IRBK-0100329

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय चरित्र

दा क्र ३२९

IRBK-0100329

नोंद क्र. ६२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावें,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

10 DEC 1970
7 DEC 1971
21 MAR 1979
30 AUG 1979
21 OCT 1980
16 JUN 1981
13 AUG 1996
2 MAR 1999
24 MAY 2000

IRBK-0100329

हिंदमहिला पुस्तकमाला—पुष्प १ लें.

# कै. श्री. रमाबाई रानडे

लेखक—उमाकांत.

प्रकाशक—वि. प. नागपूरकर,
हिंद-महिला कचेरी, मुंबई नं. ४

मुद्रक—रामचंद्र नारायण मंडलीक, बी: ए:
'लोकमान्य' प्रेस, २०७ गिरगांव मुंबई.

पुस्तकाचे सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यांनें आपल्या स्वीय नसल्याचें समजतें.

जानेवारी सन १९२५
१९२५

किंमत एक रुपया.

समर्पण.

ल्या वहिनी

या कै. वा. सौ. यो

व

धाकटी चुलतबहि

च्या पुण्यस्मृतीस.

उमाकान्त.

श्री ग्रंथ संग्रहालय नं. ३६३

# चुकीची दुरुस्ती.

## प्रकरण ५ वें, पान ९४.

"न्यायमूर्तीनीं आपल्यामागें स्थावर जंगम मिळून अंदाजें १ लक्ष ९४ हजार रुपयांची इस्टेट ठेविली. यापैकीं आपले बंधु श्रीपादराव व नीळकंठराव यांना प्रत्येकीं पंचवीस पंचवीस हजार रुपये दिले. आणि ५० हजार रुपयांचा ट्रस्ट करून रमाबाईना त्याचे सोल ट्रस्टी नेमिलें. ह्या ट्रस्टनें व्याजांतून अनेक संस्थांना वार्षिक देणग्यांचा क्रम चालू ठेविला. रमाबाईच्यासाठीं त्यांनीं लोणावळें येथील त्यांचा रहाण्याचा बंगला व तेथील मिळकत ठेविली; आणि त्यांच्या मोठेपणाच्या दर्जाला शोभेसा खर्च धर्म वगैरे करण्याची तरतूद करून ठेविली होती. आपल्या सावत्र बंधूचा मुलगा नानू यास दत्तक घ्यावा असें सांगितलें; आणि त्यांच्या केवळ आज्ञेनुसार १९०२ सालीं रमाबाईनीं त्याला दत्तक घेतलें."

## प्रकरण १३ वें.

"घरखर्चाकरितां ठेविलेले ३६०० रुपये मृत्युपत्राप्रमाणें दत्तक मुलाकडे गेले. त्यांचें स्त्रीधन ..." वगैरे माहिती विश्वसनीय नसल्याचें समजतें.

आ. र. ८१३

# आभार प्रदर्शन.

आज 'हिंदमहिला पुस्तक माले'चें पहिलें पुष्प आमच्या वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस आनंद वाटत आहे. सत्कार्य हातीं घेतलें कीं, मदत स्वयंस्फूर्तीनें मिळूं लागते याचा अनुभव हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविल्यापासून आम्हांला आला व त्यामुळेंच हें पुस्तक वाचकांच्या हातीं उशीरां पडत आहे. पुस्तक लिहावयाला सुरवात झाल्यावर अधिकाधिक माहिती हातीं येऊं लागल्यामुळें हा उशिर झाला आहे. हें पुस्तक ता. २६--१०--२४ लाच प्रसिद्ध करण्याची तयारी केली पण शेवटीं ह्या मार्गांत इतक्या कांहीं अडचणी उपस्थित झाल्या कीं एका संकटांतून डोकें वर काढावें तों दुसरें संकट पुढें दत्त म्हणून हजर. चरित्र लेखक श्री. उमाकांत ह्यांचे आजारीपण, हिंदमहिला वर्तमान पत्रावरील एक कौटुंबिक आपत्ती, व श्री. काशीबाई कानिटकर ह्यांच्या एकुलत्या एका कन्येचे पती व इचलकरंजी संस्थानचे प्रजाप्रीय युवराज यांचें अकालीं निधन, अशा ह्या अडचणीच्या त्रिविध तापांत सांपडल्यामुळें गेल्या सप्टेंबरांत प्रसिद्ध होणारें चरित्र आज जानेवारी महिन्यांत वाचकांच्या हातीं पडत आहे, याबद्दल वाचक आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविल्यावर कै. रमाबाई यांचे बंधु श्री. बाबासाहेब कुर्लेकर यांना व न्यायमूर्ती रानडे यांचे चरित्रकार श्री. नरहर रघुनाथ फाटक यांना माहिती पुरविण्याची विनंति करतांच त्यांनीं या कामीं सर्व तऱ्हेची मदत आपलें काम समजून केली आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यास आमच्याजवळ शद्ब नाहींत. तसेंच कै. रमाबाई रानडे यांचे नातू श्री. देवदत्त यांनीं आपल्या आठवणी दिल्या आणि औरंगाबादेच्या मुलींच

शाळेनें आपला रिपोर्ट पत्र पाठवितांच त्वरित पाठवून दिला याबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहोंत.

चरित्रलेखनाचं काम 'हिंदमहिले'तील एक लेखक श्री. उमाकांत यांनीं हौसेनें अंगावर घेतल्यामुळें हें पुस्तक इतक्या लौक् हातीं देतां येत आहे. राणीचें राज्य सुरू झाल्यापासून महाराष्ट्राच्या संसारांत जीं स्थित्यंतरें चालू आहेत त्या स्थित्यंतरांच्या पडद्यावर क. रमाबाई यांचें चरित्रचित्र कसें दिसत हें दाखविण्याचा श्री. उमाकांत यांनीं प्रयत्न केला आहे तो आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

कै. रमाबाईचें चरित्र प्रसिद्ध करण्याचा मनोदय जाहीर करतांना कै. रमाबाईच्या चरित्राचा आणि महाराष्ट्रांतील शिक्षणाच्या चळवळीचा अविभाज्य संबंध आहे असें आम्हीं म्हटलें होतें व या दृष्टीनें या चरित्राची पूर्तता करण्यासाठीं काहीं परिशिष्टें जोडण्याचा आमचा विचार होता; पण मूळ पुस्तकच मोठें झाल्यामुळें हा बेत रहित करावा लागला. तथापि ही माहिती नव्या पुस्तकांच्या रुपानें वाचकांच्या हातीं देण्याचा आमचा विचार आहे. के. रमाबाई यांच्यासंबंधींच्या कांहीं आठवणी आमच्या हातीं आहेत व आणखी कांहीं मिळतील. या आठवणी व चरित्रांत द्यावयाचीं परिशिष्टें यांचें सुमारें दीडशें पानांचें स्वतंत्र पुस्तकच 'हिंदमहिला पुस्तक मालें' तून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

ह्या पुस्तकांचीं प्रुफें वाचून अभिप्राय देण्याची प्रो.फडके, श्रीमती जानकीबाई भट, सुबोध पत्रिकेचे संपादक श्री. वैद्य यांना विनंति केली व त्यांनींहि ती मान्य केली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. श्रीमती काशीबाई कानिटकर यांचे आभार मानण्याचें काम आजच आम्ही उरकून घेऊं इच्छित नाहीं. त्यांचा व 'हिंद महिले'चा ऋणानुबंध वाढावा अशी आमची फार इच्छा आहे. प्रस्तावना लिहून देण्याचें मान्य केल्याबद्दलचे

आभार जरी आम्ही मानून आज मोकळे होऊं इच्छित नाहीं तरी घरगुती आपत्तींत असतांहि त्यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे आम्हीं ऋणी आहों.

पुस्तकाच्या छपाईवरून 'लोकमान्य' छापखान्यानें किती दक्षतेनें आणि हौसेनें काम केलें आहे हें वाचकांच्या नजरेस येईल. लोकमान्यांतील मंडळींच्या नांवाचा उल्लेख करून आभार मानण्याची परवानगी नसल्यामुळें आम्हीं त्यांचे सर्वांचे एकत्रित आभार मानतों.

हिंद महिला कचेरी<br>मुंबई नं. ४<br>ता. २८।१।२५.

सौ. अवंतिकाबाई गोखले.

ग्रंथ संग्रहालय
... ठाणे, ...
वा. क. ........
वि. ..........

# अभिप्राय.

## न्या. रानडे यांचे चरित्रकार श्री. न. र. फाटक, बी. ए.

श्री. उमाकांत यांनीं लिहिलेलें कै. रमाबाई रानडे यांचें चरित्र मी आमूलाग्र वाचलें आहे. रमाबाई रानडे यांच्या निधनाला अद्यापि सहा महिने पुरे झाले नाहींत. इतक्यांत जेवढी माहिती मिळवितां आली तेवढी मिळवून श्री. उमाकांत यांनीं कै. रमाबाईंचें चरित्र महाराष्ट्रीय वाचकांसाठीं तयार केलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच होईल. रमाबाईंच्या चरित्राची सामग्री त्यांनीं लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' बाहेर अतिशय थोडी होती. परंतु 'कौशल्य आहे रचनत मोठें' या कव्युक्तीप्रमाणें उपलब्ध झालेल्या माहितीची मांडणी अत्यंत कौशल्यानें करून श्री. उमाकांत यांनीं आपल्या चरित्र विषयाला एक प्रकारचा अपूर्व नवेपणा आणला आहे व हाच या पुस्तकाचा विशेष आहे. या पुस्तकांतून महाराष्ट्रांतील सुशिक्षित स्त्रीसमाजाला पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे व तसा बोध घेण्याची आज आवश्यकताहि आहे. पुस्तकाची भाषा मनोवेधक आणि हृदयंगम असल्यानें सुरवातीपासून अखेरपर्यंत कंटाळवाणा भाग मुळींच आढळत नाहीं. श्री. उमाकांत यांनीं महाराष्ट्रांतील चरित्र वाङ्मयांत एका चांगल्या पुस्तकाची भर टाकली असल्यानें साक्षर महाराष्ट्राकडून त्याचें उदार आश्रयाच्या रूपानें चीज झाल्याशिवाय रहाणार नाहीं असा भरंवसा आहे. सेवासदन, महिला विद्यापीठ आणि स्त्री शिक्षणाच्या सरकारी संस्था यामधील अभ्यासक्रमांत हें पुस्तक ठेवलें जावें अशी माझी त्या त्या संस्थांच्या चालकांना श्री. उमाकान्त यांच्या वतीनें शिफारस आहे.

मुंबई,
ता. २४।१०।२४

न. र. फाटक.

## हिस्लॉप कॉलेजचे प्रो० ना. सी. फडके, एम. ए.

श्री. उमाकांत यांनीं लिहिलेलें श्रीमती रमाबाई रानडे यांचें चरित्र मी समग्र वाचून पाहिलें. या चरित्रापासून सर्वांना बोध घेण्यासारखा आहे हें तर खरेंच, पण रमाबाईंचें चरित्र विशेषतः महाराष्ट्रीय स्त्रियांना उद्बोधक व्हावयाचें असल्यामुळें चरित्रकारांनीं पुस्तकांत जी साधी, सरळ व रसाळ भाषा वापरली आहे तिच्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. चरित्रांतील विविध प्रसंगांची मांडणीहि चांगली साधली आहे, व ^ ी रमाबाईच्या आयुष्यांतील कांहीं प्रसंगांच्या निमित्तानें एकंदर महाराष्ट्रीय संसाराविषयीं जे सामान्य विचार चरित्रकारांनीं मधून मधून प्रगट केले आहेत तेहि मार्मिक आहेत. खरें शिक्षण कशाला म्हणावें, तें प्राप्त करून घेण्याच्या मार्गांतील अडचणी कशा कुशलतेनें दूर कराव्या, आणि शिक्षण व आपली आर्य संस्कृति यांचा विरोध असल्याचा भासहि लोकांना होणार नाहीं अशा कटाक्षानें आपलें वर्तन कसें ठेवावें इत्यादि गोष्टींचा सुलभ आणि सोदाहरण खुलासा आमच्या भगिनींना पहावयाचा असल्यास तो त्यांना श्रीमती रमाबाईच्या चरित्रांत पहावयास सांपडेल, हेंच त्यांच्या आयुष्याचें रहस्य होय. हें रहस्य लक्षांत वागवून व तें शक्य तितकें स्पष्ट करण्याच्या धोरणानेंच चरित्रकारांनीं हें पुस्तक लिहिलें आहे हें जागोजाग स्पष्ट दिसून येतें. श्री. उमाकांत यांनीं यंदांच्या दीपोत्सवप्रसंगीं आपल्या भगिनीवर्गास हें चरित्र म्हणजे एक बहुमोल भाउबिजेची भेट देऊं केली यांत संशय नाहीं. आमच्या भगिनींनीं या भेटीचा आदरानें स्वीकार करावा, व श्री. कर्वे यांच्या महिलाविद्यापीठासारख्या संस्थांनीं हें चरित्र आपल्या क्रमिक पुस्तकांत अंतर्भूत करावें, म्हणजे स्त्रियांच्या उन्नतीस पोषक असें आणखी वाङ्मय निर्माण करण्याचा श्री. उमाकांत यांचा उत्साह द्विगुणित होईल.

हिस्लॉप कॉलेज,
नागपूर ता. ११।१०।२४

ना. सी. फडके.

## श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य, संपादक सुबोधपत्रिका.

श्री. उमाकान्त ह्यांनीं लिहिलेलें श्रीमती रमाबाईसाहेब रानडे ह्यांचें चरित्र व त्यासच जोडलेल्या श्रीमती काशीबाई कानिटकर ह्यांनीं लिहिलेल्या आठवणी व प्रस्तावना हीं प्रकाशकांनीं कृपा करून मला वाचावयास दिलीं. रा. उमाकान्त ह्यांस हें चरित्र लिहावयास त्यांची श्री. रमाबाईविषयींची आदर बुद्धीच कारण झाली. १९०२ सालीं जान्युआरी महिन्यांत गुरुवर्य डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर ह्यांनीं न्या. मू. रानडे ह्यांच्या धर्मपर व्याख्यानांसाठीं उपोद्घात लिहिते वेळीं रमाबाईंना " पूज्य रमाबाई " असें म्हटलें आहे. त्यावेळीं आयुष्यांतील आठवणी लिहिण्याची मनःस्थिति रमाबाईंची नव्हती; सेवासदनाची शाखा पुण्यास स्थापावी हा विचार कोणाला सुचला नव्हता व स्वतः रमाबाई अज्ञातवासांत होत्या. सारांश, महाराष्ट्राला रमाबाई आज ज्या आदरणीय वाटत आहेत त्या आठवणींसारखें अलौकिक पुस्तक त्यांनीं लिहिलें व सेवासदनाच्या द्वारें त्यांनीं आपल्या कर्तृत्वाची ओळख महाराष्ट्रास करून दिली म्हणून, परंतु त्यापूर्वीच त्यांच्या आंगच्या अनेक गुणांमुळें डा. भांडाकरासारख्या वयोवृद्ध व आदरणीय गृहस्थांस त्या पूज्य वाटत. अशा विशेष कर्तृत्ववान व विशेष गुणी स्त्रीचें चरित्र रा. उमाकांत ह्यांनीं महाराष्ट्रीयांस सादर केलें आहे. चरित्र लिहितांना मन पक्षाभिमानापासून अलिप्त ठेवण्याचा रा. उमाकांत यांचा प्रयत्न प्रशंसनीय आहे. रमाबाईंची योग्यता कळावयास ह्या चरित्राचा उपयोग पुष्कळ होईल. चरित्राची भाषा साधी, विवेचन सरळ व रचना व्यवस्थित आहे. श्री. रमाबाई साहेबांचें हें चरित्र कांहींसे अपुरें व त्रोटक आहे असें वाटतें, हें येथें नमूद केलें पाहिजे. परंतु ही उणीव रा. उमाकान्त ह्यांनीं लिहिलेलें चरित्र पाहून पुढें मागें भरून निघण्याचा संभव आहे. श्री. रमाबाईंची योग्यता व त्यांच्या कार्याचें महत्त्व ह्यांची कल्पना प्रस्तुतचें चरित्र चांगल्या रीतीनें करून देईल, यांत कांहीं संशय नाहीं.

संपादक—सुबोधपत्रिका.

# प्रस्तावना

गेल्या ता. ३० जुलै रोजीं सौ. अवंतिकाबाई गोखले यांनीं श्री. कै. बा. रमाबाईसाहेब रानडे यांच्या चरित्राला मी प्रस्तावना लिहावी असा त्यांनीं आपला मानस कळविला. त्यापूर्वी मी पुण्यास असतांना चि. रा. देवदत्त-राव व चि. रा. राजारामपंत असे दोघे मजकडे आले होते व मी श्री. वहिनीबाईंचें चरित्र लिहावें अशी आपली इच्छा आहे असें त्यांनीं सांगितलें. त्यांनीं चरित्राची सामुग्री देण्याचें कबूल केलें व मीहि लिहिण्याचें कबूल केलें. नंतर वरील पत्र आलें व त्या पत्राचेंहि मी उत्तर होकारार्थी दिलें. 'हिंदमहिलेचें' चरित्र आपल्यापूर्वी तयार होईल असें वाटून त्याला अनुमोदन दिलें. चरित्र गेल्या अनंतचतुर्दशीला प्रसिद्ध होणार होतें; परंतु आक्टोबर २०-२१ ला माझ्या हातीं पडलें. त्यानंतर दिपवाळीची व संयुक्त प्रांतांतली दुर्गापूजा वगैरे सणाच्या गर्दीत मला त्याकडे पहाण्यास झालें नाहीं व ता. २९ ला अत्यंत अपरिहार्य कारणानें मला येथें यावें लागलें. त्यामुळें मला लिहिण्यास जितकी फुरसद मिळावी तितकी मिळाली नाहीं. आणि मनाचेंहि स्वास्थ्य नसल्यामुळें केवळ माझ्या अत्यंत प्रिय जेष्ठ भगिनीच्या करतांच मी हें काम करीत आहें.

हें चरित्र रा. देवदत्तरावांनीं दिलेल्या सामुग्रीवरून व 'आयुष्यांतील' आठ-वणीवरून लिहिलें आहे. घरगुती स्वरूपाच्या गोष्टी सर्व आठवणींत आहेत. यामुळें त्याला आत्मचरित्राप्रमाणें महत्त्व आलें आहे. रा. उमाकांत यांनीं अतिशय काळजीपूर्वक व सहानुभूतीचे भावनेनें हें लिहिलें आहे. भाषा साधी व भारदस्त असल्यामुळें वाचणाराला आनंद वाटतो. जसा कै. बा. रमा-बाईसाहेबांचा स्वभाव प्रेमळ होता तशाच प्रेमभावानें चरित्र लिहिलें असल्यामुळें लेखकाच्या अगत्याची व निष्ठेची प्रचिती त्यांत येते.

त्यांच्या कांहीं कांहीं गुणांचा विशेष रीतीनें उठाव झाला नाहीं असें वाटल्यावरून मी त्यांच्यासंबंधीं चार ओळी या प्रस्तावनेस जोडल्या आहेत. रा. उमाकांतानीं चरित्र लेखनाच्या वेळीं आपलें मन अगदीं समतोल व निर्विकार ठेऊन चरित्र लिहिलें आहे त्यामुळें अतिशयोक्ति किंवा अंधश्रद्धा हा दोष त्यांत आला नाहीं. जशा गोष्टी घडल्या तशाच त्या नमूद केल्या आहेत. आणि चरित्र लेखक असाच ताजव्याप्रमाणें समतोल असावा. नाहीं तर कांहीं गोष्टी विनाकारण कादंबरीवजा वाचकाच्या पुढें येतात. नाहीं तर ज्या गोष्टी जगापुढें यावयास पाहिजे असतात त्याचा लोप होतो. ह्या दोषापासून रा. उमाकांत अलिप्त राहिले आहेत. वहिनीबाईचें चरित्र म्हणजे प्रत्येक होतकरू हिंदकन्येचा आदर्शच आहे. पूर्वी थोर थोर स्त्रिया पुष्कळ होऊन गेल्या व त्या त्या काळच्या स्त्रीवर्गास त्यांचें चरित्र वंदनीय व आदरणीय झालें. तशाच सध्याच्या बदललेल्या देशस्थितींत श्री. कै. रमाबाई ह्या अत्यंत पूजनीय झाल्या. चालू काळच्या राष्ट्रकन्यांनीं त्यांचेप्रमाणें होण्याचा प्रयत्न करून त्यानीं दाखवलेल्या मार्गाचें अवलंबन करावें. देशांतील आपआपला कार्यभाग करून देशाचें उतराई व्हावें.

कै. वहिनीबाई गेल्या नसून त्या किर्ती रूपानें जीवंतच आहेत. त्या आपल्या सौजन्यानें, कृतीनें व परोपकारानें अमर झाल्या आहेत. त्यांच्यासंबंधींचें कर्तव्य रा. उमाकांत यांनीं फार चांगल्या तऱ्हेनें बजावलें यांत बिल्कूल संशय नाहीं. कै. वहिनीबाईनीं महाराष्ट्रावर केवढे उपकार केले आहेत यांची साक्ष त्यांच्या मृत्युलेखांत आहेच. वहिनीबाईचें चरित्र भावी पिढीच्या पुढें आदर्शाप्रमाणें होऊन वहिनीबाईसारख्या अनेक हिंदकन्यका या राष्ट्राला लाभोत. इमारतीच्या पायाचें काम या दंपत्यानें करून वरच्या इमारतीचा नकाशा रेखाटून जनतेपुढें ठेवला आहे त्या नकाशाप्रमाणें इमारत उठविण्याचें काम भावी पिढीवर त्यानीं सोपविलें आहे. वहिनीबाईच्या सेवासदनासारख्या निरनिराळ्या कामाच्या संस्था सर्व देशांत अनेक व्हाव्यात वा

इच्छेनेंच त्यांनीं आपल्या संस्थेचा नमुना लोकांच्या डोळ्यापुढें ठेवला आहे. प्रेमानें, सहानुभूतीनें, नम्रतेनें व निरलसपणानें वागलें असतां कार्यसिद्धी होऊन लोकादरास पात्र होतां येतें, हें उदाहरण वहिनीबाईनीं लोकांपुढें मांडून ठेवलें आहे.

त्यांचें निधनवृत्त लिहीत असतां केसरीकारांनीं एक उपमा दिली होती. ती अत्यंत बरोबर व वहिनीबाईचें शील दर्शविणारी आहे. ती मी याखालीं देऊन त्यांची व वाचकांची आज्ञा घेते. " कै. रावसाहेब रानड्यांच्या हयातींतच वहिनीसाहेबांची योग्यता समाजास कळून आली होती. तथापि ज्याप्रमाणें सूर्याच्या सान्निध्यानें चंद्राचा प्रकाश दुणावत नसून उणावतो त्या प्रमाणें न्यायमूर्तींच्या व्यापक तेजांत रमाबाईचें तेज वेगळें भासमान होत नव्हतें. परंतु सूर्यास्तानंतर जसा चंद्राचा शीतल प्रकाश प्राणीमात्रास आल्हाद देतो त्याप्रमाणें गेलीं तेवीस वर्षें श्रीमती रमाबाईनीं आपल्या परोपकार बुद्धीनें, स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्तृत्वानें आणि मातृवात्सल्यानें महाराष्ट्रीय समाजास ऋणी करून ठेविलें आहे. "

इचलकरंजी,

काशीबाई कानिटकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. नं. २५८२
२

# श्री. काशीबाई कानिटकर यांच्या आठवणी.

श्रीमति के. रमाबाईसाहेब यांची माझी ओळख--चांगली ओळख -पंडिता रमाबाई पुण्यास आल्या तेव्हां झाली. त्यापूर्वी मी त्यांचें नुस्तें नांव ऐकत होतें. त्या जेव्हां मुंबईस होत्या तेव्हां मी जरी मुंबईस रहात होतें तरी अशा मंडळींत वावरण्यासारखी नव्हतें. कारण त्या कर्त्या पुरुषाच्या पत्नी होत्या व मी विद्यार्थीदशा न संपलेल्यांची गृहिणीः—सासु, सासरे, आजेसासु, आजेसासरे, नंणदा,दीर इत्यादिकांच्या कुटुंबांतली सासूरवाशीण होतें. तेव्हां त्यांची माझी ओळख होणें शक्यच नव्हतें. पंडिताबाई इकडे आल्या तत्पूर्वीच त्यांच्या विद्वत्तेची व वक्तृत्वाची कीर्ति इकडे वर्तमानपत्रांतून आली होती. त्या वेळीं स्त्रियांचें वक्तृत्व म्हणजे एक अलौकिक गोष्ट होती. बायको माणुस बोलते तरी कशी हे पहाण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. पंडिताबाईंचीं व्याख्यानें आपणां पुरुष वर्गाला एकट्याला ऐकावयास मिळतील. कारण युरोपिअन विद्वान स्त्रियांचीं भाषणें जशी आपणांस ऐकावयास मिळतात तसेंच हेंहि घडेल पण पंडिताबाई कसल्या वस्ताद ! ! त्यांना हा पुरुषांचा कावा पूर्ण माहिती ! !

पंडिताबाईंचीं व्याख्यानें पुराणें वगैरे जें काय होईल त्याच्या निमंत्रण पत्रिकेंत एक अट नेहमीं घातलेली असे ती ही कीं, ‘ जे कोणी पुरुष व्याख्यानाला येतील त्यांनीं आपली पत्नी, मुलगी, सून, बहीण, भावजय अशापैकीं खुद्द आपल्या घरची स्त्री बरोबर आणल्या शिवाय त्यांना रांगेत बसतां येणार नाहीं. ’ या त्यांच्या अटीमुळें मला माझ्या श्वशुरांच्या बरोबर पंडिताबाईस व त्याच प्रसंगी रमाबाईस पहाण्याचा योग आला. त्यानंतर मग मी जेव्हां जेव्हां पुण्यास जाई तेव्हां तेव्हां वहिनीबाईंची गांठ भेट

होई. विशेषेंकरून चैत्र महिन्यांत जर मी तेथें असलें तर त्यांच्या गांठी वरचेवर पडत. मी मुंबईच्या प्रार्थनासमाजाच्या मुख्य शाळेंतील सभेला जात असें तेव्हां वहिनीबाई रानडे तेथें नव्हत्या. त्या वेळीं सभेला नियमाने येणाऱ्यापैकीं, डॉ. भांडारकरांच्या येथील मंडळी, कै. वा. म. वागळ्यांची मंडळी, श्री. उषाबाई पंडित, कै. स. पा. केळकरांची मंडळी, प्रथमच पुनर्विवाह झालेल्या रखमाई व आणखी कांहीं समाजिस्टांच्या स्त्रिया, कै. भास्कर हरि व राजारामशास्त्री भागवत, रखमाबाई मोडक वगैरे अधून मधून येत असत. त्या वेळच्या मुंबईतील सुशिल बायका आमच्यामध्यें फारशा मिसळत नसत व त्यांच्या दृष्टीनें आम्ही फारच अडाणी व अज्ञानी अशा कदाचित दिसत असूं.

माझें रहाणें पुण्यांत जास्त जास्त होऊं लागलें तसा तसा माझा व श्री. रमाबाईचा स्नेह जमूं लागला. वास्तविक धन, मान व विद्या या तीन गोष्टींपैकीं एखाद्या गोष्टीचें तरी साम्य असावें लागतें पण आम्हा दोघींत यासंबंधानें जमीन अस्मानाचें अंतर म्हटलें तर अतिशयोक्ति होईल काय ? त्यांच्या धन, मान व विद्या यांच्या पासंगासहि माझी तुलना लागणार नाहीं. पण त्यांचा स्वभाव चांगला व साधा असल्यामुळें स्नेह जडला.

कै. रावसाहेब रानडे स्पेशल जज्ज झाल्यावर माझी व श्री. वहिनी बाईची गांठ वर्षांतून एकदां मे महिन्यापूर्वीही पडत असे. तालुक्याच्या गांवीं त्यांची स्वारी आली म्हणजे तीन चार दिवस तरी त्यांचा मुकाम खात्रीनें तेथें होई. न्याशनल कॉंग्रेसचा जन्म झाला त्या वर्षी नाताळच्या अगोदर त्यांचा दौरा नगर जिल्ह्यांत नेवासें तालुक्यांत होता. कॉंग्रेसची घटना अगदीं बाल्यावस्थेंत असल्यामुळें फारशी मंडळी जमली नव्हती तर बायका तरी कोठून जाणार ? रावसाहेबांना जाणें जरूरच होतें, कारण सर्व चळवळीचे ते सूत्रधार होते. तेव्हां बाकीच्या मंडळींनीं वेरूळचीं लेणीं पहा-

ण्याचा बेत केला. रावसाहेबांनीं मुंबईस जावें व रानडे कुटुंब व आम्हीं वेरूळाकडे जावें, असा आमचा व वहिनीसाहेबांचा बेत ठरला. सुटी सुरू होतांच तो आम्हीं अमलांतही आणला. या योगानें परिचय दृढ होऊन त्यांच्या स्वभावाची चांगली ओळख पटली. त्यांचा स्वभाव अतिशय प्रेमळ होता. आपपरभाव अति सूक्ष्म प्रमाणांत असे. म्हणजे व्यवहाराला जेवढी जरूर आहे तेव्हढाच तो त्यांच्यांत होता. इतका असणें हा मनुष्य स्वभाव आहे, मानव देहांत राहिलेल्या प्रत्येक जिवात्म्याला तो तितका अवश्यकच आहे. सर्व संग परित्यागी म्हणनणाऱ्यांनासुद्धां माझा लोटा, माझी मठी, माझी छाटी असें म्हणावें लागतें, मग प्रापंचिकाला तर तो तितका असणारच.

त्यांच्या बरोबर त्यांचे दोघे दीर कै. नीलकंठराव उर्फ आबासाहेब, त्यांची पत्नी गंगाबाई, धाकटे दीर डॉ. श्रीपतराव उर्फ बाबासाहेब व वहिनीबाई अशी खाशी मंडळी होती व शिवाय शिपाई, ब्राह्मण, गाडीवाले वगैरे व कांहीं त्यांच्या ऑफिसची माणसें व आमच्याहि ऑफिसची माणसें होती. सर्व चार ठिकाणचीं चार जमलेली होती. पण वहिनीबाईंच्या सौजन्या-मुळें आम्हीं एकोप्यानें राहिलों. त्यांनीं रावसाहेबांना पत्नी त्यांच्या योग्य कशी शोभेल याचें चित्र आपल्या हृत्पटलावर रेखून ठेवलें होतें व त्याबरोबर आपली वागणूक ठेवावयाची असा निश्चय केला होता. कठोर शब्द त्यांच्या वाणींत कधींच येत नसे. त्यांचे शब्द जसे मृदु असत त्याहून त्यांचें अंतःकरण मृदु असे. त्या मृदु अंतःकरणाची एक दोन उदाहरणें दिलीं असतां वाचकांना ओळख पटेल.

कायगांव, टोकें व प्रवरासंगम अशीं तीन गांवें श्रीगोदावरी व प्रवरा यांच्या संगमाजवळ आहेत. तेथें प्रवरासंगमीं आम्हीं मुक्काम करून टोकेंगांव पहाण्यास निघालों. टोक्यास जातेवेळीं प्रवरा ओलांडावी लागते. प्रवेरला पाणी कांहीं फार नव्हतें. सरासरी गुडघ्याच्या वर असेल. पण

वहिनीबाईंचे दीर आबासाहेब अत्यंत भित्र्या स्वभावाचे होते हें वहिनीबाई जाणून होत्या. त्यांनीं अगोदर पासूनच दोन शिपायांना दोहों बाजुस त्यांचे हात धरून चालण्यास सांगितलें होतें. पाणी थोडें गुडघ्याच्या वर लागतेंसें वाटतांच व प्रवेरला थोडी ओटाहि जास्त असल्यामुळें आबासाहेब 'वहिनी वहिनी' करून ओरडूं लागले व आम्हीं सर्व मंडळीं त्यांच्या भितरेपणाबद्दल हसूं लागलों, पण वहिनीबाई खरोखरच घाबरल्या. त्यांना वाहून जाण्याची भिती वाटली नाहीं पण आबासाहेबांना भितीमुळें धसका भरेल याची फार भीति वाटून त्या त्यांच्याजवळ समाधान करण्यास व धीर देण्यास धांवल्या. या वहिनीबाईच्या भितरेपणाबद्दलहि आम्ही त्यांचीहि थट्टा केली. परंतु त्यांचा स्वभावच तसा असल्यामुळें त्या आम्हांवर रागावल्या नाहींत. दुसरा प्रसंग औरंगाबादेस आला. रावसाहेब मुंबईस पहिल्या कॉंग्रेसला गेल्यावर मुंबईच्या वृत्तपत्रांतून मुंबईस कॉलरा उद्भवल्याच्या बातम्या येऊं लागल्या. यामुळें नसत्या कुकल्पनांनीं त्यांना-वहिनीबाईंना-हैराण करून सोडलें. त्यांना रात्रीं झोंप नाहीं, दिवसा सारखें रडण्याशिवाय दुसरें सुचूं नये व पानांवर बसलें असतां अन्नाचा घांस घशाखालीं उतरूं नये अशी त्या कल्पनांनीं त्यांची स्थिती करून टाकली. आम्हीं सर्वांनीं आपल्याकडून पराकाष्ठा केली. पुष्कळ धीराच्या गोष्टी सांगितल्या, परंतु त्यावेळच्या त्यांच्या मनःस्थितीला त्या पटल्या नाहींत. जेव्हां मुंबईहून खुशाली कळली तेव्हां त्यांचें मन शांत झालें.

त्यांनीं आपला क्रोध आवरून धरण्याचेंही एक व्रत पाळलें होतें. भूत-दया तर त्या स्वतःच मूर्तिमंत होत्या.

पुण्यास त्यांच्या घरीं बरेचसे गरीब विद्यार्थी असत.एका रविवारीं जेवणास उशीर होता. घरांत कांहीं नैमित्तिक होतें. त्या गडबडींत त्या मुलांना सकाळचे फराळास मिळालें नव्हतें. बिचाऱ्यांना अतिशय भूक लागली होती.

इतक्यांत अक्कांनी त्यांतल्या एकास माडीवरून डेऱ्यांतून गूळ काढून आण-वयास सांगितलें. त्यानें घरांत पाहिजे होता तेवढा गूळ देऊन आपण व इतर त्याचे सोबती यांनीं सुपारी सुपारी एवढा गूळ खाऊन ते पाणी प्याले. या त्यांच्य. अपराधाबद्दल अक्का व माईसाहेब त्या बिचाऱ्यांना खूप बोलल्या. तें ऐकून वहिनीबाईंना पराकाष्ठेचें वाईट वाटलें व त्या मुलांची बाजू घेऊन सासुबाई व वन्सं यांची त्यांनीं कानउघाडणी केली. त्या म्हणाल्या तुम्हीं जो त्यांच्यावर चोरीचा आरोप घालता तो फुकट आहे. तुम्हीं होऊन गूळ काढण्यास सांगितलांत. काढतांना भुकेच्या वेळीं एक एक सुपारी एवढा तोंडत टाकला म्हणून त्यांत काय बिघडलें. त्यांनीं तुमची परवानगी घ्याव-याला पाहिजे होती पण गडबडींत असल्यामुळें राहिली. आणखी त्यांना हें आपलेंच घर आहे यांत परकेपणा नाहीं असें वाटून त्यांनीं खाल्ला हा त्यांचा अपराध झाला असें मला मुळींच वाटत नाहीं. उलट मोकळ्या मनाचीं मुलें आहेत असेंच वाटतें. या वहिनीबाईंच्या मध्यस्तीचा फार उत्तम परिणाम झाला असें जरी म्हणतां येणार नाहीं तरीं घरांतील बायकांच्यावर त्याचा थोडा तरी परिणाम होऊन त्यांच्या भाषेंतील कठोरपणा अंशतः कमी झाला यांत संशय नाहीं. असें जरी होतें तरी वहिनीबाईंना प्रसंगविशेषीं यासंबं-धाचे टोमणे बसण्यांत मात्र काटकसर किंवा प्रसंगाचा विसर कधींच पडला नाहीं.

त्यांनीं क्रोधाला जिंकण्याचें व्रत कांहीं दिवस घेतलें होतें. एखादें व्रत घेतलें म्हणजे त्यांत अडथळे हे वारंवार यावयाचेच. त्याप्रमाणें त्या व्रत परिपालन करण्यांत पराकाष्ठा करीत. एकदां त्यांच्या चोपदारानें टपाल आणून रावसाहेबांच्या जवळ त्यांचें दिलें व वहिनीबाईंच्या जवळ वहिनी-बाईंचें दिलें. चोपदार टपाल देऊन परत जातो तोंच रावसाहेब त्यांस म्हणाले कीं 'बाकीचें टपाल काय केलेंस? घेऊन ये इकडे!' ही झालेली

आज्ञा ऐकून तो परत येऊन टपाल मागूं लागला. तो परत येईपर्यंत वहिनी-बाईनीं आपल्या माहेरच्या आप्तापैकीं आलेलें पत्र फोडून वाचण्यास आरंभ केला होता. टपाल मागितल्याबद्दल वहिनीबाईंना वाईट वाटलें व थोडासा राग आला. रागाच्या सपाट्यांत त्या शिपायालाच बोलल्या कीं, ' सर्व टपाल तिकडे नेऊन तिकडून फोडून वाचून घरांत देण्यास सांगितल्याशिवाय तूं कां तें इकडे आणलेंस ?' व रावसाहेबांना उद्देशूनहि त्या म्हणाल्या 'माझ्या माहेरचेंच पत्र होतें. कांहीं कुठल्या कारस्थानाचा त्यांत बेत केलेला नव्हता. किंवा कोणाचे घातपात करण्याचे बेत केलेले नव्हते. एवढा अविश्वास कशाला ?' असें म्हणून त्यांना तो राग व ती परवशतेची कल्पना असह्य होऊन नेत्रावाटे त्या विकारांना त्यांनीं मार्ग काढून दिला. हा प्रकार त्यांच्या शुक्रवारांतल्या वाड्यांत मागल्या दाराच्या कै. माईसासूच्या खोलीच्या दाराशींच झाला. मी त्या दिवशीं कांहीं तरी काम योजून त्या वेळीं त्यांच्या कडे गेलें होतें. म्हणून माझ्या तें दृष्टीस पडलें. व कितीहि यत्न केला तरी क्रोधाला व्यक्त होण्याला मार्ग मिळतोच हें त्यांच्या व माझ्या लक्षांत आलें. आम्ही दोघी नंतर माडीवर गेल्यावर यासंबंधानें बोलत बसलें व आपण केलेला नियम कितपत तडीस जातो हें पहाण्यास देव गुप्त रूपानें अशा-सारख्या गोष्टी घडवून आणून पहात असतो. आपणाला सावध रहावयाचें तें याच वेळीं असें मी त्यांना म्हटलें. त्यावरून त्यांचा जो रावसाहेबांच्या-वर राग झाला होता तो पार नाहींसा झाला.

वहिनीबाईंना आपल्या स्त्रीवर्गाबद्दल अतोनात अभिमान वाटे. स्त्रीजातीकडून कोणतीहि वाइट गोष्ट घडली असतां त्यांना फार वाईट वाटे. ती गोष्ट सर्व स्त्रीवर्गाला कमीपणा आणणारी अशी वाटून त्यांना फार दुःख होई. असा प्रकार कोठें घडण्याचा संभव आहे असें कळलें तरी त्यांना दुःख होई व त्या त्या ठिकाणीं जाऊन खरा

प्रकार समजून घेऊन होण्यासारखा असला तर त्याचा प्रतिकारही करीत. पुण्यास पहिली कॉंग्रेस भरली तेव्हांची एक गोष्ट मला आठवते. त्यावेळीं पुण्यास सुधारक व पुराणमतवादी यांच्या सामाजिक परिषदेसंबंधीं मतभेद उत्पन्न झाला होता. शिवाय राजकीय सभेला येणाऱ्या बायकांच्यावरहि टीका चालत असे हें सर्व विश्रुतच आहे. कॉंग्रेसला जाण्यास बहुतेक आम्ही सर्व एकत्र जमून जात असूं. निदान परत येतांना तरी एकदम मंडपांतून बाहेर पडत असूं. एक दिवस बाहेर गांवची आलेली एक स्त्री वाटेल तिकडे कॅंपमध्यें भटकत असलेली त्यांना आढळली. तिचें भटकणें हें सर्व स्त्रियांना व स्त्रीशिक्षणाला बाधक होईल असें वहिनीबाईंना वाटलें. त्या आपली गाडी मागें थांबवून ठेऊन व्हालंटिअरकडून शोध करवून त्यांनीं तिला आणवली व आपल्या गाडींत बसवून घेऊन त्यांनीं तिला तिच्या घरीं पोहचती केली. पाठीमागून समजलें कीं तिला कांहीं थोडा भ्रमाचा विकार झालेला होता, परंतु नांवें ठेवणारे लोक या गोष्टी थोडेच जमेंत धरणार आहेत.

चांगलें काम करीत असतांना कोणी कांहींही म्हटलें तरी त्याकडे दुर्लक्ष करावयाचें हा त्यांचा बाणा होता. पंडिताबाईनीं आर्यमहिला समाज स्थापन करण्याचें ठरविलें त्यांचा दिवस ठरला. बायका जमल्या पाहिजेत, नुसत्या चिठ्यांनीं येणार नाहींत म्हणून वहिनीबाई व त्यांच्या बरोबर दुसरी एक पुढारी मंडळींच्यापैकीं एकजण अशा दोघी येण्यासारख्या बायकांना बोलावणें करण्यास हिंडल्या. एका पुढाऱ्याच्या घरीं गेल्या. तेंथें त्या गृहस्थाची बायको विरुद्ध मताची आहे हें त्यांना ठाऊक नव्हतें. त्या गेल्यावर त्या गृहधनीनीनें त्यांना बसण्यास आसन दूर दिलें. इकडल्या तिकडल्या गोष्टी निघाल्या त्या तिच्या प्रत्येक वाक्यांत सुधारणाप्रिय लोकांच्यावर टीकात्मक शब्द होतेच. पण गृहधनीही सुधारणाप्रिय असल्यामुळें तिचा रोख

यांच्या ध्यानांत आला नाहीं. शेवटीं त्यांनीं सभेचें बोलावणें केलें तेव्हां ती स्पष्टच म्हणाली कीं, " तुम्हां सुधारक बायकांनीं आतां तोंडाला रंग लाऊन समाजांत नाच करण्याचेंच तेवढें राहिलें आहे. तेवढें करून टाका म्हणजे तुमचे हात गगनाला पोहोंचतील. " या तिच्या बोलण्यानें वहिनी-बाईच्या डोळ्याला टच्कन् पाणी आलें. त्या चटकन् जाग्यावरून उठून त्यांनीं जाण्याचा रस्ता सुधारला. पण एक अक्षरही तोंडावाटे काढलें नाहीं. बरोबर असलेली दुसरी बाई खमंग होती पण आतां थांबले तर कांहीं तरी निराळच प्रकार घडून येइल म्हणून त्यांनीं तिला उलट बोलण्यास अवसरच दिला नाहीं. या त्यांच्या धोरणाबद्दल व शांततेबद्दल सर्वांनीं वहावाच केली.

आपलें माणूस एकदां म्हटलें म्हणजे त्यांत दुजेपणाचा संबध यत्किंचि-तहि येऊं द्यावयाचा नाहीं हा त्यांचा बाणा असे. त्या माणसाच्या हातून जर न कळून एखादी चूक घडली असेल तर ती सुधारून घेण्याची खटपट करावयाची. याचें एक उदाहरण म्हणून एक गोष्ट नमूद करतें.

रावसाहेबांना जेव्हां हायकोर्टाच्या जज्जाची जागा मिळाली त्या वेळीं फिरतीवर असतां माढें तालुक्यांत त्यांचा मुक्काम पांच सहा दिवस होता. माढ्याहून सोलापुरीं जाण्याच्या दिवशीं माढ्याच्या मुन्सफांनीं सर्व मंडळींनां त्यांच्या घरीं जेवण करून गाडीवर जावें म्हणजे सामान सुमान बांधण्यास सोईचें पडेल असें सुचविलें. वहिनीबाईनांहि ती गोष्ट मानवली. आदले दिवशीं वहिनीबाईनां सर्व मंडळींसंबंधीं सूचना देऊन घरधनीन आली व दुसरे दिवशींचा १० चा वत तिनें ठेवला. पात्रें वगैरे मांडून बोलावण्यास माणूस पाठविला. तो परत येऊन निरोप सांगण्यापूर्वींच वहिनीबाईची चिट्ठी आली कीं, " काल तुमच्या पुरुषांनीं पुरुष मंडळींचें बोलावणें केलें नाहीं. घरांत भात झुणक करून वाढा असें म्हणणें चाललें आहे. अजून तरी

बोलावणें पाठवा नाहीं तर तुमची खटपट व श्रम फुकट जाऊन मनाचा विरस होईल. "

हीं चिठ्ठी आल्यावर मुन्सफ गेले व त्यांची तरफदारी तेथें वहिनीबाईनीं केली. त्या म्हणाल्या, 'लहान माणसांना भीड वाटते, एकदां जर ठरलें होतें तर पुन्हां वडील माणसांना आपल्या घरासारख्या ठिकाणीं बोलावणें ते काय करावयाचें. वडील माणसांनींच आपण होऊन गेलें पाहिजे.' या त्यांच्या सरळ व आपलेपणाबद्दलच्या अभिमानाचें उदाहरण आहे. असा सरळपणा व निगर्वीपणा पाहूं गेल्यास दहा हजारांत तरी सांपडेल काय?

रावसाहेब रानड्यांनीं अल्पवयी मुलीशीं लग्न केलें, प्रौढ विधवेशीं केलें नाहीं, याबद्दल अखेरपर्यंत लोक नांवें ठेवीत होते व अजून त्यांच्याबद्दल गोष्टी निघाल्या कीं, त्यांना यासंबंधीं नांवें ठेवणारीं माणसें कांहीं थोडीं नाहींत. पण माझे मतें त्यांनीं केलें हेंच नीट केलें. वहिनीबाई सारखी हुशार, तरतरीत, अल्पवयी मुलगी केल्यानें त्यांना आपल्या उच्च ध्येयाप्रमाणें आपली सहचारिणी बनवितां आली. चित्रकार किंवा मूर्तीकार ज्याप्रमाणें ओल्या मातीला आपल्या मनाप्रमाणें आकार देऊन चित्र बनवितो त्याप्रमाणें रावसाहेब रानड्यांनीं वहिनीबाईरूपी बाहुली जगाला व त्यांच्या कल्पनेला जशी असावीशी वाटत होती त्याप्रमाणें त्यांनीं तिच्या मनाची वर्तनाची घडण घडविली. या त्यांच्या कौशल्याबद्दल महाराष्ट्र स्त्रीसमाज धन्यवादच गाईल. रावसाहेब रानड्यांनीं अनेक ळवळी देशांत सुरू ह्या. त्यांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वहिनीबाई त्यांच्याबरोबर भाग घेत असत. त्यांचीं अनेक विषयावर अनेक मतांच्या लोकांशीं संभाषणें होत. अनेक लोकांना त्यांच्या त्यांच्या अडचणी प्रसंग ऐकून घेऊन त्यासंबंधीं सल्ला मसलत देत. अनेक धंदेवाले, व्यापारी, ग्रंथकार, कवि, राजभक्त, देशभक्त, सुधारणाप्रिय, पुराणमतप्रिय, स्त्रीशिक्षणेच्छु, स्त्रीशिक्षणद्वेष्टे इत्यादि सर्व तऱ्हे " व सर्व दर्जाचीं माणसें

त्यांच्या घरीं येत. रावसाहेब पुण्यांत होते तोंपर्यंत त्यांची बैठक ओसरीवरच्या झोंपाळ्यावर असे. दोन झोंपाळे टांगलेले असत व एकावर रावसाहेब बसत व दुसऱ्यावर आलेली मंडळी बसे व तेथें त्यांचीं बोलणीं चालत ती सर्व किंवा बहुतेक वहिनीबाईंच्या कांनावर जात. यामुळें सर्व तऱ्हेच्या शिक्षणाचा लाभ त्यांना होत असे. रावसाहेबांच्याकडे जीं पुस्तकें अभिप्रायाला व ' दक्षिणाप्राइझ ' कमिटीकडून परिक्षणाला येत तीं सर्व वहिनीबाईंनाच वाचून दाखवावीं लागत व त्यावरचा अभिप्राय रावसाहेब सांगतील तसा लिहावा लागे. ही अशीं कामें रावसाहेब त्यांच्याकडून करून घेत म्हणून त्या बहुश्रुत, कोणत्याहि कामांत वाकब झाल्या. त्याचेंच फळ पुढें पुण्याचें सेवा-सदन लोकांच्या अनुभवास आलें. सेवासदनासारखी संस्था निर्माण करण्याची कल्पना जरी मि.दयाराम गिडुमल व त्यांचे परमस्नेही बैरामजी पेरवानजी मलबारी यांचीं असली तरी पुणें शाखा वाढविण्याचे, तिला अनेक अंगानीं सजविण्याचे व तिच्या प्रीत्यर्थ झीज—शारीरिक, मानसिक व सांपत्तिक—सोसण्याच बिकट काम वहिनीबाईसारखीकडे आलें म्हणूनच ती येवढी नांवारूपाला चढली. सेवासदनाच्या योगें आज अनेक गरीब निराश्रित स्त्रियांना अब्रूनें अन्नवस्त्र मिळतें आहे. अनाथ अल्पवयी मुलींना एखादा धंदा शिकून, विद्या शिकून मान्यतेनें जगांत वागण्याला मिळतें आहे. जनतेला चांगली बाजू केव्हांच दिसत नसते. जनतेचा डोळा सदा वक्रच असतो. त्या वस्तूस्थितीला सोडून पुणें सेवासदन नव्हतें. त्यांचेवरहि अनेक लोकांचे अनेक कुतर्क होतेच पण वहिनीबाईसारख्या बाईचा त्या संस्थेला खंबीर आधार होता. त्याऱ्यावर येणाऱ्या माऱ्यास तोंड देण्यास किंवा तो सहन करण्यास त्यांनीं आपला ढालीसारखा उपयोग करून घेतला. आलेल्या संकटांना त्या धिमेपणानें तोंड देत होत्या. सर्वांची मैत्री संपादन करून

जर त्यांत कोणी विरुद्ध असेल तर त्याची ती भावना प्रेमानें नाहींशी करीत होत्या.

रावसाहेब रानडे होते तोपर्यंत बाहेर गांवाहून आलेल्या मंडळींना स्त्रियांना व पुरुषांना नवीन कल्पना, नवीन बातमी, नवीन शिक्षण व नव्या माणसांची ओळख करून घेण्याचें ठिकाण जसें त्यांचें—रानड्यांचे घर होतें तसेंच त्यांच्या नंतर स्त्रियांना तरी सेवासदन हें ठिकाण होतें. वहिनीबाई गरीब, श्रीमंत, मध्यम हा भेदाभेद मनांत न आणतां प्रत्येकाशीं प्रेमानें, अगत्यानें व जिव्हाळ्यानें भेटत, बोलत व वागत. त्यांनीं कोणाशींही ताठ्याचें किंवा आढ्यतेचें वर्तन ठेवलें नव्हतें. त्यांच्या धाकट्या दोघी जावा जोंपर्यंत त्यांच्याजवळ होत्या व त्या वहिनीबाईशीं सलोख्यानें वागत होत्या तोंपर्यंत वहिनीबाई त्यांच्या प्रेमळ वडील बहिणीसारख्या वागत. सासूशीं व थोरल्या नणंदशा अत्यंत मर्यादेनें वागत. त्यांना दान धर्माची वगैरे अडचण पडूं नये म्हणून दरमहा त्यांच्या नकळत त्यांच्या पुजेच्या संबळींत- वीस- पंचवीस रुपये ठेऊन देत. वास्तवीक घर प्रपंचापैकीं दोघींच्याकडे दोन अधिकार रावसाहेबांनीं देऊन ठेवले होते. अक्कांच्याकडे मळे, शेती· वगैरेंची व्यवस्था बघावयाची व येईल तें उत्पन्न वसूल करावयाचें, बीं बेणें वगैरे सर्व त्यांच्याकडे व्यवस्था होती, व घरांतील तिजोरीकडचें काम म्हणजे दागदागिना नवीन करणें, चांदीसोनें नवें खरेदी करणें किंवा जुन्या नव्याची सांध मोड करणें, हें सर्व माईच्याकडे होतें. त्यायोगें दोघींच्या हातांत पैसा खेळत असे. पण त्या त्यांतून घेतील न घेतील, कदाचित् संकोच करतील या समजुतीनें त्या समजून उमजूनच धर्माकरितां वरील रक्कम ठेवीत. याचा आरंभ कदाचित रावसाहेबांच्या सूचनेवरून झाला असेल पण पुढें नियमीतपणानें ती गोष्ट अमलांत आणणें वहिनीबाई कडेच होतें.

चि. नानूवर त्यांचा इतका लोभ होता कीं, नानू हा जावेचा मुलगा आहे, त्यांचा नव्हे असें अपरिचिताला सांगावेंच लागे. लहानपणापासून

त्यांचा त्याला लळा होता. व त्याच्या मनांत कोणी विपरीत भावना भरवून दिली नसती तर तो त्यांचा खरोखर आज्ञाधारक, प्रेमळ, मातृभक्त मुलगा असाच शेवटपर्यंत वागता.

बाहेरून पहाणाऱ्यांनां रानड्यांचें घर म्हणजे सर्वांच्या एकीचें आगर असें वाटे. आणि कांहीं प्रसंग वगळले तर तें खरेंच तसें होतेंही. घरांतील अतिशय सोंवळें करणाऱ्या वडील माणसांचीं मनें दुखविण्याचा प्रसंग त्यांनीं साधारण बारीक सारीक गोष्टींत कधींच येऊं दिला नाहीं. जेथें तत्वाचाच प्रश्न असेल तेथें मग ते कांहीं प्रसंगीं मेरूसारखे असत. पण असे प्रसंग फार थोडे, तडजोडीचेच फार येत. यामुळेंच त्यांच्या घरांत एकी नांदत असे. वहिनींबाई म्हणजे रानड्यांची छायाच होत्या. आपल्या कांहीं ग्रंथांत स्त्री कशी असावी याचीं वर्णनें आहेत त्यांत ती पतिच्या छायेसारखी असावी असें म्हटलेलें आढळतें. त्याप्रमाणें वहिनीबाई वागत होत्या. त्या तशा वागल्या म्हणूनच रानडे गेले तरी त्यांचें नांव अनेक लोकोपयोगी कामाला हातभार लावल्यामुळें वहिनीबाईनीं सर्वांच्या डोळ्यापुढें कायम ठेवलें. रानडे काय होते याची जाणीव महाराष्ट्राला पुरती नसली तरी त्याच्या कांहीं भागाला थोडी तरी होती पण वहिनीबाई व ना. गोखले यांच्यासारख्या कांहीं माणसांना ती पूर्ण होती. त्याचप्रमाणें वहिनीबाई काय होत्या याची महाराष्ट्र स्त्री वर्गाच्या कांहीं भागाला ओळख होती. बराचसा भाग अज्ञानांत होता व ज्या भागाला पूर्ण ओळख होती असा भाग फारच संकुचित आहे. वहिनीबाई व रावसाहेब रानडे अशासारखी जोडपी मागें पुष्कळ काळाकडे वळून पाहिलें तरी दृष्टीस पडत नाहींत. चालू काळाकडे पाहिलें तरी ध्यानांत, दिसण्यांत येत नाहींत व भविष्य काळाच कांहीं सांगतां येत नाहीं.

महाराष्ट्राला सर्व बाजुनें जें चैतन्य आलें तें आणण्याचें श्रेय सार्वजनिक काका, रानडे, छत्रे, थोरले चिपळुणकर, विष्णुशास्त्री पंडीत अशा थोर

विभुतींच्याकडे येतें. त्यांत सर्वांग सुधारणा घडवून आणण्याचें श्रेय सर्वच रानड्यांच्याकडेच येतें. बाकीच्यांनीं सुधारणेचा श्री ग काढला असेल तर रानड्यांनीं ‘ ज्ञ ’ पर्यंत मजल पोंचवली होती. व त्यांच्या प्रत्येक कामांत वहिनीबाईंचा भाग अल्प तरी असेच.

मराठी पुस्तकावर अभिप्राय देणें वगैरे कांहीं कामें तर रावसाहेब वहिनीबाईंच्या कडूनच करून घेत. बायकांच्या सभा भरवणें वगैरेंची सूचनाहि त्यांच्याकडूनच येत असे. सामाजीक गोष्टींत जितकी बायकांच्याकडून प्रगति होणें शक्य असेल तितकी करवून घ्यावी या धोरणानें ते वहिनीबाईंच्याकडून काम करून घेत. राजकीय कामांत बायकांनीं अजून पर्यंत भाग घेण्यासारखी स्थिति आली नाहीं तोंपर्यंत त्यांत त्यांनीं भाग घेऊं नये असें त्यांचें प्रथम मत असावेंसें वाटतें. आणि म्हणूनच मुंबईस दुसरी राष्ट्रीय सभा झाली त्या वेळीं मि. ब्राडलॉ हे हजर राहिले होते, त्यानीं पंडिता रमाबाई वगैरे स्त्री पुढारी बायकांना सुचविलें होतें कीं, “ तुमची राष्ट्रीय सभा अजुन फार मोठी झाली नाहीं तोंच स्त्री प्रतिनिधी त्यांत घेण्याची व्यवस्था करा. पुढें हीच सभा तुमच्या देशाची पार्लमेंट होईल. नंतर स्त्री सभासद घेण्याचें मनांत आलें तरी फार कठीण जाईल. य साठीं अगोदर पासून वहिवाट असूं द्या. नाहींतर इंग्लंडसारखीं रणें माजतील ” या ब्राडलॉ साहेबांच्या सूचनेप्रमाणें पं. रमाबाई खटपट करूं लागल्या. पण रावसाहेब रानड्यांनीं वहिनीबाईंनां किंवा पुण्यांतलि अन्य पुढाऱ्यांच्या बायकांना प्रोत्साहन दिलें नाहीं. पंडिता रमाबाईंनीं फार खटपट करून सात आठ स्त्रीडेलीगेट मिळवले.

रावसाहेब रानडे यांनीं सर्व सुधारणांचे रोपें लावलें. कांहीं सुधारणारूपी लहान लहान रोपडीं होती त्यांना वाढीस लावण्याचें काम त्यांनीं प्रयत्नपूर्वक केलें. पुण्याचा व महाराष्ट्राचा कर्तेपणाचा लौकिक रानड्यांनींच वाढवला.

ते सरकारी नोकरींत होते म्हणून पुष्कळ लोक त्यांना नांवें ठेवीत असत, पण त्यांनीं असा विचार केला नाहीं कीं, नोकरीशिवाय सुखवस्तु व स्वतंत्र धंद्याचे लोक महाराष्ट्रांत कांहीं थोडे थोडके नव्हते. त्यांनीं अशी कोणती कामें निर्माण करून पुढें चालविली ? रावसाहेब रूपेरी शृंखलाबद्ध असूनही त्यांच्याकडून जी देशसेवा झाली त्याच्या दशांशही इतरांनीं केली नाहीं. किंवा त्यांच्यांत तितकी कर्तबगारी नव्हती असें म्हणावें लागतें. कोणी राजकीय सुधारणा करण्याचें तेवढेंच ध्येय ठेवलें तर कोणी औद्योगिक आखले, कोणी सामाजिक तर कोणी धार्मिक अशासारखें एकएका अंगानें कर्तव्य करावयाचें ठरविलें पण सर्व बाजूंनीं उन्नति झाल्याशिवाय देशास उर्जितावस्था यावयाची नाहीं असा सर्व बाजूचा विचार व त्याप्रमाणें त्याचें ध्येय हें रावसाहेबांनींच तेवढें ठेवलें होतें.

ज्या मनुष्यांत जें काम करण्याची पात्रता असेल तें काम त्याचेकडून करून घेण्याची हातोटी रावसाहेबांप्रमाणें त्यांच्या पश्चात् कोणांतही दिसून आली नाहीं. रावसाहेबांनीं सरकारी नोकरी करून हिंदू लोक बुद्धींत, निःस्पृहतेंत व कामांत कोणच्याही तऱ्हेनें कमी नाहींत. उंच प्रतीचीं कामें करण्याची पात्रता त्या लोकांच्यापेक्षां कांकणभर जास्तच आहे. न्यायाचा समतोल काटाही आमच्या लोकांना बरोबर प्रमाणांत धरतां येतो व तें काम करीत असतां इतर कामाला फाटा द्यावा लागत नाहीं हें त्यांनीं आपल्या वर्तनानें जनतेच्या निदर्शनास आणून दिलें. त्यांनीं आपलें अंग सांभाळून पेशाला झीज न लावतां सुधारणा केल्या असा त्यांचेवर पुष्कळांचा आरोप आहे व कदाचित आक्षेपकाच्या दृष्टीनें तो खराही असू शकेल. परंतु सर्वांची दृष्टी सारखी नसते हें ते लोक विसरतात. असो. सर्व विचार व आचरण ज्याचें यासारखें होतें त्यांच्या सहवासांत, त्यांच्या शिक्षेंत वागलेल्या वहिनीबाईही त्यांच्याप्रमाणेंच पुढें वागल्या. त्यांनाही जनतेंत तसा

सरकारांत सारखाच मान होता. पुण्याच्या येरवड्याच्या स्त्री–अपराध्यांना भेट देण्याचें काम सरकारनें त्यांचेकडे ठेवलें होतें. त्याचप्रमाणें सम्राज्ञी जेव्हां हिंदुस्थानांत आल्या तेव्हां त्यांची व इकडील राण्या व थोर स्त्रिया यांची ओळख करून देण्याचें काम मुंबईसरकारनें त्यांच्यावर सोंपविलें होतें. यावरून त्याही आपल्या प्रियपतीप्रमाणें दोहोंकडे सारखाच मान पावत होत्या.

सहानुभूतिनें व प्रेमानें वागण्याचें तत्त्व जसें सर्वमान्य होईल तसें विरोध करण्याचें होणार नाहीं. प्रेमानें जसें अंतःकरण वश होतें तसें विरोधानें होत नाहीं व झालें तरी फार वेळ टिकत नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां राव-साहेब रानडे व वहिनीसाहेब या दोघानीं जो मार्ग स्वीकारला होता तोच योग्य व प्रशंसनीय होता असें शांतताप्रिय लोकांचें तरी खास मत असेल. शिवाय अत्यंत सर्व बाजूनीं पराधीन स्थिती असतां व लोकांना काय व कसें वागलें असतां आपलें इष्ट ध्येय गांठतां येईल हें कळत नसतां, उगीच विरोधाच्या मार्‍यांत त्यांना जाऊं देणें हें धोक्याचेंच असणार तेव्हां याही दृष्टीनें त्यांचें करणेंच योग्य होतें असें पुष्कळांचें मत पडेल.

सर्व बाजूचा विचार केला असतां भावी पिढींतील होतकरू बालिकांनीं वहिनीबाईचें चित्र डोळ्यापुढें ठेऊन आपला आयुष्यक्रम चालविला तर कौटुंबिक व सार्वजनिक संबंधांत खरोखरीच सुपरिणामी होईल. रा. उमाकांत यांनीं त्यांचें चरित्र लिहून पुढच्या पिढीपुढें त्यांनीं वहिनीबाईची मूर्ती ठेवली हें फार चांगलें केलें व चरित्रही चांगलें निर्विकार मनानें लिहिलें असल्यामुळें फाजील स्तुती कोठेंही आढळत नाहीं. मनुष्यस्वभावांत कोठें ना कोठें दोषरूप खाचा खोचा असावयाच्याच. ज्यांनीं अगदीं कसून वाइट गूण घालवण्यासाठीं प्रयत्न केलेला असतो अशा उच्च कोटींतील माणसांत सुद्धां, दुसऱ्यांना दोष आढळतो.

मग हीं तर प्रापंचीक माणसें होतीं. त्यांच्यात चार दोन दोष शिल्लक राहिले असल्याचें काय नवल! वास्तविक मनुष्य जन्मतांच त्याचे ठिकाणीं चांगले व वाईट या दोन्ही गुणांची सारखीच खिचडी असते. पण चांगल्याची बाढ करून वाईटाला नमवण्याचें काम आपण सर्व करीत असतों. ज्यांना चांगले गूण कोणचे व वाईट गूण कोणचे याची निवड करून एकाची वृद्धि व दुसऱ्याचा क्षय करण्याचें साधत नाहीं तींच माणसें आपण वाईट समजतों. त्याच्याशीं जर आपण सहानुभूतिनें व प्रेमानें वागलों तर तींहि लौकर चांगलीं होतील. जगांत सदोदीत आपण चांगलीं ध्येयें लोकांपुढें ठेवीत गेलें पाहिजे. आणि प्रत्येक माणसानें तें आपल्या डोळ्यापुढें ठेऊन तसें होण्याचा यत्न केला पाहिजे तरच जग चांगलें होईल. वाईटाबद्दल खटपट करावी लागत नाहीं,त्याच्या वाढीला वेळ लागत नाहीं. हां! हां! म्हणतां वाईट गोष्टीचा प्रसार होतो. यासाठीं रमाबाईसाहेबांच्या सारख्यांचीं चरित्रें आमच्या होतकरू मुलींच्या वाचनांत आलीं पाहिजेत. पतिपत्नी व मुलें यांच्या संबंधींचेंच तेवढेंच प्रत्येकीचें कर्तव्य आहे व त्यापलिकडे कांहींहि कर्तव्य नाहीं, फार झालें तर परलोकसुखप्राप्ताच आणखी एक कर्तव्य समजून त्यासंबंधीं आणखी कांहीं बुद्धीला पटेल असें पुराणश्रवण अथवा दानधर्म करणें एवढ्यावर आपलें—मानवी प्राण्यांचें कर्तव्य संपत नाहीं. या अफाट विश्वांतील असंख्य जीवांत आपलाहि अंशतः भाग आहे व त्या प्रत्येकास एकमेकांबद्दल कर्तव्य करावें लागतें. मनुष्य प्राणी हा ज्ञान-वान् असल्यामुळें त्याच्यावर कर्तव्याचा बोजा जास्त आहे. सर्व मनुष्य प्राण्यांत स्त्रियांच्याकडे कर्तव्याचा वाटा अर्धा येतो. लहान मुलांचें कसें तरी सांगोपन करून त्यांना जगाच्या रहाटगाडग्याला लावलें म्हणजे कर्तव्य पूर्ण होत नाहीं. नीट व्यवस्थित शिक्षण देऊन त्यांना योग्य नागरीक बनवलें पाहिजे व आपल्यावर आपल्या देशासंबधा केवढी कर्तव्याची जोखीम

हें समजलें पाहिजे. अशी समजूत पटण्यास कै. रावसाहेब रानडे व कै. वहिनीबाई रानडे या दंपत्याचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवलें तर बराच कार्यभाग होईल. कै. लो. टिळक, कै. ना. गोखले, कै. प्रि. आगरकर, कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यासारखींहि पुष्कळ मार्गदर्शक आहेत आणि त्यांच्यापैकीं प्रत्येकानें आपला कार्यभाग उत्तम करून ते देशाचे उतराई झाले आहेत. पण या सर्वांना वाट दाखविणारे रावसाहेब रानडे असल्यामुळें मी त्यांचेंच नांव प्रथम घेतलें. व सर्व बाजूचा साधक बाधक विचार त्यांनींच केला होता असें मला वाटतें. बाकीच्यांनीं एक एका बाजूचाच केला. पण सर्व बाजू सारख्याच आहेत, सर्व रस्ते एकाच इच्छित ठिकाणास पोंचतात असें दाखविणारे विचार व त्या त्या कामाला उठाव देण्याची हातोटी एकट्या रानड्यांचीच होती. आणि तोच धडा श्रीमती कै. रमाबाईंनीं घेतला व आमरणांत त्यांनीं आपला व्यासंग त्याच रीतीनें चालवून जगांत आपली कीर्ती सबळ करून ठेवली.

हिंद बालिकांनो !! तुम्हाला विद्यामृत प्राप्त व्हावें म्हणून, तुम्हांस प्रपंचांत व लौकिकांत भलेपणा मिळावा म्हणून, तुम्हांस सर्वांनीं धन्यवाद द्यावा म्हणून, रमाबाईंनीं आपली कृति तुम्हांपुढें ठेवली आहे. त्याचा तुम्हांस लाभ होऊन तुम्हांस जगांत धन्यता, मान्यता, व आनंद होवो.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

## मरावें परा कीर्तिरूपें उरावें.



राठी ग्रंथ संग्रहालय

श्री

# श्रीमती रमाबाई रानडे

[ १ ]

## बालपण

१८६२ सालांत पौष वद्य दशमीचे दिवशीं रमाबाईचा जन्म देवराष्ट्रें गांवीं कुर्लेकर या सरदार घराण्यांत झाला.

देवराष्ट्रें गांव तालुक्याचें किंवा जिल्ह्याचें ठाणें नसलें तरी या चार पांच हजार वस्तीच्या गांवास देवस्थानाचें व ऐतिहासिक महत्त्व आहे. येथें सागरेश्वराचें देवालय आहे. गांव डोंगरपठारावर असून दक्षिणेस तीन मैलांवर कृष्णा नदी आहे. कुंडनपुरच्या राजाचें कुष्ठ सागरेश्वराच्या प्रसादानें नाहींसें झालें, म्हणून त्या राजानें सागरेश्वराचें देवालय आणि इतर १०८ देवालयें बांधविलीं आणि देवाच्या पंचामृतासाठीं ताकारी, तुपारी, दुधारीं दह्यारी वगैरे पांच गांवें लावून दिलीं अशी आख्यायिका आहे. हीं गांवें देवराष्ट्रें गांवच्या आसपास असून त्यांतील ताकारी हें गांव पुण्याहून बेळगांवला जाणाऱ्या सदर्न मराठा रेल्वेच्या फाट्यावर एक स्टेशन आहे. या स्टेशनावरून सागरेश्वराचें देवालय दृष्टीस पडतें.

पेशवाईच्या काळांत देवराष्ट्रें गांवाला तेथील कुरणांच्या विपुलतेमुळें लष्करी ठाण्याचें महत्त्व आलें होतें. येथें पेशव्यांचें पथक असून या पथकानें

आसपासच्या प्रांतांतील बंदोबस्त ठेवण्याचे कामीं मदत करावयाची असे. रमाबाईंचे पूर्वज प्रथम कांहीं देवराष्ट्रें येथें आले नाहींत व त्याचें खरें आडनांव कुर्लेकरहि नव्हतें. त्यांच्या पूर्वजाचें आडनांव चिपोळकर असून ते रत्नागिरी जिल्ह्यांत नेवरें गांवीं राहात असत. त्यांच्या पूर्वजांपैकीं बाळंभट घाटावर आले व औंधाजवळ राजाचे कुर्लें म्हणून गांव तेथें येऊन राहिले. या गांवावरून त्यांना कुर्लेकर हें आडनांव पडलें. बाळंभटांच्या मुलांनीं लष्करी पेशा स्वीकारला आणि पुण्याच्या पेशव्यांच्या पागेंत चांगलें नांव मिळविलें. त्यामुळें, पेशव्यांचे औंधच्या पंतप्रतिनिधींशीं बिनसल्यावर औंधकरांच्या ताब्यांत असलेलें देवराष्ट्रें येथील ठाणें पेशव्यांनीं आपल्याकडे घेतलें; व तें कुर्लेकर बंधूंच्या ताब्यांत दिलें. पुढें कुर्लेकरांची पागा पेशव्यांनीं पटवर्धनांच्याकडे लावून दिली. पटवर्धनाबरोबर तोरगलच्या स्वारींत कुर्लेकरांचें पथक होतें. चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनीं आपली बहिण रमाबाईंचे पणजोबा गणपतराव भाऊ यांना दिली होती.

रमाबाईंचे आजोबा माणिकराव पराक्रमी निघाले नाहींत. होतें तेंच इनाम व उत्पन्न संभाळून ते सर्वकाळ देवीच्या पूजनांत घालवीत. हाच कित्ता रमाबाईंचे वडिल माधवराव यांनीं गिरविला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें रमाबाईंच्या जन्माच्या वेळेस कुर्लेकरांचें घराणें इतर सरदार घराण्यांप्रमाणें मोडकळीस आलें होतें. ऐहिक वैभवाच्या दृष्टीनें जरी कुर्लेकर घराण्याची मोडकळीस स्थिति आली होती, तरी त्यांचा खानदानीपणा कांहीं मोडकळीस आला नव्हता. रमाबाईंचे वडिल, आजोबा व पणजोबा तिघेहि धर्मशीलवृत्तीचे होते आणि करारी होते. पितृकुलांतील हा गुण रमाबाईंनीं लहानपणापासूनच उचलला होता. त्यांची लहानपणीं गणपतीवर पराकाष्ठेची भक्ति होती व त्या आपलें बाळपणचें हितगूज फक्त गणपतीजवळच सांगत असत.

रमाबाईंची आजी व आई संसारांत दक्ष असल्यामुळें दोघींनींहि संसाराचा व्याप उत्तम रीतीनें आटोपला होता. रमाबाईंची आई उमाबाई जशा संसारांत दक्ष तशा पतिपरायण आणि प्रेमळ होत्या. त्यांना सासुरवास भोगावयास लागला होता; पण त्यामुळें त्यांचा स्वभाव द्राष्ट आणि चिरचिरा बनला नव्हता. पति हाच स्त्रियांचा गुरु आणि देव अशी भावना त्यांच्या मनांत पक्की बिंबली होती. त्यांनीं रमाबाईंच्या वडिलांकडून गुरुपदेश घेतला होता व आपल्या आचरणानें पतीचें मन संतुष्ट ठेवलें होतें. दररोज संध्याकाळीं त्या आपल्या मुलांना घेऊन अंगणांत बसत व देवादिकांच्या गोष्टी सांगत. चांगलें बीं पेरीत असावें. जशी जमीन मिळेल तसें मूळ धरील. निदान आपल्या तोंडानें देवादिकांचा कथांचा उच्चार होऊन आपल्याला पुण्य लागेल तेवढेंच! अशी त्यांची मुलांना गोष्टी सांगण्यांत विचारसरणी असे. ह्यावरून त्यांची धर्मपरायणता व मुलांबद्दलची कळकळ दिसून येते. संसारांतील दक्षपणाबरोबरच आईचे पतिपरायणता, धर्मपरायणता आणि मुलांबद्दलची कळकळ हे गुण रमाबाईंनीं उचलले होते, हें त्यांच्या पुढच्या चरित्रांत दिसून येतें.

जुन्या बायका म्हणजे नेहमीं पोरेंबाळें, नवरा आणि देव यांत गुंतलेल्या अशी आपली समजूत असते, पण ती चुकीची आहे. रमाबाईंची आई या मिरजेचे प्रसिद्ध राजवैद्य राघोपंत करमरकर यांची मुलगी. पण त्या नांवालाच वैद्याची मुलगी नव्हत्या. त्या वैद्यक्रिया शिकलेल्या होत्या. आपला घरप्रपंच संभाळून त्या घरीं औषधें तयार करीत व लोकांना देत. इतकेंच नव्हे तर त्यांच्या घरीं रोगी येत. त्यांना ठेवून घेऊन त्यांच्याकरितां औषधापासून पथ्यापाण्यापर्यंत सर्व खस्ता त्या खात. या परोपकाराच्या कामीं त्यांना रमाबाईंच्या वडिलांचीहि पूर्ण संमत्ति असे.

अशा परोपकारी, दक्ष आणि प्रेमळ आईच्या हाताखालीं रमाबाईंचें बालपण गेलें. रमाबाईंचे वडिल कडक असत. त्यांना मुलांनीं दंगा

कलला मुळींच खपत नसे. त्यामुळें रमाबाईंना आपल्या घरीं मैत्रिणींना जमवून खेळण्याचे प्रसंग फार थोडे येत असत. माधवराव जरी कडक स्वभावाचे होते तरी रमाबाई त्यांच्या लाडक्या होत्या. वडिल माणसांच्या देखत मुलांना घ्यावयाचें नाहीं, त्यांच्याशीं बोलावयाचें नाहीं अशी जुन्या बालबोध वळणाच्या घराण्यांत शिस्त असे. आजी निवर्तल्यावर रमाबाई झाल्यामुळें माधवरावांच्या वात्सल्यप्रेमाच्या पहिल्या भागीदार रमाबाईच झाल्या होत्या. रमाबाईच्या मोठ्या बहिणींचीं लग्नें त्या काळच्या रिवाजाप्रमाणें पांचवे व सातवे वर्षी झालीं होतीं. रमाबाई माधवरावांच्या लाडक्या असल्यामुळें त्यांचा विवाह उशीरा म्हणजे अकरा वर्षांच्या असतांना झाला असावा; असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं.

बाळपणांत रमाबाईच्या मनावर आईच्या व वडिलांच्या आचरणानें उत्तम संस्कार होत होते; पण त्यांना साक्षरतेचा गंध नव्हता. रमाबाईची आई वैद्यक्रियेंत प्रवीण होती, त्यांना पुराणांतलि देवादिकांच्या गोष्टीहि येत असत. पण त्यांनाहि साक्षरतेचा गंध नव्हता. कुर्लेकरांच्या घरांत साक्षरतेवर बहिष्कार पडण्यास एक कारण घडलें होतें. रमाबाईची एक आत्या ब्रह्मवर्तास दिली होती. त्या वाचावयास शिकल्या होत्या. त्या व्यंकटेश स्तोत्र वाचीत असत, इतकीच त्यांच्या साक्षरतेची मजल गेली होती; पण त्यांना बाळपणीं वैधव्य आल्यामुळें या अशुभ गोष्टीचा वाचावयाला शिकण्याशीं संबंध जोडून देण्यांत आला आणि वाचावयाला शिकणें म्हणजे वैधव्य जवळ ओढून घेणें असा कुर्लेकरांच्या घरांतील बायकांच्या मनांत ग्रह होऊन बसला.

रमाबाईंना आपला भाऊ गोष्टी वाचतो याचें कौतुक वाटे व एकदां तर आपल्या दाजीला पत्र वाचून आपल्या मनांतील गुपित गोष्ट कळली याचें राहून राहून त्यांना नवल वाटलें. रमाबाईचे वडिल एकदां पुण्यास

निघाले असतां रमाबाईंनीं त्यांना पुण्याहून मोत्यांच्या बाहुल्या व साडी आणावयास सांगितली. वडिलांनीं या जिनसा आणल्यावर सर्वांना चकित करावयाचें असें त्यांनीं ठरविलें होतें. हें आपल्या मनांतील गुपित फक्त त्यांनीं आपल्या देवाला--गणपतीला--सांगितलें होतें. पण त्यांच्या वडिलांना काय ठाऊक! त्यांनीं घरीं पाठविलेल्या पत्रांत रमाबाईंनीं सांगितलेल्या बाहुल्या व साडी आणतों असें कळविलें. त्यामुळें दाजीनें पत्र येतांच रमाबाईंना टोला हाणला, 'कायग, चोरटे, परवां आत्याबाईंनीं विचारलें तेव्हां पळून गेलीस; पण अण्णासाहेबांना काय आणावयाला सांगितलेंस तें मला कळलें.' हा टोला मिळालेला पाहून रमाबाई चकित होऊन गेल्या. त्यांनीं आर्जवानें आपलें गुपित तुला कसें कळलें असें भावाला विचारलें. 'अग त्यांचें आज पत्र आलें आहे त्यांत त्यांनीं लिहिलें आहे,' या भावाच्या उत्तरानें त्यांचें समाधान झालें नाहीं. तेवढा दिवस गेल्यावर पोरपणानें हा प्रकार त्या विसरून गेल्या. घरीं किंवा शेजारीं मुलींनीं शिकावयाचें ही गोष्ट डोळ्यांपुढें नसल्यामुळें आपण शिकलें पाहिजे अशी जिज्ञासा रमाबाईंच्या मनांत लहानपणीं उत्पन्न झाली नसल्यास नवल नाहीं. त्या वेळच्या मुलींची हौस म्हणजे मोत्यांच्या बाहुल्या आणून खेळ खेळण्याचे, चांगल्या साड्या नेसावयाच्या; ही हौस रमाबाईंच्यामध्यें होती. भातकुलीच्या खेळामुळें संसाराबद्दल उत्पन्न होणारी आवड इतर हिंदु मुलींप्रमाणें रमाबाईंच्या अंगीं उत्कटपणानें उत्पन्न झाली होती. या आवडीचा परिणाम त्यांच्या पुढील चरित्रक्रमांत जागोजाग आढळून येतो.

रमाबाईंच्या लहानपणीं सुधारणेची किंवा स्त्रीशिक्षणाची लाट जेथें पुण्यालाहि येऊन फारशी भिडली नव्हती तेथें तिचें वारें देवराष्ट्रें या बाजूच्या गांवाला कोठून येऊन पोंचणार! रमाबाईंच्या जन्मकालीं

हिंदुस्थानांत राणीचें राज्य होऊन सारीं चारपांच वर्षें लोटलीं होतीं. त्या वेळीं पुणें हेंच महाराष्ट्रांतील शिष्टाचाराचें गमक होतें. जुन्या आचार-विचारांचा आणि समजुतींचा पगडा पुण्यांतील समाजावरचा कमी झाला नव्हता. अर्थात तो देवराष्ट्रें या गांवांत पूर्ण स्वरूपांत नांदत असल्यास नवल नाहीं. पण महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य सुरू झाल्याचा परिणाम देवराष्ट्रें येथील कुर्लेकरांच्या घराण्यांवर मुळींच झाला नव्हता असें नाहीं. इंग्रजी झाल्यामुळें कुर्लेकर घराण्याचा लष्करी पेशा नाहींसा झाला व त्यामुळें इतर सरदार घराण्याप्रमाणें कुर्लेकरांचें वैभव नाहींसें झालें आणि काप गेले व भोकें राहिलीं अशी त्यांच्या घराण्याची स्थिति झाली. तथापि संसाराचें जुनें बालबोध वळण सुटलें नव्हतें. रमाबाईचें बालपण अशा जुन्या बालबोध वळणांत गेलें.

---

[ २ ]

# विवाह

रमाबाईंचा विवाह सन १८७३ सालच्या डिसेंबरांत, मार्गशीर्ष शुद्ध एकादशीस गोरज मुहूर्तावर झाला.

'विवाह' हा सर्वच स्त्रीपुरुषांच्या आयुष्यांतील महत्त्वाचा प्रसंग आहे. विवाहापासून मनुष्याच्या खऱ्या आयुष्यास सुरवात होते. हिंदूंत आणि तेंहि विशेषतः स्त्रियांच्या बाबतींत विवाहाला फार महत्त्व आहे. मुंज झाल्यामुळें जसा ब्राह्मण, क्षात्रिय आणि वैश्य या तीन वर्णांना द्विजत्व म्हणजे दुसरा जन्म प्राप्त होतो तसा लग्न झाल्यामुळें हिंदू स्त्रियांना दुसरा जन्म प्राप्त होतो असें समजलें जातें. विवाह हीच स्त्रियांची मुंज समजून मुलांची मुंज जशी पांच सहा वर्षांच्या आंत उरकून घ्यावयाची तसें मुलींचें लग्नहि आठ वर्षांच्या आंत उरकून मोकळें व्हावयाचें अशी सर्रास चाल रमाबाईंच्या लहानपणीं होती. या चालीप्रमाणें रमाबाईंच्या दोन्ही वडिल बहिणींचीं लग्नें पांचव्या व सातव्या वर्षींच झालीं होतीं. रमाबाईंचें वय मात्र लग्नाचे वेळीं अकरा वर्षांचें होतें.

पन्नास वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत जशीं मुलींचीं लग्नें आठ वर्षांच्या आंत करून टाकावयाची सर्रास चाल होती तशी विधुर केवढाहि असो त्यानें द्वितीय संबंध करावयाचाच अशी सर्रास चाल होती. मुंज, विवाह आणि द्वितीय संबंधाची जरूरी या संबंधाच्या खऱ्या कल्पना पार लोपून गेल्या होत्या. मुंजीमुळें द्वितीय जन्म प्राप्त होतो ही कल्पना खरोखरच सार्थ आहे. आपण आपल्या आयुष्यांत जो उद्योग करणार त्याची तयारी झालेला मनुष्य आणि तयारी न झालेला मनुष्य यांत अंतर असतें आणि हें अंतर जन्मानें उत्पन्न केलेल्या

अंतरा इतकें असतें हें सहज दिसणारें आहे. आपल्या विद्येंत प्रवीण झालेल्या इसमाचा आयुष्यक्रम ज्या तऱ्हेनें जातो त्या तऱ्हेनें विद्याहीन मनुष्याचा आयुष्यक्रम जात नाहीं. त्यामुळें विद्यासंपन्न होणें म्हणजे आयुष्यक्रमणाच्या दृष्टीनें नवा जन्म घेतल्यासारखेंच असतें. पण मुंज म्हणजे संध्या करावयाला शिकणें इतकाच अर्थ जसा समजला जातो तसाच विवाह म्हणजे पोरीच्या गळ्यांत मंगलसूत्र अडकविणें असा अर्थ होऊन बसला आहे. ह्या कल्पना त्या वेळीं अधिक जोरांत होत्या. मूळ कल्पना टाकून नुसता रूढ आचार पाळणें हेंच समाजाच्या अवनतीचें लक्षण आहे.

समाजाच्या या अवनत स्थितीमुळें बायकांचा महाराष्ट्रांत आयुष्यक्रम एक दुःखाचा किंवा एक सुखाचा व्हावयाचा असें ठरून गेलें होतें. रमाबाईंच्या आईचें उदाहरण पाहिलें तर त्यांचा संसार त्या काळाच्या मानानें सुखाचा झाला. विवाह होऊन मुलें बाळें होणें आणि तीं पुन्हां संसाराला लागणें ही आपल्याकडे पुऱ्या संसाराची जी कल्पना दृढमूल होऊन बसली आहे ती विचारांतींहि खोटी नाहीं असें दिसून येईल. कुलीन, अनुरूप आणि कर्तृत्ववान पति मिळणें; सच्छील आणि सद्गुणसंपन्न मुलें होणें आणि तीं पराक्रमी निघालीं आहेत असें पाहणें ह्यांत इतिकर्तव्यता कोणाहि स्त्रीला वाटत असल्यास तें मनुष्यस्वभावाला धरून आहे. या अपेक्षेप्रमाणें रमाबाईंच्या आईचा संसार अगदीं सोळा आणे नसला तरी बराच सुखाचा झाला; पण तोच रमाबाईंच्या आत्याबाईचा संसार--वैधव्यामुळें त्यांना संसारच राहिला नाहीं आणि त्यांचें आयुष्य संसाराच्या ओलाव्याशिवाय सहाराच्या वालुकामय प्रदेशाप्रमाणें रखरखीत गेलें. एक संसाराच्या शीतलवृक्षाखालीं तरी बसावें किंवा रखरखीत वालुकामय प्रदेश तुडवीत आयुष्य कंठावें हे दोन मार्गच महाराष्ट्रांतील स्त्रियांच्या नजरेपुढें त्या वेळीं असल्यामुळें संसाराच्या वृक्षाचा आश्रय तुटेल अशी कोणतीहि गोष्ट आपल्या हातून चुकूनहि होऊं नये अशा विषयींची

तत्परता हिंदू स्त्रियांच्या रक्तांत त्या वेळीं खिळून गेली होती व अजूनहि आहे. या तत्परतेमुळें रमाबाईच्या आतेचें शिकणें सर्वांनाच अशुभ वाटत होतें.

प्रथम वरांशीं लग्न करण्याचा योग आला तरी जी धाकधूक स्त्रियांच्या मनांत घर करून राहावयाची ती बिजवरांशीं जन्माची गांठ पडणाऱ्या स्त्रियांच्या बाबतींत अगदीं एवढ्या तेवढ्या गोष्टीनेंहि त्यांच्या मनाचें पाणी करून टाकील हें सांगणें नकोच. अशा वातावरणांत वाढलेल्या रमाबाईंवर, द्वितीय संबंधाची पत्नी होण्याचा योग आला.

हा योगायोग त्या वेळीं अनेक मुलींच्या नशीबीं लिहिलेला असे. त्यांत अपूर्व असें कांहीं नव्हतें. पण रमाबाईंचा विवाह न्या. रानडे यांच्याशीं झाला या योगायोगाला एकापेक्षां अधिक रीतीनें महत्त्व प्राप्त झालें. निव्वळ त्या काळच्या लोकांच्या दृष्टीनें पाहिलें तर एका विद्वान, पुष्कळ पैसे मिळविणाऱ्या आणि सरकारदरबारांत मान्यता पावलेल्या बिजवराशीं रमाबाईंचें लग्न लागलें त्यांत रमाबाईंनीं नशीब काढलें असें म्हणावें लागेल. सुशिक्षित, सद्‌गुणी आणि धनकनकसंपन्न पति मिळण्याच्या दृष्टीनें रमाबाई खरोखरच नशीबवान होत्या पण त्यांच्या व न्यायमूर्तींच्या वयांत फार अंतर होतें. रमाबाई अकरा वर्षांच्या होत्या तर न्यायमूर्ति बत्तीस वर्षांचे होते. हा वयांतील फरक रमाबाईंच्या मनांत सारखा जागृत होता. रमाबाईंच्या वांट्याला जो आयुष्यक्रमाचा मार्ग आला होता तो गंगोत्रीच्या वाटेसारखा होता. एका बाजूला विशाल आणि सुंदर हिमालयाचा विस्तार आणि दुसऱ्या हाताला खोल दरी आणि सर्व वस्तूंना रेटीत पुढें नेणारा गंगेचा प्रवाह यांतून जशी गंगोत्रीला पाऊल वाट जाते तसली वाट रमाबाईंच्या संसाराची होती.

पण या अपूर्वाईपेक्षांहि न्यायमूर्ति रानड्यांशीं विवाह होणें हीच गोष्ट त्यांच्या आयुष्यांत खरी अपूर्व ठरली. रमाबाई जशा पूर्णपणें जुन्या वातावरणांत वाढल्या होत्या तसे न्यायमूर्ति मुंबईच्या नव्या वातावरणांत वाढले

होते. १८७३ सालाच्या सुमारास पुण्याच्या बहुजनसमाजांत विधवाविवाहाच्या प्रश्नानें खळबळ उडवून दिली होती. पुनर्विवाह पक्षाचें आव्हान कऱ्हाडचे विठोबा अण्णा दत्तरदार यांनीं स्वीकारून विरुद्ध व्याख्यानें देण्यास सुरवात केली असल्यामुळें पुण्यांत उसळलेल्या खळबळीची लाट कृष्णा कांठापर्यंत येऊन थडकली होती. या लाटेचा आवाज देवराष्ट्रें व कोल्हापूर येथें प्रतिध्वनीत होत होता. आजकाल मुंबईच्या खालोखाल पुणें नव्या आचारविचारांचें केंद्रस्थान बनलें आहे. पण पन्नास वर्षांपूर्वी अशी स्थिति नव्हती. जुन्या आचारविचारांचें प्राबल्य बहुजनसमाजांत होतें. आपल्या खानदानीपणाचा अभिमान पुण्यांत प्रखर होता. मुंबईत याच्या उलट स्थिति होती. पुणें जसें त्यावेळीं मराठ्यांच्या संस्कृतीचें माहेर घर होतें तसें मुंबई इंग्रजांच्या संस्कृतीचें माहेर घर बनूं लागलें होतें. इंग्रजांच्या आचार विचाराची छाप इंग्रजी शिकून संसाराला लागलेल्या त्यावेळच्या सुशिक्षितांवर पडली होती. इंग्रजांचा संसार पराक्रमावर अधिष्ठित झालेला होता व त्यांच्या संसारांत मोकळेपणा व आनंद पूर्णपणें आढळून येत होता. त्यांच्या उलट महाराष्ट्रांतील संसाराची स्थिती झाली होती. त्यावेळीं महाराष्ट्राच्या संसारांत पराक्रमाला थाराच राहिला नव्हता. नवनव्या साहसाला प्रवृत्त होण्याच्या वृत्तीमुळें स्वाभाविकपणें जो दिलदारपणा उत्पन्न होतो तो त्यावेळच्या पिढींत राहिला नसल्यामुळें जुन्या आचारांचा कांच मात्र प्रत्येकाच्या अनुभवास येत असे. हा कांच नाहींसा करावयाचा असल्यास हा कांच उत्पन्न करणाऱ्या गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत असें त्यावेळच्या' सुशिक्षितांना वाटूं लागलें. इंग्रजांच्या स्त्रिया सुशिक्षित असतात, त्या इंग्रजांना त्यांच्या कार्यांत मदत करतात, त्यांच्यांत बाळविवाह नाहींत, वैधव्याचा कांच नांहीं, तेव्हां या गोष्टी आपल्या समाजांत कशा सुरू होतील अशी तळमळ त्यावेळच्या सुशिक्षितांना लागून राहिली होती. एलफिन्स्टन कॉलेजांतून बाहेर पडलेल्या अशा तळमळीच्या तरुणांनीं १८४८ त मुंबईत 'ज्ञानप्रसारक सभा' आणि 'स्टुडं-

टस सायंटिफिक आणि लिटररी सोसायटी' स्थापून लोकांत आपली तळमळ उत्पन्न करण्याच्या आणि मुलींना शिक्षण देण्याच्या कार्यास सुरवात केली होती. न्यायमूर्ति रानडे १८५८ मध्यें मुंबईस शिकावयास आल्यावर त्यांचें मन या मंडळीच्या चळवळीनें ओढून घेतलें आणि तेहि या चळवळींत तळमळीनें काम करूं लागले. १८६२ मध्यें मुंबईस 'इंदुप्रकाश' निघूं लागून न्यायमूर्ति रानडे वगैरे मंडळींना आपले विचार प्रसरविण्याचें एक नवीन साधन मिळालें. १८६२ च्या सुमारास म्हणजे रमाबाईच्या जन्मकाळीं मुंबईत स्त्रीशिक्षणाचें पाऊल चांगलेंच पुढें पडून सुशिक्षित तरुणांच्या मनापुढें विधवा विवाहाचा प्रश्न जोरानें पुढें आला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नामुळें १८५६ सालींच विधवाविवाहाचा कायदा सरकारनें पास केला होता; पण तो प्रश्न महाराष्ट्रांत जोराला आणण्यास विष्णुशास्त्री पंडित हे कारणीभूत झाले. विष्णुशास्त्री पंडित हे स. १८६४ सालीं सरकारी नोकरींतून सुटून 'इंदुप्रकाश' चालवीत होते. 'इंदुप्रकाशां'तून त्यांनीं विधवाविवाहाचा पुरस्कार करावयास सुरवात केली होती; व ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या विधवाविवाहाबद्दलच्या पुस्तकाचें भाषांतर करून तें प्रसिद्ध केलें. इतकेंच नाहीं तर या कार्यास तोंड पाडण्यासाठीं त्यांनीं १८६५ सालीं विधवाविवाह मंडळाची स्थापना केली व नंतर लौकर त्यांनीं एक विवाहहि घडवून आणला. यामुळें महाराष्ट्र समाजांत खळबळ उडून हें प्रकरण शंकराचार्यांच्या पीठापुढें गेलें. १८७० सालीं पुण्यास या बाबतींत खडाजंगी वाद होऊन त्यावेळेपुरता तरी जुन्या विचाराच्या मंडळीचा विजय झाला; पण सर्व सुशिक्षित सामान्यतः नव्या विचाराचे होते. ह्यामुळें बालविधवांनीं विवाह करण्यास हरकत नसावी अशी तडजोड करण्यास शंकराचार्य तयार होते; पण सुधारक पक्षानें प्रत्येक विधवेला पुनर्विवाहाची मोकळीक असली पाहिजे असा आग्रह धरल्यामुळें तडजोड झाली नाहीं. या वादविवादानें जुन्या विचारांचा जोर पुण्यांत आहे हें जसें ठरलें तसें त्याबरोबरच नवा विचारहि पुण्यांत वाढीला लागला आहे

असें जुन्या लोकांना दिसून आले. त्यामुळें सुशिक्षित आणि बिजवर मुलांच्या आईबापांना आपल्या मुलांबद्दल धास्ती वाटे. न्यायमूर्ति रानडे हे पुनर्विवाह पक्षाचे असल्यामुळें त्यांचें पहिलें कुटुंब वारल्यावर न्यायमूर्ती रानडे यांचे वडिल गोविंदराव यांना रानडे पुनर्विवाह करतील, अशी धास्ती पडली.

गोविंदरावांची ही धास्ती अगदींच निराधार होती असें नाहीं. पण या धास्तीमुळें गोविंदरावांनीं रानड्यांच्या मनःस्थितीचा थोडाहि विचार केला नाहीं. रानड्यांचें आपल्या पहिल्या बायकोवर प्रेम होतें. तिच्या दुखण्यांत तिची शुश्रूषा करण्यांत त्यांनीं आपल्या प्रकृतीकडे पाहिलें नाहीं. पण गोविंदरावांनीं त्यांना पुरतें रडावयालाहि फुरसत दिली नाहीं. एक तावडतोब विवाह करावा किंवा आपला संबंध तोडून टाकावा असा हट्ट गोविंदराव धरून बसले. कुलाच्या प्रेमाला आंचवण्यापेक्षां स्वतःच्या बाबतींत आपणाला प्रिय वाटणारी गोष्ट अमलांत न आणणेंच श्रेयस्कर, असा विचार करून विवाहास न्यायमूर्ति रानडे तयार झाले.

न्यायमूर्ति रानडे आपल्या इच्छेप्रमाणें लग्नास तयार झाल्यावर गोविंदरावांनीं इतर कोणत्याहि गोष्टीचा आग्रह धरला नाहीं. विवाहसमारंभ कसा बसा उरकून घेण्यांत आला आणि रमाबाई एका अज्ञात अशा प्रदेशाच्या द्वाराशीं येऊन उभ्या राहिल्या.

# [ ३ ]

# न्यायमूर्ति रानडे

रमाबाईचें लग्न झालें त्यावेळीं न्यायमूर्ति रानडे बत्तीस वर्षांचे होते. न्यायमूर्ति रानडे १८७१ सालीं सबार्डिनेट जज्ज होऊन पुण्यास आले. त्याच्या आधींचीं १८५८ पासूनचीं त्यांचीं सर्व वर्षें मुख्यतः मुंबईस गेलीं होतीं. उच्च शिक्षण घेत असतांना व नंतर मराठी ट्रान्सलेटरची आणि एल्फिस्टन कॉलेजमधील अध्यापकाची नोकरी करीत असतांना मुंबईतील विचारक्रांतीच्या ओघांत ते अवगाहन करीत होते. इंग्रजी राज्य आणि इंग्रजी विद्या यांच्या सहवासाचे आणि इंग्रज लोकांच्या राहणीचे जे संस्कार सुशिक्षित पिढीच्या मनावर झाले होते त्याला प्रथम मुंबईस अंकूर फुटूं लागले. सुशिक्षितांतील ही विचारक्रांति एका जातीपुरतीच मर्यादित नव्हती. पारशी, दक्षिणी, गुजराथी, सारस्वत, मुंबईतील आणि मुंबईबाहेरील जे जे लोक इंग्रजी विद्या आणि इंग्रजी राहणी यांच्या छायेखालीं आले त्यांच्यांत, दृष्टोत्पत्तीस पडूं लागली होती.

इंग्रज व हिंदी लोक यांच्यामधील ठळक दिसणारे भेद अर्थात् या सुशिक्षित मंडळीच्या प्रथम नजरेस यावेत हें स्वाभाविक आहे. इंग्रजांनीं सात समुद्र ओलांडून हिंदुस्थानचें राज्य कमावलें आणि आपण हिंदी लोक कूपमंडूकवृत्तीनें हिंदुस्थानांतच स्वतःला कोंडून घेत आहों; इतकेंच नव्हे तर, कोणी परदेशाला निघाला तर त्याला बहिष्कृत करण्यास तयार होतों याची चीडया सुशिक्षित मंडळींत उत्पन्न झाली. इंग्रजांच्या सात समुद्र ओलांडण्याच्या साहसाचा जसा या सुशिक्षित मंडळींच्या मनावर परिणाम झाला त्याच प्रमाणें मिशनरी मंडळाच्या दीर्घोद्योगाचीहि त्यांच्या मनावर छाप पडली. मुलामुलींच्या शिक्षणाच्या कामीं आणि धर्मप्रसाराच्या कामीं मिशनरी आस्थेनें करीत अस-

लेले प्रयत्न पाहून त्या वेळेच्या सुशिक्षितांत तशा प्रयत्नाची आवड उत्पन्न झाली. पण त्याबरोबर आपला धर्म निर्जीव आहे असें त्यांना वाटूं लागलें. इंग्रजांच्या या साहसीवृत्तीप्रमाणेंच इंग्रजी कुटुंबांतील त्यांना दिसणारा मनमोकळेपणा व पतीपत्नीमधील बरोबरीचें नातें यांनीं सुशिक्षित मंडळींचें मन खेंचून घेतलें. डोळ्यापुढें दिसणाऱ्या इंग्रजांच्या राहणींतील उल्हास आणि उत्साह आणि त्यांच्या नाटक कादंबऱ्यांतील चित्रित केलेलीं संसाराचीं रम्य वर्णनें यांनीं सुशिक्षितांचें मन रंगून गेलें असतां त्यांच्या अगदीं उलट अशी त्यांच्या समाजाची स्थिति त्यांना दिसत होती. आपल्या लोकांत साहस नाहीं, दीर्घोद्योग नाहीं, संसारांत आनंद नाहीं, मोकळेपणा नाहीं, असा देखावा त्यांना दिसून आला.

या स्थितींतून स्वतःच्या समाजाला वर काढण्याची कोणा तरुणाला स्फूर्ति उत्पन्न होणार नाहीं ? एल्फिस्टन कॉलेजांतून बाहेर पडलेल्या तरुणांचें मन या कल्पनांनीं भरून गेलें होतें. ते उद्योगाला लागावयाच्या आधींच नानाशंकरशेट यांच्या प्रयत्नानें मुलींच्या शिक्षणास १८४५ सालीं अल्पारंभ झाला होता व त्यावेळच्या तरुण मनाला व्हाव्या अशा वाटणाऱ्या एक दोन गोष्टी घडून आल्या होत्या. एलफिस्टन कॉलेजांतून बाहेर पडलेल्या तरुणांनीं आपल्या अध्यापकांच्या प्रोत्साहनानें 'ज्ञानप्रसारक सभा' आणि 'स्टुंटन्ट्स सायंटिफिक आणि लिटररी सोसायटी' स्थापन करून नवें विचार पसरविण्याचें काम आणि मुलींचें शिक्षण हातीं घेतलें. या मंडळींत सर्व जातीचे तरुण होते. पारशी व हिंदु मुलींच्या शिक्षणाचा आरंभ व्यवस्थित रीतीनें करण्याचें श्रेय 'स्टुडंट्स लिटररी आणि सायंटिक सोसायटी'ला आहे. १८५१ मध्यें पारशी समाजानें आपल्या मुलींच्या शिक्षणाची निराळी व्यवस्था केली.

न्यायमूर्ति रानडे १८५८ मध्यें मुंबईस शिकण्यास आले त्या वेळीं सुशिक्षितांचें मन वेधून घेणारी एक गोष्ट पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या खटपटीनें घडून आली होती. मुंबईच्या आधीं कलकत्यास इंग्रजी संस्कृतीचा

परिचय झाला आणि अर्थात् मुंबईच्या अगोदर कलकत्त्यास स्त्रीशिक्षण, विधवा-विवाह, परदेशगमन, नवधर्ममत ह्या कल्पना प्रचलित झाल्या होत्या. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं १८५४ मध्यें पुस्तक लिहून विधवांच्या गांजणुकीची कल्पना सुशिक्षितांना करून दिली. त्यांच्या या खटपटीनें ता. २५ जुलै १८५६ रोजीं विधवाविवाहाचा कायदा सरकारनें पास केला. हा कायदा पास झाल्यावर पुनर्विवाहाच्या प्रश्नाकडे मुंबईतील सुशिक्षितांचेंहि लक्ष अधिक रीतीनें वेधलें. गुजराथी भाटिया समाजांत व पारशी समाजांत नव्या विचाराला धरून आचारक्रांति दक्षिणी समाजाच्या अगोदर सुरू झाली होती. त्याचाहि परिणाम न्यायमूर्ति रानडे कॉलेजांत शिकत असतांना त्यांच्या मनावर झाला. ते 'ज्ञानप्रसारक सभे'मधून विचारप्रवर्तनाच्या आणि 'स्टुडंट्स लिटररी आणि सायंटिफिक सोसायटींतून स्त्रीशिक्षणाच्या चळवळींतून भाग घेत होतेच; पण पुनर्विवाहाच्या प्रश्नाला श्री. विष्णुशास्त्री पंडित मुंबईस येऊन १८६४ मध्यें 'इंदुप्रकाश 'पत्र लिहूं लागेपर्यंत जोर लागला नव्हता. विधवा-विवाहाला उत्तेजन देण्याच्या या चळवळींत न्यायमूर्ति रानडे पूर्णपणें पडले होते. रा. ब. गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांचीहि या चळवळीस मदत होती. विष्णुशास्त्री यांनीं या चळवळीस इतका वेग दिला कीं, स्त्रीशिक्षण, परदेशगमन वगैरे सुशिक्षितांच्या मनाला चैन पडूं न देणाऱ्या प्रश्नापेक्षां पुनर्विवाहाच्या प्रश्नाला अधिक महत्त्व चढलें. मिशनऱ्यांनीं त्या वेळीं चढविलेल्या हिंदुधर्मावरील हल्ल्याइतकाच या तरुणमंडळीचा हिंदु आचारविचारावरील हल्ला हिंदु समाजाला तडाका देऊन जागे करण्यास कारणीभूत झाला. जुने शास्त्री, पंडित व धर्मगुरु हल्ला परतावण्यास कंबर कसून पुढें आले. समाजाचा पाठिंबा या शास्त्री पंडितांस व धर्मगुरूंना होता; पण सुशिक्षित तरुणांच्या मनाचें समाधान करण्याचें सामर्थ्य त्यांच्या पोपटपंची विद्येंत उरलेलें नव्हतें. आपले शास्त्री, पंडित व धर्मगुरु यांचा टिकाव नवीन विचाराच्या तरुण मंडळीपुढें लागत नाहीं असें

१८७० सालच्या वादविवादाच्यावेळीं बहुजनसमाजाला कळून चुकलें. त्यामुळें या पुनर्विवावाहाच्या संकटांतून आपल्या तरुण मुलांचा बचाव कसा होईल अशी विवंचना जुन्या वृद्ध लोकांना १८७० सालीं व त्यानंतरहि २५।३० वर्षे सतावून सोडीत होती. पुनार्विवाहपक्षाच्या वतीनें शास्त्री पंडितांशीं चार हात करण्यांत न्यायमूर्ति रानडे होते. हें त्यांचे वडिल गोविंदराव यांना माहित होतें; तेव्हां न्यायमूर्ति रानडे यांचें पहिलें कुटुंब वारतांच गोविंदरावांना प्रथम कोणत्या गोष्टीची काळजी उत्पन्न झाली असेल तर ती न्यायमूर्ति रानडे पुनर्विवाह लावतात कीं काय ही होय !

आपल्या मुलानें पुनार्विवाह करूं नये म्हणून त्रागा करणारे गोविंदराव आणि सहासात वर्षे ज्या कल्पनेच्या प्रसारासाठीं खटपट केली ती कल्पना स्वतःच्या आचरणांत आणण्याची संधि न्यायमूर्ति रानडे यांनीं गमावूं नये म्हणून आग्रह करणारी स्नेही मंडळी अशा पेंचांत १८७३ सालीं आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्युनंतर चार आठ दिवसांतच न्यायमूर्ति रानडे सांपडले. न्यायमूर्ति रानडे यांच्या आयुष्यांतील हा कसोटीचा प्रसंग होता. त्यांच्यापुढें दोन कर्तव्यांचा लढा पडला होता.पुनार्विवाह सर्व समाजाला अमान्य नाहीं पण आपले वडलि तेवढे विरुद्ध आहेत असें न्यायमूर्तींना म्हणतां येण्यासारखी स्थिति नव्हती. शास्त्री व पंडित हे वादविवादांत टिकाव धरूं शकणार नाहींत याची खात्री जरी त्यांना होती तरी पुनर्विवाह करणें बहुजनसमाजाच्या रक्तांत भिनलेल्या समजुतीच्या विरुद्ध आहे याचीहि त्यांना पूर्ण कल्पना होती. आपलीं प्रामाणिक मतें व आपल्या वडिल धाऱ्यामंडळींचीं आणि आप्तेष्टांचीं प्रामाणिक मतें यांपैकीं कोणाच्या मताला अधिक किंमत द्यावयाची असा प्रश्न, गोविंदरावांच्या हट्टानंतर, न्यायमूर्ति रानडे यांच्या मनापुढें होता. पुनर्विवाह करावयाला तयार होण्यांत त्यांचा हेतु अनाथ बालविधवांचें दुःख निवारण करण्याचा होता. हें दुःख निवारण करीत असतांना स्वतःला, स्वतःच्या कुटुंबाला व मुलीबाळींना सामाजिक बहिष्काराच्या आगींत लोटून देण्यांत काय अर्थ ? समाजाच्या बहिष्कारा-

चे परिणाम किती दुःसह असतात याचा अनुभव रा. ब. गोपाळ हरि देशमुखांना १८७० च्या सुमारास आलेला त्यांना पाहावयास मिळाला होता. गोपाळ हरींनीं पुनर्विवाहासंबंधाच्या पंक्तींत जेवण केलें, याबद्दल त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं तर त्यांच्या मुलींना नांदवून घेणार नाहीं असा त्यांच्या विहिणीनें हट्ट धरला व शेवटीं मुलीच्या सुखाकडे लक्ष देऊन गोपाळ हरींना प्रायश्चित्त घेण्यास कबूल व्हावें लागलें. पण या छलापेक्षांहि स्वतःच्या कल्पनेप्रमाणें वागलों या कल्पनेला अधिक किंमत द्यावयाची कीं पित्याच्या मनाला संतोष द्यावयाचा हा महत्त्वाचा प्रश्न न्यायमूर्ति रानडे यांच्यापुढें होता. या कर्तव्यांच्या लढ्यांत त्यांनीं पित्याच्या मनाच्या संतोषाला अधिक किंमत दिली.

पित्याच्या इच्छेला न्यायमूर्तींनीं जो मान दिला तो मनाच्या कमकुवतपणानें दिला नाहीं. पित्याच्या इच्छेला मान देणें हें कर्तव्य त्यांना श्रेष्ठ वाटलें म्हणून त्यांनीं तो स्वेच्छेनें दिला. त्यांनीं मान द्यावयाचा नाहीं असें मनांत आणलें असतें व तितकें त्यांनीं मन कठोर केलें असतें तर गोविंदरावांचा त्रागा कुठवर चालला असता ? स्वतःच्या मर्जीप्रमाणें वागण्यसारखी त्याची स्थिति होती. पण त्यांनीं जाणून बुजून पित्याच्या आज्ञेला मान द्यावयाचें ठरविलें. गोविंदरावांच्या म्हणण्याप्रमाणें वागावयाचें असें ठरविल्यावर आपण काय करावयाचें याबद्दलची दिशा त्यांनीं मनानें पुरी ठरविली होती.

एक मुलीचा प्रश्न आणि दुसरा पुनर्विवाहपक्षाशीं कसें वागावयाचें असे त्यांच्यापुढें दोन प्रश्न होते. मुलगी नाका डोळ्यांनीं तितकीशी चांगली नसली तरी चालेल पण कुलीनाची असूं द्या; अशी त्यांनीं आपली इच्छा वडिलांना कळविली व पुढील लग्नविधींतहि त्यांनीं आपल्या मनाप्रमाणें अवश्यक तेवढेंच केलें. स्वतःच्या बाबतींत पुनर्विवाहाचीं मतें अमलांत आणतां आलीं नाहींत तरी त्याचा पुरस्कार करावयाचा हें त्यांनीं मनाशीं पक्कें ठरविलें होतें. १८७४ सालीं विष्णुशास्त्री पंडित यांनीं पुनर्विवाह केल्यावर त्यांना

घरीं मेजवानीला त्यांनीं बोलाविलें आणि आपण पुनर्विवाहपक्षाचेच आहों असें वडिलांच्या स्पष्ट नजरेस आणून दिलें.

न्यायमूर्ती रानडे यांनीं रमाबाईशीं लग्न दूरवर विचार करून करण्याचें ठरविलें असल्यामुळें न्यायमूर्ति रानडे व त्यांचे वडिल यांच्यामध्यें लग्नाच्या बाबतींत झालेल्या झटापटीचा त्रास रमाबाईंना मुळींच भोगावा लागला नाहीं. मनाविरुद्ध गोष्ट झाल्यामुळें स्वभावांत येणारा त्रासिकपणा किंवा मनाच्या कमकुवतपणाला बळी पडून मनाविरुद्ध गोष्ट केल्यामुळें मनाला वाटणारा उद्वेग न्यायमूर्ति रानडे यांच्या पुढील वर्तनांत मुळींच दिसून येत नाहीं. यावरूनहि न्यायमूर्ती रानडे यांनीं रमाबाईशीं विवाह केला तो निव्वळ बळजबरीमुळें किंवा मनाच्या कमकुवतपणामुळें केला, असें म्हणतां येत नाहीं.

न्यायमूर्ती रानडे यांनीं जर मनाच्या कमकुवतपणामुळें किंवा बळजबरीमुळें विवाह केला असता तर रमाबाईचे हाल कुत्राहि खाता ना! रमाबाई त्यावेळीं साऱ्या अकरा वर्षांच्या होत्या. आपलें लग्न कोणत्या परिस्थितींत होत आहे याचें महत्त्व कळण्याचें त्यांचें वय नव्हतें. अशा स्थितींत न्यायमूर्तींनीं डोक्यांत राख घालून घेतली असती तर रमाबाईच्या जन्माचें नुकसान व्हावयाला काय वेळ लागला असता? रमाबाईचा पुढचा संसार काट्याकुट्यांनीं भरणें किंवा गुलाबांच्या फुलांनीं फुलवून टाकणें हें न्यायमूर्ती रानडे यांच्या हातांत होतें. रमाबाई इतक्या लहान होत्या कीं, त्यांच्या मनांत अजून सद्विचारांनीं कळीचें रूपहि धारण केलें नव्हतें. सद्विचारांची नीटरीतीनें जोपासना करून ते स्वतःला व लोकांना आनंददायी होतील अशा रीतीनें फलोन्मुख करण्याचें कुशल माला-काराचें काम न्यायमूर्ती रानडे यांच्यावर पडलें होतें. तें त्यांनीं अत्यंत धीरानें उल्हासानें आणि कुशलतेनें केल्यामुळें रमाबाईच्या चरित्राच्या पुढील मनोरम बागेतून इतस्ततः विहार करण्याचें भाग्य आपणाला लाभलें आहे.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# शिक्षणांतील अडचणी

संसारांत आपण ज्या ज्या गोष्टी करतों त्या सर्वच सफल होतात असें नाहीं; पण आपण ज्या गोष्टी करीत असतों त्या गोष्टीबद्दल कौतुक झालें ह्मणजे कौतुकाचें जें हें फळ पदरांत पडतें तेवढ्यानेंहि आपणाला नव्या उद्योगाला लागण्यास हुरुप येतो. संसारांत जीवाभावाचा संबंध पतीपत्नींचा असतो. गृहिणी या नात्यानें पत्नी संसारांत मेहनत घेऊन संसाराला सुंदरपणा आणि व्यवस्थितपणा उत्पन्न करीत असते. त्याचें कौतुक पतीनें जर केलें नाहीं तर आपले सर्व श्रम वाया गेले असें प्रत्येक स्त्रीला वाटत असतें. पती नवनवे उद्योग हातीं घेत असतो. या कामीं पत्नीनें त्याला जो धीर द्यावा लागतो, निदान सहानुभूती दाखवावी लागते तो धीर व ती सहानुभूति जीवाभावाच्या पत्नीकडून मिळाली नाहीं तर पुरुषाचें मन खट्टू झाल्याशिवाय राहात नाहीं. याकरितां पतीपत्नीमध्यें आचारविचाराचे बाबतींत आणि वयाच्या बाबतींत अनुरूपता असावी लागते.

हे विचार हिंदुस्थानांतील लोकांच्या कल्पनेलाहि शिवले नव्हते असें नाहीं. खुद्द हिंदु लोकांच्या विवाहपद्धतीचा विचार केला तर पतीपत्नींमध्यें बरोबरीचें नातें उत्पन्न व्हावें अशीच विवाहाची मांडणी आहे, असें दिसून येईल. पण लोकांचा प्रत्यक्ष आचार त्या वेळीं तसा राहिला नव्हता, व आतांहि राहिलेला नाहीं. शिवाय इंग्रजी झाल्यावर जुन्या लोकांत आणि तरुण मंडळींत विचारसाम्य राहिलें नाहीं. कष्टमय संसारांत आनंद व उत्साह उत्पन्न करण्यासाठीं पतीपत्नीमध्यें बरोबरीचें नातें उत्पन्न करावयाचें असेल तर बालविवाहाची चाल मोडली पाहिजे आणि स्त्रियांना सुशिक्षित केल्या पाहिजेत असें इंग्रजी-

नंतरच्या प्रत्येक पिढींतील नवशिक्षित तरुणाला वाटतें. न्यायमूर्ति रानडे याच विचारांत वाढले होते. त्यांनीं आपल्या पहिल्या कुटुंबासहि लिहा-वाचावयास शिकविलें होतें.

वडिलांच्या मताप्रमाणें दुसरा विवाह करण्याचें एकदां ठरविल्यावर अल्प-वयस्क व अशिक्षित रमाबाईशीं विवाह झाला म्हणून न्यायमूर्ति रानडे कुढत बसले नाहींत. रमाबाईना मुळींच अक्षर ओळख नाहीं असें कळल्यावर त्यांनीं लगेच पाटी पेन्सिल आणून देऊन स्वतः श्रीगणेशाचा धडा घालून दिला. रोज रात्रीं रमाबाईना शिकविण्यासाठीं दोन तास खर्च करण्यास न्यायमूर्तींनीं आरंभ केला व पंधराव्या दिवशीं रमाबाईनीं जेव्हां पहिल्या पुस्तकांतील धडा वाचून दाखविला त्या दिवशीं न्यायमूर्ती रानडे यांना मोठें समाधान वाटलें.

न्यायमूर्ति रानडे यांनीं धीम्मेपणानें रमाबाईना अक्षर ओळख करून देण्यापासून शिकविण्यास आरंभ केला व रमाबाईनीं थोड्याच दिवसांच्या अवधींत न्यायमूर्ति रानडे यांना त्यांचे श्रम सार्थकीं लागत आहेत असें दाखविलें. रमाबाईचें ज्या स्थितींत लग्न झालें त्या स्थितींत, रमाबाईच्या शिक्षणाच्या बाबतींत, रमाबाईमध्यें शिक्षणाचा तिटकारा असता किंवा न्याय-मूर्ति रानडे यांचा उदासीनपणा असता तर ' प्रथमग्रासे मक्षिकापातः ' या न्यायानें हा मोठाच अडथळा झाला असता; पण सुदैवें करून हा अडथळा न येतां रमाबाईचा शिक्षणक्रम सुरू झाला. पण रमाबाईना घरांतील बाय-कांचा विरोध सहन करावा लागला. हा विरोध पुढें पुढें इतका जाचक होऊं लागला होता कीं, नाशकास जर न्यायमूर्ति रानडे यांची बदली झाली नसती तर न्यायमूर्ति रानडे यांच्या गंभीर मनाचाहि ठाव सुटला असता.

त्या वेळच्या लोकांची मनःस्थिति पाहिली तर रमाबाईना घरांतील बाय-कांचा विरोध निव्वळ बायकी बुद्धिमुळें सहन करावा लागला असें म्हणतां येणार नाहीं. रमाबाईच्या आत्याबाई वाचावयाला शिकल्या म्हणून त्यांना

वैधव्य आलें; तेव्हां 'वैधव्य टाळावयाचें असेल तर शिकतां कामा नये' असल्या कारणामुळें रमाबाईंच्या वन्सं, किंवा ताईसासूबाई त्यांना विरोध करीत नव्हत्या. न्यायमूर्ति रानडे यांना पहिल्या बायकोला शिकविण्याच्या बाबतींत खुद्द गोविंदरावांनीं कधीं त्यांना विरोध केला नाहीं; इतकेंच नव्हे तर, त्यांनीं आपल्या दुसऱ्या बायकोला व मुलीला लिहावाचावयास शिकविलें होतें आणि आपणाला लिहावाचावयाला येतें याचा दोघींना अभिमानहि वाटे.

रमाबाई १८८३ सालीं इंग्रजींत भाषण करून परत आल्यावर न्यायमूर्ति रानडे यांच्यावर तणतणतांना रमाबाईंच्या ताईसासूबाईंनीं आपल्या विरोधाचें असें कारण दिलें आहे कीं, 'बायकांना शिकविलें म्हणजे त्या उद्धट होतात, त्यांच्या डोळ्यांत पाणी राहात नाहीं, ही गोष्ट खोटी आहे काय ? शिकवावयाचेंच तर व्यंकटेश स्तोत्र, शिवलीलामृत याच्यासारखें कांहीं वाचतां आलें म्हणजे पुष्कळ झालें. पुरुषासारखें इंग्रजी शिकून काय चाकरी करावयाची आहे ?' 'तुझी आई व वडील किती बरं चालीचीं माणसें आहेत. त्यांना नुसतें पाहिलें तरी संतोष वाटतो. त्यांच्या घरीं तर बायकांनीं मराठीसुद्धां शिकण्याची चाल नाहीं, मग इंग्रजीचें नांव कशाला ? पण तुझें पहावें तों मडमेवर ताण' अशी रमाबाईंच्या वन्सची तक्रार चालू असे.

बायका न शिकल्या तर उत्तमच, शिकल्याच तर पोथ्यापुराणें वाचण्याइतकें त्यांनीं शिकावें, जास्ती शिकून त्यांना नोकऱ्या करावयाच्या आहेत काय असें त्या वेळच्या बायकांनाच काय पण पुरुषांनाहि वाटत होतें. शिवाय आपल्या मुली मडमा होतील, स्वेच्छाचारी होतील ही भीति. रमाबाई भर सभेंत, पुरुषांत, आपल्या नवऱ्याच्या देखत, न लाजतां, बोलल्या ह्यापेक्षां स्वेच्छाचाराचें दुसरें उदाहरण कुठलें असें रमाबाईंच्या ताईसासूबाई न्यायमूर्ति रानडे यांना समजावून देत होत्या. पण ही भीति ताईसासूबाईंच्या मनांतच तेवढी त्या काळीं वागत होती असें नाहीं. डॉ. आनंदीबाई जोशी यांना

शिक्षणाचे कामीं रमाबाईंच्या पेक्षांहि अधिक त्रास, तोहि पुरुषवर्गाकडून, त्या वेळीं सोसावा लागला.

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या शिक्षणांत आलेले अडथळे पाहिले तर ते पुरुषमंडळीकडूनच विशेष आले. डॉ. आनंदीबाईंचे वडिल व आई पाहिल्या तर मुलीनें शिकूं नये असें म्हणणाऱ्या नव्हत्या. डॉ. आनंदीबाई जोशी यांना त्यांच्या वडिलांनीं शाळेंत घातलें होतें. आणि एक दिवस डॉ. आनंदीबाई शाळेस गेल्या नाहींत म्हणून त्यांच्या आईनें त्यांना मारहि दिला होता. पण लग्न झाल्यावर डॉ. आनंदीबाईंचे पति गोपाळराव जोशी हे जेव्हां त्यांना शिकवितात असें त्यांच्या वडिलांना कळलें तेव्हां डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या वडिलांनीं गोपाळराव जोशी यांनीं हा नाद सोडून द्यावा अशी दुसऱ्या करवीं खटपट केली. पण गोपाळराव जोशी हे स्त्रीशिक्षणाचे कट्टे अभिमानी असल्यामुळें त्यांनीं या मध्यस्थास धुडकावून लावलें. पुढें गोपाळराव जोशी यांचे वडिल मुंबईस आले तेव्हां डॉ. आनंदीबाई गिरगांवांतील मिशनरीशाळेंत शिकावयास जात होत्या. बुट स्टाकिंग घालणें असा थाट साहजिकच त्यांच्यामध्यें आला होता. सूनबाईचा हा थाट गोपाळरावांच्या वडिलांना आवडला नाहीं. ते गोपाळरावांना म्हणाले, " बायकांच्या जातीला इतकें शिक्षण काय करावयाचें आहे ? त्यांना साधारण पोथ्या वाचतां आल्या म्हणजे झालें. बायकांनीं इंग्रजी शिकून त्यांना कुठें चाकऱ्या मिळवायाला जावयाचें आहे ? आपली गरिबाची बायको, तिला एव्हांपासून असें मोकळें वागूं दिलें म्हणजे आपला संसार कसा व्हावा ? बायकांच्या जातीला स्वतंत्रता व विद्या ही काय कामाची ? त्यांची विद्या म्हणजे आपण घरांत जें आणून देऊं त्याची त्यांनीं नीट नेटकी व्यवस्था करावी हीच काय ती. बायकांनीं विद्या शिकल्यावर पुरुषांनीं काय करावयाचें ? व त्यांचें घरांतील काम कोणी करावें ?" अर्थात् वडिलांची ही विचारसरणी गोपाळरावांना मान्य झाली नाहीं ही गोष्ट वेगळी; पण त्यांनाहि अलीबाग,

कोल्हापूर येथील स्नेही व निंदक मंडळीकडून होणाऱ्या कुत्सित टीकेचा मारा सहन करणें शक्य झालें नाहीं. तेवढ्याकरतां त्यांनीं महाराष्ट्राला रामराम ठोकला व कलकत्त्यास नोकरी पाहिली; पण तिथें शाळेंत जाऊन शिकतांना डॉ. जोशी यांना कोल्हापूर मुंबईपेक्षां अधिक त्रास होऊं लागला. तेव्हां शेवटीं त्यांनीं डॉ. आनंदीबाईंना १८८१ सालीं वयाच्या सोळाव्या वर्षी एकटेच अमेरिकेस डॉक्टरीच्या शिक्षणासाठीं पाठविण्याचें धाडस केलें.

गोपाळराव जोशी कट्टे स्त्रीशिक्षणाचे अभिमानी होते व त्यांनीं डॉ. आनंदीबाईंना मनाचा धडा करून व हाल सोसून अमेरिकेसहि धाडून दिलें; पण त्यांना धाडून दिल्यावर त्या तिकडे धर्मांतर करतात कीं काय, स्वेच्छाचारी होतील कीं काय अशी भीति सारखी त्यांच्या मनांत वागत होती. गोपाळराव जोशी यांच्या या संशयी स्वभावाचा डॉ. आनंदीबाई जोशी यांना अमेरिकेंत असतांना अतोनात त्रास सोसावा लागला. त्या वेळीं सुशिक्षित विधुर मुलाच्या बापाला आपला मुलगा पुनर्विवाह करतो कीं काय ही जशी धास्ती वाटत होती तशी स्त्रिया शिकल्या तर मडमा होतील कीं काय ही भीति स्त्रीपुरुषांना साशंक बनवीत असे.

स्त्रीशिक्षण आणि पुनर्विवाह या गोष्टीकडे त्या वेळची नवशिक्षित मंडळी एका दृष्टीनें पाहात होती तर जुनी मंडळी दुसऱ्या दृष्टीनें पाहात होती. संसारांत जोम व आनंद उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें नवशिक्षित तरुणांनीं स्त्रीशिक्षण आणि पुनर्विवाह या चळवळी हातीं घेतल्या होत्या. या बाबतींत नवशिक्षित जे मुद्दे मांडीत ते जुन्या लोकांना खोडून काढतां येत नसत. बालविधवांचे विवाह लावण्यास हरकत नाहीं अशी १८७० च्या चर्चेच्या वेळीं शंकराचार्यांनींसुद्धां संमत्ति दिली होती. स्त्रियांनीं हिशेब ठेवण्यापुरतें आणि पोथ्या पुराणें वाचण्याइतकें शिकावें यालाहि त्या वेळच्या समंजस माणसांची हरकत नव्हती. नवशिक्षित ज्या अडचणी दाखवीत त्या अडचणी दूर

व्हाव्यात असें समंजस लोक कबूल करीत; पण त्याच्या पुढची पायरी चढून जाण्यास ते नाखूष होते. मुलींना मुलासारखें शिक्षण देणें किंवा विधवांचे पुनर्विवाह करणें इष्ट नाहीं, हें आपल्या संस्कृतीविरुद्ध आहे असें त्यांना वाटे; पण असें कां वाटतें ह्याचीं कारणें जेथें स्वतःचीं स्वतःला त्यांना देतां येत नव्हतीं ते नवसुशिक्षितांचें समाधान काय करणार? इंग्रजी शिक्षण आणि पुनर्विवाह हें आपल्या संसारांतील समाधानावर अज्ञात संकट चालून येत आहे अशी त्या वेळच्या बहुजनसमाजाची समजूत होती. या अज्ञात संकटाचा संपर्क आपल्या संसाराला लागूं नये असें प्रत्येकाला वाटत होतें.

अशा स्थितींत रमाबाई इंग्रजी शिकूं लागल्या. रमाबाईंना या अज्ञात संकटापासून परावृत्त करण्यासाठीं कधीं धाकाचा, कधीं गोड बोलण्याचा, उपयोग त्यांच्या घरांतील बायकांनीं करून पाहिला. धाक व गोड शब्द उपयोगीं पडत नाहींत असें त्यांनीं पाहिल्यावर त्यांनीं रमाबाईंना बहिष्कृतासारखें वागविण्यास व वर्मी आघात घालण्यास सुरवात केली. १८७५ मध्यें गोविंदराव निवर्तल्यावर न्यायमूर्ति रानडे यांनीं कोल्हापूरचें बिऱ्हाड मोडून आपली सावत्र आई व सावत्र भाऊ यांना पुण्यास आणलें. न्यायमूर्तींचे सावत्र बंधू आबा व बाबा रमाबाईच्या बरोबरीचे होते. ते त्या वेळीं इंग्रजी शिकत असल्यामुळें ते शिकतात तेव्हां आपणहि इंग्रजी शिकावें असें रमाबाईंना वाटूं लागलें. त्यांनीं इंग्रजी शिकण्याची इच्छा न्यायमूर्ति रानडे यांना सांगितली. रमाबाईंनीं आपण होऊन इंग्रजी शिकण्याची उत्सुकता दाखविली याबद्दल न्यायमूर्ती रानडे यांना आनंद झाला. त्यांनीं लागलीच रमाबाईंना इंग्रजी शिकविण्यास सुरवात केली. इंग्रजीची अक्षर ओळख झाल्यावर रमाबाई एक दिवस सोपा झाडीत असतां त्यांना इंग्रजी अक्षराचा कागद सांपडला. कुतुहलबुद्धीनें त्यांनीं तो वर उचलून घेतला व अक्षरें लावूं लागल्या. किती क्षुल्लक गोष्ट! पण धाकानें व सामोपचारानें रमाबाई आपल्या म्हणण्यास मान देत नाहींत यामुळें चिडलेल्या वन्स कडाडल्या, ‘असला नाच-

रेपणा आम्हांला खपायाचा नाहीं. काय नाचावयाचें असेल त्याला माडी मोकळी आहे. येथें आमचा अपमान करावयाचा नाहीं. ”

१८८१ च्या सुमारास न्यायमूर्ति रानड्यांना सातारा जिल्ह्यांत फिरतीच्या कामावर जावें लागल्यामुळें रमाबाईंना इंग्रजी शिकविण्यास मिस हरफर्ड बाईंना ठेवलें होतें. मिस हरफर्ड शिकवून गेल्या म्हणजे आमच्या घरांत तशाच येऊन भ्रष्टाकार करूं नका असें घरांतील बायकांनीं म्हणावें. या बोलण्याला त्रासून रमाबाईंनीं दुपारीं विहीरीच्या पाण्यानें अंग धुवावें. असा क्रम सुरू झाल्यावर अर्थात् थोड्याच दिवसांत त्यांच्या आबा भावोजींनीं न्यायमूर्ति रानड्यांना ही हकिगत कळविली. पुढें न्यायमूर्ति रानडे यांनीं घरच्या बायकांची कानउघाडणी केल्यामुळें रमाबाईंचा थंड पाण्याचा त्रास चुकला. वस्त्रांतर केलें म्हणजे रमाबाईंना घरांत येण्यास परवानगी मिळूं लागली.

१८८२ च्या सुमारास पंडिता रमाबाई पुण्यास आल्या. त्याहि रमाबाईच्या बरोबर मिस हरफर्डजवळ इंग्रजी शिकूं लागल्या. घरांतील बायका पंडिता रमाबाईबद्दल कुत्सितपणानें बोलून रमाबाईंच्या मनाला डागण्या देण्यास कमी करीत नसत.

शिक्षणाच्या बाबतींत असा मनाला असह्य त्रास होत असतांना रमाबाईंनीं तो आपल्या बापाचा उपदेश मनापुढें ठेवून शांतपणें सोसला. रमाबाई जेव्हां प्रथम सासरीं जाण्यास निघाल्या तेव्हां त्यांना जवळ घेऊन त्यांच्या वडिलांनीं असा उपदेश केला होता कीं, “ हें बघ, तूं आपल्या सासरीं जात आहेस. सख्या सावत्राचें कुटुंब, पदरीं दहा तऱ्हेचीं माणसें आहेत. तूं माझी मुलगी आहेस. आपल्या कुलीन घराण्याला शोभेल असें वाग. तुला कितीहि त्रास झाला तरी सोस, पण नोकरांनासुद्धां उलट बोलूं नको. हें एक व दुसरें तुझ्या मनाला असह्य झालें तरी तूं होऊन कोणाची

चहाडी नवऱ्याजवळ सांगत जाऊं नकोस. चहाडीनें कुटुंबाचाच नव्हे पण राज्याचाही नाश होतो. ह्याकरितां मी सांगतो हीं दोन व्रतें पाळ, म्हणजे तुला कधीं कांहीं कमी पडणार नाहीं. तूं भाग्यवान आहेस. सोशिकपणा हा तुझा गुण झाला म्हणजे तूं खऱ्या किंमतीला चढशील व आमच्या कुलांत जन्म घेतल्याचें सार्थक होईल. हें माझें बोलणें लक्षांत ठेव.. याच्या उलट वागतेस असें ऐकलें तर मी कधीं फिरून तुला माहेरीं आणणार नाहीं. ”

रमाबाईनीं वडिलांचा उपदेश तंतोतंत आपल्या आचरणांत आणला. हें आतां सांगणें जितकें सोपें झालें आहे तितकेंच तें आचरतांना रमाबाईना कठीण गेलें. आबा व बाबा यांचा पाठीराखेपणा आणि न्यायमूर्ति रानडे यांच्या प्रेमळपणाचा त्यांच्या त्रस्त मनाला मिळणारा विसावा यांच्या जोरावर त्यांनीं घरीं होणारा त्रास सहन करून लग्नानंतरच्या दहा वर्षांत त्यांनीं शिक्षणाचा मार्ग पुष्कळच आक्रमण केला.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ........

## [ ५ ]

# सार्वजनिक कार्याची तपश्चर्या

सन १८८१ मध्यें न्यायमूर्ति रानडे यांची मुंबईहून पुण्यास प्रिन्सिपाल सदर अमीन या जागीं नेमणूक झाली व १८९३ सालीं त्यांना मुंबईच्या हायकोर्टाचे न्यायाधीश होण्याचा मान मिळाला. या बारा वर्षांत न्यायमूर्ती रानडे यांना पुणें, सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्यांतील फिरतीचीं कामें व पुढें १८८६ मध्यें फायनन्स कमिटीचें काम करावें लागल्यामुळें न्यायमूर्ति रानडे व रमाबाई यांचा मुक्काम पुण्यास कायमचा असा फारसा नव्हता. पण त्यांचें घर असे या बारा वर्षांत पुण्यांतच होतें व न्यायमूर्तींच्या आणि रमाबाईच्या सार्वजनिक कार्याचें क्षेत्रहि मुख्यतः पुणेंच होतें.

रमाबाईच्या लग्नाच्या वेळचें १८७३ मधील पुणें आणि न्यायमूर्ती हायकोर्ट जज्ज म्हणून मुंबईस प्रयाण करतांनाचें पुणें यांच्या स्थितींत मधल्या वीस वर्षांनीं पुष्कळच क्रांति घडवून आणली होती. स्त्री-शिक्षण, पुनर्विवाह, सार्वजनिक कार्यांत स्त्रियांनीं भाग घेणें, या गोष्टी १८७३ सालीं पुण्यांत प्रतिध्वनी रूपानें उमटत होत्या; पण १८९३ सालीं या गोष्टींचा पुरस्कार करणारा व त्याप्रमाणें आचरण करणारा एक वर्गच पुण्यांत उत्पन्न झाला. स्त्रियांमध्यें ज्ञानाची आवड उत्पन्न होऊन संघटना उत्पन्न व्हावी या हेतूनें सार्वजनिक काका ऊर्फ गणेश वासुदेव जोशी यांनीं १८७० सालीं ' स्त्री विचारवती ' सभा स्थापन केली होती. या सभेमार्फत नव्या विष्णुचे देवळांत दरवर्षी चैत्राचे महिन्यांत सार्वजनिक हळदीकुंकू होत असे व त्या प्रसंगींच संभाषणाचा व व्याख्यानाचा योग जुळवून आणण्यांत येत असे.

या सभेमार्फत होणाऱ्या हळदीकुंकवाच्या समारंभांत रमाबाई पुढें जातीनें काम करीत असत. पण ही सभा जेव्हां सार्वजनिक काकांनीं काढली तेव्हां पुरुषांत जेथें विचाराला ठाव नाहीं तेथें 'स्त्री-विचारवती' सभेची काय जरूरी आहे असें 'ज्ञानप्रकाश'नें उद्गार काढले होते. पण १८९३ सालच्या सुमारास चार पांच वर्षें प्रि. आगरकर यांचें सुधारक पत्र या गोष्टींचा जोरानें पुरस्कार करीत होतें. "ज्या तत्त्वांचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत तीं तत्त्वें हा सुधारक महाराष्ट्रांतील लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यास त्यास आज ज्याचा जारीनें अम्मल चालू आहे त्या लोकमताविरुद्ध जावें लागणार असल्यामुळें फार त्रास पडणार आहे," हें जाणूनहि प्रि. आगरकर यांनीं १८८८ पासून नवीं तत्त्वें अत्यंत कळकळीनें आपल्या पत्रांतून मांडण्यास सुरवात केली. मिल यांचे ग्रंथ या नव्या विचारसरणीचे आधारभूत ग्रंथ होत. या ग्रंथांतील विचारसरणीचा पगडा जसा प्रि. आगरकर यांच्यावर बसला होता तसा त्यांच्या वेळच्या तरुण पिढीवर म्हणजे कै. हरि नारायण आपटे, प्रो. भाटे वगैरे मंडळीच्या मनावर बसला होता. मिलचे ग्रंथ आणि प्रि. आगरकर यांचें तळमळीचें लिहिणें यामुळें त्या वेळच्या तरुणपिढीच्या विचारसरणीला कोणत्या तऱ्हेचें वळण मिळत होतें याचा मासला प्रो. कर्वे यांनीं १८९२ मध्यें रँगलर परांजपे यांना केलेल्या उपदेशांत पाहावयास सांपडतो. बायकोला शाळेंत पाठविणें, पुनर्विवाह करणें, लहानपणीं मुलींचं लग्न न करणें किंवा मोठेपणीं लहान मुलीशीं लग्न न करणें यामुळें जर वडिलांचें मन दुखत असेल तर त्याला नाइलाज समजून आपणाला जो मार्ग योग्य दिसेल तो स्वीकारावा असा आपणास प्रो. कर्वे ह्यांनीं उपदेश केला असा रँगलर परांजपे यांनीं प्रो. कर्वे यांच्या आत्मवृत्तास लिहिलेल्या प्रस्तावनेंत उल्लेख केला आहे.

१८७३ ते १८९३ या वीस वर्षांत मिल्ला मानणारी आणि लोकांत रूढ असलेल्या विचारसरणीशीं चार हात करण्यास सज्ज अशी मंडळी उत्पन्न झाली होती. नवमतवादी तरुणांच्या या चढाईच्या धोरणामुळें स्वसंस्कृतीचें संरक्षण करण्याच्या बुद्धीनें प्रेरीत झालेली कांहीं मंडळी याच काळांत पुढें आली. नवमतवाद्यांनीं हिंदुसंस्कृतीवर चढविलेला हल्ला परतविण्यास प्रथम कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सुरुवात केली. हा हल्ला अनेक तऱ्हेनें येत होता. खिस्ती मिशनरी धर्माच्या बाजूनें हल्ला चढवीत होते, लोकहितवादींनीं शास्त्री पंडितांवर हत्यार उचललें होतें, कित्येक इंग्रज वाङ्मयाच्या उपासकांनीं मराठी काव्यावर झोड उठविली होती आणि 'सुधारका'नें समाजाच्या आचारविचारावर कठोर प्रहार करण्यास सुरवात केली होती. ह्या हल्ल्यांचा प्रतिकार करणारा राष्ट्राभिमानी वर्ग कै. विष्णुशास्त्री यांनीं तयार केला व त्याचें कार्य लोकमान्यांनीं पुढें चालविलें. हिंदु संस्कृती विचाराच्या कसोटीला इंग्रजी संस्कृतीच्या बरोबरीची उतरते एवढेंच नव्हे तर ती इंग्रजी संस्कृतीपेक्षां कांकणभर सरस आहे, असें 'गीतारहस्यां'त सप्रमाण लोकमान्यांनीं सिद्ध केलें आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आरंभलेल्या कार्याचा परिणाम डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या मनावर पुष्कळच झालेला आढळून येतो.

या भांडणांत न्यायमूर्ति रानडे यांना मृदुंगासारखा दोन्ही पक्षांकडून टीकेचा भडिमार सहन करण्याचा प्रसंग नेहमीं येत असे. न्या. रानडे यांना स्वसंस्कृतीचा अभिमान होता; पण त्या संस्कृतीची विचारसरणी आणि चालू आचार यांचा मेळ नसल्यामुळें आचारांत बदल व्हावा असें त्यांचें मत होतें. बालविवाहाची चाल नसावी, स्त्रियांना शिक्षण द्यावें, बालविधवांना पुनर्विवाहची आडकाठी नसावी स्त्रियांनीं सार्वजनिक चळवळींत भाग घ्यावा असें त्यांचें स्पष्ट मत होतें; पण त्यासाठीं स्वसंस्कृति सोडण्यास किंवा जुन्या पिढीचा अनादर करण्यास ते तयार नव्हते. जुनें मोडून नवी सृष्टि

उत्पन्न करण्याचा त्यांचा इष्ट नव्हता. त्यामुळें न्यायमूर्ति हे खरे खरे सुधारक नव्हत असें त्यांचे प्रतिपक्षी म्हणत आणि सुधारकांनाहि मनांतल्या मनांत तसेंच वाटे. जुन्या आचारविचारांचें मूळ तोडून टाकण्यास न्यायमूर्ति रानडे तयार नाहींत म्हणून सुधारक नाखूष असत व न्यायमूर्ति रानडे समाजाच्या आचारांत बदल घडवून जुन्या संस्कृतिला खिळखिळी करण्याचें काम करीत आहेत म्हणून हिंदुसंस्कृतीचा अभिमानी पक्ष त्यांच्यावर चडफडत असे. पण न्यायमूर्ति रानडे यांना स्वसंस्कृति राखून संसारांतील आनंदाच्या आड येणाऱ्या गोष्टी समाजाच्या आचारांतून काढून टाकावयाच्या होत्या.

त्यांचें धोरण अगदीं बरोबर होतें. स्त्रियांचा अडाणीपणा जावा, बालविधवांना संसार करण्याची संधि मिळावी व या कामीं येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या असें म्हटलें म्हणून स्वसंस्कृतीचा अभिमान सोडावयाला पाहिजे असें नाहीं. पण या कामीं स्वसंस्कृति आपणाला हात देणार नाहीं असें म्हणणारे व त्याप्रमाणें वागणारे खरे सुधारक होत, असें त्या वेळीं समजलें जात होतें व आतांहि जातें. आपल्या समाजांत प्रौढ विवाहाची व स्वयंवराची चाल रूढ झाल्याशिवाय, प्रत्येक विधवेला पुनर्विवाहाची परवानगी असल्याशिवाय आणि प्रत्येक स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचें शिक्षण दिल्याशिवाय आपल्या देशाचा उद्धार होणार नाहीं अशा एकांतिक मताचे न्यायमूर्ति रानडे नव्हते. रमाबाईंना सार्वजनिक कार्याची दीक्षा देतांना अर्थात् आपल्या मताचें वळण न्यायमूर्ति रानडे यांनीं त्यांना लावलें.

रमाबाईंनीं १८८१ च्या आधींच सार्वजनिक चळवळींत प्रवेश केला व १८९३ नंतर मुंबईस गेल्यावरहि त्या सार्वजनिक चळवळींत पडत होत्या. पण १८८१ ते १८९३ हा पुण्यांतील सार्वजनिक काम करण्याचा काळ त्यांना तपश्चर्येसारखा गेला.

न्यायमूर्ति रानडे नाशिकास १८७८--८० मध्यें काम करीत असतांना रा. ब. गोपाळ हरि देशमूख तेथें जाईंट जज्ज होते. ‘ त्यांच्या सहा सुना व दोन लेकी त्या वेळच्या मानानें बऱ्याच शिकलेल्या होत्या. त्यांचें कुटुंब जुन्या चालीचें होतें तरी त्यांना उत्तम लिहितां वाचतां येत असे. पुराण ऐक-ण्याचा व स्वतः वाचण्याचा त्यांना नाद असे. ह्या बहुतेक सर्व व्रतें वैकल्यें व नियमधर्म करीत व त्या निमित्तानें वारंवार गांवांतील बायकांना हळदी-कुंकवाला बोलावीत. यामुळें माझेंहि त्यांच्या घरीं जाणें येणें होऊं लागलें म्हणून माझा परिचय जास्त झाला. रा. ब. देशमूख व स्वतः असे दोघेहि स्त्रीशिक्षणाचे अभिमानी असल्यामुळें आपल्या बायकांनीं हळदीकुंकवाच्या निमित्तानें कां होईना, पण गांवांतील बायकांना वारंवार एकेठिकाणीं जम-वून सीता, सावित्री यांच्या सारख्या प्राचीन साध्वींचीं चरित्रें त्यांना वाचून दाखवावीं व शिक्षणाकडे त्यांचें मन वळवावें; तसेंच गांवांतील मुलींच्या शाळा पहाव्यात, त्यांना उत्तेजन येण्याकरितां कांहीं अल्पस्वल्प बक्षिसें द्यावींत वगैरे गोष्टी आवडत असत व याबद्दल आमच्या मागें तगादा असे’ असें रमाबाईंनीं आपल्या आठवणींत लिहिलें आहे.

न्यायमूर्ति रानडे यांच्या वरील इच्छेप्रमाणें एक नाशिकास व पुढें १८८१--८२ मध्यें सातारा जिल्ह्यांत फिरतीवर असतांना तासगांवास मुलींच्या शाळेच्या बक्षिससमारंभांत भाग घेण्याचे प्रसंग रमाबाईंना लाभले. ठाण्याचे सेशन जज्ज मि. कागलन साहेब नाशिकास सेशन चालविण्यासाठीं आले असतांना तेथील मुलींच्या शाळेचा बक्षिससमारंभ त्यांच्या पत्नीच्या हस्तें करण्याचें डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टरांनीं ठरविलें. या समारंभास नाशिकांतील सुमारें पन्नास साठ बायका जमल्या होत्या. या बायकांना निमंत्रणें देण्याचें काम रमाबाई व देशमुखांच्या मुलींनीं घरोघर जाऊन केलें होतें. मिसेस कागलन यांच्या हस्तें बक्षिस वांटून झाल्यावर त्यांचे आभार मानण्याचा व जमलेल्या बायकांना उत्तेजनपर आणि उपदेशपर अशा तऱ्हेचा थोडासा

मजकूर न्यायमूर्ति रानडे यांनीं लिहून दिला होता. तो देशमुखीण बाईनीं वाचून दाखवावा असें ठरलें होतें; पण आयतेवेळीं त्यांनीं तें वाचण्याचें नाकारल्यावरून न्यायमूर्तींनीं रमाबाईना वाचावयास सांगितलें. रमाबाईनीं हें काम नीट रीतीनें पार पाडलें. या जाहीर समारंभांत रमाबाईनीं पहिलें भाषण करून सार्वजनीक कार्याची धुरा वहाण्यास सुरवात केली. या प्रसंगीं घडलेल्या एका गोष्टीवरून रमाबाईचा हिंदु स्त्रीचा बाणा दिसून येतो. आभार प्रदर्शनाचें काम झाल्यावर रमाबाईनीं मिसेस कागलनबाईना, त्यांच्या आईला व बहिणीला हार घातला व एक हार वगळून त्यांनीं तबक डेप्युटींच्या पुढें सारलें. ' हा हार साहेबांना घालावयाचा ' असें डेप्युटींनीं सुचवितांच रमाबाईना राग आला. रा. ब. देशमुख यांच्या लक्षांत ही गोष्ट आली. ते पुढें झाले व त्यांनीं कागलनसाहेबांच्या गळ्यांत हार घालून प्रसंग साजरा केला.

हार घालण्याचे वेळीं कागलन साहेबांना कां वगळलेंस असें घरीं आल्यावर न्यायमूर्तींनीं कौतुकानें रमाबाईना विचारलें. तेव्हां ' मी हिंदू नसतें तर मलाहि याचें कांहीं वाटलें नसतें ' असें रमाबाईनीं उत्तर दिलें. 'डेप्युटींना व्यवहार कमी खरा' असे यावर न्यायमूर्तींनीं काढलेले उद्गारहि लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. हिंदू स्त्रीच्या स्वभावाला धरून कागलनसाहेबांसारख्या परपुरुषास हार घालण्यास रमाबाईनीं नाकारलें ही गोष्ट रा. ब. गोपाळ हरी देशमूख यांच्याप्रमाणेंच न्यायमूर्ति यांनाहि पसंत पडली हें तर झालेंच; पण नाशिकच्या हायस्कूलचे हेडमास्तर द्वारकानाथ राघोबा तरखडकर यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनींहि दुसरे दिवशीं डेप्युटींचा कावा ओळखून रमाबाई वागल्या याबद्दल समाधान व्यक्त केलें. शिकले सवरले तरी मडमाप्रमाणें वागलें पाहिजे अशी बुद्धि समंजस मंडळींत नव्हती ही गोष्ट या प्रसंगावरून नजरेस येते. पुढें सातारा जिल्ह्यांतील दुसऱ्या फिरतीचे वेळीं रमाबाई न्यायमूर्तींचा तासगांवास मुक्काम असतांना त्यांना डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर

भेटावयाला आले व त्यांनीं तेथील मुलामुलींच्या शाळेचा बक्षीस समारंभ न्यायमूर्ति व रमाबाई यांच्या हस्तें व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली. न्यायमूर्तींनीं डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टरांची विनंति मान्य केली व रमाबाईंना या खेपेस स्वतः भाषण तयार करून बोललें पाहिजे असें सांगितलें. तासगांवच्या मुलींच्या शाळेंतलि बक्षिस समारंभ आटोपून आल्यावर रमाबाईंना आपल्या भाषणाचा रिपोर्ट न्यायमूर्तींना द्यावा लागला. 'आपल्या लोकांत स्त्रीशिक्षणाविरुद्ध जो आक्षेप घेण्यांत येतो त्यांत ते अशी गोष्ट पुढें आणतात कीं, बायका शिकल्या म्हणजे दांडग्या बेपर्वा व मर्यादारहित होतील. याकरितां मुलींनों, तुम्ही शिकलेल्या मुलींनीं तर या आक्षेपाला जागाच देतां कामा नये. मनुष्यानें उद्धट व्हावें हा सुशिक्षणाचा परिणाम खचित नव्हे. सुशिक्षणाचा व संपत्तीचा परिणाम म्हणजे मनुष्याला विनयसंपन्न व नम्र करावयाचा असाच असतो. याला उदाहरण, साधारण सर्वांना समजणारें आपण केळीचें घेऊंया. केळीचें वैभव म्हणजे तिला अतिशय मोठा लंगर येणें हें होय. असें वैभव प्राप्त झालें असतां ती कधीं ताठत नाहीं, उलट अधिक नम्र व विनयशील दिसते व यामुळेंच ती अतिशय शोभते. यावरून आपल्याला इतकाच बोध घ्यावयाचा कीं, विद्या, संपत्ति, अधिकार यासारखें कोणतेंहि वैभव प्राप्त झालें असतां आपण अधिक नम्र व विनयशील होऊन आपल्या पतीशीं व वडीलमाणसांशीं आदरानें व आज्ञाधारकपणानें वागावें. त्यांत आपलें कल्याण आहे वगैरे, आपल्या भाषणाचा वरील सारांश रमाबाईनीं न्यायमूर्तींना सांगितला व तो ऐकून त्यांना संतोष वाटला. नाशिक येथील समारंभाच्या वेळचें वर्तन व तासगांवच्या समारंभांतील रमाबाईंचें भाषण कोणा हिंदु स्त्रीला पटणार नाहीं ?

पण न्यायमूर्ती रानडे यांचें वर्तन जसें त्यांच्या शत्रुमित्रांना पटत नसे तसेंच रमाबाईंचें वागणें त्यांच्या घरांतील व गांवांतील बायकांना पटत नसे. शिकलेल्या स्त्रीनें जाहिर समारंभांतून भाग घेतला कीं तिनें हिंदु स्त्रीच

स्वभाव सोडून दिला पाहिजे असें नाहीं, असें रमाबाईनीं आपल्या वर्तनानें दाखविलें होतें; पण त्या वेळीं जाहीर सभांतून बोलणाऱ्या स्त्रियांबद्दल घरांतील किंवा पुण्यांतील स्त्रियांची दृष्टि स्वच्छ राहिलेली नव्हती. या बाबतींत रमाबाईंना घरांतील व गांवांतील बायकांचा त्रास सोसावा लागला.

१८८१ मध्यें पुण्यास बदली होण्यापूर्वी न्या. रानडे कांहीं दिवस मुंबईस चीफ प्रेसीडेन्सी मॅजिस्ट्रेटचें काम पाहात होते. मुंबईस प्रार्थना समाजाच्या मुख्य शाळेंत 'आर्य महिला समाज' नांवाची संस्था पंडिता रमाबाई यांनीं स्थापन केली होती. तिच्या सभा दर शनिवारीं भरत असत. सभेला आठ दहा बायका व चार सहा पोक्त पुरुष येत असत. कोणी तरी एकाद्या विषयावर निबंध अगर थोड्या ओळी लिहून आणीत व कधीं कधीं पुस्तकांतील एकादा उताराहि लिहून आणीत. सभेंत हजर असलेली पोक्त मंडळी म्हणजे डॉ. आत्माराम दादा, भास्करराव भागवत वगैरे हजर असलेल्या बायकांना उत्तेजन यावें म्हणून "चांगलें लिहिलें आहे; पण आतां यावर कोणी कांहीं बोला" असा आग्रह करीत व कोणालाहि बोलण्याचें धैर्य झालें नाहीं तर आपणच चार दोन सोपीं व लहान वाक्यें बोलून दाखवीत आणि असें बोलावें म्हणून सांगत. या सभांना रमाबाई जात असत.

पुण्यास आल्यावर न्यायमूर्ती रानडे यांच्या खटपटीनें १८८१ च्या एप्रिल महिन्यापासून फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या एका दिवाणखान्यांत मुंबईप्रमाणेंच दर शनिवारीं स्त्रियांच्या सभा भरूं लागल्या. या सभेंत केरोपंत नाना छत्रे स्त्रियांना आस्थेनें शिकवीत असत. रमाबाईंचा केरोपंतांचे जवळ संस्कृत शिकण्याचा बेत होता; पण घरच्या बायका त्यांचा एकादेवेळीं अपमान करतील अशी भीति वाटून न्यायमूर्तींनीं हा बेत रहित केला. शनिवारच्या सभा निर्विघ्नपणें पार पडत; पुढें पुण्यास पंडिता रमाबाईनीं 'आर्य महिला समाज' स्थापन केला व तेथें त्यांचीं निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें होऊं लागलीं.

पंडिता रमाबाईंची वाणी अस्खलित व गोड असून विषय प्रतिपादन करण्याची शैली उत्तम होती. त्यामुळें पुण्यांतील नव्या व जुन्य स्त्री-शिक्षणेच्छु विद्वानांना पंडिताबाईंचें कौतुक व अभिमान वाटूं लागला, व दर शनिवारीं ते आपल्या घरच्या बायकांना व मुलींना सभेला पाठवूं लागले.

या सभेमुळें रमाबाईंना घरच्या बायकांचीं बोलणीं सोसावीं लागत. त्या वेळच्या त्यांच्या स्थितीचें वर्णन 'आठ महिन्यांचा उन्हाळा व एक दिवसाचा पावसाळा' या शब्दांत त्यांनीं उत्कृष्टपणें व्यक्त केलें आहे. रमाबाईंना होणारा हा त्रास अगदीं अपूर्व होता असें नाहीं. काशीबाई कानिटकर यांनाहि सभेला जाण्याचे बाबतींत घरच्या बायकांचा असाच त्रास सहन करावा लागत असे. त्यांचें सासर मुंबईस होतें. त्या वेळीं प्रार्थना समाजांत रविवारीं सभा भरून स्त्रियांना अनेक विषयांचें ज्ञान करून देण्यांत येत असे. या व्याख्यानांचा योग काशीबाई कशा साधीत याची त्यांच्या तोंडची हकिगत लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं काशीबाईंच्या 'चांदण्याच्या गप्पा' या पुस्तकास लिहिलेल्या प्रस्तावनेंत पुढील प्रमाणें दिली आहे; "व्याख्यानाची वेळ दुपारीं तीन ते चार असे. या वेळीं घरांतली वडिल मंडळी विश्रांति घेत पडलेली असे. त्यांना विचारल्याशिवाय सासुरवासिनीनें घराच्या बाहेर पाऊल टाकावयाचें नाहीं, व 'मी व्याख्यान ऐकावयास जाऊं का?' म्हणून विचारणें तर केवळ सुळावरची पोळी काढून खाण्याइतकें सोपें! न जावें तर भयंकर रागाला वळी पडावयाची! अशा अत्यंत कचाटींत सांपडलें असतां शाल व जोडा पदराखालीं लपवून मागेंपुढें पहात पहात मागल्या बोळानें मी एकदांची रस्त्याला लागलें. परत येते वेळीं शाल व जोडा तबेल्याच्या खिडकींतून घोड्याच्या गवताच्या ढिगावर टाकून हळूच आंत येई. असा चोरटा कारभार कित्येक महिने चालला होता. रविवार असल्यामुळें घोडेवाला घरीं असे. बाहेर पडण्यास व आंत येण्यास त्याचें साहाय्य होत असे. तो कधीं कधीं रविवारीं सकाळींच माझी शाल व जोडा गाडींत नेवून ठेवी व संध्याकाळीं

मी खिडकींतून टाकलेला जपून वर आणून ठेवी. एवढ्याबद्दल त्याचे मला अतोनात उपकार वाटत. ” काशीबाईंना सभांना हजर राहण्यासहि जी अडचण वांटणीला येत असे; ती रमाबाईंच्या वाट्याला येत नसे. पण घरच्या बायकांचा शब्दांचा असह्य मार सहन करावा लागे. काशीबाई रविवारच्या सभेंत चर्चेत भाग घेत असत. त्यांनीं एकदां ‘ हल्लींच्या स्त्रिया व पूर्वीच्या स्त्रिया ’ या विषयावर एक निबंध लिहिला तो सभेच्या व्यवस्थापकांस आवडल्यामुळें त्यांनीं तो सुबोध पत्रिकेंत छापला. तो अंक रविवारीं घरीं येतांच काशीबाईच्यावर मोठा गहजब झाला. या घोर अपराधाबद्दल त्यांच्यावर घरांतील अवघड कामें लादण्यांत आलीं व त्यांच्या तोंडाला कुलूप ठोकण्यांत आलें. अशा स्थितीमध्यें त्यांना शेकडोवेळां देहाचें विसर्जन करावें असें सुद्धां मनांत येई असें रा. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं आपल्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे.

पंडिता रमाबाईच्या सभेला हजर राहण्याबद्दल असें वाग्ताडन सहन करीत असतांना पुण्यास मुलींचें हायस्कूल पाहिजे म्हणून १८८३ मध्यें हिराबागेंत बायका पुरुषांची एक मोठी सभा भरली होती. या सभेंत रमाबाईनीं इंग्रजींत ॲड्रेस वाचून दाखविला. याच्या आधीं रमाबाई दोनदां सभेंतून बोलल्या होत्या; पण पुण्यास, जाहीर सभेंत आणि तोहि इंग्रजी ॲड्रेस वाचण्याचा त्यांच्यावर हा पहिलाच प्रसंग होता. अर्थात् त्या उभ्या राहिल्याबरोबर घाबरून गेल्या. पण डॉ. भांडारकर यांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णाबाई यांनीं त्यांना धीर दिला व रमाबाईनीं धीर करून भाषण वाचून दाखविलें. या भाषणाबद्दल रमाबाईच्या ताई सासूबाईनीं न्यायमूर्ति रानडे यांना “ तुझी पगडी कशी डोक्यावर राहिली. ” असा सवाल केला. तेथें रमाबाईना केवढा शब्दाचा मार सोसावा लागला असेल याची कल्पनाच करणें बरें. हा सारा नाचरेपणा रमाबाईनाच पाहिजे, असें घरांतील बायका म्हणत व न्यायमूर्ति कधींहि आपल्या सांगण्यावरून रमाबाई या गोष्टी करता-

हेत असें सांगत नसत. यामुळें रमाबाईंना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागे. हिराबागेंतील भाषणाचे बाबतींतहि असेंच झालें. रमाबाईंच्या ताईसासूबाई "आतांच्या या मुलीं बोट दिलें तर हात गिळावयाला येतात. त्यांना बेतानें वागविलें नाहीं तर त्या आळ्यांत राहावयाच्या नाहींत. काय बाई तरी ! घरांत ती एक शब्दहि बोलत नाहीं. किती तरी गरीब दिसते; पण बाहेर तिला इतका कुठला धीटपणा आला तो ! ऐकल्यापासून मला पुनः पुनः नवल वाटतें," असें न्यायमूर्तींना म्हणाल्या तरी न्यायमूर्ति असें कांहीं म्हणाले नाहींत कीं, "तिनें आपण होऊन वाचलें नाहीं. मी सांगितलें म्हणून वाचलें." "इतकें जरी स्वतः म्हटलें असतें तरी मला पुरे होतें. पण तसें कांहीं झालें नाहीं" असें रमाबाईंनीं यासंबंधीं आपल्या आठवणींत म्हटलें आहे.

हिराबागेंतील जाहीर सभेंतील भाषणाबद्दल रमाबाईंच्या इच्छेप्रमाणें न्यायमूर्तींनीं घरच्या वडील बायकांच्या जवळ जरी खुलासा केला नाहीं, तरी त्यांनीं नंतर रमाबाईंची समजूत घातली. आपण जें कृत्य चांगलें म्हणून करीत असतों तें दुसऱ्यांला वाईट दिसत असलें तरी तें कृत्य करावयाचें व त्याबद्दल कोणी बोललें तरी उलट जबाब देण्याच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असें न्यायमूर्तींनीं आपल्या वागण्याचें धोरण स्वीकारलें होतें. याच धोरणाचा उपदेश रमाबाईंची समजूत घालतांना न्यायमूर्ती करीत असत. रमाबाईंनीं हिराबागेंतील जाहीर सभेंत इंग्रजी ॲड्रेस वाचला याबद्दल ताई सासूबाई त्यांना बोलल्या याबद्दल न्यायमूर्तींना राग आला नाहीं; पण पुढें अन्नपूर्णाबाईंच्या पुराणाच्या वेळीं गांवांतील बायकांचा रमाबाई वगैरे सुधारकांत गणल्या जाणाऱ्या स्त्रियांना पुरुषांत बसविण्याचा डाव साधूं द्यावयाचा नाहीं म्हणून रमाबाई पुराणांतून उठून आल्याबद्दल मात्र न्यायमूर्ति रमाबाईंच्यावर गरम झाले आणि त्यांनीं त्यांना अबोल्याची शिक्षा दिली.

ही हकिगत अशी झाली. १८८४--८५ च्या सुमारास अनुसूयाबाई नांवाच्या संस्कृतज्ञ पुराणिक बाई पुण्यास आल्या. बरोबर त्यांचे पति व वृद्ध वडील होते. ह्याहि पंडिता रमाबाईसारख्या श्रीमद्भागवत वाचीत व पुराणिकासारखें सर्व देऊळभर ऐकावयाला जाईल असें गळ्यावर संहिता वाचून अर्थ सांगत. पंडिता रमाबाईप्रमाणेंच अनुसूयाबाईचें पहिलें पुराण न्यायमूर्तींच्या घरीं झालें. पुढें त्यांचें पुराण सार्वजनिककाकांच्या विष्णुमंदिरांत ठरलें. त्या वेळीं विष्णुमंदिरांत नेहमीं पुराणास येणाऱ्या बायकांनीं असा कट केला कीं, "या सुधारकांच्या बायकांना आज आपण बसावयास जागा द्यावयाची नाहीं. सभामंडपांतील तेवढी जागा राखून ठेवून गाभाऱ्याच्या पुढील जागा आपण धरून बसूंया, म्हणजे त्यांना मंडपामध्यें पुरुषांच्या शेजारींच बसावें लागेल. ह्या सभेला जातात तेव्हां पुरुषांच्या खुर्च्यांना खुर्च्या लावून बसतात; मग येथेंच तेवढी वेगळी जागा कशाला पाहिजे ?" विष्णुच्या मंदिरांत रमाबाई वगैरे बायकांना सभामंडपांत पुरुषांत बसविण्याचा गांवांतील बायकांचा बेत साधला. ह्या बेताची बातमी रमाबाईंना त्यांच्या मैत्रिणींनीं दिली होती; पण ही बातमी त्यांना फार उशीरा कळली. रमाबाईंना गांवांतील बायकांच्या या बेताबद्दल फार वाईट वाटलें व अपमानहि वाटला. देवळांत गेल्यावर त्या नाखुशीनें पंडिता रमाबाई व इतर बायका यांच्याबरोबर पुरुषांसमोर बसल्या. अनुसूयाबाईच्या व्यासपीठाच्या एका बाजूला सुधारक व दुसऱ्या बाजूला सुधारकांच्या बायका बसाव्या अशी व्यवस्था करण्यांत आली होती.

रमाबाईंना ही बातमी कळल्यापासूनच राग आला होता. तशा मनाच्या स्थितींत त्या देवळांत येऊन बसल्या; पण तेथें त्यांना दहा पंधरा मिनिटांपेक्षां अधिक वेळ बसवलें नाहीं. आपणाला घेरी वाटते आहे असें त्यांनीं पंडिता रमाबाईंना त्यांच्या कानांत सांगितलें व त्या घरीं आल्या. कागलनसाहेबांना डेप्युटींनीं हार घाला म्हणून सांगितल्याबरोबर रमाबाईंच्या अंगांतील हिंदु स्त्रीचा स्वभाव उसळून बाहेर आला. तोच स्वभाव गांवांतील बायकांच्या

कटानेंहि उसळून बाहेर पडला. व त्या तडाक्यांत त्या घरीं परत आल्या. आपण चांगली गोष्ट केली या आनंदाच्या भरांत त्या घरीं आल्या, व त्यांनीं आल्याबरोबर ताई सासूबाईंना आपण कां परत आलें, तें सांगितलें. तेव्हां त्या शाबासकीच्या स्वरानें म्हणाल्या, "पाहिलेंस, हा असाच तर्क ठेवला पाहिजे, म्हणजे लौकिकांत बरें दिसतें व लोक नांवें ठेवीत नाहींत. या नव्या शिकलेल्या पोरांना कांहीं व्यवहार समजत नाहीं. काय हवें तें करावयाला सांगतात. म्हणून तें सगळें करून आपलें कसें चालेल? घरच्या पुरुषांना राग आला तरी तो दोन दिवसांनीं जाईल. त्याचा काय बोभाटा आहे? पुरुषांचा रागावण्याचा स्वभावच असतो. घरचादारचा सगळा राग काय तो बायकोवर काढण्यांत त्यांना पराक्रम वाटतो." ताई सासूबाईंच्या शाबासकीनें दुणावलेला आनंद रमाबाईंना फार वेळ उपभोगावयाला मिळाला नाहीं.

न्यायमूर्ती रानडे घरीं आल्यावर अर्थात् रमाबाईंना काय होतें याची त्यांनीं चौकशी केली. कांहीं होतंच नव्हतें तर रमाबाई तरी काय उत्तर देणार? त्यांनीं आपणाला कांहीं होत नाहीं, असें न्यायमूर्तींना सांगितलें. त्याबरोबर न्यायमूर्तींनीं नेहमींप्रमाणें रमाबाईंची कपडे काढतांना मदत घेतली नाहीं व ते त्यांच्याशीं एक अक्षरहि बोलले नाहींत. रात्रहि अशीच अबोल्यांत गेल्यामुळें सकाळींहि रमाबाईंना चैन पडेना. शेवटीं न्यायमूर्ती रानडे जेवावयास येण्यापूर्वीं त्यांना भेटून आपली चूक झाली, असें त्यांनीं कबूल केलें. तेव्हां न्यायमूर्ति म्हणाले, "पहिल्यांदा अशी वेड्यासारखी वागतेस, त्याचा तुला तर त्रास होतोच, पण मलाहि होतो. आपलें माणूस आपल्या धोरणानें वागलें नाहीं तर तें कोणाला बरें वाटेल? एकदां आपल्या माणसाच्या आवडीची दिशा समजली म्हणजे तीच बळकट धरावी, म्हणजे दोघांनाहि त्रास होणार नाहीं. पुन्हां असें करूं नको." न्यायमूर्तींचा हा उपदेश रमाबाई पुढें कधीं विसरल्या नाहींत. कागलनसाहेबांना कां हार

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ...

घातला नाहींस, त्यांनीं काय तुझें घोडें मारलें होतें, असें कौतुकानें विचारून डेप्युटींना एकंदरींत व्यवहार कमी असा त्या प्रकरणीं न्यायमूर्तींनीं शेरा मारला होता. तसें पाहिलें तर रमाबाई कागलनसाहेबांना हार न घालण्याचे प्रसंगीं ज्या मनाच्या कलाला धरून वागल्या होत्या त्याच कलाला अनुसरून त्या पुराणांतून उठून आल्या होत्या. असें असतांना रमाबाईंनाच व्यवहार कमी असें न्यायमूर्तींनीं ह्मटलें हें कसें? न्यायमूर्तींच्या वर्तनांत हा ढळढळीत विरोध दिसत नाहीं काय? थोडा विचार केला. तर न्यायमूर्तींचें करणें सुसंगतच होतें असें दिसून येईल.

धीटपणानें वागणें म्हणजे विनय सोडून देणें नव्हे. कागलन साहेबांना हार घालण्यांत हिंदु स्त्रीच्या दृष्टीनें विनयभंग होत होता. जाहीर सभेसारख्या प्रसंगीं स्त्रियांनीं इंग्रजी पद्धतीप्रमाणें पुरुषांना हार घातला म्हणून कांहीं बिघडलें असें न्यायमूर्तींना अर्थात् वाटत नव्हतें. पण हिंदु स्त्रीच्या स्वभावांत परपुरुषाच्या गळ्यांत हार घालणें ही गोष्ट अविनयाची समजली जाते हें न्यायमूर्तींना ठाऊक होतें. साहेबांस जाहीर सभेंत हार घालणें इतका धीटपणा करण्यापुरताच हा प्रश्न नव्हता. यांत पतिविषयक हिंदुस्त्रीच्या ज्या भावना आहेत त्या भावनांचा संबंध येतो. आणि ह्या भावना चांगल्या नाहींत असें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. पण पुराणाच्या वेळचा प्रसंग निराळा होता. पुरुषांत बसणें ह्यांत स्त्रीचा धीटपणा दिसून येईल, यापेक्षां विनयभंगाच्या चांगल्या कल्पनेचा त्यांत संबंध येत नाहीं. गांवांतील बायकांचा सुधारक बायकांना हा एक लाजविण्याचा कट होता. ह्या कटास रमाबाई बळी पडल्या, म्हणून न्यायमूर्तींना त्यांचा राग आला. पर पुरुषांत जाऊन अंगाला वेटून आपल्या बायकोनें बसलें पाहिजे, अघळ पघळ बोललें पाहिजे असें न्यायमूर्तींचें म्हणणें नव्हतें. पण योग्य विनयाच्या मर्यादा पाळून धीटाईनें वागण्यास हरकत नसावी असें त्यांचें मत होतें. रमाबाई व न्यायमूर्ती तसे दोघेहि मनमोकळेपणानें वागत; पण रमाबाई कधीं न्यायमूर्तींच्या

मांडीला मांडी लावून बसल्या असें झालें नाहीं व त्या अशा बसत नसत म्हणून न्यायमूर्तीहि कधीं रागावले नव्हते. कारण धीटाईपेक्षां आदराचा भाग त्यांत फार असतो. आदर व निष्ठाबुद्धीनें विनयाच्या मर्यादा रमाबाईनीं पाळल्या तर त्यांत न्यायमूर्तींना आनंदच वाटे. धीटपणानें वागणें म्हणजे विनय सोडणें नव्हे, असें न्यायमूर्तींच्या वर्तनांतील या दोन प्रसंगांतून एक आचरणाचें सूत्र निघतें. हें सूत्र योग्य नाहीं असें कोणाला म्हणतां येईल ?

धीटपणानें वागणें म्हणजे विनय सोडणें नव्हे तसें साहेब लोकांशीं मिळून मिसळून वागणें म्हणजे साहेबांचे रीतिरिवाज उचलणें नव्हे असें न्यायमूर्तींना वाटत होतें. रमाबाईना ज्या तऱ्हेनें ते गांवांतील बायकांशीं वागावयाला सांगत व युरोपियन बायकांशीं स्नेह जोडावयाला सांगत त्यावरून ही गोष्ट दिसून येते.

हिराबागेंत मुलींच्या शाळेबद्दल इंग्रजींत ॲड्रेस वाचण्याचा प्रसंग आल्यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं हिराबागेंतच एज्युकेशन कमिशननें साक्षी घेण्यास सुरवात केली. या कमिशनपुढें रमाबाई व पंडिता रमाबाई या दोघींचीहि इंग्रजींत भाषणें झालीं. हिराबागेंतील पहिल्या भाषणापेक्षां रमाबाईचें या वेळचें भाषण अधिक चांगलें झालें. हिराबागेंतील या दोन्ही तिन्हीं सभांना पुण्यांतील जुन्या व नव्या विचारांच्या अशा बऱ्याच बायका जमत व मोकळ्या मनानें व हौसेनें एकमेकींशीं वागत, हे पाहून त्यांच्या परस्पर भेटीचे प्रसंग जुळवून आणले तर, या बायका प्रेमानें व एकोप्यानें वागूं लागतील; म्हणून हळदी कुंकवासारखे किंवा पार्टीसारखे समारंभ वर्षांतून दोन चार वेळां तरी करावेत; त्याला लागणारा खर्च आपण करावा, लोकांजवळ कांहीं मागूं नये असें न्यायमूर्तींचें रमाबाईना सांगणें असे. त्याप्रमाणें पुढें कांहीं महिन्यांनीं रमाबाई व त्यांच्या दोघी चौघी मैत्रिणींनीं त्या

वेळच्या मुंबईच्या गव्हर्नरांची बायको लेडी रे यांना उपाहारास बोलविलें. ही पार्टी पुण्यांत बायकांची अशी पहिलीच झाली. तींत हिंदु बायकांचे खाण्यापिण्याचे जिन्नस वेगळ्या खोलींत मांडले होते. खाणें झाल्यावर हिंदु रिवाजाप्रमाणें पानसुपारी, हळदी कुंकू वगैरे सर्व ठेविलें असल्यामुळें पुण्यांतील बायकांना ही पार्टीची चाल परकी न वाटतां उलट पसंत पडली असें रमाबाईंनीं आपल्या आठवणींत लिहिलें आहे.

न्यायमूर्ति रानडे १८९३ मध्यें हायकोर्टचे जज होऊन मुंबईस जाण्यापूर्वी पंचहौद मिशनचें चहाप्रकरण व संमति वयाच्या बिलाचा वाद या दोन प्रकरणांनीं पुण्यांत नव्या जुन्याच्या लढ्याला चांगलेंच तोंड लागलें होतें. पंचहौद चहाप्रकरणाच्या चहाच्या वेळीं रमाबाई इतर कांहीं बायकांबरोबर हजर होत्या; पण त्यांनीं चहा घेतला नव्हता. पंचहौद चहाप्रकरणाच्या बाबतींत न्यायमूर्तींनीं शेवटीं वृद्धांच्या मतांचा अनादार करावयाचा नाहीं असें धोरण स्वीकारलें. आणि त्यांनीं स्वतः प्रायश्चित्त घेऊन आपल्या स्नेह्यांचा मार्ग मोकळा करून दिला. संमतिवयाच्या बिलाच्या बाबतींत न्यायमूर्तींनीं अर्थात सुधारकांचा पक्ष स्वीकारला होता. संमतिवयाचें बिल शेवटीं पास झालें. संमतिवय बारा असावें. या बाबतींत राष्ट्राभिमानी मंडळींचाहि विरोध नव्हता. एकादी गोष्ट बहुजनसमाजाला पटल्यावर ती अमलांत येण्यासाठीं त्या संबंधानें कायदा होऊन राजसत्तेचा पाठिंबा मिळाला पाहिजे हीहि गोष्ट त्यांना अमान्य नव्हती. पण आपणाला समाजांत हव्या असलेल्या सुधारणा कायद्याच्या जोरावर अमलांत आणण्याचा नवमतवाद्यांचा कटाक्ष राष्ट्राभिमानी वर्गाला संमत नव्हता व या दृष्टीनें संमतिवयाच्या बिलाला त्यांचा विरोध होता. न्यायमूर्ति रानडे संमतिवयाचे बिलाकडे नवमतवाद्यांच्या एकांतिक मताच्या दृष्टीनें पाहात नव्हते. व त्यामुळें त्यांना राष्ट्राभिमानी मंडळींनीं या बिलास विरोध करावा हें

मान्य नव्हतें. न्यायमूर्ति रानडे यांच्या समाजसुधारणेच्या बाबतींतील या मध्यवर्ती धोरणाचा पुरस्कार आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें कै. हरि नारायण आपटे यांनीं केला. त्याची सुरवात १८९० पासून 'करमणूक' हें पत्र काढून कै. हरिभाऊंनीं केली होती. समाजाचे जुने आचारविचार पार उध्वस्त करून त्या जागीं नव्या आचारविचारांचा नवा बाग निर्माण करावयाचा ही नवमतवाद्यांची एकांतिक दृष्टि व या दृष्टीचा तितकाच राष्ट्राभिमानी पक्षाकडून होणारा एकांतिक दृष्टीचा विरोध न्यायमूर्ति रानडे यांना पसंत नव्हता. या मताचें आविष्करण कै. हरिभाऊ यांनीं जसें आपल्या कादंबरींतून केलें तसेंच पुढें सेवासदन चालवितांना हेंच धोरण रमाबाईंनीं आपल्या नजरेपुढें ठेवलें. पण या धोरणाचे धडे रमाबाईंना सार्वजनिक कार्याची तपश्चर्या करीत असतांना न्यायमूर्ति रानडे यांनीं दिलें. शिक्षण आणि सार्वजनिक कार्य या बाबतींत रमाबाईंनीं टाकींचे घाव्र सोसण्यांत जो सोशिकपणा दाखविला त्यामुळें त्यांच्या वडिलांनीं त्यांना आश्वासन दिल्याप्रमाणें रमाबाईंच्या पुढील चरित्रास तेज चढलें आहे.

[ ६ ]

# संसारांतील आनंद

मुलें बाळें, नोकर चाकर यांनीं घर गजबजलेलें असावें, आणि यांच्या जोडीला पतीच्या प्रेमाचा पूर्ण आधार मिळत असावा, हीच संसाराची खरी स्थिति असें प्रत्येक हिंदु स्त्रीला वाटत असतें.

धुळें येथें राहात असतांना रमाबाईंना एका अधमाचा शेजार मिळाला होता. त्याच्या कुटुंबासंबंधानें त्यांनीं आपल्या 'आठवणीं' त असे उद्गार काढले आहेत कीं, " थोड्याच दिवसांनीं एक बिऱ्हाड आलें. हेंहि कुटुंब वत्सल होतें. म्हणजे मुलगे, सुना, कुटुंब नोकर चाकर वगैरे मिळून बरीच मंडळी होती; पण प्रेम आणि वत्सलता हीं दोन मात्र त्यांच्यापासून फार दूर राहात असत. याबद्दल सर्व हकिगत मला त्यांच्या सुनांकडून कळत असे. मुख्य बाई स्वभावानें मायाळू, पोक्त व धार्मिक असत. हिंदु कुटुंबांत जीं आम्हीं सुखाचीं साधनें असें समजतों तीं त्यांना अनुकूल असत. त्यामुळें त्या मोठ्या नशीबवान् असा माझा समज होता; पण त्या फार दुःखी आहेत, असें त्यांच्याशीं झालेल्या परिचयावरून माझ्या लौकरच ध्यानांत आलें, व हा शेजार आपल्याला नसावा असें वाटूं लागलें. " या उद्गारांच्या जोडीला, " एक जें माझें खऱ्या सुखाचें व समाधानाचें ठिकाण त्यांत अंतर येऊं नये, व ही एक समाधानाची बाजू बळकट असेल तर घरांतील इतर कोणत्याहि माणसाकडून होणारा जाच व त्रास सोसण्याला मला अधिक बळ येईल, अशी माझी पक्की समजूत होती, " हे न्यायमूर्तींसंबंधाच रमाबाईंचे उद्गार वाचले, म्हणजे त्यांची व हिंदु स्त्रियांची संसाराची परिपूर्ण कल्पना मनापुढें उभी राहाते.

महाराष्ट्रांतील पन्नास वर्षांपूर्वीच्या कुटुंबांची स्थिति पाहिली तर प्रत्येक कुटुंबांत संसाराचा वृक्ष पूर्ण वाढीचा दिसे; पण वीज पडून निर्जीव झालेल्या वृक्षाप्रमाणें या कुटुंबांची स्थिति असे. प्रेम व वत्सलता हा संसार वृक्षाचा रस आहे; हा रसच त्या वेळच्या कुटुंबांतील संसारवृक्षाला सोडून गेला होता. प्रेम आणि वत्सलता हे गुण सोडून दिले तर मनुष्यांत माणुसकी ती कोठें राहिली? शरीरपोषणासाठीं खाण्याची इच्छा जशी मनुष्यांत आहे तशी पशूंतहि आहे. मांजर किंवा माकड आपल्या पोरांची काळजी वाहातें; पण स्वतः क्षुधित असले तर आपल्या पिलाला पंजा मारण्यास मांजर किंवा आपल्या पिलाच्या तोंडांतील जिन्नस हिसकावून घेण्यास माकड मागेंपुढें पाहात नाहीं. मागें पुढें पाहणें हें शहाणपण मनुष्याला परमेश्वरानें दिलें आहे व या शहाणपणालाच माणुसकी म्हणतात. माणुसकीमुळें मनुष्य आपोआप मागें पुढें जसें पाहातो तसें प्रेम व वत्सलता हे गुण त्याला शिकवावे लागत नाहींत. ह्या माणुसकीचा विसर त्या वेळच्या महाराष्ट्राला पडला होता. न्यायमूर्ती रानडे यांच्या धुळ्यांतील अधम शेजाऱ्यानें माणुसकीला सोडचिठ्ठी दिली होती. संपत्तीची अनुकूलता असतांनाहि तो आपल्या बायका मुलांना नीट वागवीत नसे. इतकेंच नव्हे तर त्यानें रमाबाईच्या बद्दलहि अभिलाष बुद्धि धरण्यास कमी केलें नाहीं. माणुसकीला जागणाऱ्या कुटुंबांतील कर्त्या बायका रमाबाईंना फारच थोड्या आढळल्या, हें त्यांनीं डॉ. भांडारकर यांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णाबाई यांच्याबद्दल आपल्या 'आठवणीं'त आदरानें केलेला उल्लेख वाचला म्हणजे मनापुढें स्पष्ट उभें राहातें. "सौ. अन्नपूर्णाबाई भांडारकर यांची वागणूक लेकींशीं व सुनांशीं सारखीच असे. अशी रीत हिंदु कुटुंबांत फारच क्वचित् दृष्टीस पडते. कोठें कोठें कांहीं दृष्टीस पडतें, पण यांच्या घरीं भेदभाव कधीं दिसला नाहीं. त्यामुळें कुटुंबांतील सर्वच माणसें एकोप्यानें व आनंदानें असत."

कुटुंबांत एकोपा व आनंद राहाण्यास माणुसकीचें प्राबल्य पाहिजे. माणुसकी हा दिसावयाला शब्द मोठा दिसत असला आणि प्रेम आणि वत्सलता हे गुण या लोकीं औषधालाहि मिळणार नाहींत असें वाटत असलें तरी वस्तुस्थिति तशी नाहीं. आपण एकाद्या परगांवांत किंवा पर मुलखांत असलों आणि आपल्या गांवच्या किंवा मुलखाच्या माणसाची गांठ पुष्कळ दिवसांनीं पडली असतां आपलेपणाची जी मनोमन साक्ष पडते, त्यामुळें आपणाला आनंद होतो. आपलेपणाची मनोमन साक्ष पटली असतां आनंदानें स्वाभाविकपणें मन भरून जातें. सौंदर्याची अस्पष्ट कल्पना आपल्या मनांत जागृत असते; म्हणून गुलाबाचें टवटवीत फूल दृष्टीस पडतांच आपणाला आनंद वाटतो. वत्सलता स्त्रियांच्या मनांत वास करीत असते आणि चालतें बोलतें वात्सल्य रांगत त्यांच्यापुढें आलें म्हणजे त्यांचें मन आनंदानें भरून जातें. सौंदर्य, प्रेम, वत्सलता, दया वगैरे सद्गुण मनुष्याच्या मनांत वास स्वभावतः करीत असतात. त्यांचें वसतीस्थान स्वर्गलोक नसून भूलोकांतील मनुष्याचें हृदयमंदीरच आहे. दुसऱ्याची भाषा अवगत करून घेणें कठीण असतें तसें पशुपक्ष्यांच्या सृष्टींत मनाला पटणारा आपलेपणा सहज अवगत करून घेतां येत नाहीं. पण आपलीच भाषा बोलणारा मनुष्य भेटला असतां एकमेकांचें मनोगत जसें लौकर कळतें तसें आपणाला मनुष्या मनुष्यांतील आपलेपणा चटकन् कळतो. मनुष्यामनुष्यांत आपलेपणा जो वाटतो तो प्रेम, दया, वात्सल्य या सद्गुणांच्या अस्तित्वानें वाटतो. मनुष्यांतील त्या सद्गुणांची ओळख झाली कीं दोन मनांना एकजीव व्हा, म्हणून सांगावेंच लागत नाहीं. या स्थितीचा अनुभव कोणाला येत नाहीं ? माणुसकी आपल्यांत आहे पण तिला हिंदु कुटुंबांतील नववधूप्रमाणें चोरटेपणानें वागावें लागत आहे आणि सुनेनें जसें आपल्या मनाला वाटेल तेवढें व तितकेंच अस्तित्व घरांत दाखविलें पाहिजे असें सासूला वाटत असतें तसेंच माणुसकीच्या बाबतींत आपणाला वाटत असतें. हिंदु कुटुंबांतील

सुनेला ज्याप्रमाणें घरांतील परसू वावरावयाला मिळतें किंवा देवांना देव्हाऱ्याचा प्रांत सोडून घरांतील कारभारांत ढवळाढवळ करूं देण्यांत येत नाहीं, त्याप्रमाणें कधीं आपण माणुसकीला अडगळींत ठेऊन देतों किंवा देवाप्रमाणें पुजतों; पण आपल्या रोजच्या आचारविचाराशीं माणुसकीचा संबंध येऊं देत नाहीं. यांत आपण मनुष्यस्वभावाला धरून चालत नाहीं, तर माणुसकीला विसरून चालत असतों. माणुसकीला विसरलेला समाज आणि मनुष्य आधोगतीला गेल्यावेरीज कसा राहील ?

समाजसुधारणा करावयाची म्हणजे अडगळींत पडलेल्या माणुसकीला रोजच्या उपयोगाला आणावयाची आणि या बाबतींत येणाऱ्या अडचणी काढून टाकावयाच्या. माणुसकीला रोजच्या आचरणांत आणावयास घरांतील कर्त्या बायकोनें किंवा पुरुषानें सुरवात केली कीं, कुटुंबांत आनंद उत्पन्न होतो आणि साहजिकच एकोपा वाढीला लागतो. आपणाला जसा राग लोभ आहे, आवडी निवडी आहेत तशा दुसराहि मनुष्यच असल्यामुळें त्यालाहि आहेत, असें आपण वादविवादाच्या वेळीं किंवा मन शांत असतांना कबूल करतों; पण प्रत्यक्ष वागण्याची वेळ आली असतां स्वतःचा राग लोभ किंवा आवड निवड हीच श्रेष्ठ समजून ती दुसऱ्यावर लादीत असतो. असें करणें कर्तेपणाचें लक्षण नव्हे. न्यायमूर्ती रानडे ह्यांचें वर्तन कर्त्या पुरुषाला साजेसें होतें आणि प्रथम कांहीं दिवस न्यायमूर्ती रानडे यांच्या वर्तनाचें रमाबाईंना अनुकरण करणें कठीण गेलें असलें तरी एकदां न्यायमूर्तींच्या वर्तनांतील मर्म पटल्यावर त्यांना न्यायमूर्ती रानडे यांच्या आवडीबाहेर वागण्याची इच्छाच झाली नाहीं. गुलाबाच्या फुलाच्या सौंदर्याची ज्यांना ओळख पटली आहे त्यांचें मन भलत्या फुलाकडे ओढ कधीं घेत नाहीं.

न्यायमूर्ति रानडे यांचें वर्तन खऱ्या कर्त्या पुरुषाला शोभणारें होतें. आपल्या जशा प्रामाणिक समजुती आहेत तशा वडिल माणसांच्या असतात

तेव्हां त्यांचा अनादर करणें केव्हांहि माणुसकीला शोभणारें नाहीं. न्यायमूर्ति रानडे यांनीं रमाबाईंचे सासरे गोविंदराव, ताई सासूबाई यांच्याशीं ठेवलेलें वागणुकीचें धोरण पाहिलें म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होते. मुलींनीं शिकूं नये; कारण त्यामुळें त्या चवचाल होतील अशी ताई सासूबाईंची प्रामाणिक समजूत होती. या समजुतीप्रमाणें त्या रमाबाईंना बोलत व न्यायमूर्ति रानडे यांचीहि कानउघडणी करण्यास कमी करीत नसत. न्यायमूर्ति रानडे यांनीं कधींहि याबद्दल ताई सासूबाईंना उलटून उत्तरें दिलीं नाहींत. एकदां रागाच्या भरांत न्यायमूर्ति ताईसासूबाईंना उलटून बोलले. एक विद्यार्थी चोरी करून पळाला. ही हकिगत रमाबाईंनीं घाईघाईनें न्यायमूर्तींना जाऊन त्यांच्या कामाच्या वेळीं सांगितल्याबद्दल ताई सासूबाई संतापल्या. सबंध जन्मांत रमाबाईंचा कैवार घेऊन न्यायमूर्ति रानडे ताई सासूबाईला लागेल असें त्या वेळीं बोलले; पण थोड्या वेळानंतर लगेच त्यांनीं ताई सासूबाईंची क्षमा मागितली. वडिलधाऱ्या माणसांचा अनादर किंवा अपमान न करतां आपणाला जी चांगली गोष्ट वाटते ती करीत असावें असें न्यायमूर्तींचें धोरण असे. हीच गोष्ट त्यांनीं इंग्रजी ॲड्रेसबद्दल ताई सासूबाईंनीं जो कडाका उडवून दिला त्याबद्दल रमाबाईंची समजूत करतांनां सांगितली. न्यायमूर्ति म्हणाले, "कां ? आजचा सपाटा कसा आहे ? हल्ला तर फार जोराचा आहे बुवा. तो फार दिवस त्रास देईलसें वाटतें. पण आपणाला तितकीच उलट तयारी केली पाहिजे. आपण तितक्याच सोशीकपणानें व धिम्मेपणानें हें सर्व सहन केलें पाहिजे, असा आपण निश्चय करूं. त्यांचा राग वाढण्याला आपल्याकडून जागाच द्यावयाची नाहीं. त्यांच्या वेळच्या समजुतीप्रमाणें त्या बोलतात, त्यांत त्यांचा दोष नाहीं; पण त्यांना दुःखवावयाचें नाहीं, उत्तर द्यावयाचें नाहीं, येवढें तूं कर त्यांचें वाटेल तसें बोलणें मुकाट्यानें ऐकून घेणें जरा त्रासाचें आहे हें मी समजतों; पण आज होणाऱ्या त्रासापासून जो सोशिकपणा आपण शिकूं, तो आपल्याला जन्म-

भर उपयोगी पडेल. एकदां ही संवय लागली म्हणजे आपल्या विरुद्ध कोणी कितीहि बोलत असले तरी या संवयीनें मनाची उचंबळ होत नाहीं व त्रास होत नाहीं. तेव्हां कांहीं न बोलतां खरें व योग्य दिसेल तें मात्र करावयाचें, सोडावयाचें नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव. ताईचा व अक्कांचा स्वभाव कडक आहे, त्याला उपाय नाहीं; अशा माणसांना उत्तर न देणें बरें. मी सुद्धां त्यांचें बोलणें ऐकून घेतों हें तूं पाहात नाहींस का? आतां माझ्यापेक्षां तुला अधिक त्रास होतो हें खरें आहे. पण ही इतर मंडळी बोलली तरी मी तुला आहेना! मग इतकें भिण्याचें कारण काय आहे बरें! थोडें धीरानें वागण्यास शिकावें; तरीहि वाईट वाटेल पण तें कांहीं नेहमीं राहणारें नाहीं." रमाबाईंना वर केलेल्या उपदेशांत न्यायमूर्तींच्या कर्तेपणाचें रहस्य तर दृष्टीस पडतेंच, पण ते रमाबाईंच्या मनांत स्वतःबद्दल विश्वास कसा उत्पन्न करीत असत ह्याचीहि कल्पना येते.

पतीपत्नींनीं एकमेकांच्या मनांत स्वतःबद्दल विश्वास उत्पन्न करणें, आपला कष्टमय संसार आनंदाचा होण्यास, आवश्यक गोष्ट आहे. मनुष्य ज्या वेळेला चुकतो, घाबरतो त्या वेळीं जो सावरून धरतो, धीर देतो, तोच आपल्या विश्वासाचा धनी होतो. संसारांत पतीनें पत्नीला आणि पत्नीनें पतीला विश्वास आपल्या वर्तनानें द्यावा लागतो. सामान्यतः ही जबाबदारी पुरुषांवर अधिक असते. कितीहि प्रौढपणीं विवाह झाला तरी पुरुषच स्त्रीपेक्षां ज्ञानानें व वयानें मोठा असतो. त्यामुळें त्याच्यावर आपल्या पत्नीला ही विश्वास देण्याची जबाबदारी पडते. समाजाची घडी नीट असतांना व संसाराचा ओघ सुरळीतपणें वाहात असतांना जेथें पुरुषानें आपल्या पत्नीस विश्वास देण्याची आवश्यकता असते, तेथें समाजाची घडी विसकटून आणि संसाराचा प्रवाह खडकाळ पात्रांत सांपडला असतांना ही आवश्यकता अधिकच असते. डॉ. आनंदीबाईंना गोपाळराव जोशी यांनीं विद्यादान

करण्याचें पुण्य पदरांत घेतलें; पण त्यांनीं आपल्या बायकोला विश्वास असा दिला नाहीं, त्यामुळें अमेरिकेसारख्या परमुलखांत अनेक तऱ्हेच्या शिक्षणाच्या सोई उपलब्ध होऊनहि डॉ. आनंदीबाईना गोपाळराव जोशी यांच्या संशयी स्वभावामुळें अतिशय मनस्ताप सहन करावा लागला, असें डॉ. आनंदीबाईच्या चरित्रांत आढळून येतें.

प्रेमानें वागणें आणि विश्वास उत्पन्न करणें या गोष्टी निराळ्या नाहींत. प्रेमानें जो वागतो त्याचेंच वर्तन सरळ म्हणावयाचें. न्यायमूर्ती रानडे यांच्या सरळ वर्तनामुळें रमाबाईंना न्यायमूर्तींच्या स्वभावाची ओळख पटली, आणि त्यामुळें त्यांना साहजिकच न्यायमूर्ती हें त्यांच्या खऱ्या सुखाचें व समाधानाचें ठिकाण होऊन बसलें. न्यायमूर्ती रानडे यांनीं रमाबाईंना साक्षर करून त्यांच्या सद्विचारांना प्रफुल्लित केलें; पण त्यांनीं जर गोपाळराव जोशी यांच्यासारखें ' तिरसटपणा ' चें वर्तन केलें असतें तर रमाबाईंच्या मनांतील सद्विचार जागच्याजागीं कोमेजून गेले असते. न्यायमूर्ती रानडे यांनीं रमाबाईंचे सद्विचार फुलविण्याचें जसें काम केलें तसें त्यांना टवटवीत ठेवण्याला आवश्यक असा विश्वासाचा रसहि पुरविला. जमीनींत ओलाव्याचा भरपूर आधार असला म्हणजे गुलाबाचें ताटवें सोसाट्याच्या वाऱ्याला किंवा करपवून टाकणाऱ्या उन्हाला दाद देत नाहींत; तसा ज्या कुटुंबांत पतीपत्नींच्या हृदयांत परस्पर विश्वासाचा भरपूर ओलावा असतो तेथें आनंदाचा प्रवाह कष्टमय संसारांतील अडचणींना बगल देऊन धीमेपणानें वाहात असतो. रमाबाईंची १८८१ ते १८९३ हीं बारा वर्षें यामुळेंच सुखासमाधानांत गेलीं.

या बारा वर्षांत रमाबाईंच्या मनांतील सद्विचारांना अंकूर फुटून त्यांना सार्वजनिक कार्याची पल्लवी येत असतां अनेक वेदना सहन कराव्या लागल्या. पण न्यायमूर्ती व रमाबाई यांच्यांत परस्पर विश्वास उत्पन्न होत गेल्यामुळें क्लेशामुळें त्यांच्या मनाचा हिरमोड न होतां विरोधी वातावरणांतून आणि

खवळलेल्या समुद्रांतून त्यांनीं आपली संसाराची नौका धीमेपणानें हांकारली. रमाबाई ज्या वेळेला शिकूं लागल्या त्या वेळीं त्यांचें अगदीं पोरवय होतें. शिकण्याच्या बाबतींत रमाबाईंना जीं बोलणीं खावीं लागत त्यामुळें त्यांचें मन त्रासल्यानें अगदीं सदा उदास राही. पण वडिलांची शिकवण लक्षांत ठेवून त्या कधींहि आपला त्रास न्यायमूर्तींजवळ बोलून दाखवीत नसत. शिवाय घरांतील वडिल माणसांचा स्वभाव न्यायमूर्तींना माहित असल्यामुळें " थोडें सोसावयास शिकावें, उत्तर दिलें नाहीं म्हणजे झालें. मी तुला कधीं कांहीं बोलत नाहींना ! इतर कोणी कांहीं बोललें तरी रडत जाऊं नकोस " असे ते रमाबाईंना धीर देत असत. रमाबाईंनीं स्वतःच या बाबतींत असें म्हटलें आहे कीं, " स्वतःकडून शांत, गंभीर व अतिशय प्रेमानें केलेला उपदेश या सर्व गोष्टी सोसण्यास मला आधारभूत झाला. असें नसतें तर या प्रकारच्या जाचांत व त्रासांत माझ्यासारख्या अल्प वयाच्या व अल्प समजुतीच्या मुलीनें टिकाव धरला नसता. अगर घरांत रहावें तसें सौख्य व शांति राहिली नसती. " घरांतील वडील बायकांच्या समजुतीमुळें रमाबाईंना त्रास सोसण्याचा प्रसंग आला असतां न्यायमूर्ती रानडे जसे आपण होऊन धीर देत असत तसेंच रमाबाईंच्या हातून चूक झाली असतां व भीतीचा प्रसंग आला असतां त्यांना सांवरून घेत असत.

१८७८ मध्यें न्यायमूर्ती रानडे यांची नाशिकास बदली झाली. तेथें गेल्यावर बाई न मिळाल्यामुळें रमाबाईंच्यावर स्वयंपाकासुद्धां संसाराचा सर्व बोजा पडला. पुण्यास कधीं चुलीपाशीं जाण्याची त्यांना जरूर न पडल्या-मुळें त्यांचा स्वयंपाक वरचेवर बिघडावयाचा; याबद्दल त्यांच्यावर न रागा-वतां किंवा जेवतांना आदळआपट न करतां न्यायमूर्तींनीं त्यांना सांवरून घ्यावें, इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्यांना सूपशास्त्राचें पुस्तक आणून देऊन, "जिन्नस करावयाला साधला तर बराच नाहीं तर करमणूक होईल. मनुष्यानें

पूर्ण लक्ष दिलें तर सर्व कांहीं होईल, ” असा धीर दिला. पुढें रमाबाई न्यायमूर्तींच्या बरोबर सातारा जिल्ह्यांत फिरत असतांना अशीच एक गोष्ट घडली. मुक्काम कोरेगांवीं करण्याचें ठरलें होतें. सकाळीं वसना नदीवर फराळ करून जेवावयाला कोरेगांवास जावयाचें होतें. त्याप्रमाणें वसना नदीवर प्रातर्विधी व फराळ आटोपल्यावर पाय मोकळे होण्यासाठीं न्यायमूर्ती पुढें गेले. रमाबाईंना गाडीबरोबर यावयास सांगितलें होतें. गाडी जोडून होईतों त्या करमणुकीकरितां चाबूक घेऊन जवळच एक आंब्याचें ठेंगणें झाड होतें तेथें गेल्या व त्यांनीं चाबकानें दोनतीन फटकारे मारले. फटकारे मारत असतांना त्यांच्या हातांतील छंद उडून पडला व तो कांहीं केल्या सांपडला नाहीं. गाडींत न्यायमूर्ती बसल्यावर रमाबाईंनीं छंद सांडल्याची हकीगत सांगितली. रात्रीं जेवतांना ब्राह्मणांना हाक मारून न्यायमूर्ती म्हणाले, “ बजाबा, आज सकाळच्या पाऊणशें रुपयांचें लोणचें वाढावयास तरी आण ! ” न्यायमूर्तींच्या या वाग्बाणानें कोणी कांहीं बोललें नाहीं. तेव्हां न्यायमूर्ती म्हणाले कीं, “छंद हरवला यांत इतकें खिन्न होण्याचें कारण नाहीं. आज दुपारीं माझी तपकिरीची डबी कोठें हरवली. जिन्नस हरवणें म्हणजे सावधपणा किंवा हुशारी कमी एवढा दोष येतो. तो न येण्यास जपावें हें बरें. पण त्याबद्दल सगळा दिवस इतकें खिन्न कां व्हावें ? हंसून खेळून समाधानानें राहावें म्हणजे दुसऱ्यालाहि बरें वाटतें. ”

न्यायमूर्ती १८८० च्या सुमारास धुळ्यास असतांना रमाबाई सतरा अठरा वर्षांच्या होत्या. न्यायमूर्ति कचेरींत गेल्यावर सामान्यतः रमाबाई घरांत एकट्याच असत. याचा फायदा घेण्याची इच्छा त्यांच्या अधम शेजाऱ्यास होऊन आपल्या आड आपलीं माणसें येऊं नयेत म्हणून त्या अधम शेजाऱ्यानें आपलीं बायका मुलें पुण्यास पाठवून देण्याचें ठरविलें. ही हकीगत त्यांच्या बायकोनें, तिचें रमाबाईवर मुलीसारखें प्रेम असल्यामुळें,

रमाबाईंना कळविली. रमाबाई अर्थात् घाबरल्या. संध्याकाळीं फिरावयास गेल्यावर रमाबाईंनीं ही हकीगत न्यायमूर्तींना सांगितली व आपण घर बदलू या असें सुचविलें. या बातमीमुळें न्यायमूर्तींनाहि फार त्रास आला. त्या रात्रीं न्यायमूर्तींना झोंप आली नाहीं. शेवटीं त्यांनीं रमाबाईंची समजूत घातली. न्यायमूर्ति म्हणाले कीं, "अनीतिमान माणसापासून नीतिमान माणसाला कधींच भय नसतें; याबद्दल विनाकारण भिऊं नये, काळजी करूं नये. वाईट गोष्टी जितक्या बोलण्यास सोप्या असतात तितक्या करण्यास सोप्या नसतात. त्या बाईनीं सांगितल्याप्रमाणें मधल्या दारास कुलूप घालून स्वस्थ मनानें आपल्या घरांत कांहींना कांहीं उद्योगांत असावें." अशा गोष्टी सांगून न्यायमूर्तींनीं रमाबाईंच्या घाबरलेल्या मनास धीर दिला. पुढें लौकरच न्यायमूर्तींची मुंबईस बदली झाल्यामुळें धुळ्याच्या अधमाचा शेजार अनायसेंच टळला.

धीर देणें व चुक्यांकडे सहानुभूतीनें पाहणें याबरोबरच रमाबाईंशीं न्यायमूर्ती मोकळेपणानें आणि हंसून खेळून वागत. इतकेंच नव्हे तर, रमाबाईंच्या मनाच्या खिन्न स्थितींत त्यांचें मन रंजविण्याचाहि प्रयत्न करीत असत. नाशिकचा मुक्काम, सातारा जिल्ह्यांतील सुखाचा प्रवास, उत्तर हिंदुस्थानांतील प्रवास हा रमाबाईंना अत्यंत आनंदाचा गेला. सातारा जिल्ह्यांत फिरतीवर असतांना गांवांतील बायकांना बोलावून आणून त्यांच्यांत मिसळून वागावें असा न्यायमूर्तींचा तगादा असे. बायका उठून गेल्यावर न्यायमूर्तींनीं विचारावें काय बोलणें झालें. रमाबाईंनीं उत्तर द्यावें, "सांगण्यासारखें बोलणें काय व्हावयाचें आहे ! कांहीं तरी इकडे तिकडे बोलत होतों झालें." मग न्यायमूर्तींनीं म्हणावें "हें बरोबरच आहे ! तुम्हीं शिकलेल्या शहरच्या राहणाऱ्या, रोज वर्तमानपत्रें वाचणाऱ्या असा तुम्हांला डौल ! त्या काय बिचाऱ्या खेड्यांतल्या. त्यांना शहरांतील सभा कोठें ठाऊक आहेत ! तुमच्या

या डौलाला व आढ्यतेला पाहून त्या दिपून जात असतील. तेव्हां त्या बोल-तील काय!" शाळेचे मास्तर आमंत्रण देऊन गेले असें रमाबाईनीं सांगि-तलें म्हणजे न्यायमूर्तींनीं म्हणावें, "मलाहि मघाशीं कामाच्या धांदलींत कांहीं ऐकल्यासारखें वाटलें खरें; पण तेव्हां लक्षांत आलें नव्हतें. कांहीं रस्त्यानें जाणारे लोक बोलत होते कीं, येथें भल्या जाड्या विद्वान बाई आल्या आहेत. त्यांचें उद्यां मुलींच्या शाळेंत व्याख्यान आहे, वगैरे वगैरे कांहीं बोलत होते खरे." असें न्यायमूर्ती थट्टेनें व विनोदानें बोलले म्हणजे रमा-बाई म्हणत, "इतक्या शब्दांपैकीं 'भल्या जाड्या' एवढा शब्द मात्र मला लागू पडतो खरा. बाकी सर्व कल्पनाच आहे." न्यायमूर्ति फायनन्स कमिटीच्या कामासाठीं सिमल्यास गेले होते व पुढें ते हरिद्वारास गेले. या प्रवासांत रा. ब. शंकर पांडुरंग पंडित त्यांच्याबरोबर होते. सिमल्यास अस-तांना पंडितांनीं फ्रेंच शिकण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां कुसुमती टेकडीवर राहणाऱ्या एका फ्रेंच बाईकडे न्यायमूर्तींनीं पंडितांच्या फ्रेंच शिक्षणाची व्यवस्था लावून दिली. सिमल्याहून परत आल्यावर न्यायमूर्तींनीं रमाबाईंना सिमल्याच्या प्रवासाचें वर्णन लिहिण्यास सांगितलें होतें. सिमल्याहून परत येतांना पंडितांचे देखत न्यायमूर्ती रमाबाईंना म्हणाले, "तूं सिमल्याचा प्रवास लिहिणार आहेस; पण कुसुमती टेकडीवरच्या मडमेविषयीं कांहीं लिहूं नको हो." न्यायमूर्तींनीं केलेल्या या थट्टेचें उट्टें पंडितांनीं हरिद्वारास काढलें. हरिद्वारास आल्यावर शिंद्यांच्या ओसरींतील एका खिडकींत बसून न्यायमूर्ति गंगेच्या प्रवाहांत दोन्ही हात सोडून पाण्याशीं खेळत होते; पण मन अगदीं विचारमग्न झालें होतें. रमाबाई कांहीं खावयाला आणूं कां असें विचारा-वयाला आल्या. तेव्हां न्यायमूर्तींनीं मला भूक लागली नाहीं असें सांगितलें. या संधीचा फायदा घेऊन पंडित रमाबाईंना म्हणाले, "वहिनीबाई कशाला भूक लागेल! तुम्हीं तिकडे कामांत होता, पण येथें आल्यापासून वृत्ति

अगदीं गंगामय झाली आहे. मला वाटतें, आतां हरिद्वारींच राहाण्याचा बेत दिसतो आहे. नुसत्या नांवामुळें मनाचा ओढा इतका आहे, मग प्रत्यक्ष महादेवाची किती तरी धांदल उडाली असेल ! " तेव्हां न्यायमूर्ति म्हणाले, " येथें तुम्हीं चुकलां ! हें तुमच्यावरच येत आहे. कारण माझें नांव सांबाचें नसून तीन अक्षरी विष्णूचें ( माधव ) आहे." तरी रा. ब. शंकरराव पंडित म्हणाले, " वहिनीबाई येथें राहण्याचा बेत झाला तर तुमचें कसें होईल ! " हें कुसुमती टेकडीच्या बोलण्याचें उसनें फिटत आहे असें पाहून रमाबाई म्हणाल्या " काय व्हावयाचें आहे ! माझी काळजी कशाला ! कोठेंहि राहाणें झालें तरी मी जवळ असणारच; मग मला धाक कसला ! आम्हीं येथें राहिल्यानें तुमचें काम मात्र जास्त वाढेल. रोजचीं वर्तमानपत्रें बुकें वगैरे पाठविणें, कांहीं खाजगी चळवळीं असतील त्या कळविणें, मत विचारणें हीं सर्व कामें तुम्हांलाच करावीं लागतील. एक पुण्याच्या मंडळींना मात्र अफू तुटल्यासारखें होईल व त्यांना परोपरीनें निरोप सांगण्याचें उद्धवाचें काम तुम्हांलाच करावें लागेल. " तेव्हां पंडित म्हणाले, " कसला उद्धव आणि माधव ! पुण्याचे लोक सगळ्या मुलखाचे भांडखोर ! पण त्यांच्यावर कोण लोभ आहे ! पुणें म्हणजे अगदीं जीव कीं प्राण ! पुणें सोडून कोठेंच चैन पडावयाचें नाहीं. येथें राहून ध्यानस्थ बसलें तरी चिंतन पुण्याचेंच चालेल. इतका मनाचा ओढा पुण्याकडे आहे. " हा आरोप थोडासा तुम्हांलाहि लागू पडेल असें परत न्यायमूर्तींनीं हंसून उत्तर दिलें.

मद्रासचें फायनॅन्स कमिटीचें काम आटोपल्यावर न्यायमूर्ती कलकत्त्याला १८८६ चे शेवटचे तीन महिने होते. याच सुमारास रमाबाईचे वडील वारल्यामुळें त्यांचें मन उदास होतें. हरिद्वाराहून निघतांना त्यांनीं आपल्या आईकरितां व वडिलांकरितां कुंभ भरून घेतले. वाटेंत वडिलांचा कुंभ फुटल्यामुळें रमाबाईच्या जीवाला चुटपुट लागून राहिली. तीच पुढें खरी

झाली. मनाच्या अशा उदास स्थितींत त्या कलकत्त्यास गेल्या. कलकत्त्याचा बंगलाहि गांवाच्या एका बाजूला व ओसाड होता. त्यामुळें रमाबाईंचें मन रमेना. तेव्हां न्यायमूर्तींनीं रमाबाईंना बाग तयार करण्याचा उद्योग लावून दिला. थोड्याच दिवसांत बाग तयार झाल्यावर त्या बागेंत बसून संध्याकाळीं रमाबाईंकडून न्यायमूर्ती वाचवून घेऊं लागले. एक दिवस दोघे संध्याकाळीं वाचत बसलीं असतांना बंगाली पत्र विकावयाला आलें. त्यावरून बंगाली शिकण्याबद्दल बोलणें निघून न्यायमूर्ती शिकवीत असले तर आपण शिकूं असें रमाबाईंनीं उत्तर दिलें. रमाबाईंचें मन वडिलांच्या मृत्युमुळें उदास झालें असल्यामुळें स्वभावतः नव्या शिकण्याकडे लागणार नाहीं व शिकण्याची टाळाटाळ करण्यासाठींच त्यांनीं आपणावर शिकविण्याची जबाबदारी टाकली आहे हें ओळखून न्यायमूर्तींनीं स्वतःच रमाबाईंना बंगाली शिकविण्याचा निश्चय केला. स्वतः ते मुळाक्षरापासून बंगाली शिकले व त्यांनीं रमाबाईंना बंगालीची अक्षर ओळख करून दिली.

न्यायमूर्ती रानडे यांनीं असा परोपरीनीं रमाबाईंना विश्वास दिल्यामुळें त्यांचीं हीं बारा वर्षें आनंदाचीं गेलीं. ‘सुख पाहतां जवापाडे, दुःख पर्वताएवढें’ संसारांत असतें खरें; पण हा दुःखाचा पर्वत आनंदाच्या एका करांगुळीवर तोलून धरतां येतो. एकजीव झालेल्या प्रेमी जोडप्यावर रामसीतेसारखे चौदा चौदा वर्षांचे विरहाचे किंवा अजीबात त्याग करण्याचे प्रसंग आले तरी मनाची ओळख पटल्यामुळें जो अननुभूत आनंद चाखावयाला सांपडलेला असतो त्या आनंदाच्या जोरावर जेथें विरहाच्या व त्यागाच्या दुःखाचे पर्वत सहन करतां येतात तेथें सामान्य संसारांतील कष्ट व दुःखें यांचा विसर पडून संसार आनंदमय वाटत असल्यास नवल नाहीं. संसाराच्या या आनंदमय स्थितीची साक्ष रमाबाईंना या बारा वर्षांत पटल्या-

मुळें पुढील संसारांतील कष्टाचे प्रसंग त्यांनीं धीमेपणानें सहन केले. रमाबाईच्या आयुष्यांतील १८८१ ते १८९३ हा बारा वर्षांचा काळ एक तऱ्हेनें अत्यंत सुखाचा गेला. न्यायमूर्ती रानडे यांना हजार दीडहजार पगार मिळत होता. त्यांना लोकांत व दरबारांत चांगली मान्यता मिळाली होती. लोकमान्यता, राजमान्यता व लक्ष्मीची कृपादृष्टी असा त्रिवेणी संगम या बारा वर्षांत उत्कर्षाच्या स्थितींत रमाबाईंना अनुभवावयास मिळाला. असलें भाग्य आज कोणाच्याही नशीबीं नाहीं, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यामुळें 'तेहि नो दिवसा गताः' असें रमाबाईंना 'आठवणी' लिहितांना जसें स्वतःच्याबद्दल वाटलें असेल, तसेंच आज महाराष्ट्राच्याहि बाबतींत म्हणण्यास हरकत नाहीं.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
आ.
ता.

[ ७ ]

## वटवृक्ष कलला !

‘सुख पहातां जवा पाडे। दुःख-पर्वता एवढें’ ही तुकारामबुवांची अभंगवाणी किंवा ‘कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकांततो वा। नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण’ ही कालिदास कवीची उक्ती ज्या वेळीं जगाचा व्यवहार सुरळीत चाललेला असतो त्याच वेळीं मनाचें समाधान करूं शकते; एरवीं नाहीं. प्रत्येक सृष्ट वस्तुजाताच्या मागें परमेश्वरानें उत्पत्ति, स्थिति आणि लय ह्या अवस्था लावल्या आहेत. जगाच्या व्यवहाराच्या दृष्टीनें स्थिति ही अवस्था महत्वाची आहे. या अवस्थेत बाल्य तारुण्य, आणि जरा या तीन स्थितींचा समावेश होतो. वेलीला फूल धरल्यावर तें उमलतें, फुलतें आणि कोमेजून नाहींसें होतें. फुलाची जी स्थिती आहे तीच मनुष्याच्या आयुष्याची व संसाराची आहे. आपल्याकडे जी संसाराच्या दृष्टीनें मनुष्याच्या आयुष्याची वांटणी करून दिली आहे त्यांत २० ते ६० वर्षे हा काळ संसाराच्या दृष्टीनें स्थितीचा काळ होय. वीस वर्षांनंतर संसाराची कळी उमलूं लागते. पुढचीं वीस वर्षें संसार विकास पावण्यांत जातात आणि पुढील वीस वर्षांत संसाराला परिणत स्वरूप प्राप्त होऊन संसाराचा सूर्य मावळत्यादिशेला झुकतो. प्रत्येकाचा संसार जेव्हां ह्या अवस्थांतरांतून जातो तेव्हांच जगाचा व्यवहार सुरळीत चालला आहे असा म्हणावयाचा !

संसाराला आनंददायक उपवनाचें स्वरूप देणें किंवा त्याचें कांतार बनविणें हें परमेश्वरानें मनुष्याच्या मर्जीवर ठेवलें आहे. मनुष्याखेरीज बाकीचे पशुपक्षी देवानें जशी भोंवताली परिस्थिती उत्पन्न केली असेल त्या परिस्थितींत

सुखी असतात; पण असें मनुष्याला सुख वाटत नाहीं. प्रतिसृष्टि निर्माण करण्याची शक्ति अमलांत आणल्याशिवाय त्याला खऱ्या आनंदाचा लाभ मिळत नाहीं. जग ही जशी परमेश्वराची सृष्टि होय, तशी संसार ही मनुष्याची सृष्टि होय. ही संसाराची सृष्टि निर्माण होत असतांना अनेक राष्ट्रें जन्म घेतात आणि अनेक संस्कृती उदयाला येतात. जन्माला येणाऱ्या फुलापेक्षां कोमेजून गेलेल्या फुलांचा आणि पिकलेल्या पानांचा सडाच सकाळच्या प्रहरीं बागेंत अधिक पहावयाला मिळतो खरा; पण जोंपर्यंत दररोज नव्यानव्या फुलांना बहार येत असतो तोंपर्यंत कुजलेलीं पानें व मुळें मनाचें स्वास्थ्य हरण करीत नाहींत; पण ज्या वेळेला बागेंत फुलांच्या ऐवजीं तण वाढूं लागतें आणि संसारांत सदाचाराच्या जागीं दुराचाराचें प्राबल्य वाढतें तेव्हां संसाराची ही विपरीत स्थिति मनांत शल्य होऊन बसते.

महाराष्ट्रांतील संसार ह्या विपरीत स्थितींतून अजूनहि सुटलेला नाहीं. पन्नास वर्षांपूर्वी तर ह्या विपरीत स्थितीच्या चांगला मगरमिठींत सांपडला होता. वयाचा विचार न करतां, मुलीचें लग्न करणें आणि विधुरानें लग्न लावणें, ह्याला सदाचार कोण ह्मणेल ? ह्या दुराचाराचा परिणाम मुलींना जाचक होतो. गृहस्थाश्रम हा दांपत्याशिवाय होत नाहीं. दंपती किंवा विवाहित स्त्रीपुरुष हे वयानें, कुलानें आणि शीलानें समान असावयाला पाहिजे. कुळ आणि शीळ याबद्दल जितकी दक्षता बाळगणें अवश्य आहे त्यापेक्षांहि वयाबद्दल अधिक खबरदारी घेतली पाहिजे. संसार जाग्यावर असला तर तो सुखाचा व समाधानाचा होण्यास कुल व शील ह्यांची मदत होते; पण प्रथम संसार होण्यास वयाचा पाया स्थिर असावा लागतो. ह्या गोष्टीकडे महाराष्ट्रांत अत्यंत दुर्लक्ष होत होतें व अजूनहि होत आहे. ह्यामुळेंच जबरीचें वैधव्य आपल्या मुलीबाळींच्या माथीं मारल्याचें पाप महाराष्ट्राच्या हातून सारखें होत आहे. या परिस्थितीमुळें आजचा कॉलेजांतील तरुण जसा

कॉलेजांतून बाहेर पडतो न पडतो तोंच म्हातारा दिसूं लागतो तसा बिजवरांच्या बायकांचा संसार त्यांच्या ऐन तारुण्याचा वेळीं कोमजून गेलेला आढळून येतो.

इतर रीतीनें भाग्यवान असलेल्या रमाबाईंची स्थिति ह्याहून निराळी नव्हती. न्यायमूर्ति रानडे आणि रमाबाई यांच्या वयांतील अंतरामुळें ज्या वेळीं रमाबाईंच्या संसाराला पूर्ण विकसित स्वरूप प्राप्त व्हावयाचें त्याच वेळीं उतरती कळा लागली. असें होईल असें रमाबाईंना सांगावयाला कोणी भविष्यज्ञान्याची जरूरी नव्हती. ही गोष्ट त्यांच्या हृदयाला माहित होती. त्यामुळें १८९१ मध्यें करमाळ्यास जेव्हां न्यायमूर्ति रानडे यांना काल्यानें गांठलें तेव्हां त्यांच्या मनाचा साहजिकच धीर सुटला.

ता. २६ फेब्रुवारी १८९१ रोजीं न्यायमूर्तींना काल्यानें पछाडलें आणि दोन दिवसांत त्यांना अगदीं जर्जर करून टाकलें. त्यांना घाम फार सुटत होता व हाताचे पंजे काळे पडले होते. तोंडहि भस्म सारविल्यासारखें कळाहीन दिसूं लागलें. आवाज अतिशय खोल गेला होता. तथापि ' तूं घाबरूं नकोस, भिऊं नकोस, लक्ष लावून बाटलीवरचीं अक्षरें नीट वाचून मग औषध देत जा, घाबरेपणानें भलतेंच देशील, " असा न्यायमूर्ती रमाबाईंना धीर देत असत, तोहि तिसऱ्या दिवशीं बोलणें बंद पडल्यामुळें मिळेनासा झाला. ह्यामुळें, धरणी आणि आकाश याशिवाय आपलेपाशीं आतां दुसरें कोणी नाहीं, अशी रमाबाईंच्या मनाची हीनदीन स्थिती झाली.

या वेळच्या मनःस्थितीसंबंधानें त्या आपल्या ' आठवणी 'त ह्मणतात, " दयाळु आणि सर्वांच्या धांवणीला धांवणारा तो कनवाळू परमेश्वर या वेळीं कोठें आहे ! माझा विश्वास आजपर्यंत सर्वस्वी त्याच्यावर आहे. त्याच्यावांचून या वेळीं मला दुसरें कोणी नाहीं, हें त्याला समजत नाहीं काय ! वगैरे मी आपल्या मनाशीं पुष्कळ रडलें व त्याच आवेशांत उठून नाडी

पाहिली. जवळ डॉक्टर व कारकून बसले होते, त्यांनीं ' मी जरा आंत जाऊन येतें, ' असें सांगून, ज्या देवळांत आह्मी उतरलों होतों, त्याच महादेवाच्या गाभाऱ्यांत देवासमोर जाऊन बसलें.

ही वेळ रात्रीची तीन वाजण्याची होती. आंत एक ह्मातारी गुरवीण निजली होती, तिला बाहेर जाण्यास सांगितलें. पणतींतील नंदादीप अगदीं मंद जळत होता, तोंहि मला बरेंच वाटलें. कारण या वेळेस मनाची वृत्ति अशी झाली होती कीं, देव आणि आपण याशिवाय येथें तिसरें कोणी नको. दिवा सुद्धां नसता तर बरें झालें असतें, असें वाटलें. होता तो मात्र मालविण्यास हात धजेना. तसें मनांतसुद्धां आणणें अशुभ आहे असें वाटून मी देवापुढें थोडी भ्रमिष्टासारखी बसलें. तोंडांतून कसला उच्चार होईना म्हणून देवापुढें डोकें टेकून हळूच पण पुष्कळ मन मोकळें करून रडलें. पुष्कळ रडून मनाचा भार थोडा कमी झाल्यावर मनाला वाटेल तितकें बोललें, प्रार्थना केली व शेवटीं मनाला सर्व प्रकारें दीनपणा आला होता तरी त्यांतल्या त्यांत त्राग्यानें 'आह्मी दीन तुझ्या दारीं संकटांत येऊन पडलों आहों. तुला वाटेल त्या रीतीनें आह्मांला बाहेर काढ; तूं सर्वांतर्यामी ह्मणवितोस त्या तुला माझी करुणा आली नाहींतर ह्या बाहेरच्या मोठ्या विहिरीला तरी खचीत करूणा येऊन ती मला पोटांत घेईल, वगैरे हवें तें बडबडलें. सर्व रीतीनें श्रांत झाल्यामुळें कीं कोण जाणें, दुखण्याची इतकी भयंकर स्थिती असतांहि, कांहीं सेकंदें तेथेंच माझा डोळा लागला.

तेवढ्यांत मला एक स्वप्न पडलें कीं, मी कोठें तरी उंच डोंगरांत देवस्थान आहे तेथें गेलें आहे. देवळाखालींच कृष्णेचें पात्र आहे. तिचे कांठीं पिंपळाचे वृक्ष जागोजाग असून त्यांना मजबूत पार बांधले आहेत व मधून मधून मोठे घाट आहेत. अशा एका उंच घाटाजवळच्या पारावरील

वटवृक्षाला दोन्ही हात टेकून खालील मजा पाहात मी उभी आहे. त्या दिवशीं विशेष कांहीं तरी मोठी पर्वणी होती म्हणून हजारों स्त्रिया व पुरुष कृष्णाबाईंत स्नान करीत होती. मी ज्या उंच व विस्तृत वटवृक्षाला दोन्ही हात टेकून धरून उभी होतें, तो एवढा मोठा वृक्ष पडतो कीं काय, असा पुढें पुढें वाकूं लागला व त्यामुळें पाराचे चिरेच्या चिरे उखळूं लागले. हें पाहून मी अतिशय घाबरलें व दोन्ही हातांनीं त्या वटवृक्षाला कवटाळून धरून मोठ्या आक्रोशानें खालील ब्राह्मणांना हांक मारून व ओरडून सांगूं लागलें, 'अहो ! पहा हा वृक्ष पडत आहे, कोणी खालून ह्याला हात लावा, धिरे द्या, हा पडला तर हजारों माणसाचे प्राण जातील;' असें म्हणून माझ्यामध्यें होतें तितकें सामर्थ्य खर्चून मी तो वृक्ष आपल्याकडे ओढीत आहे, माझा जीव घामाघूम होऊन तोंडाला कोरड पडली आहे, इतक्यांत खालील मंडळी नदींतून ओलेत्यांनीं धांवून येऊन हजारों माणसांनीं त्या वटवृक्षाला खालून आपापल्या हाताचा टेंका दिला. असें झाल्यावर एक दोन मिनिटांत तो वृक्ष अधिक न वांकतां तितक्याचा तितका घट्ट राहिला. आतां तो वृक्ष खालीं येत नाहीं, अशी खात्री झाल्यावर खालच्या माणसांनीं हात सोडले व मला आनंद झाला. अजून माझा विळखा वृक्षाला आहे तोंच शिरस्तेदारांनीं येऊन मला हांक मारली."

रमाबाईंच्या मनीं वसत होतें तें स्वप्नीं दिसलें; एवढेंच नव्हे तर, स्वप्नीं दिसलें तसें घडूनहि आलें. शिरस्तेदारांनीं रमाबाईंना देवळांतून जागें करून बोलावून आणल्यावर न्यायमूर्तींना जोराची उलटी झाली. त्यांचें अवसान सुटलें व त्यांनीं एकदम मान टाकले. डॉक्टरांनीं हेमगर्भाची मात्रा द्यावयाला सांगितली ती रमाबाईंनीं तुळशीच्या रसांतून चाटविली. या वेळीं नाडींत चलविचल होत होती. न्यायमूर्ति स्वतःहि घाबरले. "आतां माझें बरें नाहीं. कोठें पुणें आणि कोठें मी ! तूं अगदीं एकटी आहेस !" असें

म्हणतांना न्यायमूर्तींना एकदम हुंदका आला. ते पुढें म्हणाले, " भिऊं नको. देव तुला आहे ! घरीं तार करून दुर्गाला बोलाव."

रमाबाईंनीं अगोदरच दुर्गा वन्संना व डॉ. विश्राम यांना तार करून त्यांना तावडतोब स्टेशनवरून घेऊन येण्यासाठीं गाडी धाडली होती. रमाबाई अशा तऱ्हेचा धीर देत आहेत तोंपर्यंत मात्रेचा परिणाम होऊन न्यायमूर्तींना गुंगी आली; पण नाडी बंद झाली असें वाटून रमाबाई घाबरल्या. तेव्हां डॉक्टरांनीं झोंप लागली आहे, गडबड करूं नका अशी हातांनीं खूण केली. ह्या झोपेमुळें न्यायमूर्तींना हुशारी वाटली. इतकें होईतों उजाडलें. तोंपर्यंत पुण्यास तार पोंचून डॉ. विश्रामजी व रमाबाईंच्या वन्स येऊन दाखल झाल्या. त्यांना पाहून रमाबाईंना धीर आला. " डॉक्टर विश्रामजी हे बिछा-न्याजवळ आल्याबरोबर," रमाबाई आपल्या 'आठवणीं'त म्हणतात, " हे जातीनें मराठे आहेत, गवळी आहेत, याचें भान बिलकूल न राहून मी एकदम पुढें जाऊन त्यांचे पाय धरले व पायावर डोकें ठेवून म्हणालें, आतांपर्यंत ह्या डॉक्टरांनीं मेहेरबानगी करून, प्रकृति संभाळून, तुमच्या हातीं दिली आहे, आतां तुम्हीं संभाळा. तुमच्या रूपानें देवच मला साहाय्य करावयास आला आहे असें मी समजतें."

न्यायमूर्ती करमाळ्याच्या दुखण्यांतून उठून कामाला लागण्यास सुमारें दोन महिने लागले. १८९१ सालांतील हें करमाळ्याचें दुखणें म्हणजे न्यायमूर्ती यांच्या जिवितावर व रमाबाईंच्या संसारावर अपमृत्यूचा घालाच होता. ह्या घाल्यांतून न्यायमूर्ति व रमाबाई १८९१ सालीं बचावल्या खऱ्या; पण मृत्यूची चिठी अजिबात कांहीं परत फिरली नाहीं. १८८० ते १८९२ हा सुमारें बारा वर्षांचा काल न्यायमूर्तींच्या आयुष्यक्रमांत व रमा-बाईंच्या संसारांत सर्वतोपरी उत्कट आनंदाचा गेला. तारुण्य हा संसारांतील उत्कट आनंदाचा काल होय. या उत्कट आनंदाच्या कालांत पडलेल्या

... ग्रंथ ...

प्रेमग्रंथींची जोपासना करण्याचा जबाबदारीचा काल पुढें येतो. हा काल दोन्हीहि दृष्टीनें रमाबाईंना अनुभवावयाला मिळाला नाहीं. परमेश्वरानें त्यांना इतर दृष्टीनें पुऱ्या सुखांत ठेवलें होतें; पण संततिसुख दिलें नाहीं. न्यायमूर्ति व रमाबाई यांना मुलांची अतिशय आवड होती; पण याबाबतींत परमेश्वरानें कृपणपणा दाखविला होता. या बाबतींत परमेश्वर कृपण झाला तरी हरकत नाहीं; पण त्यानें न्यायमूर्तींचा सहवास तरी सढळ हातानें द्यावा अशी रमाबाईची उत्कट इच्छा होती; पण तीहि इच्छा परमेश्वरानें पुरी केली नाहीं. न्यायमूर्ती रानडे हाडापेरानें चांगले होते; तथापि पन्नासाव्या वर्षींच त्यांना मृत्यूनें आपल्या छायेंत घेतलें. करमाळ्याचें दुखणें हें प्रत्यक्ष मृत्यूचें बोलावणें ठरलें नाहीं खरें; पण तुमचा संसार माझ्या अमलाखालीं आला आहे, अशी नोटीसच करमाळ्याच्या दुखण्यानें न्यायमूर्ती व रमाबाई यांना दिली.

न्यायमूर्ती व आपल्या वयांतील अंतरामुळें वैधव्याची तलवार आपल्या डोक्यावर सारखी लटकत आहे ह्याची जाणीव करमाळ्याच्या दुखण्याच्या आधींहि रमाबाईच्या मनांत वागत होती याबद्दल 'आठवणीं'त पुरावा सांपडतो. करमाळ्यासच, ज्या दिवशीं न्यायमूर्तींच्या पोटांत दुखूं लागून रेंच सुरू झाले त्या दिवशीं नेहमींप्रमाणें रमाबाई स्वतःच्या इंग्रजी वाचनासाठीं 'मेडोज टेलर'ची 'तारा' ही कादंबरी, न्यायमूर्ती सकाळीं फिरून आल्यावर, वाचून दाखवूं लागल्या. रमाबाई 'आठवणीं'त म्हणतात, 'या वेळच्या वाचनाच्या भागांत तारेची वैधव्यस्थिति व तिच्या आईबापांच्या मनाची विव्हळता हें वर्णन वाचतांना मला फार वाईट वाटून गहिंवर आला, आणि हुंदक्यामुळें पुढील वाचन बंद ठेवावें लागलें. नंतर विधवांच्या एकंदर अत्यंत दुःखद व शोचनीय स्थितीबद्दल बोलणें निघालें. त्यांत आमच्या समाजांत कांहीं कांहीं चाली फार निर्दयपणाच्या व घातुक आहेत, त्यांचा परिणाम

पर्यायानें दिवसेंदिवस जनतेवर घडून फार अहित होत आहे, पण हें समजेल तेव्हां खरें. हळूहळू समजेल, वगैरे गंभीरपणाचें व कळकळीचें भाषण चाललें होतें."

त्या वेळीं व आज महाराष्ट्रांत अकाळीं विधवा झालेल्या स्त्रियांची इतकी विपन्न स्थिति झाली आहे कीं, कोणींहि सहृदय मनुष्यांच्या डोळ्यांत, विधवांच्या दुःस्थितीचें वर्णन वाचून, पाणी उभारल्यावांचून राहणार नाहीं. आणि त्यांत रमाबाई तर कोवळ्यामनाच्या स्त्री पडल्या. पण या कारणापेक्षांहि रमाबाई महाराष्ट्रांतील एका अनिष्ट चालीचा स्वतःच अनुभव घेत असल्यामुळें तारेची दुःस्थिती वाचून डोळ्याला पाणी येण्यांत स्वतःच्या स्थितीची आठवण होऊन रमाबाईच्या डोळ्यांतून दोन अश्रू अधिक ठिपकले असल्यास नवल नाहीं. वैधव्य कोणत्याहि राष्ट्रांत असतें; हिंदुस्थान किंवा महाराष्ट्र त्याला अपवाद नाहीं. हें खरें आहे; पण सुखाचा संसार झाल्यावर वैधव्य आलें तर तें शल्य होत नाहीं. अकालीं वैधव्य येणें आणि तें समाजांत रूढ झालेल्या एका अनिष्ट चालीमुळें हटकून प्राप्त होणें ही गोष्ट कोणाहि सहृदय माणसाच्या अंतःकरणाचा भेद केल्यावांचून सोडीत नाहीं. युरोपियन व मुसलमान स्त्रियांपेक्षां हिंदु स्त्रियांची परावलंबनाची स्थिति अधिक आहे. समाजाचा व्यवहार सुरळीत चालण्याच्या दृष्टीनें हिंदूंच्या स्मृतिकारांनीं स्त्रियांच्या बाबतींत सुचविलेली व्यवस्था गैर नाहीं; पण ह्या व्यवस्थेस आधारभूत धरलेलें तत्त्व जेव्हां समाजाच्या आचरणांतून नाहींसें होतें तेव्हां ही व्यवस्था, सबंध घर अंगावर कोसळून पडावें त्याप्रमाणें, एकट्या स्त्री वर्गाच्या डोक्यावर येऊन आदळते. लोकांत माणुसकी आहे, किंबहुना असावी व त्या माणुसकीची वाढ व्हावी अशा हेतूनें आपल्या शास्त्रकारांनीं समाजव्यवस्था ठरवून दिली आहे. पण ह्या माणुसकीला महाराष्ट्रांतील पुरुष वर्ग पारखा झाल्यामुळें

महाराष्ट्रांत स्त्रियांच्या वांट्याला संसारांतील जेवढीं असह्य ओझीं तेवढीं प्राप्त होत असतात. वंशाची परंपरा कायम टिकविण्याचें मुलांच्या संगोपनाचें जें महत्त्वाचें काम माता या नात्यानें स्त्रियांवर पडतें तें काम त्यांना नीट रीतीनें पार पाडतां यावें म्हणून आमच्या शास्त्रकारांनीं स्त्रियांवर पोटाला मिळविण्याची जबाबदारी ठेवलेली नाहीं. लहानपणीं बायकांचें पालनपोषण बापानें करावें, तरुणपणीं नवऱ्यानें व म्हातारपणीं मुलांनीं करावें असा नियम घालून स्त्रियांच्या पाठीमागची पोटापाण्याला मिळविण्याची विवंचना आमच्या शास्त्रकारांनीं काढून टाकली आहे. त्याचप्रमाणें मुलांची हेळसांड होऊं नये म्हणून आमच्या स्मृतिकारांनीं काडी मोडून घरें बदलण्याची परवानगी स्त्रियांना ठेवली नाहीं. मातेचें कर्तव्य स्त्रियांना उत्तम रीतीनें पाळतां येऊन मुलांची उत्तम जोपासना व्हावी व अशा रीतीनें आपला समाज सुदृढ आणि सुखी असावा अशा दूरदृष्टीनें शास्त्रकारांनीं घालून ठेवलेले नियम जुन्या शास्त्राचे अभिमानी म्हणविणारे पुरुष पायाखालीं तुडवून स्त्रियांना लुबाडण्यापुरते व स्त्रियांचा छळ करण्यापुरते मात्र शास्त्रांना डोक्यावर घेऊन नाचत असतात. महाराष्ट्रांतील संसाराला पुरुषांनीं माणुसकी सोडल्यामुळें अशी विपरीत स्थिति प्राप्त झाली आहे. ह्या विपरीत स्थितीचें ढळढळीत उदाहरण म्हणजे महाराष्ट्रांतील आपल्या मुलींबाळींच्या वाट्याला येणारी अकालीं वैधव्यस्थिति होय. असा प्रसंग आपल्यावर ओढवला असतां तुकारामाचे अभंग किंवा कालिदासाचीं सुभाषितें मनाचें शांतवन कसचें करतात !

महाराष्ट्रांतील पुरुषांनीं माणुसकीला रजा दिल्यामुळें शास्त्रकारांनीं सदिच्छेनें आणि समाजाच्या कल्याणाकडे पाहून घातलेले नियम हिंदु स्त्रियांना पुरुषांचे गुलाम बनविण्यास कारणीभूत होतात, व स्वाभाविकच हिंदु स्त्रियांना नवऱ्याशिवाय सतनागत असें होऊन जातें आणि पावसानें झोडपलें, राजानें

वंडलें आणि नवऱ्यानें टाकलें तरी फिर्याद कोणाकडे न्यावयाची अशी अनन्य गतिक स्थिति होऊन नवऱ्याचा आधार तुटूं नये म्हणून त्या आपला सर्व जन्म भिऊन काढतात. वेलीना जसा वृक्षाचा आधार तसा हिंदु स्त्रियांना नवऱ्याचा आधार असतो. हा आधार सुटतो असें वाटतांच त्यांच्या मनाची कशी स्थिति होऊन जाते याबद्दल रमाबाईनीं केलेलें वर्णन या प्रकरणांत आलें आहेच. सामान्यतःच जेथें प्रत्येक स्त्रीला, पुरुषांनीं उत्पन्न केलेल्या परावलंबीपणामुळें, संसारांत नवऱ्याचा आधार तुटेल कीं काय अशी भीति वाटत असते तेथें जिला आपल्या डोक्यावर वैधव्याची तलवार लटकत आहे अशी जाणीव असते त्या स्त्रीच्या मनाची स्थिति कशी होत असेल! ह्यांचीं वर्णनें 'आठवणीं' त ठिकठिकाणीं वाचावयास सांपडतात. हिंदु स्त्रियांच्या वांटणीला महाराष्ट्रांत आलेला परावलंबीपणा, वयाकडे न पाहतां बिजवरांशीं लग्न करून देण्यांत येत असल्यामुळें डोक्यावर सतत लटकणारी वैधव्याची तलवार आणि त्यांत हिंदु स्त्रियांना मनाच्या स्वाभाविक ओढीनें वाटणारें पतिप्रेम यांचा उत्कृष्ट मिलाफ रमाबाईच्या चरित्रांत झाला असल्या-मुळें त्यांनीं न्यायमूर्तींच्या जीवावरच्या दुखण्यांचीं केलेलीं वर्णनें वाचतांना वाल्मिकीमुनीच्या हृदयांत जन्म घेतलेल्या करुण रसांत आपण अवगाहन करीत आहों, असें वाटतें.

अशा अपूर्व करुण स्थितींत १८९१ ते १९०१ हीं रमाबाईच्या संसा-राचीं दहा वर्षें गेलीं. १८९१ च्या करमाळ्याच्या जीवावरच्या दुखण्यानंतर १८९३ सालीं सोलापुरास न्यायमूर्ती पोटांत कळ येऊन आजारी पडले. सोलापुरास उघड्या मैदानांत तीन दिवस एकसारखीं 'हिंदुस्थानांतील औद्यो-गिक प्रगति आणि व्यापार' या विषयावर व्याख्यानें दिल्यामुळें न्यायमूर्तींना थकवा आला व तिसऱ्या व्याख्यानाचे रात्रीं घरीं आल्यावर त्यांच्या पोटांत कळा आल्या. ह्यांतून न्यायमूर्ती लौकर बरे झाले; पण या दुखण्यानेंहि

त्यांचें बरेंच आयुष्य खालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या दुखण्यांत असतांनाच रावसाहेब रानडे मुंबईच्या हायकोर्टाचे ' न्यायमूर्ती ' झाल्याचा हुकूम आला. मुंबईस गेल्यावर, मुंबईच्या आठ वर्षांच्या काळांत तीनदां न्यायमूर्ती अपमृत्युच्या तडाक्यांतून वाचले याबद्दल रमाबाईनीं परमेश्वराचे आभार मानले आहेत.

जून सन १८९५ त न्यायमूर्ती महाबळेश्वराहून वाठारास येत असतांना रडतोंडीच्या घाटाजवळ आले. गाडी घाटांत आल्यावर न्यायमूर्ती पायउतार होऊन चालत पुढें निघाले व रमाबाईहि त्यांच्या पाठोपाठ निघाल्या. न्यायमूर्ती पुढें व रमाबाई त्यांना गांठण्याकरितां मधून मधून धांवत जात आहेत अशा रीतीनें दोघेहि घाटाच्या माथ्यावर येऊन पोंचलीं. ' तेथें एका पुलाजवळच दोन मोठ्या इंगळ्या-सुमारें चार साडेचार इंच लांबीच्या व एक दीड इंच रुंदीच्या असाव्या-त्यांनीं आपल्या नांग्या पाठींकडे वळविल्या असून त्या करंगळीएवढ्या जाड होत्या. त्यांचा रंग काळसर गुळाच्या पक्क्या पाका-सारखा होता. त्या दोन्ही इंगळ्या स्वैरपणानें एकमेकींच्या मागें चालल्या होत्या. न्यायमूर्तींच्या पावलाकडे रमाबाईची नजर लागलेली असल्यामुळें न्यायमूर्तींचें दुसरें किंवा तिसरें पाऊल त्या इंगळ्यावर पडेल अशी त्यांना भीति वाटली. रमाबाई ' आठवणी'त पुढें लिहितात, " मी अतिशय भाबरलें व कदाचित मोठ्यानें ओरडलें असतें; पण काय झालें कोण जाणें, इंगळ्यावर पाऊल पडण्यापूर्वीं आपण जाऊन गांठावें व हातानें पलीकडे करावें अशा हेतूनें मी जोरानें धांवत सुटलें; पण तेथपर्यंत जाऊन पोंचण्याच्या आधींच स्वतःचें जाणें त्या इंगळ्या ओलांडून दोन तीन पावलें पुढें झालें होतें.

हा सर्व मजकूर लिहिण्यास पांचदहा मिनिटें लागलीं; पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडण्यास दहापांच सेंकडहि वेळ लागला नाहीं. धांवत असतांना वाटेंत इंगळ्या आहेत, पाय पडेल, असें हांक मारून किंवा मोठ्यानें

ओरडून मला सांगतां येईना. इकडे तर आतां इंगळ्यावर पाय पडणार असें मनांत येऊन माझा जीव आंतल्याआंत गोळा होऊन अगदीं कासावीस झाला. निमिषार्ध माझे डोळे आपोआप मिटले. पण लगलीच डोळे उघडून पाहातें तों इंगळ्या ओलांडून पुढें गेलेलें पाऊल पाहिल्यासारखेंच जोरानें पडत आहे. हें पाहून मला अत्यानंद झाला व एवढें मोठें अरिष्ट टळल्याबद्दल मी देवाचे उपकार मानले. ”

१८९६।९७ सालीं मुंबईस प्लेग सुरू झाला. या प्लेगनें न्यायमूर्तींचीं बरींच नोकरमाणसें आजारी पडलीं. त्यांत काशीनाथ, मातादीन अशीं त्यांच्या प्रेमाचीं तीन नोकरमाणसें मेल्यामुळें आपल्या हातून कांहीं चूक घडल्यासारखी न्यायमूर्तींच्या मनाला रुखरुख लागली. तशांत रावबहादूर चिंतामण नारायण भट या जिवलग मित्राच्या मृत्यूची वार्ता आल्यामुळें न्यायमूर्तींना अतिशय दुःख झालें, बोलणें कमी झालें व त्यांची अन्नावरची वासना उडाली. अन्नद्वेषाचें हें दुखणें बळावल्यामुळें मार्चपासून कोर्टाला सुट्टी मिळाल्यावर न्यायमूर्ती महाबळेश्वरास गेले. तेथेंहि पांचसहा दिवस झाले तरी न्यायमूर्तींच्या प्रकृतीला वाटावें तितकें बरें वाटलें नाहीं. असे आणखी पांचसात दिवस गेल्यावर एक दिवस रात्रीं अन्नाची आवड जिभेंत परत आली. त्या दिवशीं न्यायमूर्तींनीं जेवतांना दुसऱ्यांदा वाढावयाला आलेल्या भाज्या व आमटीहि घेतली, असें पाहून रमाबाईंना मनांतल्या मनांत फार आनंद झाला. “ गेल्या अडीच तीन महिन्यांत माझ्या मनाला हृद्रोगासारखी जी काळजी लागून राहिली होती ती आतां दूर झाली. आज आपल्यावर परमेश्वरानें कृपा केली आहे असें वाटून तेथेंच क्षणभर स्वस्थ बसून मी मनांतल्या मनांत त्याचे कितीतरी आभार मानले, प्रार्थना केली व तुझ्या कृपेनें हे माझे असे सुखाचे दिवस जावोत, असें मागणें मागितलें. ह्या वेळेस माझ्या डोळ्याला पाणी आलें. पण दुसऱ्या कोणाचे लक्षांत

येण्यापूर्वी मी आपले डोळे पुसून दुसरें बोलणें काढलें, " असें रमाबाईनीं 'आठवणीं'त लिहिलें आहे.

यानंतर तिसरा अपमृत्युचा प्रसंग म्हणजे १८९९ च्या महाबळेश्वराच्या स्वारींत झालेला 'सन्स्ट्रोक' होय. महाबळेश्वरास जाऊन दोन आठवडे झाल्यावर एका सकाळीं ऊन फार कडक पडलें होतें. न्यायमूर्तींना बाहेरून फिरून येण्यास अकरा वाजून गेले. त्यांचें तोंड उन्हानें नेहमींच लाल होत असे; पण आज त्या लालीवर बराच काळसरपणा आला होता. अंगांतील बंडी ओलीचिंब झाली होती. त्यांच्या दृष्टींतहि शून्यपणा आला होता. यामुळें नेहमींप्रमाणें पत्रें वाचून दाखवितांना त्यांना नीट अर्थबोध होईना. कसेंबसें जेवण करून न्यायमूर्ती अंथरुणावर येऊन पडले. ताप म्हणण्यासारखें विशेष अंग तापलें नव्हतें; पण डोकें मात्र तापलें होतें. आज उन्हापासून डोक्याला कांहीं विकार झाला आहे खास असें रमाबाईंना वाटलें. रमाबाईंची भीति खोटी नाहीं असें डॉक्टरांनींहि सांगितलें. "याप्रमाणें सात आठ दिवस गेल्यावर, " रमाबाई या प्रसंगाचें वर्णन करतांना 'आठवणीं'त म्हणतात, "एकेदिवशीं रात्रीं सुमारें साडेदहा वाजतां स्वतःला चांगली झोंप लागली होती. मला अलिकडे बहुतेक जागरणच असे. त्यांत त्या दिवशीं मी अधिक थकलें होतें म्हणून स्वतःच्या पायाला आज तूं तूप चोळ असें गड्याला सांगून मी शेजारच्या मुलांच्या पलंगावर निजलें व लागलीच झोंपी गेलें. सुमारें अर्ध्यातासानें मोठ्यानें हंसण्याचा आवाज माझ्या कानावर पडून मी खडबडून जागी झालें. दुखण्याची धास्ती मनांत असेच; पण डोळ्यावर फार झोंप असल्यामुळें काय प्रकार आहे याचा उमज पडेना. इतक्यांत दुसऱ्यांदां तसेंच मोठ्यानें हंसणें झालें. हंसें कोणाचें तें ओळखून मी अतिशय घाबरलें व माझी अगदीं बोबडी वळली. तरी तशीच स्वतःच्या

पलंगाजवळ जाऊन, ' काय झालें ! काय होत आहे ! ' म्हणून घाबरलेल्या सोबल्या शब्दांनींच विचारलें.

तेव्हां स्वतः म्हटलें, ' अग भिऊं नको, मी जागा आहें, पण दिवा आणून तुझा शहाणा गडी काय करीत आहे तें एकदां पहा. '

गडी तूप लावीत होता हें मला माहीत होतें. म्हणून मी म्हटलें, ' हें काय ! गडी काय करणार ! तो तूप चोळीत आहे. "

तेव्हां म्हटलें, ' आधीं तूं दिवा आणून बघ तरी खरी ! मग तुला हंसण्याचें कारण कळेल ! '

मी बाहेरून दिवा आणला आणि पाहातें तों गणू गडी स्वतःचा एक पाय आपल्या मांडीवर घेऊन तूप चोळीत आहे व डोकें पायाला टेंकीपर्यंत पेंगत आहे. पण दोन्ही पायांत मोजे तसेच होते व मोजावरून तूप चोळणें चाललें होतें. हें पाहून मलाहि फार हंसू आलें व गड्याच्या या बावळेपणाबद्दल मी त्याला हांका मारून जागें केलें.

दुसरे दिवशीं सकाळपासून पंधरा दिवसांपूर्वी गेलेली स्वतःची स्मरणशक्ति आज परत आली, अशी माझी खात्री झाली. कारण दुसरे दिवशीं सकाळीं चहाला सर्व मंडळी एकत्र जमल्यावर रात्रीं घडलेला गणू गड्याचा शहाणपणाचा प्रकार स्वतः हंसून भावोजींजवळ सांगितला व त्या दिवसापासून दिवसेंदिवस प्रकृतिला अधिक बरें वाटत चाललें. याप्रमाणें थोडक्यावरच हें दुखणें निभावलें व माझें भाग्य होतें म्हणून आणखी कांहीं दिवस मला सहवासाचा लाभ मिळाला. "

मृत्यूच्या छायेंत आपण जात चाललों आहों याची जाणीव न्यायमूर्तीनाहि होऊं लागली होती. त्यांच्यांतहि 'सनस्ट्रोक'च्या दुखण्यानंतर उदासपणा

उत्पन्न होऊन ते खाण्यापिण्याच्या बाबतींत कांहीं नियम कसोशीनें व कोणाच्या लक्षांत येऊं न देतां पाळण्याची तत्परता दाखवितात असें रमाबाईंच्या नजरेस येऊं लागलें. १८९१ ते १९०१ हा दहा वर्षांचा रमाबाईंच्या संसाराचा काळ अशा रीतीनें जरी मृत्यूच्या छायेंत गेला होता तरी मोठ्या धीमेपणानें आणि आनंदीवृत्तीनें रमाबाईंनीं हीं दहा वर्षें काढलीं. महाराष्ट्रांतील संसार अनेक कारणांनीं पार निखळलेल्या वटवृक्षाखालून जाणाऱ्या कृष्णा नदीप्रमाणें स्त्रियांना भीतिदायक झाला होता व आहे. त्यामुळें आपल्या संसाराचा आधार केव्हां उन्मळून भवनदींत आपण गटंगळ्या खावयाला लागूं अशी भीति हिंदु स्त्रीच्या अंतःकरणांत वागत असते. रमाबाईंच्या संसाराच्या तीरावरील वटवृक्ष कलला होता; तथापि रमाबाईंनीं सुगृहिणीला शोभेल अशा रीतीनें या दहा वर्षांत आलेल्या संसारांतील आपत्तींना तोंड दिलें, असें पुढील हकीगतीवरून वाचकांना दिसून येईल.

---

## [ ८ ]

## मुंबईतील आठ वर्षें

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

१८९३ च्या अखेरीस न्यायमूर्ती रानडे मुंबईस आपल्या नव्या जागेवर येऊन दाखल झाले. न्यायमूर्तींनीं पुणें सोडण्यापूर्वी संमतिवयाचा वाद, सरकारनें मलबारी शेटजींच्या मागणीप्रमाणें कायदा पास केल्यामुळें, पाऊस पडून धुरळा बसावा त्याप्रमाणें, शांत झाला होता. सुधारणा कायद्यानें करावी कीं नाहीं असा या वादांतील मुख्य प्रश्न होता. परकीय सरकार असल्यामुळें समाजाला पाहिजे असणाऱ्या गोष्टींना सरकारच्या सत्तेचा पाठिंबा मिळण्यासाठीं कायद्याची जरूरी आहे आणि पारशी वगैरे जातींनीं जसे आपल्या समाजाकरतां कायदे मागून घेतले तसे हिंदू समाजानें कायदे मागून घेण्यास हरकत नाहीं, अशी न्यायमूर्ती रानडे यांची विचारसरणी होती. ही विचारसरणी लोकमान्य टिळक वगैरे स्वसंस्कृतीच्या अभिमानी पक्षास अमान्य नव्हती. पण कायदा मागण्यांत सुधारकांचा इंग्रजी संस्कृती हिंदु समाजावर लादण्याचा जो अट्टाहास होता तो लोकमान्य टिळकांना मान्य नव्हता. नव्या काळाला अनुरूप समाजांच्या आचारांत फरक झाले पाहिजेत व कांहीं अनिष्ट चाली नाहींशा केल्या पाहिजेत ही गोष्ट कोणाहि सुशिक्षितास त्या वेळीं नाकबूल नव्हती. आचारांत बदल व्हावयाचा असेल तर नवा आचार कोणी तरी आचारणांत आणून दाखविला पाहिजे आणि तो सरकार दरबारीं मानला जाण्यास त्याला कायद्याचें रूप देऊन सरकारची संमत्ति घेतली पाहिजे याबद्दल तक्रार दिसून येत नाहीं. पण आचारांत बदल इंग्रजी संस्कृतीला धरून करावयाचा कीं आपल्या संस्कृतीला न सोडतां करावयाचा असा सुधारक आणि राष्ट्रीय यांच्यांत वाद होता, अझूनहि तो मिटलेला नाहीं आणि 'राजा कालस्य कारणं' या न्यायानें इंग्रजांच्या हातीं हिंदुस्थानचीं

राज्यसूत्रें असे तों हा वाद मिटावयाचाहि नाहीं. सुधारक म्हणजे इंग्रजी आचार विचारांचा अभिमानी पक्ष व राष्ट्रीय म्हणजे स्वसंस्कृतीचा अभिमानी पक्ष हे भेद तोंपर्यंत शिल्लक रहाणारच. ह्या भेदांना त्या वेळीं तीव्र स्वरूप प्राप्त झालें होतें. या झगड्यांत १८९२ सालीं सुधारक पक्षाला विजय मिळाला. पण पुढें १८९५ सालीं सामाजिक परिषद कांग्रेसच्या मंडपांत भरवावयाची कीं नाहीं या वादांत राष्ट्रीय पक्षाचा विजय झाला. १८९५ सालीं सुधारक पक्षाचा पुण्यांतलि मोठा आधारस्तंभ नाहींसा झाला. प्रि. आगरकर यांनीं 'सुधारकां' तून नव्या विचारांचा प्रचार जोरानें चालविला होता व त्यांचे मताप्रमाणें वागणारे कट्टे सुधारकहि पुण्यांत दिसूं लागले होते. न्यायमूर्ती रानडे मुंबईस गेले त्या सालीं म्हणजे १८९३ मध्यें प्रो. कर्वे यांनीं पुनर्विवाह लाऊन घेतला व पुढें १८९९ मध्यें प्रो. भाटे यांचा पुनर्विवाह झाला. १८९४ सालापासून प्रो. कर्वे यांच्या खटपटीनें पुण्यास पुनर्विवाहित कुटुंबांचा मेळा भरूं लागला व १८९६ सालीं या मेळ्यांतूनच विधवाविवाह—प्रतिबंधनिवारक मंडळी जन्माला आली. संमतिवयाच्या बाबतींत व विधवाविवाहाच्या बाबतींत सुधारकांचें उर्फ पुनर्विवाह पक्षाचें पाऊल असें धीमे धीमे पुढें पडत होतें. स्त्रीशिक्षणाच्या चळवळीसहि अधिकाधिक पाठिंबा मिळूं लागला होता. १८८९ सालीं मुंबईस स्थापन केलेलें 'शारदासदन' पंडिता रमाबाईनीं १८९२ सालीं पुण्यास आणलें. या बाबतींत जुन्या मताच्या लोकांचे तर्क खरे ठरून सुधारक पक्षाला 'शारदा सदना' शीं स्वतःचा असलेला संबंध तोडून टाकावा लागला. पण 'फीमेल हायस्कूल' च्या वादांत सुधारक पक्षानें जुन्या मंडळीवर मात केली. या सर्व भांडणाच्या मुळाशीं इंग्रजी संस्कृति कीं हिंदु संस्कृति असा वाद होता.

या वादास, मुंबई हें इंग्रजी संस्कृतीचें माहेरघर बनत चालल्यामुळें, मुंबईस तीव्रपणा नव्हता. मुंबईस रमाबाई आल्या त्या सार्वजनिक दृष्टीनें

अनेक वाद पुण्यास जशा मागें ठेवून आल्या तशा घरगुती बाबतींतहि मुंबईस येतांना पुण्यांतील जाच व त्रास मागें ठेवून आल्या. मुंबईस ताईसासूबाई आल्या नव्हत्या. त्या १८९६ सालीं पुण्यास वारल्या. मुंबईस रमाबाईच्या दुर्गावन्स व सावत्र सासुबाई होत्या; पण आतां स्वाभाविकपणेंच गृहिणी या नात्यानें रमाबाईच्यावर सारी जबाबदारी होती. रमाबाईचे वडील वारल्यापासून रमाबाईची आई व कांहीं भाऊ न्यायमूर्तींच्याकडेच होते. मुंबईस सखू, शांता, तारा व नानू अशीं चार मुलें होतीं. सखू ही रमाबाईच्या थोरल्या भावजयीची मुलगी. रमाबाईची भावजय, सखूच्या खेपेला रमाबाईंना मुलांच्या काय खस्ता खाव्या लागतात यांचें तुम्हांला काय सुखदुःख असें टोंचून बोलल्या होत्या. तेव्हां तूं आपलें होईल तें मूल मला देतीस कां ? मग दाखवितें मला मूल सांभाळतां येतें कीं नाहीं, असें रमाबाई म्हणाल्या होत्या. या बोलण्याप्रमाणें खरोखरीच सखूला रमाबाईंनीं अगदीं लहान असतांपासून पाळली. फिरतींतहि ती त्यांच्याबरोबर असे. नानू हा रमाबाईच्या आबा भावोजींचा मुलगा. हा १८९४ मध्यें पुण्यास झाला. यालाहि रमाबाईंनीं लहानपणापासून पाळलें. या दोन्हीं मुलांबद्दल रमाबाई 'आठवणीं' त १९०० सालांतील न्यायमूर्तींच्या दुखण्यासंबंधानें लिहितांना म्हणतात, " चि. नानू पांचसहा वर्षांचा लहान होता व सखूला आतां अकरा वर्षें पुरीं झालीं होतीं. ती अलेक्झांड्रा हायस्कूलमध्यें इंग्रजी तिसरी इयत्ता शिकत होती. तिचा मराठी सर्व अभ्यास घरीं मास्तर ठेवून करविला होता. ती फार बुद्धिमान, हुशार आहे, तशीच शहाणी, देखणी आणि मर्यादशील आहे, अशी स्वतः तिची नेहमीं वाखाणणी करावयाची असे व स्वतःला ती मनापासून आवडे. तिच्या गरीब स्वभावाबद्दल जेव्हां तेव्हां कैवार घ्यावयाचा. मी तिला रागें भरलें तर मलाच उलट स्वतःकडून तिच्या संबंधांत रागें भरून घ्यावें लागे. चि. नानूचा स्वभाव हूड, धीट,

तापट पण पक्का निश्चयी व अभिमानी असून तो बुद्धीनें चलाख असल्यामुळें त्याला चवथ्या वर्षापासूनच लिहावयाला येऊं लागलें. त्याप्रमाणें तो कविताहि चांगल्या म्हणे. सर्वांपेक्षां गोष्टी ऐकण्याची व सांगण्याची गोडी त्याला फार असे. तो एकदां ऐकलेली गोष्ट बिनचूक सांगे. घरांत कोणीहि मुलगे अगर मुली पाहुणे आले कीं, याचा आपला गोष्टी सांगा म्हणून त्यांच्या मागें लकडा असावयाचा. तसेंच, आपलें तें सर्व दुसऱ्यापेक्षां चांगलें आहे, आपल्यापेक्षां दुसऱ्या कोणाचें चांगलें नाहीं, अशी त्याची लहान-पणापासून समजूत व महत्वाकांक्षा असे; दुसऱ्या मुलांची चांगली आणि नवी वस्तु असली व आपली खरोखरीच वाईट व जुनी असली तरी तो चिडावयाचा नाहीं. उलट आपलें चांगलें व तुझें वाईट म्हणून दुसऱ्यां मुलांना चिडवून खूप हंसावयाचा. या त्याच्या स्वभावाचें स्वत:ला कौतुक वाटे. रोज जेवण झाल्यावर दोन्ही वेळ तास दोन तास या मुलांना घेऊन बसणें होई. सखूचें इंग्रजी व मराठी वाचन घ्यावयाचें, तिला कांहीं वाक्यें विचारावयाचीं, तिच्याकडून गाणीं म्हणवूनच घ्यावयाचीं, त्याप्रमाणेंच नानू-कडूनहि कविता म्हणून घेऊन कांहीं गोष्टी सांगून घ्यावयाच्या. तिसऱ्या प्रह-रचें फराळाचें व चहा सखूला करावयाला सांगावयाचा. तिनेंच तें केलें आहे असें तिला विचारून फार छान केलें आहेस, असें म्हणून तिची पाठ थोप-टायची, ती मोठेपणीं फार उत्तम स्वभावाची बायको होईल, तूं तिला सगळा दिवस बोलतेस पण तीच उद्यां तुला शिकवूं लागेल असें म्हणावयाचें.” शांता ही रमाबाईच्या आबाभावोजींची मुलगी. “ती अतिशय बोलकी व खेळकर होती. तिचें बोलणें लाडकें व नाजुक असून स्वभाव मोहक, मन-मिळाऊ व गोड असे. ती सगळ्यांशीं प्रेमानें वागे व तिजवरहि प्रत्येकाचें प्रेम असे. पण आम्हांसर्वांपेक्षां स्वत:ला ती भारी आवडत असे व तिचाहि आपल्या आईबापापेक्षां स्वत:कडेच सगळा ओढा असे. ही जात्या फार

नकली असे. वाटेल त्याची नक्कल ती बिनचूक करी व सगळ्यांना फार हंसवीत असे. तिला एकदां स्वतः जवळ घेऊन विचारलें कीं, अमुक अमुक माणूस कसें बोलतो चालतो तें दाखीव. असें म्हटलें कीं, झाली सुरवात. मग बजाबापासून तो सासुबाईपर्यंत एका मागून एक सगळ्यांच्या नकला हुबेहुब करून स्वतःला व आम्हां सर्वांना खूप हंसावयाला लावायची. दुसऱ्या तीन मुलांच्या चेष्टा करून त्यांची फजिती करावयाची" हीं तीन मुलें न्यायमूर्ती यांच्या प्रमाणेंच रमाबाईंना मुंबईस विसाव्याची जागा झाली होती. मुंबईस आल्यावर पुण्याचा बालबोध वळणाचा कडकपणा नाहींसा होऊन न्यायमूर्तींना हवें तसें घरच्या वागणुकीला वळण मिळालें होतें. १९०० सालच्या न्यायमूर्तींच्या आजारामध्यें 'रोज रात्रीं जेवण झाल्यावर' रमाबाई आठवणींत लिहितात, 'मी व मुली आणि केव्हां केव्हां वन्सहि तेल चोळीत असूं. या वेळीं चि. सखू, तारा नानू व शांता तेथेंच खेळत व बोलत असून सासूबाई सुद्धां सर्व मंडळी त्या वेळीं दिवाणखान्यांत येऊन बसत. एकीकडे तेल चोळण्याचें काम व एकीकडे दिवसभर काय कामें केलीं त्यांची चौकशी, त्याबद्दल टीका करण्याच्या बुद्धीनें स्वतःचें चेष्टेचें व विनोदाचें भाषण, चारी मुलें भोंवतालीं खेळत असतांना त्यांचें कौतुक करण्यांत दहा साडेदहापर्यंत वेळ काढावयाचा. वडील बायका ज्या दिवशीं कामांत गुंतल्या असतील त्या दिवशीं आम्हीं बुद्धिबळें खेळावयाचीं. कधीं कधीं मुलें निजलीं असतील तर मी व वन्संनीं पाळी पाळीनें गाणीं म्हणावयाचीं. आमच्या सगळ्यामध्यें वन्सचा गळा फार चांगला व मधुर होता, आणि भगवद्भक्तांचीं प्रेमळ व भक्तिपर गाणीं, मिराबाईचीं व कबीरांचीं पदें वगैरे त्यांना पुष्कळ येत. त्यांच्या गाण्याला नवीन शिक्षणाचा कांहीं संस्कार नसल्यामुळें त्या आपलीं गाणीं जुन्या व साध्या तऱ्हेनेंच पण फार चांगलीं म्हणत. त्यांच्या गाण्यापैकीं रंगाबाई, कान्हूपात्रा, म्हातारी, चिंधी, आदीं,

गांठोडें वगैरे गाणीं स्वतःला फार आवडत असत व तींच गाणीं वन्सना म्हणावयास सांगावयाचें. ”

मुंबईस आल्यापासून अशा रीतीनें घरांत मोकळेपणा उत्पन्न झाला होता. मुंबईस आल्यावर रमाबाईंच्या खटपटीनें १८९४ मध्यें ‘ हिंदुलेडीज सोशल क्लब’ची स्थापना झाली. १८९५ च्या पुण्यास भरलेल्या सामाजिक परिषदे-बरोबर स्त्रियांच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन भरलें होतें. या प्रदर्शनाच्या चिट-णीसीचें काम रमाबाईंनीं केलें. याशिवाय त्या नेहमीं न्यायमूर्तींच्या बरोबर ‘ प्रार्थनासमाजां’त उपासनेला जात असत. १८९६ मध्यें त्यांच्या हस्तें अलेक्झांड्रा हायस्कूलमधील बक्षिससमारंभ झाला. मुंबईचीं रमाबाईंचीं आठ वर्षे ‘ गृहिणी सचिवः प्रियः सखा, प्रियशिष्या ललिते कलाविधौ’ अशा कालि-दासानें अजविलापांत वर्णन केलेल्या इंदुमतीराणीची उपमा देतां येईल अशीं गेलीं. ज्ञानदान व लोकजागृति हाच थोरपुरुषांना साजेसा करमणुकीचा विषय न्यायमूर्ती रानडे यांनीं करून घेतला असल्यामुळें या ‘ ललितकलें’त रमाबाई त्यांच्या ‘ प्रियशिष्या’ बनल्या होत्या. मुंबईस आल्यापासून त्यांनीं गृहिणी या नात्यानें संसाराचा व्याप सांभाळला होता; इतकेंच नव्हे तर संसारांत त्या न्यायमूर्तींच्या सचीव होत्या. यामुळें न्यायमूर्तींना संसाराची काळजी करावी लागली नाहीं. १८९६।९७ सालच्या प्लेगापासून रमाबाईंच्या ज्या सांसारिक अडचणी एकामागून एक येऊं लागल्या त्यांत गृहिणी व सचिव या पदवीला साजेसें वर्तन रमाबाईंनीं केलें. घरप्रपंचांतील कोणतीहि काळजी न्यायमूर्तींना वाटूं द्यावयाची नाहीं असा रमाबाईंचा कटाक्ष असे. १८९६।९७ त मुंबईस प्लेग सुरू झाल्यावर न्यायमूर्तींच्या घरीं प्रथम त्यांच्या स्वयंपाकाच्या बाईच्या मुलाला प्लेग झाला. ही हकिगत जेवण झाल्यावर रमाबाईंनीं सांगितल्यानंतर लोणावळ्याला जावयाचा बेत करून न्याय-मूर्तींनीं रमाबाईंना मुलांना घेऊन बोरीबंदरावर यावयाला सांगितलें व आपण

परभारें कोर्टांतून येतों असें सांगितलें. रमाबाईंनीं घरांतील सर्व व्यवस्था लावून आजारी मुलाला व त्याच्या आईला इस्पितळांत पाठविलें व विद्यार्थ्यांची सोय केली. इकडे मुंबईस त्याच रात्रीं बंगल्यांत परदेशी पहारेवाला व ' मातादीन'नांवाच्या शिपायाचा भाऊ प्लेगनें लागला अशी लोणावळ्यास तार आली. यावेळीं रमाबाईचा भाचा लोणावळ्यास आला होता. त्याला व दुर्गाप्रसाद शिपायाला मुंबईस पाठवून बंदोबस्त करण्यास त्यांनीं सांगितलें. ही सर्व व्यवस्था रमाबाईंनीं न्यायमूर्तींना न कळवितां परस्पर केली. या संबंधानें रमाबाई ' आठवणीं ' त म्हणतात, ' याचें कारण, कोणीहि आजारी असलें तरी स्वतः वास्तपुस्त घेऊन त्याची नीट व्यवस्था लागेपर्यंत चैन पडावयाचें नाहीं. इतर आजारांची गोष्ट वेगळी; ही स्पर्शजन्य सांथ आहे, हिच्यापासून स्वतःला जितकें दूर राहतां येईल तितक्या तऱ्हेनें आपणच व्यवस्था केली पाहिजे, स्वतःकडून अशा वेळीं आपल्याला जपण्याकरितां दूर राहणें होणार नाहीं, हें मला माहीत होतें, म्हणून होतां होईल तों या आजारी माणसांची बातमीच कळूं देऊं नये, आपल्याला समजेल तितक्या काळजीनें योग्य बंदोबस्त करावा म्हणजे झालें, त्यांत मात्र हयगय करतां कामा नये, इतकं माझ्या मनानें घेतलें होतें व त्याच धोरणानें मी हें सर्व काम करीत होतें.'

पण संकटें एकामागून एक येतात. त्याप्रमाणें मुंबईस न्यायमूर्तींच्या बंगल्यांतील विद्यार्थी व बंदोबस्ताला पाठविलेली मंडळी प्लेगच्या सपाट्यांत सांपडूं लागली. दुर्गाप्रसाद आजारी पडला, विद्यार्थी आजारी पडले अशी तार येतांच न्यायमूर्ती मुंबईस जाऊन व्यवस्था करून येतों असें म्हणूं लागले. तेव्हां रमाबाई म्हणाल्या 'मला सांगितलें तर आज मी पुढें जातें. मघाशीं म्हटलेलें सगळें काम करतें. जागा पाहून बिऱ्हाड बदलून विद्यार्थ्यांची व आपली सर्वांची सोय करून जमल्यास रात्रीच्या गाडीनें परत येईन; नाहींतर तार

करीन. मुलांना मात्र बरोबर नेत नाहीं. ती येथेंच जवळ राहूंदेत. त्यांच्या येण्यानें माझ्या कामाचा घोटाळा होऊन त्यांचेंहि हाल होतील. कल्याणास एक जागा आहे व दुसरी भांडुपास आहे ना ! मी दोन्ही जागा जाऊन पाहातें व कोणतीतरी एक पसंत करून स्वतःच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं करतें त्याची कांहीं काळजी नको. अशा गोष्टी आजपर्यंत स्वतः कधींच केल्या नाहींत. त्या आतां कशा बरें होतलि ! याकरितां मलाच जा म्हणावें, म्हणजे मी जातें,' असें आर्जवानें सांगितल्यावर न्यायमूर्तींनीं रमाबाईचें म्हणणें कबूल केलें; आतां सखू व नाना यांची समजूत करावयाचें काम राहिलें. त्यांना खाऊं काय पाहिजे हें विचारून 'येतेवेळीं तुमचे सर्व जिन्नस आणीन, विसरणार नाहीं' असें कबूल केल्यावर त्यांनीं मोठ्या मिनतवारीनें रमाबाईंना जाण्यास परवानगी दिली. अशा रीतीनें रमाबाई भांडुपचा बंगला ठरवून विद्यार्थ्यांची सोय करताहेत तोंच न्यायमूर्तींचा रिडर काशिनाथ याची आपणाला प्लेग झाला, आपण हिंदु हॉस्पिटलमध्यें गेलों अशी चिठी आली. या चिठीमुळें रमाबाईंनां रात्रीं झोंप लागली नाहीं. न्यायमूर्ती त्या दिवशीं थकून आले होते. म्हणून रात्रीं ही चिठीची हकीगत त्यांनीं न्यायमूर्तींना सांगितली नाहीं. रमाबाई पहांटे उठल्या व आचाऱ्याला स्वयंपाकाची तयारी त्यांनीं करून दिली. मुलांना उठवून सखूची वेणी व आंगधुणें उरकून रमाबाईंनीं तिला परकर नेसविला व 'तुला आज वासुदेव शिकवील; तुझ्या मास्तरांना मी मुंबईस नेणार आहें. लवकर परत येईन बरें; नानू व तूं खेळा भांडूं नका,' असें सांगितलें. तें ऐकून सखू आपल्या उद्योगाला लागली. इकडे नानूलाहि कपडे बदलून दुसरा पोषाख घालून कोको पाजून फिरावयास नेण्याकरितां रमाबाईंनीं शिपायाच्या स्वाधीन केला. इतकें झाल्यावर न्यायमूर्तींना चहा देऊन रमाबाई हिंदु इस्पितळमध्यें गेल्या. काशीनाथाला भेटून व मातादिन वगैरेंची चौकशी करून परत आल्या. पण दुपारींच सुमारें तीन वाजतां हॉस्पिटलांतील

डॉक्टराकडून न्यायमूर्तींच्याकडे हायकोर्टात निरोप गेला कीं, ' आपल्या पांच नोकरांपकीं तीन नोकर आज मेले आहेत. त्यांच्या मूठमातींची व्यवस्था करविणार किंवा हॉस्पिटलकडून करवावयाची तें कळवावें.' चिठी वाचून न्यायमूर्तींनीं एक कारकून व चोपदार परस्पर हॉस्पिटलकडे पाठवून दिला व दुसऱ्या चोपदारास चिठी देऊन रमाबाईच्याकडे पाठविलें. या चिठीप्रमाणें लागलीच पन्नास रुपये देऊन रमाबाईनीं चोपदारास रवाना केलें. काशिनाथाची व्यवस्था तुम्ही करा व दुसऱ्या नोकरांची व्यवस्था त्यांच्या जातवाल्यांकडून करवा असें न्यायमूर्तींनीं हॉस्पिटलच्या डॉक्टरांना परत कळविलें व त्याप्रमाणें मृतांच्या मूठमातीची व्यवस्था करण्यांत आली.

ह्या आपत्तींनीं रमाबाईचें मन विव्हळ झालें असतांनाच या सर्व दगदगीचा व मानसिक त्रासाचा परिणाम न्यायमूर्तींच्या प्रकृतीवर होऊन रमाबाईंना तो एक नवाच काळजीचा विषय होऊन बसला. न्यायमूर्तींना अन्नद्वेष झाला व ह्या दुखण्यानें अडीच तीन महिने रमाबाईंना हृद्रोग लावून ठेवला. या हृद्रोगांतून बाहेर त्या पडतात न पडतात तोंच ' सनस्ट्रोक ' नें न्यायमूर्तींना १८९९ सालीं घायाळ केलें व पुढें १९०० मध्यें किडनेचा विकार बळावला. अशी आपत्तींची परंपरा येत असतांना, रमाबाई व न्यायमूर्ती यांच्यामधील वागणुकींतील मनमोकळेपणा रमाबाईच्या मनाला मोठा आधार होता. या आपत्तीच्या प्रसंगींहि त्यांचें कधीं गंभीर तर कधीं विनोदाचें संभाषण होत असे.

१८९५ सालांत रडतोंडीच्या घाटांतील प्रसंग अशाच पैकीं होता. इंगळ्या ओलांडून जाण्याचा प्रसंग निभावल्यां नंतर रमाबाईनीं न्यायमूर्तींना गांठलें व त्यांनीं " पायाला कांहीं टोंचलें नाहींना ! " असें न्यायमूर्तींनी घाबरेपणानें विचारलें. रमाबाई आपल्या आठवणींत म्हणतात, " हें माझें

विचारणें जरा चमत्कारिक वाटलें व लागलीच थांबून माझ्याकडे पाहून म्हटलें, 'काय? काय विचारतेस? काय झालें आहे.? इतका दम कशानें लागला! गाडी कोठें आहे?' वगैरे एकामागून एक प्रश्न विचारले. कांहीं तरी अपाय झाला किंवा घोडे उधळले असें कांहीं तरी स्वतःच्या मनांत येऊन हें इतकें विचारलें असावें हें माझ्या लक्षांत आल्याबरोबर मी एकदम म्हटलें, "कांहीं नाहीं, मागून गाडी सुरक्षित येत आहे. मी जरा घाईनें चाललें व चढ आहे म्हणून दम लागला. जरा वेळ बसावें तरी तोंवर गाडी येईल. आतां चढ संपला. आतां गाडींत बसण्यास काय हरकत आहे?" तेव्हां म्हटलें, 'कोणाला दम लागला आहे? मला? मी बिलकुल दमलों नाहीं. मुळीं पुरुषांचा जन्म श्रमाचीं कामें व कष्ट करण्याकरितांच आहे. आम्हांला दम लागून कसें चालेल? दऱ्या खोऱ्यांतून व डोंगर कठारींतून हिंडणारीं आम्हीं माणसें. तूं दमली आहेस, म्हणून रदबदली करीत आहेस. मग मी दमलें आहे असें स्पष्ट म्हण, म्हणजे तुझ्याकरितां मी खालीं बसतों.'

मी लागलींच म्हटलें, 'होय, मी दमलें आहे. माझ्याकरितां कां होइना पण खालीं बसावें.'

मग सडकेच्या कडेला पांढरे दगड ओळीनें लाविलेले असतात त्यांजवर आम्ही उभयतां बसलों. गाडी येण्यास पुष्कळ अवकाश होता, म्हणून त्या दोन इंगळ्यांची गोष्ट मी सांगितली. ती ऐकून म्हटलें, 'आतां तुझ्या घाबरण्याचें कारण मला बरोबर कळलें. त्या वेळचा तुझा घाबरलेला आवाज व भ्यालेली मुद्रा पाहून मला चमत्कारिक वाटलें व गाडीबद्दल काळजी वाटली."

मी म्हणालें, "केवढें तरी आज अरिष्ट टळलें! इंगळ्यांना नुसत्या पायाचा स्पर्श झाला असता तरी त्या चावल्या असत्या; मग काय वाट झाली असती! अशा ऐन तिन्हीसांजांच्या वेळीं आड रानांत औषध

कोठून मिळणार होतें ! अशा तिन्हीसांजाच्या वेळीं कोण साहाय्य झालें असतें ! असें बोलत असतां मला गहिंवर आला व एकदम रडेंहि आलें."

तेव्हां स्वत: थोडावेळ अगदीं स्तब्ध राहून मग मला म्हटलें, 'आतां अरिष्ट टळलेंना ? आतां भिण्याचें कारण काय आहे ? यावरून असें पहा, कीं, परमेश्वर सदोदित आपल्या सन्निध आहे व पावलोपावलीं आपल्याला संभाळीत आहे. इंगळ्यावर पाऊल न पडतां जें पाऊल सहज पलीकडे गेलें असें तुला वाटलें, तें कसेंहि असलें तरी ही योजना त्याचीच आहे, यांत संशय नाहीं. त्यानें रक्षण करण्याचें मनांत आणिल्यास कोणाकडूनहि अपाय होणें शक्य नाहीं. मात्र आपण तसा भाव ठेवला पाहिजे. हें शिकण्यासारखें नाहीं काय ? तुकाराम बुवांचा एक अभंग आहे. जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविशी हातीं धरूनियां. ' हा अभंग किती सत्य आहे बरें ? धन्य ते पुरुष आणि धन्य त्यांचा निस्सीम भाव. आपल्याला जेव्हां अनुभव येतो, तेव्हांच ही उक्ति पटते. आपण दुर्बळ माणसांनीं त्यांच्या सारखा दृढभाव मनांत धरला तर तें एक अत्यंत मोठें सामर्थ्य आहे व त्यांत आपलें कल्याण आहे. "

या गंभीर उपदेशाच्या आधीं दऱ्याखोऱ्यांतून हिंडण्याचा न्यायमूर्तींनीं जसा विनोद केला तसाच एकदां रमाबाई आचाऱ्याला कच्च्या भाताबद्दल बोलल्या असतां 'लिंबूर खाऊन दिवस काढणारी आम्ही लढाईतील माणसें' असें न्यायमूर्ती म्हणाले होते. त्यांवर रमाबाईंनीं केलेला विनोद लक्षांत ठेवण्याजोगा आहे. त्या म्हणाल्या, 'रोजच्या जेवणांत एक घांस अधिक झाला तर तेवढा पलीकडे ठेवावयाचा असतो; तोलून खाणाऱ्यांनीं लढाई कसली करावयाची ? आतां लेखणींत मात्र लढाई उरली आहे. लेखणी शिवाय दुसऱ्या कशानें लढाई करावयाची ! ! हत्यारांचा तर बंदोबस्त आहेच. मात्र हातांत धरावयाच्या काठ्या अजून वापरावयाला मिळतात हें भाग्य आहे. त्याहि कांहीं दिवसांनीं सरकार बंद करील म्हणजे काम आटोपलें.

खरोखरीच लढाईची वेळ आली म्हणजे सर्वांची केवढी धांदल उडेल ! छाती दुखत असली म्हणजे त्यावर मोहरी वाटून घातली किंवा टरपेंटाईन चोळलें, तर तेवढ्या जागेवर पुरळ उठतो व फोड येतात, त्या शरीराला लढाईच्या जखमा सोसल्या तरी कशा ? '

प्रार्थनासमाजांत जातांना नेहमीं रमाबाई न्यायमूर्तींच्या बरोबर असत. उपासना झाल्यावर घरीं परत येतांना गाडींत बसल्यावर न्यायमूर्तींनीं रमाबाईंना विचारावें, 'आज तुला काय समजलें सांग.' रमाबाईंनीं सर्व उपासना नीट सांगितली तर न्यायमूर्ती म्हणत, 'तर मग आजची उपासना बरी झाली असावी असें वाटतें.' एकादे वेळेस प्रतिपादनाचा विषय अवघड असला म्हणजे रमाबाईंना उपासना कशी झाली हें सांगतां येत नसे. तेव्हां न्यायमूर्ती म्हणत, 'तर मग आजची उपासना चांगली झाली नाहीं म्हणावयाची. उपासनेसंबंधानें आम्ही असें प्रमाण बसविलें आहे कीं, तुला समजली म्हणजे ती उपासना चांगली झाली, व तुला समजली नाहीं ती उपासना चांगली झाली नाहीं, दुर्बोध झाली असें मी समजतों.'

दररोज पहांटे अभंग म्हणण्याचा न्यायमूर्तींचा परिपाठ असे. कांहीं वेळां तल्लीनतेनें आपल्यापाशींच अभंग म्हणत असतांना आपण म्हणत असलेल्या अभंगाचा दुसरा चरण जुळत आहे कीं नाहीं इकडे न्यायमूर्तींचें लक्ष नसे. प्रथम एक अभंग म्हणावयाचा व दुसऱ्यादां दुसऱ्याच अभंगाचा चरण म्हणावयाचा. अशा वेळीं रमाबाईंना फार हंसू येई व त्या म्हणत, "ह्या सगळ्या नवीन अभंगांची एक गाथा करून ठेऊं या. मी कल्याण शिष्यासारखें लिहिण्याचें काम पत्करून हे सगळे अभंग लिहून काढतें, म्हणजे बरें होईल." यावर न्यायमूर्ती उत्तर देत, "आम्ही आपलीं भाबडीं माणसें. आम्हांला यमकें किंवा तालसूर यांची माहिती नाहीं व त्यांची गरजहि वाटत नाहीं. ज्याच्याकरितां आम्ही म्हणतों त्याला ते सर्व समजतात. त्याचें लक्ष या इतर गोष्टींत नाहीं.'

अशा रीतीनें मनमोकळ्या व प्रेमळ संवादाचें सुख अनुभवित रमाबाई संसारांतील आपत्तींना तोंड देत असतां, आहेत तेवढ्या आपत्ति पुरे नाहींत असें देवाला वाटूनच कीं काय ज्या वेळेस न्यायमूर्तींना 'स्पॅझम' दुखण्यानें घेरलें. त्याच वेळीं रमाबाईच्या आठरा वर्षांच्या जुन्या रोगानें आपलें डोकें वर केलें. रमाबाईच्या रोगावर ऑपरेशन नाहीं केलें तर दुखणें धनुर्वातावर जाईल असें डॉक्टरांनीं सांगितलें. यामुळें रमाबाईचें मन द्विधा होऊन गेलें. न्यायमूर्तींच्याहि मनाची अशीच स्थिति झाली होती. ऑपरेशन केलेंच पाहिजे असें ठरल्यावर विषण्ण मनानें न्यायमूर्ती रमाबाईच्या पलंगाजवळ आले व म्हणाले, 'मग ऑपरेशनचें काय करावयाचें ? डॉक्टर अनमानित बोलतात, खात्री देत नाहींत. म्हणून नुसत्या धाडसानें ऑपरेशन करविण्यास परवानगी द्यावयाला मन धजत नाहीं, भीति वाटते, "हे शब्द बोलतांना" रमाबाई 'आठवणीं'त पुढें लिहितात, "आवाज अगदीं हळूं झाला व मन किती तरी आवरून धरलें होतें. पण बोलण्यांत थोडा तरी गहिंवरल्यासारखा आवाज माझ्या कानीं पडल्याबरोबर, याबद्दल मला कांहीं भीति वाटत नाहीं, हें दाखविण्यासाठीं व स्वतःला धीर वाटण्याकरितांच किंचित हंसून पण मोठ्या हुशारीच्या स्वरानें म्हटलें, 'अं-' त्यांत काय आहे ! इतकी भीति कसली वाटते ! क्लोरोफार्म देतील व ऑपरेशन करतील. त्याची इजा मला तर कांहीं समजावयाची नाहीं. येऊन जाऊन स्वतःला पाहवणार नाहीं. तर जरा मन घट्ट करून दिवाणखान्यांतच बसून राहावें म्हणजे झालें. नाहींतर ऑपरेशनच्या खोलींत कोणीच यावयाला नकोच. डॉक्टरणीशिवाय दुसरें कोणीच त्या खोलींत येऊं द्यावयाचें नाहीं, असें मी मिस बेन्सनकडून आज सकाळीं वचन घेतलें आहे. कांहीं झालें तरी ऑपरेशन करावयाचेंच. मला कांहीं भीति वाटत नाहीं. स्वतः उगीच नसती काळजी करूं नये. माझ्या

हातून नेहमींसारखीं चार कामें झालीं तर माझ्या जगण्याचें सार्थक. नाहीं तर श्रीमंतांच्या जनानखान्यांत वस्त्राभरणानें मंडित अशा पांगळ्या बायका कण्हत कुंथत बसलेल्या असतात व आपल्याच सेवेकडे चारदोन माणसें गुंतवितात, तसें वैभव मला नको आहे. त्यापेक्षां मुळींच बरी झालें नाहीं तरी हरकत नाहीं.' तेव्हां म्हटलें, 'असे वेड्यासारखे भलभलते विचार डोक्यांत भरवून घेऊन काय बरें आपल्याला त्रास करून घेत आहेस? आपलाच हट्ट काय चालवावा? दुसऱ्याच्या मनाचा त्यांत थोडातरी विचार करावा. स्वस्थ पडून किंवा एके ठिकाणीं पडून जर आज ऑपरेशन टळत असेल तर बरें नाहीं का? घरांत हिंडून फिरून आपल्या हातानें कामें न झालीं तरी बसल्या बसल्या सर्व व्यवस्था पहातां येईल. शिवाय, लिहिण्या-वाचण्याची करमणूक तुझी तुला आहेच. खुर्चीवर बसून ती दोन माणसांनीं खालीं नेली म्हणजे गाडींतून फिरावयास सुद्धां जातां येईल. तेव्हां मला तर हेंच पसंत आहे. नीट विचार कर म्हणजे तुलाहि मी म्हणतों तेंच खरें वाटेल. उगीच आग्रह धरून आपला जीव धोक्यांत कां घालावा?'

आजहि आदल्या रात्रींसारखीच झोंप आली नाहीं. नुसती या कुशी-वरून त्या कुशीवर चळवळ चालली होती व नेहमींप्रमाणेंच आज जरा जास्त उदासवाणीनें 'राम' 'राम' असा उच्चारलेला शब्द ऐकूं येत होता. तें ऐकून व गेल्या दोनचार दिवसापासून स्वतःच्या मनाची झालेली स्थिति व संध्याकाळचें बोलणें, जें कष्टानें मन आंवरून धरून मोठ्या व तुटक शब्दांनीं चाललें होतें, तें सर्व मला या वेळीं आठवून अगदीं भड-भडून आलें. त्यासरशीं जें रडें आलें तें कांहीं केल्या आवरेना. उद्यां जर मी गेलें तर स्वतःला असह्य दुःख होईल. मन अत्यंत उदास व खिन्न होईल. आपल्या स्वतःच्या कोणत्याच गोष्टी आजपर्यंत स्वतः कधीं पाहिल्या नाहींत. कोणत्या वेळीं काय पाहिजे तें आठवणीनें आजपर्यंत मीच करीत

असें, तें आतां कोण करील! रात्रींचे रात्रीं कांहीं होऊं लागलें तर तें कोणाला कळेल? घरांतील सर्व माणसें काळजीचीं व अगत्याचीं आहेत. पण स्वतःकडून उच्चार होईल तेव्हांना त्यांना कळेल! अशा संकोचवृत्तीनें नित्य किती तरी हाल होतील. एरव्हींपेक्षां जरासें बरें नसलें तरी जेवणखाण, औषधपाणी, अंग व डोकें चेपणें वगैरे उपचार माझ्याशिवाय कोणी केलेले कधीं आवडत नाहींत. मग आतां कसें होईल? आज तीनचार महिने तर स्वतःचें दुखणें चाललें आहे. बाकी, अशावेळीं मी गेलें तर त्यांत काय वाईट आहे! इतकें सुख व वैभव भोगल्याचें सार्थक होईल व धन्य धन्य म्हणतील. हेंच मी परमेश्वराजवळ आजपर्यंत मागत आलें आहेना! संसारांतील मुख्य सुखाचा लाभ जीं अपत्यें तीं आम्हांला मुळींच नाहींत. तरी आम्हीं दोघेंहि त्यानें ठेवलेल्या स्थितींत आनंदानें आहोंत. कधीं उदासीन राहिलों नाहीं किंवा सुस्काराहि टाकला नाहीं. उलट, ती वाण भरून काढण्याचीहि आम्ही तजवीज केली आहे. तेव्हां आतां आमच्या या असलेल्या स्थितींत कांहीं बदल न करतां शेवटीं मलाच देव आधीं नेईल, असाच विश्वास आजपर्यंत मी ठेवीत आलें आहेना? कारण, माझ्यामध्यें कुलीन घराण्याशिवाय स्वतःचा संबंध जुळण्यासारखें रूप, रंग, गुण किंवा विद्या यांपैकींच कांहीच नसून केवळ परमेश्वराच्या कृपाप्रसादानेंच मला ही जन्माची जोड मिळून माझें जीवित धन्य झालें आहे. ही जन्माची जोड तोच कायम राखील, असा मला पूर्ण भरंवसा आहे. असा आपल्याशीं मी विचार करीत असतांना आदले दिवशीं संध्याकाळीं माझ्याशीं बोलतां बोलतां स्वतःच्या तोंडून 'दुसऱ्याच्या मनाचा थोडा तरी विचार ठेवाव.' हें जें वाक्य जपून व हळू उच्चारलें गेलें होतें तरी त्यांतील गहिंवरलेल्या व घोगऱ्या आवाजाची आणि खिन्न झालेल्या चेहऱ्याची मला आठवण होऊन त्या शुद्ध प्रेमाची व माझ्या या चाललेल्या उलट विचाराची मी जेव्हां

तुलना केली, तेव्हां मला अगदीं चमत्कारिक होऊन माझा मला थोडा तिरस्कारहि वाटला. आपल्या मागें स्वतःच्या मनाची होणारी स्थिति मनांत आल्याबरोबर मन अगदीं विव्हळ झालें व वाटलें कीं, आम्हां उभयतां-पैकीं कोणी तरी दुःख सोसलें पाहिजे. अशी जर परमेश्वराची इच्छा असली तर स्वतःकरतां मी कांहींहि सोसावें, पण माझ्याकरितां स्वतःला कांहींहि दुःख होऊं नये. त्या कोंवळ्या मनाला तें अगदीं सहन होणार नाहीं. बायकांचें खरें व्रत म्हटलें म्हणजे आपल्यापासून आपल्या प्रिय पतीला केव्हांहिं व कोणत्याहि बाबतींत दुःख होऊं नये. हीच तिची आमरणात् इच्छा असावी व लहान मोठ्या सर्व गोष्टींत या धोरणानें तिचा प्रयत्न होत असावा. हेंच बायकांचें खरें सौभाग्य व हेंच व्रत. जिला पतीच्या अंतःकरणाची चांगली ओळख झाली आहे व जिला त्या निस्सीम प्रेमाची किंमत कळत आहे तिला आप मेलें जग बुडालें अशा आपलपोट्या विचारानें समाधान कसें वाटावें ! ”

अशा द्विधा मनःस्थितींत शेवटीं रमाबाईनीं ऑपरेशन करून घ्यावयाचा निश्चय केला व सुदैवानें ऑपरेशनांतून त्या सहीसलामत बाहेर पडल्या. रमाबाईच्या या आजाराच्या व ऑपरेशनच्या काळांत न्यायमूर्तींचा ‘ स्पॅझम ’चा विकार थांबला होता. पण पुढें त्यानें डोकें वर केलें. ऑपरेशनच्या टेबलावर, मनाचा धडा करून, मृत्यूशीं झुंजून त्यांतून रमाबाई मोकळ्या होतात न होतात तोंच त्यांना न्यायमूर्तींच्या यमदूतांशीं झगडावें लागलें. रमाबाईनीं हा झगडा सावित्रीप्रमाणें कसोशीनें केला; पण व्यर्थ गेला. दिपवाळीच्या सुटीनंतर न्यायमूर्तींनीं सहा महिन्यांची रजा घेतली ती अखेरचीच ठरली.

# [ ९ ]

## अज्ञातवास

१८७३ सालानें रमाबाईच्या आयुष्याला जसें अभावित वळण लावलें तसेंच १९०१ सालानेंहि त्यांच्या आयुष्याच्या प्रवाहास अगदीं स्वतंत्र अशी दिशा लावली. हिंदूंत दोन जन्म आहेत. बायकांच्या वांटणीला हे दोन जन्म आले आहेत; पण पुरुषांच्या बाबतींत या जन्मांना जें आनंद-दायक स्वरूप असतें तसें स्त्रियांच्या बाबतींत नसते. मुलीचा जन्म हाच मुळीं प्रथम आईबापांच्या हृदयाला जाळीत सुटतो आणि सामान्यतः महाराष्ट्रांत तरी 'दारिका हृदयदारिका'च समजली जाते. विवाहानें दुसरा जन्म प्राप्त होतो; पण तो गृहिणी या सन्मानाच्या पदावर होत नाहीं; पुरुषाच्या आहार-विहाराच्या गरजा कमी खर्चांत भागविणारें एक साधन म्हणून जन्म घ्यावा लागतो. स्त्रियांच्या बाबतींत ही विपरीत स्थिति येथेंच थांबत नाहीं. दोन जन्माप्रमाणें तीन मृत्यू स्त्रियांच्या वांटणीला येत असतात. देव आप-णाला केव्हां घेऊन जाईल याची वाट अनेक स्त्रियां महाराष्ट्रांत पाहात असतातच देवानें त्यांचें गाऱ्हाणें ऐकले नाहीं तरी पुरुष आपल्या परीनें हें गाऱ्हाणें पुरवीत असतात. अकाळीं वैधव्य हा स्त्रियांच्या बाबतींत, संसाराच्या दृष्टीनें मृत्यूच होय. मेलेल्याला मारावें काय इतका चांगुलपणाहि महाराष्ट्रां-तील पुरुषांत आढळून येत नाहीं. अकाळीं वैधव्य स्थितीस पोंचलेल्या आप-ल्या भावजयीस, आईस व बहिणीस सुद्धां पोटगीची मालकीण करून अपमानाच्या खाईंत लोटून दिल्याशिवाय आपलें कर्तव्य पार पडलें असें त्यांना वाटत नाहीं.

रमाबाई जुन्या विचाराच्या घराण्यांतील कोणा पुरुषाच्या पदरीं पडल्या असत्या तर ही अनेक जन्मांचीं व मृत्यूचीं सर्व दुःखें त्यांना 'याच देहीं

याच डोळां ' अनुभवावयास मिळालीं असतीं. हातावर मोजण्यासारखीं कांहीं समंजस कुटुंबें सोडलीं तर महाराष्ट्रांत स्त्रियांच्या बाबतींत अशी विपन्नावस्था रमाबाईंच्या बालपणीं होती व अजूनहि पहावयास सांपडते. या एकंदर परिस्थितीमुळें नव्या सुशिक्षितांचें मन विधवांच्या परिस्थितीकडे ओढलें गेलें. जन्मांच्या दृष्टीनें रमाबाई भाग्यवान होत्या. त्या मुलीच्या जन्माला आल्या तरी आईबापांच्या लाडक्या होत्या; बरें पुढें विवाह झाल्यावर न्यायमूर्ति रानडे यांच्यासारखा उदार, विचारी व प्रेमळ पती लाभल्यामुळें त्यांना त्यांच्यापुरता तरी पृथ्वीवरच स्वर्ग झाला होता. पण या स्वर्गांतून आपणाला केव्हां लोटून देण्यांत येईल याचा नेम नाहीं अशी धास्ती त्यांच्या मनाला जाचीत होती. कारण इतर स्त्रियांच्या वांटणीला येणारा मृत्यु त्यांच्या वांटणीला येऊं नये इतकी तजवीज करण्याइतका दूरदर्शीपणा न्यायमूर्तींत होता तरी—अकाळीं वैधव्य, संसारांतला हा अपमृत्यु, उघड्या डोळ्यांनीं प्राण सोडणें किती कठीण असतें हें कां सांगावयाला पाहिजे !

दिवाळीच्या सुट्टींत न्यायमूर्ति माथेरानास गेले; तेथें ' स्पॅझम 'चा विकार बळावल्यामुळें ऑपरेशनमधून उठून पंधरा दिवसहि झाले नव्हते तरी रमाबाइ तशाच माथेरानला गेल्या. माथेरानच्या हवेमुळें न्यायमूर्तींना तात्पुरतें बरें वाटलें व त्यांनीं लाहोरच्या कॅांग्रेसला जाण्याचा बेत मुक्रर केला. सर्व बांधाबांध झाली. पण लाहोरास जावयास निघण्याच्या आदले दिवशीं रात्रीं ' स्पॅझम 'चा विकार बळावला आणि छातींत कळाहि निघूं लागल्या. यामुळें लाहोरास जाण्याचा बेत रहीत झाला. नाताळची सुट्टी लोणावळ्यास काढून मुंबईस आल्यावर ता. ८ जानेवारी १९०१ रोजीं न्यायमूर्तींनीं सहा महिन्याची रजा मागितली व ती लौकरच मंजूर होऊन आली. रजा मंजूर होऊन येतांच न्यायमूर्तींनीं हायकोर्टाच्या नोकरांना व चोपदारांना हायकोर्टाकडे जाण्यास सांगितलें व मुंबईचा बंगला सोडून देण्याचें ठरविलें.

घर सोडण्यासंबंधाच्या वाटाघाटींत न्यायमूर्ती झटकन् जाण्याबद्दलची निराशा बोलून गेले, ' सहा महिने केव्हांच संपतील आणि एकदां हें घर दुसऱ्यानें घेतलें म्हणजे पुन्हां असें घर मिळण्यास फार पंचाईत पडेल, ' असें रमाबाईंचें म्हणणें पडलें. तेव्हां जरा त्रासूनच न्यायमूर्ति म्हणाले, " मनुष्यानें बोलूं नये म्हणून नेम केला तरी तुम्ही त्रास देऊन बोलावयाला लावतां. समजत असून वेड कां पांघरावें ! मी जें सांगेन तें मुकाट्यानें करावयाचें टाकून उलट कांहीं तरी विचारीत बसतां याचा अर्थ काय ? माझ्या प्रकृतीचें मान तुम्हांला दिसत नाहीं का ? ही रजा संपून मी परत येईन असें तुम्हांला वाटतें काय ?'

जानेवारीची चौदावी तारीख काळजींत गेली. रात्रीं ' स्पॅझम ' रोजच्या पेक्षां जोराची आली व जास्त टिकली. ' प्रत्येक दिवशीं ही वेळ निघून गेली म्हणजे आजचा दिवस पार पडला, असें माझ्या मनांत येऊन मी देवाचे आभार मानी. बाकी जसें स्वतःला हें दुखणें परिणामाचें आहे असें वाटे, तितकेंच उलट मला तसें वाटत नसे. आंतून माझ्या मनाला धास्ती वाटे, तथापि देव आपल्या भक्तांना अत्यंत संकटांत पाडून मग त्या दुर्धर संकटांतून त्यांची सुटका करतो, अशा ज्या त्याच्या सहज लीला आपण नेहमीं वाचतों किंवा ऐकतों, त्यापैकींच ही वेळ नसेल कशावरून ? करमाळ्याच्या भयंकर दुखण्यांतून त्यानें वांचविलें, तो आतां कां उपेक्षा करील ? असें कधीं होणार नाहीं, अशी माझी दृढ समजूत असल्यामुळे असा भयंकर प्रसंग माझ्यावर तो आणणार नाहीं व हें दुखणें बरें होईल,' अशी वेडी आशा रमाबाईंना वाटत होती. पण ता. १५ च्या न्यायमूर्तींच्या बोलण्यानें त्यांना आपल्या आशेचा आधार तुटला असें वाटलें.

त्या दिवशीं जेवतांना रमाबाईंच्या बन्सनीं महाबळेश्वरास जावें असें बोलणें काढलें व तेथें अगदीं विश्रांति घेतली पाहिजे, असें न्यायमूर्तींना

बजावलें. या बजावण्याबद्दल बोलतांना न्यायमूर्ती म्हणाले, " ज्यामध्यें मन रमतें, समाधान पावतें, बारीकसारीक वेदना सहज विसरल्या जातात, त्या संवयीच्या व करमणुकीच्या वाचनासारख्या गोष्टी सोडल्यानें विश्रांति मिळेल काय ? ज्याला उगीच बसण्यांत विश्रांति वाटून सुख लागणार असेल तें त्याचें सुख त्यालाच लखलाभ असो. हातून कोणत्याहि प्रकारचें काम न होतां नुसतें पडून राहून निरर्थक आयुष्य घालविण्याची पाळी आली तर तें आजच संपलें तरी हरकत नाहीं असें मनुष्याला वाटेल." असें म्हणून न्यायमूर्तींनीं एक मोठा सुस्कारा टाकला. न्यायमूर्तींच्या या भाषणानें, विशेषतः शेवटच्या वाक्यानें रमाबाईंचें मन उद्विग्न झालें. त्या 'आठवणीं'त लिहितात, " केवळ स्वतःचें जेवण होत होतें म्हणून मी मन अगदीं आवरून धरून निरुपायानें इतका वेळ तेथें उभी होतें. पण आतां धीर निघेना. मुखशुद्धीचीं फळें व सुपारी जवळ ठेवून मी तशीच वर गेलें. वर जाऊन दाराला आज आंतून कडी लावली व एका पलंगावर पडलें. त्यासरशी मला जी जोरानें उकळी आली ती कांहीं केल्या किती वेळतरी आंवरेना. पुष्कळ वेळानें तो वेग कमी झाला; पण मन अगदीं सैरभैर झालं. काय संकट आहे व मी काय करीत आहे, माझें मलाच समजेनासें झालें. वेळेवारी मी असें काय करीत आहें, असा माझा मलाच राग येऊन मी आपला आपल्याशींच निषेध केला व खालीं निघून गेलें; पण मनाला चैन पडेना. सारखी हुरहूर लागली. उगीचच्या उगीच गळा दाटून येऊन डोळ्याला धारा लागावयाच्या. त्याला कांहीं वेळ किंवा ठिकाण लागत नसे. असें झालें कीं, ती स्थिति आवरतां आवरतां मला पुरेसें होई. घटकेंत आशा व घटकेंत निराशा व तिच्या मागून कुकल्पना यांनीं काहूर करून माझें चित्त अगदीं बावरल्यासारखें करून सोडलें होतें. रोजचीं करावयाचीं तीं सर्व कामें मी हातानें करीं; पण हें केवळ सर्व संवयीनें

होई. मन म्हणून कशांतहि लागत नसे. फार वेळ कोठेंच बसवत नसे. अमळ एकीकडे जाऊन पडेन व मनाला थोडें शांत वाटेल म्हटलें तरी चैन पडत नसे. खालीं बायकांमध्यें जाऊन बसावें तों चुकल्या चुकल्यासारख वाटून वर केव्हां जाईनसें होऊन मी चटकन् उठें व दिवाणखान्यांत जवळ जाऊन बसें, तरी मनाची स्थिति सारखीच. आपल्या मनासारखें जगांत कोणीहि वैरी नसेल! मन चिंती तें वैरी न चिंती असें म्हणतात तें अगद, खरें आहे असें मला क्षणोक्षणीं वाटे. माझ्या दुष्ट मनानें कांहीं वेड्या-वांकड्या कल्पना करूं नयेत म्हणून मी कितीतरी शिकस्त करीत असें. मनांत वाटे कीं, माझें मन उगीच राहात नाहीं, त्याला काय उपाय करूं? कोणाला शरण जाऊं? कोण माझी माऊली होऊन हें संकट निवारण करील? देवा! माझी लाज तुला असूं दे. आजपर्यंत थोडीं कां जीवावरचीं दुखणीं गेलीं? तेव्हां तूंच माझ्या धांवणीला धांवलास व स्वतःचें वेळोंवेळीं रक्षण करून ज्या मला या भाग्याच्या शिखरावर चढ-विलेंस, त्या आज मला तूं त्या शिखरावरून खालीं पायानें लोटून देशील काय? कधीं लोटणार नाहींस असा मला भरंवसा आहे. नारायणा, मला समजूं लागल्यापासून माझ्या सर्व सुखाचा व आनंदाचा ठेवा कायतें एवढेंच ठिकाण आहे हें तूं जाणत आहेस. तें तूंच संभाळ? एवढी मला भिक्षा घाल. यापेक्षां अधिक मोठें सुख मी दुसरें कशांतच मानिलें नाहीं. संसा-रांत मला मुलेंबाळें नाहींत, ही उणीव सुद्धां मला कधीं भासली नाहीं. इतकी मीच या सहवासांत संतुष्ट व गर्क आहे. राजेरजवाडे, संस्थानिक, जहागिरदार यांच्या बायका संतति संपत्तीनें व अधिकार वैभवानें कितीहि थोर असल्या तरी माझ्यापेक्षां त्यांचें सुख अधिक खास नसेल. स्वतःचीं जोड मिळाल्यामुळें मला आज जी धन्यता व जें समाधान होत आहे तिला उपमा नाहीं. देवा, हें सारें देणारा तूंच आहेस व रक्षण करणाराहि तूंच समर्थ आहेस.

ग्रंथ सं... ना.

'हें माझें झालें; पण स्वतःच्या मनांत सुद्धां असेंच कांहीं असेल असें मला आपलें वाटे. सर्व वेळ मनामध्यें दुष्ट सुष्ट कल्पनांचें काहूर माजल्यामुळें माझें मन भेदरल्यासारखें झालें होतें. कदाचित दृष्टादृष्ट झाली तर या मुद्दाम आंवरून धरलेल्या स्वतःच्या मनाचा सुद्धां बांध लागलाच ढांसळेल, खचित राहाणार नाहीं, मग माझी ती कथा काय? असें मला वाटे. भुंग्यानें पोखरून ठेवलेल्या पण वरून अगदीं शाबूत व मजबूत दिसणाऱ्या तुळईसारखी मनाची अवस्था झालेली अशी आम्ही दोघेंहि मोठ्या कष्टानें दिवस काढीत होतों. तरी मी अगदीं वेडी! अजूनहि हें दुखणें बरें होईल अशा आशेच्या नादांतच मी कित्येक तास काढी व तेवढाच वेळ मला सुखाचा वाटे. पण ईश्वरी इच्छा निराळीच होती! तिची कल्पनाहि मला नव्हती! म्हणून अंतःकरण करपून टाकणाऱ्या काळजींतहि ज्या स्थितीला मी सुख म्हणून मानीत होतें तें सुख पुढें पुरतें चोवीस ताससुद्धां टिकलें नाहीं! ज्या देदीप्यमान तेजोमय सौभाग्य सूर्याच्या प्रकाशांत मी मोठ्या भूषणानें व खऱ्या आनंदानें एक सारखी २७ वर्षें वागत होतें, ते प्रत्यक्ष सेवा घेणारे दिव्य सूर्यरूपी पाय मला अंतरल्यामुळें अत्यंत दुःखरूप निबिड अंधारांत चांचपडत राहाण्याचा प्रसंग येऊन पोचला."

प्रखर सूर्य प्रकाशांत पुष्कळ हिंडून आल्यावर घरांत येतांच कांहीं वेळ डोळ्यापुढें अंधारी येते. तशी न्यायमूर्ति रानडे यांच्या मृत्यूनंतर रमाबाईच्या आयुष्यक्रमांत अंधारी उत्पन्न झाली. हा अंधारीचा काल चार वर्षे टिकला. न्यायमूर्तींच्या मृत्यूनंतर रमाबाई मुंबईचें घर मोडून पुण्यास येऊन शुक्रवार पेठेंतील आपल्या वाड्यांत राहूं लागल्या. न्यायमूर्तींनीं मृत्यूपत्र करून सर्वांची नीट व्यवस्था केली होती. न्यायमूर्तींना श्रीपादपंत व व नीळकंठराव असे दोघे सावत्रबंधु होते. नीळकंठराव हे न्यायमूर्तींप्रमाणेंच निपुत्रिक होते. श्रीपादपंतांना उर्फ रमाबाईच्या आवा भावोजींना कायतो एक मुलगा होता

तो म्हणजे नानू. न्यायमूर्तींनीं आपल्या मागें एकंदर स्थावर जंगम मिळून १ लक्ष ९४ हजार रुपयांची इस्टेट ठेवली. यापैकीं श्रीपादपंत व नीळकंठराव यांना प्रत्येकीं पंचवीस पंचवीस हजार रुपये दिले व श्रीपादपंताचा मुलगा नानू यांस दत्तक घ्यावें असें सांगितलें. ४५००० रुपयांचा ट्रस्ट करून त्यांतून त्यांनीं अनेक सार्वजनिक संस्थांना देणग्या दिल्या. या ट्रस्टच्या ट्रस्टींत रमाबाईचें नांव त्यांनीं घालून ठेवलें होतें. रमाबाईंना स्त्रीधन म्हणून त्यांनीं पंधरा हजार रुपयांचे दागिने दिले होते. याशिवाय रोजच्या खर्चासाठीं वीस हजार त्यांच्या स्वाधीन करून त्याचें व्याज रमाबाईनीं घ्यावें असें ठरविलें होतें. याशिवाय लोणावळ्याचें घर तहाहयात रमाबाईनीं वापरावें अशी मृत्युपत्रांत न्यायमूर्तींनीं तरतूद करून ठेवली होती. १९०२ सालीं यथाविधि दत्त विधान होऊन रमाबाईनीं नानूस ( डॉ. नारायणराव रानडे यांना ) दत्तक घेतलें.

रमाबाईच्या माहेरच्या माणसांपैकीं थोरल्या भावाची मुलगी सखू ही रमाबाईच्याकडेच असे. अगदीं धाकटे बंधू बाबासाहेब कुर्लेकर व रमाबाईची आई आधूनमधून रमाबाईच्याकडेच असे. रमाबाईची आई १९०४ सालीं वारली. रमाबाईनीं आपल्या आईसंबंधाची पुढील हकीगत ' आठवणी ' च्या हस्तलिखितांत ' मानसपूजा ' या प्रकरणांत दिली आहे. रमाबाई म्हणतात, " आमच्या आईस कथा व गोष्टी सांगण्याचा नाद शेवटपर्यंत होता. तिच्या फुरसतीच्या वेळीं जेव्हां पहावी तेव्हां या गोष्टी ऐकण्याकरितां सर्व नातवंडें तिच्या भोंवतीं जमत. आमच्या घरीं आई आतां येणार अशी नुसती बातमी कानावर आली कीं, आमच्या सखूला व नानूला आनंद होई. कारण या दोघांना गोष्टी ऐकण्याचा अतिशय नाद व आमच्या आईला गोष्टी सांगण्याचा मुळींच कंटाळा नसे. आमची आई सन १९०४ सालीं वारली. ती शेवटपर्यंत आपलीं सर्व कामें आपल्या हातानें करी. होतां होईल तों ती

आपलें काम आपल्या सुनालेकींना सुद्धां सांगत नसे. आपल्याला दुसऱ्याचें काम करण्याची शक्ति राहिली नाहीं तरी मी माझें काम लोकांवर पडूं देणार नाहीं, असा तिचा निर्धार असे. तो परमेश्वरानें शेवटपर्यंत चालविला. मरणाचे दिवशीं सुद्धां ती उठून प्रातर्विधी उरकून अंग धुतलें, पण उपासानें अगदीं थकलेल्या माणसासारखा तिला थकवा मात्र अधिक वाटूं लागला, म्हणून ती बिछान्यावर जाऊन पडली. दोघे मुलगे, दोघी सुना व नातवंडें जवळ होतीं. त्यांना जवळ बोलावून व सांगावयाचें तें सर्व सांगून मग शिवनामाचा जप करीत व मंत्र म्हणत, दिव्यांतील तेल संपावें तसें आयुष्य संपेपर्यंत स्वस्थ मनानें वेदनारहित पडून होती. तोंडानें नामस्मरण करीत त्याच रात्रीं तिनें देह ठेवला.''

सखू व नानू हा रमाबाईंच्या जीवाला विरंगुळा होता. रमाबाई सखू-संबंधानें ' आठवणी ' च्या अर्पणपत्रिकेंत म्हणतात, " मुलींचें मन जात्याच कोमल. तशांत आम्हीं मुंबईहून पुण्यास आल्यावर तर ती सदोदित मला चिकटून असे व मला काय पाहिजे असेल, कशानें मला हलकें वाटेल या योजनेंत असे पोरवय तरी माझ्या अंतःकरणाला वाव मिळावा म्हणून मला सुखकर अशा आठवणी काढून माझें समाधान व्हावें असा ती प्रयत्न करी. " अशा रीतीनें न्यायमूर्तींच्या सहवासाच्या सुखकर आठवणींत विसावा घेत रमाबाई दिवस कंठत होत्या. अशा स्थितींत त्यांना १९०३ सालीं प्लेग झाला. ऑपरेशन नंतरचें रमाबाईंचें हें दुसरें जिवावरचें दुखणें होतें. या दुखण्यांत रमाबाईंचा अंत झाला असता तर रमाबाईंचें चरित्र कोणी गाइलें नसतें. त्यांचें चरित्र गावयाला लावणाऱ्या गोष्टी यानंतरच त्यांच्या हातून घडून आल्या. त्या घडल्या नसत्या तर अनेक न्यायाधीशांच्या बायका जशा नवऱ्यामागें दिवस काढून एक दिवस देवाघरीं जातात व त्यांच्या मृत्युमुळें त्यांच्या परिवाराखेरीज इतर कोणीहि जसें हळहळत नाहीं तशीच स्थिति,

१९०३ चा प्लेग प्राणहारक ठरता तर, रमाबाईंचीहि झाली असती. पण न्यायमूर्तींनीं रमाबाईंच्या मनांत पेरलेलें समाजसेवेचें बीं फुकट जावें अशी ईश्वराची इच्छा नव्हती. म्हणून त्यानें रमाबाईंना १९०३ च्या प्लेग-मधून वांचविलें. परमेश्वरानें रमाबाईंना त्यांच्या हातून समाजसेवेचें काम करविण्यासाठीं जसें वांचविलें तसें त्यांना कार्याला प्रवृत्त करण्याची बुद्धि डॉ. भांडारकर प्रभृति मंडळीच्या मनांत उत्पन्न केली. भगवन्नामचिंतनाची गोडी लागल्यावर संसाराकडे परत वळून पाहण्याची जशी इच्छा भक्ताला होत नाहीं तशी पतिभक्तीमुळें रमाबाईंची मनःस्थिति झाली होती. पण खरी भक्ति म्हणजे आपल्या भक्तीचा विषय झालेल्यानें दाखविलेल्या मार्गानें जाणें अशी जाणीव विचारांतीं रमाबाईंना पटल्यामुळें, १९०४ च्या नाताळच्या सुट्टींत भरलेल्या पहिल्या महिला परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल करून अज्ञातवासांतून त्या बाहेर आल्या. यासंबंधानें आपल्या भाषणाच्या सुरवातीस त्या म्हणतात, " आज मी आपल्यामध्यें सुमारें चार वर्षांनीं पुनः उभी आहें. त्या पूर्वीच्या स्थितींत व आजच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर आहे व त्यामुळें माझ्या मनाची स्थिति बदलून आज ही मुंबई, हें ठिकाण आणि आपण माझ्या सर्व प्रेमळ मैत्रिणी मला अगदीं नव्या, वेगळ्या अशा दिसत आहां. ज्या श्रेष्ठ, प्रेमळ व पवित्र सहवासांत माझीं २७ वर्षें सार्थकीं लागलीं त्याचा परिणाम म्हणजे मी माझ्या मनाच्या स्थितीला कुरवाळीत बसावें असा होऊं नये, हें खरें आहे. देवानें ठेविलें आहे त्या स्थितींत त्याच पायांचें चिंतन करून विवेकानें दिवस काढावेत व आपल्या कर्तव्यास सदा तत्पर असावें, असाच तो परिणाम व्हावयास पाहिजे होता. पण मोठ्या दुःखानें मला म्हणावें लागतें कीं, माझ्यांत तेवढें सामर्थ्य नाहीं. नेहमींचें म्हणणें तर असें असे कीं, " सुख दुःख देहाचे भोग किंवा मनाचे विकार आहेत; त्यांना महत्व देऊं नये, व प्रत्येकानें आपल्या कर्तव्याविषयीं अत्यंत दक्ष असावें, तरच मनुष्यजन्माचें सार्थक आहे."

व ह्या म्हणण्या प्रमाणेंच नित्याची वागणूक असे. रात्रींच्या रात्रीं झोंपेशिवाय गेलेल्या असोत किंवा छातींत तीव्र वेदना झालेल्या असोत, कामांत मन गुंतलें असतांना त्यांचा पूर्ण विसर पडत असे. आपण देही आहोंत, देहासंबंधीं विकार आपणाला होत आहेत, यांचें भानहि नसे. अशी आपल्या कर्तव्याला चिकटून राहाण्याची व उद्योगाची अत्यंत आवड असे. अशा त्या सहवासांतील मी असूनही माझ्यामध्यें त्या सामर्थ्याचा त्या दैवी गुणाचा अल्पहि अंश नाहीं हें मला मोठ्या खेदानें कबूल केलें पाहिजे. नाहींतर ज्या थोर कार्याकडे गेलीं अठरा वर्षें तन मन धन अर्पण करून अव्याहत श्रम केले त्या अत्यंत आवडीच्या गोष्टीमध्यें माझ्याकडूनहि थोडासा हातभार लावण्याची संधि आली असतां, मला आपल्या वतीनें आमंत्रण किंवा गुरुवर्य भांडारकरांना आग्रह करण्याचें श्रम कां पडावे बरें ? कसेंहि असो. मी आज आपणांपुढें उभी आहें व आज मला जें अध्यक्षस्थान आपण दिलें आहे तें मी कांहीं शिकलीसवरलेली बाई म्हणून मला हें उच्च स्थान आपण दिलें आहे असें नाहीं. आपल्यामध्यें देवाच्या पायावर जी फुलांची माळ वाहिलेली असते तिच्या निर्माल्य स्थितींतहि एक प्रकारचा आदर आपणास वाटत असतो व त्या वाळलेल्या माळेच्या ठिकाणीं आपला एक प्रकारचा भाव असतो व अशा बुद्धीनेंच आज जो आपण मला मान दिला आहे त्याचें मला विशेष भूषण वाटतें व त्याबद्दल मी आपली फार आभारी आहें.

रमाबाईनीं स्वतःला निर्माल्याची उपमा घेतली; पण हा निर्माल्य कांहीं साधा नव्हता. वाळलेल्या बकुलीच्या माळेसारखा हा निर्माल्य होता. यांत रमाबाईनीं म्हटल्याप्रमाणें न्यायमूर्तींच्या सहवासानें उत्पन्न होणारा आदरभाव होताच; पण अंगचेहि गुण होते. यामुळें वैजयंतीनें जशी विष्णूला शोभा येते तशी रमाबाईच्या पुढील चरित्रानें ‘ माधवा ’ च्या चरित्रासहि अधिक शोभा आणली आहे.

---

[ १० ]

## सहधर्मचारिणी

रमाबाईंच्या आयुष्यांत १९०४ ते १९२४ हीं वीस वर्षें महत्वाचीं आहेत. हा वीस वर्षांचा काळ त्यांनीं पुण्यांत काढला. १८९३ मध्यें न्यायमूर्ती रानडे यांची पत्नी म्हणून मुंबईत पाय ठेवला त्या वेळचें पुणें आणि १९०४ सालीं न्यायमूर्तींची सहधर्मचारिणी या नात्यानें महिला परिषदेच्या अध्यक्षस्थानावर अरुढ झाल्या त्या वेळेचे पुणें यांत फार अंतर पडलें होतें. या तीस वर्षांच्या काळांत मुंबईप्रमाणें पुणें जरी नव्या विचारांचें माहेर घर बनलें नाहीं तरी पुण्यासहि नव्या विचारांना लोकांच्या हृदयांत स्थान मिळालें होतें. आहे ही समाजाची स्थिति नको या बाबतींत सर्वांचें एकमत झालें होतें व नव्या विचाराच्या राहणीकडे इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा ओढा दिसून येऊं लागला होता. प. वा. हरिभाऊ यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो' या कादंबरीनें बालविधवांच्या दुःस्थितीकडे महाराष्ट्रांतील आबालवृद्धांचें लक्ष वेधून घेतलें होतें. प्रि. आगारकरांच्या तळमळीच्या लिहिण्यानें जुन्या लोकांतील सुधारणा न करण्याची प्रवृत्ति पार लयाला गेली होती. 'मनोरंजनां'तील गोष्टींनीं व लेखांनीं नव्या राहणीची आवड लोकांत उत्पन्न करण्याचें काम बरेंच पार पडलें होतें. विधवांची दुःस्थती सुधारली पाहिजे व त्यांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविलें पाहिजे ह्या गोष्टीस नव्या व जुन्या विचारांच्या मंडळीची संमति व सहानुभूति मिळून प्रो. कर्वे यांना हिंगण्यास अनाथ बालिकाश्रमचा व्याप करतां येऊं लागला होता. नव्या पिढींतील जुन्या मताच्या लोकांत जशी वरील प्रकारची विचारक्रांति होत होती त्याप्रमाणेंच सुधारणेच्या प्रमुख पुरस्कर्त्यांच्या विचारांनाहि खोलपणा येऊं लागला होता. १८८७ मध्यें सामा-

जिक परिषदेची कल्पना मांडतांना न्यायमूर्ती रानडे यांनीं जितका खोल आणि दूरवर विचार केला होता तितका त्यांच्या सहकाऱ्यांनींहि केला नव्हता. न्या. चंदावरकर यांनीं अनेक वर्षें सामाजिक परिषदेच्या कर्णधाराचें काम केलें आहे. त्यांचे लेख व भाषणें वाचतांना सुधारकांच्या विचारी मंडळात कशी विचारक्रांति होत होती याचें चित्र पाहावयाला सांपडतें. नव्या विचाराचे लोक उर्फ पुनर्विवाह पक्ष, जुन्याविचाराचे लोक उर्फ कायद्यानें सुधारणा नको म्हणणारे असे दोन पक्ष स्पष्ट स्वरूपांत या तीस वर्षांत परिणत दशेस आले होते. न्यायमूर्ती रानडे व न्यायमूर्ती चंदावरकर हे पुनर्विवाह पक्षांतीलच होते; पण त्यांचा सामाजिक व धार्मिक बाबतींत थोडा निराळा पंथ होता. न्या. रानडे हे न्या. तेलंग यांच्या सांप्रदायांतील होते. कै. हरिभाऊ आपटे हे आपणाला न्यायमूर्तींच्या सांप्रदायांतील म्हणवीत असत. या सांप्रदायाला चांगलें नांव असें रूढ झालेलें नाहीं. याला कोणी लघुतम प्रतिकाराचा पक्ष असें म्हणतात. कै. हरिभाऊ यांनीं सुधारणा करतांना आपलेपणाची भावना पाहिजे असें प्रतिपादन केलें आहे. जुन्या लोकांना शक्य तितकें कमी दुखविणें व आपलेपणाची भावना ठेवणें निराळें नाहीं; पण ही आपलेपणाची भावना उत्पन्न होण्यास जुन्या आचाराबद्दल नसला तरी विचाराबद्दल अभिमान वाटला पाहिजे. हा अभिमान न्या. रानडे यांच्यांत होता, हरिभाऊ आपटे यांच्यामध्यें होता व न्या. चंदावरकर यांच्यामध्येंहि दिसून येतो. न्या. चंदावरकर यांनीं सामाजिक परिषदेच्या सुरवातीच्या प्रत्येक भाषणांत पुनर्विवाहाचा प्रश्न हा बालविधवांपुरताच आहे असें प्रतिपादन केलें आहे. सर्व सुधारकांना तसें वाटलें असतें तर हा वाद १८७० सालींच मिटला असता. न्या. चंदावरकर यांच्या १९०४ व १९०५ सालच्या सामाजिक परिषदेच्या सुरवातीच्या भाषणांत सुधारणेच्या मूळ तत्त्वांची छाननी करण्याची प्रवृत्ति दिसून येते. १९०५ च्या भाषणांत त्यांनीं सनातन तत्त्वांवर ऊर्फ धर्मावर जोर दिला असून

३२९ १०१

सुधारणा हिंदूंच्या सनातन तत्त्वांना धरून झाली पाहिजे असें प्रतिपादन केलें आहे. हिंदु धर्मातील हीं सनातन तत्त्वें धार्मिक बाबतींतहि न्या. रानडे यांना मान्य होतीं. हें विवेचन लक्षांत घेऊन १९०४ सालांतील आपल्या आचारविचारांत सुधारणा पाहिजे म्हणणाऱ्या मंडळींत तीन पक्ष उत्पन्न झाले होते असें दिसून येईल. सुधारक, सनातन धर्मवादी व राष्ट्रीय अशीं आपल्या सोयीकरितां या तीन पक्षांना नांवें देण्यास हरकत नाहीं. सुधारकांचा इंग्रजी आचार-विचारांवर भर होता. त्यांना घरच्या रहाणींत किंवा प्रार्थनासमाजांत इंग्रजी संस्कृतींतील जोमदारपणा पाहिजे होता. जुन्या विचारांना घट्ट धरून बसून काळानुरूप आचारांत बदल होतील ते पत्करावे असें राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें होतें. सनातन धर्मवाद्यांना जुन्या विचारांना चिकटून राहण्याची आवश्यकता पटत होती; पण त्याबरोबरच काळानुरूप आचारांत बदल करण्याची आपण होऊन खटपट केली पाहिजे असें त्यांचें मत होतें. सुधारणा वाऱ्यावर सोडून चालणार नाहींत; आचार बदलल्याशिवाय राहाणार नाहींत तर त्यांना इष्ट दिशा लावण्याची खबरदारी घेतली पाहिजे असें सनातन धर्मवाद्यांचें म्हणणें होतें व या दृष्टीनें हिंदुस्थानांत होऊं पाहाणाऱ्या आचारक्रांतीला व विचारक्रांतीला इष्ट वळण देण्यासाठीं १८८७ सालीं न्यायमूर्ती रानडे यांनीं सामाजिक परिषदेची स्थापना केली.

१८८७ सालीं न्यायमूर्ती रानडे यांनीं समाजाच्या आचारक्रांतीला आणि विचारक्रांतीला इष्ट वळण लावण्यांचे जें काम हातीं घेतलें आणि जें काम त्यांनीं आमरण तनमनधनें करून अव्याहतपणें चालविलें तें कार्य पुढें चालविण्याची जबाबदारी न्यायमूर्तींची सहधर्मचारिणी या नात्यानें आपल्यावर आहे असें रमाबाईंनीं महिला परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणाच्या सुरवातीसच कबूल केलें आहे. ही जाणीव ठेवून त्यांनीं १९०४ ते १९२४ पर्यंत निरलसपणें काम केलें यांतच त्यांचें सहधर्मचारित्व दिसून

येतें. आपल्याकडे सर्व तऱ्हेच्याच विचारांना ग्लानि आली आहे. गृहिणी, माता, सहधर्मचारिणी या शब्दांनीं व्यक्त होणारे स्त्रियांचे अधिकार आपल्या मनांतहि उभे राहात नाहींत व लग्नाची स्त्री म्हणजे पायांतली वहाण एवढीच कल्पना डोक्यांत खिळून राहिली. तेव्हां एकाची वहाण दुसऱ्याच्या पायाला येत नाहीं किंवा ती जशी त्याज्य समजली जाते इतक्या हलकट नजरेनें बायकांकडे पाहण्याइतका चांगल्या विचारांचा अभाव महाराष्ट्रांत दृष्टीस पडतो. सहधर्मचारिणी या एका शब्दांत हिंदूंच्या विवाहाबद्दलची संपूर्ण कल्पना सामावली आहे. या शब्दानें नवराबायकोचें बरोबरीचें नातें व्यक्त होतें; दोघांच्या आवडीनिवडी एक असल्या पाहिजेत. ह्यावर कटाक्ष दिसून येतो आणि नवऱ्याच्या पाठीमागेंहि तिला सहधर्मानें वागतां यावें असा तिचा घरांत अधिकार असला पाहिजे, हा अर्थहि ह्या एकाच शब्दानें व्यक्त होतो. या तिन्ही बाबतींत महाराष्ट्रांतील स्त्रियांची वंचना करण्यांत येत आहे. ही वंचना न्या. रानडे यांच्याशीं रमाबाईंचा लग्नसंबंध जुळून आला नसता तर रमाबाईंच्याहि वांट्यास आली असती. न्या. चंदावरकर यांनीं १९०१ च्या सामाजिक परिषदेच्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें न्या. रानडे यांनीं कोणत्या सुधारणा व्हावयाला पाहिजेत हें आपल्या आचरणानें दाखविलें आहे. त्यांनीं आपली जबाबदारी ओळखून चिकाटीनें आणि प्रेमळपणानें रमाबाईंना सहधर्मचारिणीच्या पदाला योग्य केलें व त्यांना हा धर्म आपल्या मागेंहि अविच्छिन्नपणें पाळतां येईल अशी तरतूद करून ठेविली. आतां कांहीं गुण सोन्याचा व कांहीं सोनाराचा या म्हणीप्रमाणें रमाबाई यांच्या अंगांतहि गुण होते म्हणूनच त्या खऱ्याखुऱ्या सहधर्मचारिणी झाल्या हें कांहीं खोटें नाहीं. न्या. रानडे यांनीं त्यांना पोटापाण्याची ददात ठेविली नव्हती. रमाबाईंनीं जर हरीहरी म्हणत दिवस कंठावयाचें ठरविलें असतें तर त्यांना कोण नको म्हणणार होतें; आणि त्यांनीं तसें केलें असतें म्हणून त्यांना कोणी वाईटहि म्हटलें नसतें. हें वागणें

सामान्य स्त्रीला शोभण्यासारखें झालें असतें. सामान्य स्त्रीपेक्षां त्यांच्यांत कांहीं वरचढ गुण होते म्हणूनच त्यांनीं घरचीं बोलणीं व जाच सोसून शिक्षण संपादन केलें व पुढें वैधव्यस्थितीनें खचून न जातां समाजसेवेला तनमनधनेंकरून वाहून घेतलें.

विधवेनें आपण कोणाची बायको होतों हें समजून वागलें पाहिजे असें रमाबाईचें म्हणणें असे व स्वतः त्यांची तशी वागणूक होती. न्यायमूर्ति रानडे यांच्या सहवासांत आपण सत्तावीस वर्षें फुकट घालविलीं नाहींत असें त्यांनीं आपल्या वीस वर्षांच्या चारित्रानें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें आहे. सहधर्मचारिणीत्वाची जबाबदारी अमुकच एका पद्धतीनें पाळली पाहिजे असें नाहीं. समाजसेवा केली तर सहधर्मचारिणीत्वाची जबाबदारी पाळली, नाहीं तर नाहीं, असा अर्थ करणें बरोबर नाहीं. सीता द्रौपदी व दमयंती ह्या जुन्या स्त्रिया घेतल्या किंवा जिजाबाई, अहिल्याबाई, व झांशीच्या लक्ष्मीबाई या अलिकडच्या स्त्रिया घेतल्या तर या सर्वाहिजणी आपल्या परीनें आदर्शभूत सहधर्मचारिणी होत्या असें दिसून येईल. १४ वर्षांच्या वनवासानंतर राज्य प्राप्त होऊन सुखाचा संसार व्हावयाचा तोंच प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन रामचंद्रानें सीतेला टाकावयाचें ठरविल्यावर रामाचा हेतू लक्षांत घेऊन सीतेनें नवा वनवास शांतपणें सोसला. द्रौपदीनें व दमयंतीनें आपल्या नवऱ्याबरोबर आलेलीं वनवासाचीं दुःखें आनंदानें सहन केलीं. जिजाबाईनें आपल्या आचरणानें वीरमाता हें नांव मिळविलें आहे. अहिल्याबाई व लक्ष्मीबाई यांनीं आपल्या वर्तनानें वीरपत्नी हें नांव सार्थ केलें आहे. सर्व समाजाला आपल्या आचरणानें उदाहरण घालून देण्याचा अधिकार राजाचा आहे व याच दृष्टीनें आदर्शभूत चरित्रें म्हटलीं म्हणजे आपल्याकडे राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचीच समजलीं जातात. राजघराण्याचा हा मान हल्लींच्या काळांत मध्यम वर्गांतील कर्त्या घराण्याकडे आला आहे. मध्यम वर्गांतील कर्त्या स्त्रीपुरुषांचीं चरित्रें व

सुखदुःखें लोकांना हल्लीं आपलीशीं वाटतात आणि त्यामुळें सामाजिक नाटकें, सामाजिक चरित्रें व सामाजिक कादंबऱ्या याकडे लोकांचा ओढा अधिक दिसून येतो. या सामाजिक काळांत समाजसेवा हेंच कर्तृत्वाचें लक्षण समजलें जावें ह्यांत आश्चर्य नाहीं.

हिंदुस्थानांत राणीचें राज्य सुरू झाल्यावर सुशिक्षितांचें लक्ष यामुळें साहजिक समाजसेवा व सुधारणा याकडे वळलें. आपल्या समाजांत सामाजिक असा भाग नव्हता. प्रत्येक वर्णानें चार आश्रमांना धरून आपला धर्म पाळावा व धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावे अशी हिंदु समाजाची मूळभूत रचना आहे. पण इंग्रजी सुरू झाल्यापासून ही जुनी रचना व जुनी भाषापद्धति बदलून लोकांच्या कर्तव्याचे सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक असे चार भाग पडले आहेत व या दृष्टीनेंच इंग्रजी सुरू झाल्यापासून हिंदुस्थानांतील अनेक चळवळींना वळण मिळत आहे. नवीन तऱ्हेच्या या चारी चळवळींना चालन देण्याचें श्रेय न्यायमूर्ती रानडे यांना लाभलें आहे. संसारसुखाचा होण्यास समाजांतील अनिष्ट चाली दूर झाल्या पाहिजेत, राजकीय हक्क प्राप्त झाले पाहिजेत, आर्थिक धोरणें बदललीं पाहिजेत आणि धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झालें पाहिजे अशी नवी विचारसरणी न्या. रानडे यांनीं प्रवर्तित केली. संसाराचा आधार राजसत्ता असल्यामुळें ही राजसत्ता स्वाधीन असल्याशिवाय या सर्व चळवळी फलद्रूप होणार नाहींत; तेव्हां राजसत्ता लोकांच्या हातीं आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत अशी विचारसरणी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं निबंधमालेतून अस्फुटपणें मांडली तीच लोकमान्यांनीं केसरींतून जोरानें प्रतिपादन केली. १९०४ च्या सुमारास या विचारसरणीनें महाराष्ट्रांत तर आपली छाप पाडली होतीच; पण बंगाल प्रांतानेंहि या विचारसरणीचा अंगिकार केला होता. जुन्या सुशिक्षितांनीं सामाजिक व धार्मिक बाबतींत जशी आस्थेनें खटपट केली तशी आतां नवीन सुशिक्षितांनी पिढी करीत नाहीं अशी न्या.

चंदावरकर यांनीं पारशी समाजासंबंधानें लिहितांना तक्रार केली आहे. राजसत्तेकडे महाराष्ट्रांतलि लोकांचें लक्ष जोरानें ओढलें जात होतें, अशा काळीं रमाबाईनीं आपल्या कार्यास सुरवात केली.

हें कार्य कोणत्या पद्धतीनें करावयाला पाहिजे या संबंधाची आपली कल्पना रमाबाईनीं महिला परिषदेच्या व्यासपीठावरून भाषण करतांना पुढील प्रमाणें दिली आहे, " स्त्रियांनीं सार्वजनिक हिताचीं व परोपकाराचीं कोणतीं कामें अंगावर घेऊन चालवावीं व आपलें आयुष्य अधिक उपयोगी करावें या संबंधानें दोन गोष्टी आपणापुढें मांडाव्या, अशा मला वाटत आहेत व या विषयाचें यथार्थ ज्ञान-स्वरूप ध्यानांत येण्याकरितां आपल्यांतील जुन्या धरंदाज बायका कोणतीं कामें हातीं घेत असत व आज आपली परिस्थिति कशी बदलली आहे, आपल्या सदसद्विवेकशक्तीला कोणतीं नवीं दुःखें जाणवूं लागलीं आहेत, ह्या दोहोंकडे आपण दृष्टी दिली पाहिजे. जुन्या चालीच्या मुखवस्तु बायकांचा आयुष्यक्रम कसा असे या विषयीं आपल्यापैकीं बायकांना ऐकून तरी बरीच माहिती असेल व आपल्यापुढें असल्या गोष्टी पुष्कळ उभ्या रहात असतील. परंतु मला या वेळीं ज्या साध्वीचें नांव आठवतें आहे त्या बाई म्हणजे इचलकरंजीच्या ' माईसाहेब ' ह्या होत. या बाई सध्यांच्या त्या संस्थानाच्या अधिपतीच्या निपणजी होत. त्या मोठ्या सच्छील व धार्मिक होत्या. त्यांचा नित्यक्रम म्हणजे त्या मोठ्या पहांटेस उठून पंचगंगेवर स्नानास जात. जातेवेळीं वाटेवर मुद्दाम मेणा थांबवून आपल्या गांवांतील गोरगरीबांच्या घरीं जाऊन तेथें कोणी आजारी व बाळंतीण असतील त्यांना स्वतः पहात व समाचार घेत. कोणत्याहि जातीची बाई अडली आहे, अशी बातमी कानावर पडतांच जेवित असल्या तरी तशा उठून मेण्यांत बसून तिच्या घरीं जाऊन ती नीच मानलेल्या जातीची असली तरी तिला शिवून तिची सुटका करून परत येत असत. स्नान करून परत वाड्यांत आल्यावर सकाळीं पाहिलेल्या आजारी बाळंतिणी वगैरे मंडळीला औषधपाणी व पथ्याचें पाठ-

वीत व नंतर पूजेला बसत. पूजा झाल्यावर देवळांत, धर्मशाळेंत कोणी पांथस्थ, गरीब, दुबळे, निराश्रित उतरले आहेत कीं काय याचा शोध आणवून, असल्यास त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था सांगून मग आपण जेवावयास बसत. दुपारीं पोथ्या, पुराणें वाचावीं व बायकांना समजावून सांगावीं, असा त्यांचा नित्यक्रम असे. अशा प्रकारचे सत्कर्मांत व परोपकारांत आयुष्य घालविणाऱ्या स्त्रिया संस्थानिकांत किंवा श्रीमंत वर्गांतच सांपडत असें नाहीं. मध्यम स्थितींतील बायकांतहि अशीच उदारवृत्ति असे.

"पण अलिकडे चाळीस वर्षांत असलें कर्तृत्व दिसून येत नाहीं. कारण काय असेल तें असो ! खरें पहाता 'जे कां रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले' ही वृत्ति क्वचित क्वचित अत्यंत थोर पुरुषांत दिसून येते; तरी वास्तविकपणें ती स्त्री-स्वभावाचा धर्म आहे. दुसऱ्याचें दुःख पाहून कळवळा उत्पन्न होणें, मनाला तळमळ लागून रहाणें, व त्याचें निवारण शक्त्यनुसार करण्यास झटणें, या गोष्टी पुरुषापेक्षां स्त्रीवर्गांतच अधिक दिसून येतात. स्त्रीस्वभावाचा तो विशेष आहे. तो थोडाहि मावळूं देणें योग्य नव्हे. आजपर्यंत आपण हिंदुस्थानांतील स्त्रियांनीं जी आध्यात्मिक उन्नति संपादन केली आहे ती तशीच कायम राखणें, तिच्यांत लवलेश कमीपणा येऊं न देणें हें तर आपलें जीवन आहे. पण पूर्वीची थोरवी राखून, किंबहुना ती राखण्याचें सामर्थ्य येण्याकरितां आज आपण जीं नवीं नवीं कामें घेतलीं पाहिजेत तीं कोणतीं यांचा थोडा निर्देश करतें.

"त्यापैकीं एक काम म्हणजे गांवांतील चार पोक्त बायकांनीं महिन्यांतून एकदां दोनदां आपल्या सवडीप्रमाणें इस्पितळांत जाऊन तेथें आजारी असलेल्या मुलांचा व बायकांचा समाचार घ्यावा, त्यांना कांहीं उणीवा असल्यास त्यांची दाद लावून ती दूर करावी व कांहीं अव्यवस्था असल्यास तीं आपल्या सौजन्यानें मोडण्याचा प्रयत्न करावा हें होय. आतां मी वर सांगितलेल्या धार्मिक बाईच्या उदाहरणावरून आज जी ही गोष्ट आपण करावी

म्हणतों ती कांहीं नवीन करणार आहों असें नाहीं. आपल्या जुन्या चालीपैकींच ही एक जरा निराळ्या रूपानें सुरू करावयाची आहे इतकेंच. दुसरें काम म्हणजे मुलींच्या शाळेची देखरेख हें होय. आतांशा आपणास मुलींच्या शाळा दर शहरीं व खेड्यापाड्यांतून स्थापन व्हाव्यात असें वाटूं लागलें आहे. पण अधिक शाळा काढावयाच्या तर त्याबरोबर आपणावर जी जबाबदारी येते ती आपण कितपत बजावतों याचा विचार आपण करावयास नको काय? आपण महिना पंधरा दिवसांनीं आपल्या मुलींच्या शाळांत जाऊन, तेथील शिकविण्याची व इतर व्यवस्था कशी काय आहे, लहान मुलींच्या मर्यादेकडे व रीतीभातीकडे शिक्षकिणीकडून कितपत लक्ष दिलें जातें, त्यांची पाणी पिण्याची, व अडोशाची वगैरे सोय काय आहे, जागा कोंदट व ओली नाहींना? मुलींनां खेळण्यासवरण्यांस आवार मिळण्याजोगें आहे काय वगैरे स्वतः पाहून योग्य वाटतील त्या वेळोवेळीं सूचना देणें हें काम आपण केलें पाहिजे. मुली अल्पवयांत सासरीं जाऊं लागतात हें खरें आहे. पण आपल्या हाताखालीं त्याऐवजीं सुना तर येतात ना? त्यांचें जर शाळेंत जावयाचें वय असेल तर त्यांना शाळेंत पाठविण्याची आपण हयगय करूं नये. पूर्वीच्या व हल्लींच्या काळांत अंतर पडलें आहे.

पांचपन्नास वर्षांपूर्वींच्या काळांत शास्त्री, वैदिक, मुत्सद्दी वगैरे लोक सोडले म्हणजे बाकी राहिलेल्या पुरुष वर्गाची व स्त्रियांची ज्ञानाच्या बाबतींत साधारण बरोबरीच असे. त्यांचे विचार व कल्पना सारख्याच असत. पण हल्लीं तसें नाहीं. आपणास आपले मुलगे व जांवई शिकलेले मोठमोठ्या परीक्षा पास झालेले व नांवाजलेले असावेत असें वाटतें. या पाश्चात्य विद्येमुळें पृथ्वीवरील मोठमोठ्या राष्ट्रांकडे, आपल्या इतर देशांच्या इतिहासांकडे, नवनव्या निघालेल्या शास्त्रांतील शोधाकडे पाहाण्याची त्यांची प्रवृत्ति स्वाभाविकच होते. व आपल्या भावी स्थितीबद्दल नवेनवे विचार व

संकल्प त्यांच्या मनामध्यें उत्पन्न होतात. अशा त्या कल्पनेशीं व विचाराशीं जिचे विचार जुळतात अशी बायको असली म्हणजे ज्या गोष्टींवर तो विचार करील त्या तिला समजून दोघांचाहि आनंद दुणावेल. याला उदाहरण-साधारण असें पाहा कीं, आपण डोंगरावर अगर दुसरे कोठें फिरावयाला गेलो, तेथें कांहीं रमणीय अगर आश्चर्य वाटण्याजोगें पाहिलें तर तें कोणा जवळ सांगितल्याशिवाय आपल्याला राहवत नाहीं. ज्याला आपण सांगतों त्यास तें चांगलें समजलें असें आपल्याला वाटलें तर आपला आनंद खचित दुणावतो. पण आपण काय म्हणतों तें जर दुसऱ्यास कळलें नाहीं असें आपणास दिसून आलें, तर आपण अगदीं निराश होतों व हिरमोड होतो. हा साधारण सर्वांचा अनुभव आहेच. अशा घटकाभर सहवास झालेल्या माणसांस सुद्धां आपले विचार व कल्पना कळाव्या असें आपणास वाटतें व त्याबरोबर आपल्या मनावर बरा किंवा वाईट परिणाम होतो. तर जिच्या-बरोबर ही संसारयात्रा पार पाडावयाची आहे, जिच्यावर आपलें व आपल्या पुढील पिढीचें सुख व लौकिक अवलंबून आहे अशी स्त्री आपल्या अनुरूप असावी, असें आपल्या प्रत्येक शिकलेल्या मुलांस वाटणें साहजिक आहे; पण तसें नसलें म्हणजे त्यांचीं मनें लागावीं तितकीं घरांत लागत नाहींत. ते उदासीन असतात आणि बायकांबद्दल व आईबद्दलहि त्यांना वाटावा तितका आदर वाटेनासा होतो, अशी सध्यांची स्थिति आढळते. हा प्रकार अनिष्ट आहे आणि तो काढून टाकणें सर्वथैव अगत्याचें आहे. तर आप-ल्यांतील पोक्त बायांनीं पुढाकार घेऊन फुरसतीच्या दुपारच्या वेळीं ही उणीव अंशतः कमी करण्याकरितां ' गृहशिक्षण ' वर्ग सुरू करावे हें अग-त्याचें आहे. ''

इस्पितळें किंवा शाळा पाहण्यास जाणें किंवा गृहशिक्षणाची योजना करणें याहूनहि अधिक महत्वाचीं कर्तव्यें पोरकीं मुलें व अनाथ स्त्रिया यांच्या-संबंधाचीं आहेत असें रमाबाईनीं आपल्या भाषणांत म्हटलें असून हीं कामें

इंग्लंडांतील ' सिस्टर्स ' ज्या तऱ्हेनें करतात तशीं करावींत अशी त्यांनीं सूचना केली आहे. वर उद्धृत केलेल्या भागांत प्रतिपादन केल्या-प्रमाणें १९०२ सालींच पुण्यांतील चार पोक्त बायकांना बोलावून ' गृह-शिक्षणा ' च्या कार्यास सुरवात केली होती; पण व्यापक कार्यास मलबारी शेटजींच्या प्रोत्साहनानें सुरवात झाली. रमाबाईंनीं आपल्या भाषणांत उल्लेख केलेल्या धोरणानें कार्य करण्यासाठीं मलबारी शेटजींनीं मुंबईस ' सेवासदन ' नांवाची संस्था १९०८ सालीं उघडली व तिचें अध्यक्षस्थान स्वीकार-ण्याची त्यांची विनंति रमाबाईंनीं मान्य केली. त्यानंतर पुण्यास मुंबईच्या ' सेवासदना ' ची एक शाखा काढावी अशी दयाराम गिडुमल यांनीं सूचना केली. या सूचनेचा विचार होऊन मुंबईच्या ' सेवासदना ' च्या धर्तीवर कितपत काम करतां येईल, याचा अदमास घेण्याकरितां रमाबाईंनीं १९०२ मध्यें स्थापलेल्या हिंदू लेडीज सोशल क्लबानें ' हें कार्य सहा महिने करून पहावें ' असें ठरलें. ह्या गोष्टी ठरविण्याच्या बाबतींत रमाबाईंच्या बरोबर ' सर्वंट ऑफ इंडिया ' चे सिनियर मेंबर गोपाळराव देवधर यांनीं पुढाकार घेतला. ते व रमाबाई मुंबईस जाऊन दयाराम गिडुमल वगैरे मंडळीजवळ त्यांनीं वाटाघाट केली व प्रथम ' हिंदुलेडीज सोशल क्लबा 'नें हें कार्य हातीं घ्यावें असें ठरविण्यांत आलें. प्रयोगाचे सहा महिने यशस्वी रीतीनें पार पड-ल्यावर ता. २ आक्टोबर १९०९ रोजीं पुण्यास रमाबाईंच्या वाड्यांत सेवा-सदनाची स्थापना करण्यांत आली व नंतर यांतच ' हिंदू लेडीज सोशल क्लब ' अंतर्धान पावला.

ता. ७ मार्च १९१४ रोजीं ' सेवासदन ' या विषयावर रमाबाईंचें एक व्याख्यान झालें. या व्याख्यानांत रमाबाई म्हणतात, "आज मी परमेश्वराचे विशेष रीतीनें आभार मानावयाचे ते याकरतां कीं, १९०४ सालीं मुंबईस महिला परिषदेंत जें माझें भाषण झालें त्यांत ज्या गोष्टी आम्हां पोक्त बाय-

कांच्या हातून घडाव्यात अशा तऱ्हेच्या नुसत्या आशा व इच्छा प्रदर्शित केल्या होत्या, त्यांचा केवळ मनोराज्यांतच लय न होतां त्या आज प्रत्यक्ष मूर्तरूपानें अस्तित्वांत आल्या आहेत हें सांगण्यास मला अत्यंत संतोष वाटतो. या शिवाय गेल्या नऊ वर्षांत आणखी ज्या ज्या गोष्टींची उणीव आम्हांला भासत आहे ती ती उणीव या संस्थेच्या द्वारें भरून काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों. या कामीं पुष्कळ साध्वी, प्रौढ, व कळकळीच्या बायकांचें आम्हांला साहाय्य पाहिजे. त्या दृढ निश्चयानें हीं कामें अशींच पुढें चालवून अंशतः तरी तरुण पिढीच्या कर्जातून मुक्त होतील असें मानण्यास आतां हरकत नाहीं. तसेंच या कामीं आमच्या बंधुवर्गाचाहि चांगला पाठिंबा असल्यामुळें आम्हांला आमच्या कामांत अडचणी भासत नाहींत. एवढेंच नाहीं तर उलट दोन्ही वर्ग आपापलीं कामें अधिक उत्साहानें व एकोप्यानें करतात हीं त्यांतल्या त्यांत विशेष समाधानाची गोष्ट आहे. घरासंबंधीं काय किंवा देशासंबंधीं काय त्या दोनहि वर्गांचीं कामें निरनिराळींच असावयाचीं साधारण उदाहरणाकरितां पहा. परक्या पुरुषांशीं पत्रव्यवहार करणें, त्यांना जाऊन भेटणें, व्याख्यान देण्याबद्दल अगर वर्गणी देण्याबद्दल आग्रह करणें वगैरे जीं कामें केवळ भिडस्तपणामुळेंच बायकांच्या हातून होत नाहींत, तीं व संस्थेसंबंधानें अनेक कामें करण्यास जें पुरुषांचें सहाय्य पाहिजे आहे, तें आज आम्हांला चांगल्या रीतीनें मिळत आहे हें आमचें सुदैव होय.

### स्त्रीचा मुख्य धर्म–मातृप्रेम

सेवासदनाच्या कार्याचें मुख्य क्षेत्र स्त्रीसमाज होय. या संबंधानें स्त्रीत्वाच्या अधिकाराचा व स्वरूपाचा आपण विचार करूं. उत्कृष्ट तऱ्हेचें मातृत्व म्हणजे सेवा करणें हाच स्त्रियांचा मुख्य अधिकार आहे. या मातृत्वाची योग्य जाणीव उत्पन्न करणें, त्याचें उदात्त स्वरूप स्त्रियांच्या पुढें मांडणें व पूर्णपणें तदनुरूप वर्तन करण्याची पात्रता त्यांचे ठिकाणीं निर्माण करणें हेंच सेवासदनाचें उच्च ध्येय आहे. किंबहुना स्त्रीच्या कार्याचें महत्व थोड-

क्यांत सांगणें झालें तर तें मातृत्व याच एका शब्दानें सांगतां येईल. मातृप्रेम ही परमेश्वरानें स्त्रियांच्या अंगीं उत्पन्न केलेली शक्ति आहे. त्या शक्तीची किंवा मातृप्रेमाची वाढ करणें समाजोन्नतीच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे.

मातृप्रेमाची भावना व सेवा हा मनुष्यधर्म आहे. या संबंधानें आज मी काहीं सांगणार आहें असें ऐकून पुष्कळांना चमत्कारिक वाटेल कीं यांत या नवीन काय सांगणार आहेत, नुसतें मनुष्यांतच नाहीं; पण जीवमात्रांमध्यें मातेचें प्रेम नैसर्गिक असतेंच. हा आह्मांला रोजचा अनुभव आहे. त्याप्रमाणें सेवा करण्याचा अधिकार अनादिकाळापासून आलेला आहे, आमच्या घरीं तरी रोज आह्मी सेवाच करीत असतों. मग ह्या गोष्टी शिकण्यास आह्मांला सेवासदनच कशाला पाहिजे. असा प्रश्न साहजिक पुढें येईल. त्याला उत्तर येवढेंच कीं, होय, आपलें म्हणणें खरें आहे, तरी वर लिहिलेल्या मातृप्रेमाच्या भावनेंत व रोजच्या सेवेंत थोडी अधिक भर घालावयाची आहे. ती ही कीं, मातेच्या कर्तव्याची व सेवेची किंमत फार मोठी आहे. तिची निर्वेध सेवा अनुपमेय असते. ती इतकी कीं, कित्येक वेळां माता आपण आपल्या स्वतःला विसरून जाऊन अहोरात्र मुलांची सेवा व शुश्रूषा करीत असते, त्यांना बरें वाटण्यांतच तिचे सुख वाढतें व श्रम परिहार होतात असा आपल्याला नित्याचा अनुभव आहेच. हें सर्व आपल्या घरापुरतें झालें. पण ह्या प्रेमाचें क्षेत्र आज आपल्यापुरतें म्हणजे संकुचित आहे. त्याची वाढ व व्यापकता आज आहे त्यापेक्षां हजारों पटीनें अधिक झाली पाहिजे. कारण त्या वाढीवरच आपल्या प्रगतीचें बहुतेक कार्य अवलंबून आहे. सर्व तऱ्हेच्या कर्तृत्वाचीं व दयाधर्माचीं कामें याच वाढीवर अवलंबून आहेत. पहिल्यांदां आपण, मग आपले आप्त, नातलग, मग शेजारी, मग गांवांतील, प्रांतांतील, देशांतील लोक अशी आपलेपणाच्या भावनेची परंपरा वाढत गेली पाहिजे. तरच आपली बुद्धि उदार होऊन आपल्या हातून खरीं उपयुक्त, व श्रेयस्कर कामें होतील. म्हणूनच सेवासद-

नानें हीं कामें करण्यास योग्य होतील अशा सेविका तयार करण्याचें धोरण हातीं घेतलें आहे. आणि अशा विस्तृत प्रकारच्या मातृप्रेमाची भावना वाढविणें हा या संस्थेचा मुख्य हेतु आहे. ”

‘ सेवासदनाचे नियम ’ या मथळ्याखालीं रमाबाईच्या हस्तलिखित बाडांत एक्झरसाईज बुकाच्या मळपृष्ठावर शिसपेनीनें लिहिलेला पुढील मजकूर आढळतो,

“ १ सर्व मानवबंधूंशीं प्रेमानें वागावें.

२ जें कर्म करावयाचें तें परमेश्वरास भक्तीनें अर्पण करून त्याच्या फलाची अपेक्षा न धरणें.

३ जीवितावर मालकी आपली नसून, हा परमेश्वराकडून मिळालेला ठेवा आहे असें समजून याचा योग्य उपयोग करावयाचा व शेवटीं तें प्रेमपूर्वक व भक्तिपूर्वक परमेश्वरास अर्पण करावयाचें.

या मुख्य तीन तत्वांच्या पायावर सेवासदनाची उभारणी आहे.

रमाबाईची निष्ठा व श्री. गोपाळराव देवधर यांचा निरलस उद्योग यामुळें ‘ सेवासदना’ चा व्याप वाढून पुण्याचें सेवासदन मुंबईची शाखा न राहातां स्वतंत्र व स्वावलंबी बनलें व १९१७ मध्यें ‘ सेवासदना ’ नें सुरू केलेलें कार्य ‘ सेवासदन सोसायटी’ नें रमाबाईच्या अध्यक्षपणाखालीं आपल्या हातीं घेतलें. १९२१ सालीं रमाबाईनीं ‘ घी इंडियन इंटर प्रिटर ’ या मासिकाच्या एप्रिलच्या अंकांत ‘ सेवासदन ’ सोसायटीचें दहा वर्षांच्या कामाचें त्रोटक समालोचन असा इंग्रजी लेख लिहिला आहे. ‘ हिंदी स्त्रियांच्या उद्धारासाठीं ‘ पुणें सेवासदन ’ सोसायटी काम करीत आहे असें त्यांनीं या लेखांत म्हटलें आहे. सेवासदनाचा व्याप आतां पुण्यासच वाढला नसून त्याच्या शाखा बारामती, सोलापूर वगैरे ठिकाणीं निघाल्या असून एक दिवा दुसरा दिवा प्रज्वलित करतो या न्यायानें पुण्याच्या सेवासदनाचें अनुकरण सांगली, जमखिंडी वगैरे ठिकाणींहि होऊं लागलें आहे.

[ ११ ]

## समाजसेवा

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ना. गां.

१९०४ ते १९२४ या वीस वर्षांत रमाबाईच्या समाजसेवेचा प्रदीप आपल्या निर्मल आणि सात्विक तेजानें तेवत होता. सेवासदन स्थापून रमाबाईंनीं आणि 'भारतसेवक समाज' स्थापून ना. गोखल्यांनीं न्या. रानडे यांच्या सामाजिक व राजकीय चळवळीचें खरें स्मारक उभारलें आहे असे न्या. चंदावरकर यांनीं सार्थ उद्गार काढले आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक व औद्योगिक चळवळी करून लोकांत स्वोन्नतीची जागृति उत्पन्न करावयाची असा हेतू मनापुढें ठेवून न्यायमूर्ती रानडे यांनीं आपल्या हयातींत जीं कार्यें सुरू केलीं तीं आज सेवासदन, भारतसेवक समाज, प्रार्थनासमाज या संस्थांच्या रूपानें १९०४ ते १९२४ या वीस वर्षांत बद्धरूढ झालीं आहेत. प्रो. कर्वे यांनीं विधवा विवाह प्रतिबंधनिवारणाच्या चळवळीस स्वतःला कांहीं दिवस वाहून घेतलें होतें; पण हें प्रतिबंधनिवारण करण्यापेक्षां विधवांना सुशिक्षित करण्याचें मूलग्राही काम करावें असें ठरवून त्यांनीं १८९६ सालीं सुरू केलेल्या अनाथबालिकाश्रमास भारतीय महिला विद्यापीठाचें स्वरूप या वीस वर्षांत प्राप्त झालें. स्त्रियांना सुशिक्षित करून त्यांना समाजसेवेच्या कार्यांत तयार करणें, लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करीत लोकांत राजकीय बाबींची आवड उत्पन्न करणें, धार्मिक बाबतींत विवेकाला प्राधान्य देण्याची खटपट करणें, नव्या परिस्थितीला धरून आर्थिक धोरण बदलणें ह्या एकट्या गोष्टी घेतल्या तर याबद्दल या वीस वर्षांत महाराष्ट्रांत आतां वाद राहिलेला नाहीं. वाद आहे तो धोरणासंबंधानें आहे. हें धोरण ठरवितांना इंग्रजी संस्कृति आणि इंग्रजी राज्यकारभार हे वादाचे प्रश्न होतात. इंग्रजी संस्कृति व इंग्रजी राज्यकारभार हिंदुस्थानच्या उन्नतीस सहाय्यभूत होईल अशा विश्वासाचा वर्ग न्या. रानडे यांच्या शिकवणींत तयार झाला आहे.

इंग्रजी संस्कृति व इंग्रजी कारभार कितीहि चांगला असला तरी जोंपर्यंत हिंदुस्थानचा कारभार इंग्रजी नोकरांच्या हातीं आहे तोंपर्यंत इंग्रजी संस्कृति व इंग्रजी कारभार उपकारक न होतां अपकारकच होईल तेव्हां आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा औद्योगिक चळवळी करतांना चळवळी राजसत्ता हिंदी लोकांच्या हातीं आणण्याच्या खटपटीस उपकारक असाव्या व त्या आपल्या संस्कृतींतील उच्च विचारसरणीला धरून असाव्यात अशा मताच्या वर्ग कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक यांच्या शिकवणींत महाराष्ट्रांत तयार होऊन तो या वीस वर्षांत मध्यमवर्गाला व्यापून बसला आहे. प्रत्येक चळवळीकडे राजकीय दृष्टीनें पहाण्याची वृत्ति महाराष्ट्रांत उत्पन्न झाल्यामुळें स्वतंत्र रीतीनें सामाजिक, धार्मिक दृष्टीनें समाजसेवा करणाऱ्यांना महाराष्ट्रांत बहुजनसमाजाचा जसा पाठिंबा मिळावा तसा मिळत नाहीं आणि बहुजनसमाज या गोष्टीकडे उगीच वांकड्या बुद्धीनें पहात असतो.

पुनर्विवाह, नवधर्ममत, नेमस्त पक्षांचीं राजकीय मतें यांच्याशीं शक्य तो संबंध टाळून प्रो. कर्वे आपली स्त्रीशिक्षणाची चळवळ करीत असल्यामुळें त्यांच्या चळवळीकडे महाराष्ट्रांतील मध्यम वर्ग जितक्या सहानुभूतीनें पहातो तितक्या सहानुभूतीनें ‘ सेवासदना ’ च्या व ‘ प्रार्थना समाजा ’ च्या कार्याकडे पाहत नाहीं. याचें कारण या दोन्ही संस्थांत पुढाकार घेऊन काम करणारी मंडळी राजकीय बाबतींत नेमस्त पक्षाची आहेत हें होय. हा राजकीय संबंध बराच अडथळा करतो. १९०४ ते १९२४ या वीस वर्षांत पुण्यास मि. पटेल यांचें बिल, मुलांच्या सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न आणि नेमस्तांची भारतीय परिषद अशा राजकीय पक्षभेदाच्या दृष्टीनें तीन महत्वाच्या गोष्टी घडल्या. या प्रसंगीं स्वाभाविकपणेंच रमाबाईंनीं नेमस्त पक्षाच्या वतीनें काम केलें. यामुळें त्यांच्या सेवासदनाच्या निव्वळ स्त्रीशिक्षणाच्या कार्याकडे वांकड्या बुद्धीनें बघण्याची प्रवृत्ति पुण्याच्या व महाराष्ट्राच्या मध्यम वर्गांत

दिसून येते. ही बुद्धि बरोबर नाहीं हें रमाबाईनीं ज्या हेतूनें कार्य आरंभिलें आहे त्यावरून कोणाच्याहि ध्यानीं येणार आहे."

रमाबाई नेमस्त पक्षाच्या होत्या तरी होयबा नव्हत्या हें येथें जातां जातां सांगितलें पाहिजे. १९१७ च्या मुंबईच्या वार कान्फरन्समध्यें त्यांना निमंत्रण होतें. त्यावेळीं सरकरास लोकांनीं मदत करावी असें सांगतांना सरकारनेंहि यावेळीं लोकांच्या मागण्या देऊन टाकल्या पाहिजेत असें बजावण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. तसेंच केनया वसाहतींतील हिंदी लोकांच्या बाबतींत जो अन्याय होत आहे त्या संबंधानें पुण्यास भरलेल्या सभेंतहि त्यांनीं हिंदी लोकांच्या मागण्यांचा जोरानें पुरस्कार केला होता. परंतु रमाबाईचें खरें जीवितकार्य हें नव्हतें. स्त्रियांच्या उन्नतीची खटपट करणें व व्यापक स्वरूपावर समाजसेवा करणें हें त्यांनीं आपल्या जीविताचें कार्य ठरविलें होतें. हीं दोन्हीं कार्यें त्यांनीं ' सेवासदना ' मार्फत चालविलीं होतीं.

सेवासदनांतील विद्यार्थिनींना रुग्णपरिचर्येचें [ नार्सिंगचें ] शिक्षण देण्याची व्यवस्था जेव्हां पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्यें करण्याचें ठरलें तेव्हां कित्येक विद्यार्थिनींना पुरुष विद्यार्थ्यांबरोबर शिकण्याचा संकोच वाटूं लागला. ही स्थिति पाहून रमाबाई एके दिवशीं मेडिकल स्कूलमध्यें गेल्या आणि तेथील पुरुष विद्यार्थी वर्गाला त्यांनीं कळकळीचा उपदेश केला. त्याचा इष्ट तो परिणाम घडून सेवासदनांतील विद्यार्थिनींना संकोच वाटण्याचें कारण लयास गेलें व त्यांच्या मनाला धीर येऊन शिक्षणक्रम सुकर झाला.

इस्पितळांत जाऊन त्या रोग्यांची विचारपूस करीत. या संबंधानें सेवासदनाच्या तिसऱ्या वार्षिक रिपोर्टांत पुढील हकिगत दिली आहे. " एके दिवशीं आमच्या अध्यक्ष श्रीमती रमाबाई साहेब रानडे या हॉस्पिटलमध्यें गेल्या होत्या. चांगलीं पुस्तकें वाचावींशीं तुम्हांला वाटतात काय असा त्यांनीं तेथील कांहीं रोग्यांना प्रश्न केला. तेव्हां पुरुषांच्या वार्डांतील

प्रत्येक रोग्यांनें आपल्याला पुस्तक मिळालें तर बरें होईल असें त्यांना सांगितलें. तेथें एक लहान मुलगा होता तोहि त्यांच्याकडे पळत पळत येऊन त्यांच्या पाशीं पाटी व पुस्तक मागूं लागला. एक रोगी एका कोपऱ्यांतील खाटेवर पडला होता तो मात्र एक अक्षरहि बोलला नाहीं. तुम्हीं कांहीं कां बोलत नाहीं असा वहिनीसाहेबांनीं त्यांचे जवळ जाऊन त्यास प्रश्न केला. तेव्हां तो त्यांना म्हणाला, " बाई, मी मुसलमान व आपण हिंदु आहांत तेव्हां आपल्याजवळ मी पुस्तक मागितलें तरी तें आपण मला कसें द्याल ?" त्यावर त्या म्हणाल्या, ' बाबा तूं मुसलमान असलास आणि मी हिंदु असलें तरी त्यांत काय बिघडलें. हिंदु व मुसलमान हीं एकाच ईश्वराचीं लेकरें नव्हेत काय ! ' या त्यांच्या बोलण्यानें त्या रोग्याच्या मनास फार सुख झालें व आपल्याकरतांहि त्यानें एक पुस्तक मागितलें. "

इस्पितळांत जशा रमाबाई जात तशा त्या व्हिजिटर असल्यामुळें येरवड्याच्या तुरुंगांत वारंवार जाऊन तेथील कैद्यांची त्या वास्तपुस्त करीत असत. या संबंधानें त्यांचे नातू देवदत्त विध्वंस यांनीं 'रमाबाईच्या आठवणीं'त पुढील प्रमाणें माहिती दिली आहे, " येरवडा सेंट्रल प्रिझनच्याहि त्या एक सरकारनें नेमलेल्या व्हिजिटर होत्या. हें एक धार्मिक कृत्य म्हणून त्यांनीं आपल्या अंगावर घेतलें होतें. दर दोन किंवा तीन आठवड्यांनीं त्या गाडींतून तेथें जाऊन फीमेल वार्डमधील गुन्हेगार स्त्रियांना उपदेश करीत आणि त्यांच्या हातून पुन्हां गुन्हे होऊं नयेत—झालेल्याबद्दल त्यांना पश्चात्ताप व्हावा व पुढें त्यांनीं सन्मार्गी लागावें म्हणून उपदेशाच्या गोष्टी सांगून त्यांच्याकरितां तेथें अभंग म्हणून ईश्वरोपासना करीत असत. आणि तेथील स्त्रियाहि निष्ठेनें व भक्तीनें ऐकत. एखाद्या वेळीं तेथें जाण्याची वेळ चुकली तर ' तुमच्या येण्याची आम्ही अगदीं वाट पाहिली. तुमच्या येण्यानें आम्हांला समाधान वाटतें ' असें त्या म्हणत.

ह्या गुन्हेगार ठरून शिक्षा झालेल्या स्त्रियांचीं तान्हीं तीन वर्षांच्या आंतील मुलें त्या बायकांच्या जवळ कैदेंत ठेवलेलीं असतात. ह्या गरीब बिचाऱ्या निरपराधी मुलांना तुरुंगवास भोगावा लागतो. ह्या मुलांना आई ( रमाबाईंना देवदत्त ' आई ' म्हणत असत ) तेथें जात असे त्या वेळीं कांहीं तरी खाऊ घेऊन जात असत. त्यांना खाऊ देण्यासाठीं आईंना सरकारकडे बराच पत्रव्यवहार करावा लागला. "

दुष्काळपीडितांना मदत करण्यांतहि रमाबाईंचा पुढाकार असे. काठेवाड गुजराथ येथील खेड्यांतील दुष्काळग्रस्तांच्या दुःखाचें निवारण त्यांनीं जातीनें जाऊन केलें होतें- बाबतींत सेवासदनाच्या तिसऱ्या वार्षिक रिपोर्टांत पुढील प्रमाणें हकिगत सांपडते, " गुजराथ व काठेवाड या प्रांतांतील नुकत्याच संपलेल्या दुष्काळांत संस्थेच्या कांहीं स्त्रियांनीं दुष्काळपीडित भागांत प्रवास केला. लाहोर येथील ' हिंदु अनाथरक्षक दुष्काळ फंड ' या नांवाच्या कमिटीकडून लाला लजपतराय यांचे साहाय्यानें रा. देवधर यांनीं गुजराथ व काठेवाड या प्रांतांतील दुष्काळाकरितां प्रथम पांच हजार रुपयांची मदत मिळविली व ती रक्कम मुंबईंतील सेंट्रल रिलीफ कमिटीच्या स्वाधीन करतांना त्यांनीं असें सुचविलें कीं, ज्या अर्थी ही मदत अनाथ, पंगु माणसें दुःखी कष्टी विधवा व निराश्रित अर्भकें यांचेकरितां आहे त्या अर्थी ती वांटण्याकरितां होतां होईल तों स्त्रीस्वयंसेवक मिळविण्याची खटपट करावी. तें मान्य करून पुणें व मुंबई येथील सेवासदनांतील स्त्रियांस यासंबंधानें विचारण्यांत आलें. पुणें येथील सेवासदनांतील. तीन स्त्रियांसमवेत आपण पालनपूर एजन्सीमध्यें जाऊन ही रक्कम वांटण्याची व्यवस्था करूं असें श्री. रमाबाईसाहेब रानडे यांनीं फंडाचे जनरल सेक्रेटरी मि. पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांना लिहिलें व श्री. रमाबाईसाहेब रानडे, श्री. अन्नपूर्णाबाई आपटे, श्री. यमुनाबाई भट व श्री. सीताबाई डुकले या चवघीजणी पालनपूरला गेल्या. तेथें त्यांच्या कामांत त्यांना संस्थानांतील अधिकारी व ब्रिटिश अधि-

कारी यांच्याकडून चांगलें साहाय्य झालें. यांनीं खेड्यापाड्यांतून हिंडून तेथें दुष्काळग्रस्तांच्या जरूरीप्रमाणें त्यांस धान्य, कपडे व पैसे दिले. या स्त्रियांचा प्रवास खर्च एन. एम. वाडिया ट्रस्टीजनीं दिला. परंतु श्री. रमाबाईसाहेब रानडे यांनीं आपला खर्च स्वतःच केला. ”

ह्या समाजसेवेच्या कार्याशिवाय स्त्रियांच्या उन्नतीच्या सर्व चळवळींत प्रमुखपणें रमाबाईंनीं या वीस वर्षांत भाग घेतला. सेवासदनाचें कार्य त्यांचे घरचें होतें. या कार्यासाठींहि त्यांनीं लेखनद्वारें व व्याख्यानद्वारें परिश्रम चालविले होते. १९११ सालीं त्या वऱ्हाडांत या कार्यासाठीं गेल्या होत्या. तेथें यवतमाळ, उमरावती व अकोला या ठिकाणीं त्यांचीं स्त्रियांच्या सभांपुढें उपदेशपर व्याख्यानें झालीं. राष्ट्रघटनेसंबंधांतील आपली जबाबदारी स्त्रियांनीं ओळखणें कसें आवश्यक आहे हें त्यांनीं तेथील स्त्रियांच्या निदर्शनास आणून दिलें. १९१२ सालीं पालनपूर एजन्सीमध्यें दुष्काळाच्या कामानिमित्त फिरत असतांनाहि रमाबाईंनीं तेथील गुजराथी स्त्रियांच्यापुढें एक व्याख्यान देऊन, ‘ विधवा व त्यांची शोचनीय स्थिति ’ या संबंधानें आपले विचार प्रदर्शित केलें.

१९१९ सालीं औरंगाबाद येथील शारदा मंदिर कन्याशाळेचा दुसरा वार्षिक उत्सव रमाबाईंच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. या प्रसंगीं रमाबाईंनीं प्रकट केलेले विचार मननीय आहेत. रमाबाई म्हणाल्या, “ आजकालचा काळ हा जागृतीचा व प्रगतीचा आहे. पुरुषाला काय किंवा स्त्रीला काय ज्ञान अवश्य पाहिजे. निदान प्रत्येक स्त्रीला स्वतः विचार करण्यापुरतें व ज्ञानाची किंमत कळण्यापुरतें तरी शिक्षण पाहिजेच. जन्मभर ज्या पतीबरोबर संसार करावयाचा त्याचे विचार कळावयास किंवा त्याची योग्यता कळावयाला तिला नको काय ? स्त्री आपल्या पतीला दैवत मानीत असते; त्याचे गुण, त्याची विद्वत्ता ही तिला चांगल्या रीतीनें

समजली पाहिजेत व याकरितां तिला शिक्षण अवश्य पाहिजे. मुलांना व मुलींना सारखेंच शिक्षण द्यावयाचें असा आपण निर्धार केला पाहिजे. त्यांच्यामध्यें पंक्तिप्रपंच कां ? मुलांना जेवावयाला घालतांना कसा भेद करीत नाहीं आणि दोघांवरहि सारखें प्रेम करतो; असें असतांना शिक्षणाच्या बाबतींतच प्रतारणा कशाला ? मुलांच्या शिक्षणाची जशी आपण काळजी घेतां तितकीच मुलींच्या शिक्षणाचीहि घेतली पाहिजे. पुरुषांनीं जर मनावर घेतलें तर आमच्या स्त्रिया खात्रीनें मुलींच्या शिक्षणाविरुद्ध जाणार नाहींत येथें ही शाळा अनायासें मुलींकरितां निघाली आहे. तिचा सर्वत्रांनीं पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे. सर्वांनीं जर एकोप्यानें शाळेस पाठिंबा दिला तर याचनेची स्थिति राहाणार नाहीं. ही संस्था या प्रांताला भूषणभूत झाली पाहिजे व या दृष्टीनें सर्वांनीं अगत्यपूर्वक इकडे लक्ष दिलें पाहिजे. शाळेच्या चालकांनीं आर्थिक अडचणींना न जुमानतां आजपर्यंत शाळा चालविली हें अभिनंदनीय होय.

वास्तविक आयांची नजर आपापल्या मुलींच्या शिक्षणावर नेहमीं असली पाहिजे व या बाबतींत त्यांनीं स्वतःवरची जबाबदारी ओळखली पाहिजे. स्त्रियांनीं सर्व बाबतींत आतां पुरुषांवर अवलंबून राहून चालणार नाहीं. याकरितां त्यांनीं स्त्रियांची एक कमेटी स्थापन करून शाळेस शक्य त्या तऱ्हेनें मदत करावी आणि शाळेवर पहाणीहि करावी.


१९१९ मध्यें स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळविण्याच्या चळवळींत रमाबाईंनीं पुढाकार घेतला होता. या चळवळीच्या खटपटीसाठीं मद्रासच्या वुइमेन्स असोशिएशनच्या एक प्रमुख कार्यकर्त्या मिसेस कझिन्स या त्यांच्याकडे पुण्यास आल्या होत्या. मुंबई कौन्सिलांत मतदानाच्या प्रश्नावर दोन दिवस कडाक्याचा वाद झाला व शेवटीं स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्याचा ठराव पास झाला. या वादविवादाच्या वेळीं त्या

वेळचे मुंबई इलाख्याचे होम मेंबर ना. लॉरेन्स यांनीं ठरावास पाठिंबा देतांना रमाबाईच्याबद्दल पुढील प्रमाणें उद्गार काढले, " There is no Council which would not be honoured, graced & helped by the presence of such a woman as one who is known to us, all, Mrs. Ramabai Ranade. "

त्या दर वर्षी आळंदीस जात व स्वयंसेविका बरोबर घेऊन बायकांना देवदर्शन घडवीत याबद्दल बायकांना फार कृतज्ञता वाटे. पंढरपुरास सकेशा विधवांना व स्वतः रमाबाई तशा असल्यामुळें त्यांना विठोबाचे गाभाऱ्यांत जाऊन दर्शन घेतां येत नसे. ही अडचण काढून टाकण्याची खटपट करण्याचा त्यांचा विचार होता; पण त्यांच्या मृत्युमुळें तो तसाच राहिला.

१९१५ सालीं सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून प्रो. कर्वे यांनीं भारतीय महिला विद्यापीठाची योजना मांडली व गेल्या ९ वर्षांच्या त्यांच्या अविरत परिश्रमानें लोकांचा व धनिकांचा पाठिंबा मिळून ही संस्था महाराष्ट्राचें भूषण होऊन राहिली आहे. रमाबाईंनीं सीनेटचे सभासद या नात्यानें महिला विद्यापीठाच्या कार्यास मदत केली आहे.

समाजसेवेच्या या अनेकविध चळवळींना त्यांनीं ' सेवासदना 'च्या पायावर उभा राहून मदत केली असल्यामुळें 'सेवासदन' हेंच त्यांच्या समाजसेवेचें खरें दृश्य स्वरूप होय.


Small and great. And champion the weak against the strong.

श्री. रमाबाईंचें इंग्रजी व मराठी हस्ताक्षर.

[ १२ ]

## मराठी वाङ्मयांतील कामगिरी.

उत्तम पैलू पाडलेलें हिंदू स्त्रीरत्न म्हणजे रमाबाई असें रमाबाईंचें एका वाक्यांत वर्णन करतां येईल. समाजसेवा व मराठी वाङ्मयांतील कामगिरी हे त्यांचे आधुनिक लोकांच्या दृष्टीला संतोष देणारे आणि दिपविणारे देदीप्यमान पैलू आहेत. या पैलूंतून जें पाणी चमकत आहे तें रमाबाईंच्या अंतःकरणांत दृढमूल झालेल्या पतिभक्तिचें व्यक्त स्वरूप आहे. भक्ति ही गोष्ट परमेश्वराप्रमाणेंच अव्यक्त आहे; पण परमेश्वराचें दर्शन जसें प्रत्येक भव्य उज्ज्वल आणि सुंदर वस्तूंत दृष्टीस पडतें तसें त्यांनीं मराठी वाङ्मयांत केलेल्या कामगिरींत त्यांच्या पतिभक्तीचें उज्ज्वल आणि सुंदर स्वरुप दिसून येतें.

त्यांनीं नाटकें कादंबऱ्या लिहून किंवा तत्त्वविवेचनाचे ग्रंथ लिहून मराठी भाषेची सेवा केलेली नाहीं. पतीचें मनन व चिंतन करतांना त्यांच्या हातून मराठी भाषेची सहज पण उत्कृष्ट सेवा घडून आली आहे. न्यायमूर्तींच्या निधनानंतर एक वर्षाभरांत, अज्ञातवासांत असतांनाच त्यांनीं न्यायमूर्ती रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें छापून पतिऋण आणि मराठी भाषेचें ऋण फेडलें. हें ऋण फेडतांना त्यांना हल्लींचे प्रार्थना समाजाचे चिटणीस रा. द्वा. गो. वैद्य यांची फार मदत झाली याचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेवरून रमाबाईंचें अंतःकरण पतिभक्तिनें किती ओथंबलेलें आहे याची कल्पना मराठी वाचकांना आली. आजहि त्यांची प्रस्तावना वाचतांना तितकीच गोडी लागते. रमाबाई आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात, " या धर्मपर व्याख्यानांचा संग्रह करण्याचा हेतु, त्या परमपूज्य, अत्यंत शुद्ध पायांची सेवा प्रत्यक्ष नाहीं तर या रूपानें तरी घडावी असा आहे,' असा देऊन पुढें म्हणतात, " मुंबईस प्रार्थना

मंदिरांत जेव्हां जेव्हां उपासना चालविण्याचे प्रसंग येत त्या त्या वेळीं एकदां त्या प्रेममय रसाळ वाणीचा ओघ सुरू झाला कीं, हृदय उचंबळून यावें, मन तल्लीन व्हावें, क्षणांत प्रापंचिक सुखाचा विसर पडावा, आशा व आस्था यांचा हृदयांत प्रवेश व्हावा इतकेंच नाहीं, तर आपण कधीं कधीं साक्षात् स्वर्गसुखच अनुभवित आहोंत असें वाटावें. हा प्रकार उपासना सुरू झाल्यापासून तों ती संपेपर्यंत चालत असे; एवढेंच नव्हे, तर तेथून घरीं आल्यावरसुद्धां, त्या प्रेमळ, पण मनावर पूर्णपणें संस्कार करणाऱ्या शब्दांनीं जागृत केलेले धर्मविचार पुढें एकसारखे तासांचे तास मनांत घोळत राहात; व आपल्याला आज कांहीं जास्त अधिकार प्राप्त झाला आहे, आपली योग्यता जास्त झाली आहे असें वाटून आनंद होई.

ती प्रेमळ, शांत व गंभीर वाणी प्रत्यक्ष ऐकण्याचें जरी आतां माझें भाग्य राहिलें नाहीं, तरी माझ्या हृदयस्थ असलेल्या माझ्या मूर्तीच्या मुखांतून निघालेल्या अमृतवाणीचा—त्या पवित्र गंगेचा—आश्रय केला, तर अशा दुःखांतही कांहीं समाधानाला जागा होईल व मनाला स्थैर्य व शांति येण्याला तीच प्रसादवाणी सर्वांशीं कारणीभूत होईल, असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. आपल्याला नंदादीप लावण्याचें सामर्थ्य नसेल, तर तेवत असलेल्या नंदादीपाची नुसती वात सारली, तरी पुण्य घडतें, असें वाडवडील सांगत आले आहेत. दुसऱ्यानें लावलेल्या नंदादीपाची वात सारण्याचें श्रेय इतकें आहे; आणि हा जो उपदेशरूपी उज्ज्वल ज्ञानदीप स्वतःच ठेवण्यांत आला आहे, त्याची वात सारण्याचें काम माझेंच आहे, हें जाणून मी आज उपलब्ध असलेलीं धर्मपर व्याख्यानें प्रसिद्ध करीत आहें. हीं मजप्रमाणेंच इतर वाचकांनाहि कल्याणप्रद व्हावीं, हेंच देवाजवळ अनन्य भावानें मागणें आहे.”

धर्मपर व्याख्यानांच्या प्रस्तावनेंत रमाबाईंच्या पतिप्रेमाची व सरळ, साध्या व योग्य उपमांनीं नटलेल्या भाषासरणीची चुणूक दिसली तिचें

स्पष्ट, भव्य आणि विशाळ स्वरूप ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' या पुस्तकानें मराठी वाचकांच्या निदर्शनास आणून दिलें. पुढें पुढें करावयाचें हा हिंदु स्त्रीचा स्वभाव नाहीं. मारुतीची अशी गोष्ट सांगतात कीं, कोणी तरी अमुक काम तुझ्या हातून होईल असें सांगितल्याखेरीज तो कार्याला प्रवृत्त होत नसे. तशीच कांहींशीं रमाबाईची स्थिति होती. समाजसेवेला लागल्या त्या अनिच्छेनें लागल्या. असें नाहीं; पण सेवासदनासारखें लोकांच्या डोळ्यांवर सारखें यावयाला लावणारें काम अंगीकृत करतांना त्यांना रा. गोपाळराव देवधरांना पुष्कळ आग्रह करावा लागला. आठवणी लिहून छापण्यास अशीच दुसऱ्याच्या आग्रहाची जरूर पडली. कै. सौ. सखुताई विद्वांस ही त्यांची अत्यंत लाडकी होती. " पोरवय तरी माझ्या अंतःकरणाला वाव मिळावा म्हणून मला सुखकर अशा आठवणी काढून माझें समाधान व्हावें असा ती प्रयत्न करी. याप्रमाणें या पुस्तकांत दिलेल्या कांहीं गोष्टी ऐकून ती एके दिवशीं मला म्हणाली कीं, या तूं लिहून काढल्यास तर पुष्कळांस वाचावयास नाहीं कां मिळावयाच्या ? नाहीं तर आमच्या करितां तरी लिहून काढ " अशी आठवणी लिहिण्याबद्दलची पूर्व पिठिका रमाबाईनीं अर्पणपत्रिकेंत दिली आहे.

या आठवणी अशा रीतीनें बऱ्याच दिवस लिहिल्या जात होत्या. रमाबाईची मानलेली लाडकी लेक सौ. सखूताई १९०७ सालीं वारल्या. त्या वेळीं आठवणीची हस्त लिखित प्रत पुरी झाली होती. त्यानंतर या हस्तलिखित प्रतिवरून छापण्याकरितां एक प्रत तयार करण्यांत आली. पहिली आवृत्ति छापण्याचें काम १९०९ सालीं आर्यभूषणमध्यें झालें. दुसरी आवृत्ति ' मनोरंजन ' मासिकाचे चालक यांनीं काढून ती 'मनोरंजना ' च्या वर्गणीदारांना भेट म्हणून दिली. आठवणींच्या पुनर्मुद्रणाचा हक्क त्यांनीं आतां ' सेवासदन ' सोसायटीला देऊन टाकला आहे. आठवणींची

गुजराथी व बंगालींतहि भाषांतरें झालीं आहेत. या आठवणीबद्दल मिसेस कझिन्स या इंग्रजी बाईनींहि चांगले उद्गार काढले आहेत.

मूळ हस्तलिखित आणि छापावयाला तयार केलेली प्रत यांतून कांहीं आठवणी प्रत्यक्ष पुस्तक छापतांना गाळल्या आहेत. छापावयास तयार केलेल्या प्रतींतून ‘ मानसपूजा ’ ‘ चातुर्मासा ’ चे नियम हीं दोन प्रकरणें व नाशिकचा चोरटा गडी व गाडीचा अपघात ह्या आठवणी गाळल्या आहेत. आठवणी या न्यायमूर्तींच्या द्यावयाच्या असें पुस्तक छापतांना धोरण ठेवलें असल्यामुळें वर उल्लेख केलेल्या रमाबाईंच्याबद्दल विशेष संबंध पोंचत असलेल्या आठवणी गाळण्यांत आल्या. तसेंच मूळ हस्तलिखित प्रतींतूनहि न्यायमूर्तींच्या संबंधाच्याच पण वादग्रस्त वाटणाऱ्या आठवणी छापावयाची प्रत तयार करतांना गाळ ' आल्या.

या आठवणी लिहितांना न्यायमूर्तींचें बालपण ताई सासूबाईंच्या तोंडून त्यांना ऐकावयाला मिळालें. न्यायमूर्तींच्या मुंबईतील अभ्यासाची माहिती कीर्तने मंडळीकडून मिळाली असा आठवणींच्या हस्तलिखित टांचणांत उल्लेख सांपडतो. पंचहौद प्रकरणासंबंधानें रा. जी. डब्ल्यु. कानिटकर यांनीं केलेलें टिप्पण रमाबाईंच्या वाडांत आढळतें. तसेंच न्यायमूर्तींच्या दुसऱ्या विवाहाच्या वादासंबंधाचें एक मोडी, जीर्ण झालेलें टिप्पण आहे; पण त्याच्या शेवटचीं पानें सांडलीं असल्यामुळें तें कोणी लिहिलें हें कळण्यास मार्ग नाहीं. ‘ आठवणी ’ ची मूळ हस्तलिखित प्रत एक्झरसाईज बुकांत लिहिली आहे.

‘ आठवणी ’ १९१० सालीं प्रसिद्ध झाल्या व मराठी वाङ्मयांत एका अपूर्व पुस्तकाची भर पडली. अपूर्वाई दोन तऱ्हेची आहे. हिंदु स्त्रीनें आपल्या पतीच्या आठवणी प्रसिद्ध कराव्या ही नवल वाटणारी गोष्ट होती. शिवाय ‘ आठवणी ’ लिहिण्याची पद्धतहि अपूर्व आहे. त्यांत इंग्रजी तऱ्हेची

पद्धति मुळींच स्वीकारण्यांत आली नाहीं. पतीचा नामोच्चारपूर्वक निर्देश करूणें ही इंग्रजी पद्धत झाली. या पद्धतीचा अवलंब रमाबाईनाहि करतां आला असता आणि त्यांनीं केला असता तर कोणालाहि नवल वाटलें नसतें. नवल त्यांनीं स्वीकारलेल्या पद्धतीचें वाटलें. आणि या पद्धतीमुळें त्यांच्या पुस्तकाला अपूर्वाई आली आहे.

'आठवणी' लिहून रमाबाईनीं मध्यम वर्गांतील बालबोध वळणाच्या घराण्यांतील चालीरीती कशा असत व या घराण्यांतील बायका कशा तऱ्हेची भाषा वापरतात याची ओळख करून दिली आहे. 'आठवणी'ची भाषा अगदीं घरगुती आहे आणि भाषेच्या साधेपणानेंच 'आठवणीं'ना एक तऱ्हेचें रम्यत्व प्राप्त झालें आहे. महाराष्ट्रांतील मध्यम वर्गांतील बायकांना सुचणाऱ्या पण समर्पक उपमा 'आठवणीं'त जागोजाग आढळतात. धर्मपर व्याख्यानांच्या प्रस्तावनेंत दिलेली नंदादीपाची उपमा आठवणींत तासगांवच्या भाषणांत उपयोगांत आणलेली केळ्याच्या लंगराची उपमा रडतोंडीच्या घाटांतील इंगळ्यांच्या रंगास 'काळसर गुळाच्या पक्क्या पाका'ची दिलेली उपमा, करमाळ्याच्या दुखण्यांत न्यायमूर्तींच्या चेहऱ्याचें वर्णन करतांना 'भस्म फासल्यासारखा चेहरा दिसत होता,' हें वर्णन किंवा शेवटीं न्यायमूर्तींच्या मृत्युशय्येजवळ न्यायमूर्ति व आपली मनःस्थिती कशी झाली होती यांचें वर्णन करीत असतांना वरून शाबूत दिसणाऱ्या आणि आंतून पोखरल्या गेलेल्या तुळईची दिलेली उपमा या मराठी कुटुंबांतील स्त्रियांनाच सुचणाऱ्या आहेत. आठ महिन्यांचा उन्हाळा व एक दिवसाचा पावसाळा असे समर्पक शब्दप्रयोगहि वारंवार दर्शन देऊन मनाला संतोष देतात.

रमाबाईंची वर्णनशैली फार चांगली आहे. काल्का येथील उडिया गार्डनचें वर्णन उत्तम वर्णनशैलीचा नमुना आहे. पीयर फुलांचें वर्णन

पुढीलप्रमाणें केलें आहे, "या बागेंत सर्वांहून अधिक झाडें पियर नांवाच्या फळांचीं होतीं हीं फळें हिरवीं असून एका बाजूला लाल असल्यामुळें शेंदरी आंब्यासारखीं दिसत होती. झाडाला आंब्यासारखींच पुष्कळ पानें असून तें डेरेदार व ठेंगणें असतें. हे दिवस त्या फुलाच्या हंगामाचे असल्यामुळें सर्व झाडें फळांनीं ओथंबलेलीं होतीं. जमिनीवर नुसतें उभें राहिलें तरी फळें हातांनीं तोडतां येत असत. झाडाला फळांहून पानें कमी असावींत असें वाटे."

मनःस्थितीचें चित्र रेखाटण्याची शैली उत्कृष्ट आहे. या शैलीचे मासले मागील प्रकरणांतून आले आहेत. 'करमाळ्याचें दुखणें' हें प्रकरण अत्यंत चित्ताकर्षक व करुणरसपरिपूर्ण साधलें आहे. 'पण लक्ष्यांत कोण घेतो' या कादंबरींतील यमूच्या नवऱ्याच्या मृत्यूच्या हकीमतीचें प्रकरण आणि 'करमाळ्याचें दुखणें' हें प्रकरण यांतील कोणतें चांगलें असा भ्रम पडण्याइतकीं दोन्ही सरस आहेत. 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरी-बद्दल "ही गोष्ट वाचून तर ती आपल्या लहान वयांतील गोष्ट कांहीं फेरबदल करून लिहिली आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं." असा अभिप्राय रमाबाईनीं प्रकट केला आहे. हा अभिप्राय लिहितांना त्यांच्या मनापुढे त्यांच्या आयुष्यांतील 'आठवणींत'त वर्णन केलेले हृदयंगम प्रसंग असावेत असे म्हणण्यास हरकत नाहीं.

'आठवणी' नंतर पुस्तक म्हणतां येईल असें रमाबाईनीं कांहीं लिहिलें नाहीं. महिला परिषदेंत केलेलें भाषण व १९१४ सालीं 'सेवासदना' संबंधानें पुण्याच्या 'जॉन स्मॉल मेमोरियल हॉल' मध्यें केलेलें भाषण त्यांनीं लिहून काढलेलें होतें. ह्या निबंधाची भाषासरणीहि सरळ आणि प्रासादिक आहे. त्यानंतर गिरीश कवीच्या 'अभागी कमल' या काव्यास त्यांनीं बरीच विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेवरून त्यांना अनाथ विधवांबद्दल वाटणारी तळमळ दिसून येते. त्या या प्रस्तावनेंत म्हणतात,

"हिंदु विधवा म्हणजे घरांतील पोतेरें! त्यांनीं घरांतील कामें करीत लोकांचे कर्णकटु, हृदयभेदक टोमणे ऐकतच राहिलेलें आयुष्य संपविलें पाहिजे, अशी रुढी आहे. तिला घराबाहेर जाण्याची, बंधूबरोबर बोलण्याची चोरी झालेली असते. तिला घरांतील कारभारांत कोणताहि अधिकार नाहीं (!) व घरांतील एकाहि वस्तूवर तिची सत्ता नाहीं अशी परिस्थिात, रूढीनें पाठिंबा दिलेल्या व धर्म म्हणून स्तोम माजविण्यांत आलेल्या नियमांनीं उत्पन्न झालेली आहे. तिचें दर्शनहि अपशकुनी धरलें जातें! ती सकेशा असेल तर तिनें केलेला स्वयंपाक अशुद्ध धरला जातो; तिनीं फुलें तिचा स्पर्श झालेलें पाणी—तिचें कांहीं एक देवाला चालत नाहीं—असें रुढीमुळें मानलें जातें. (परम कृपाळू व दीनवत्सल परमेश्वरापाशीं भेदाभेद नाहीं हें वड्या शास्त्र्यांच्याहि ध्यानांत येत नाहीं.) या शेवटच्या वाक्यावर दिलेल्या टीपेंत रमाबाई म्हणतात, "पंढरपुरासारख्या प्रसिद्ध देवस्थानीं—जेथील देव--श्रीविठ्ठल दीन अनाथांचा मायबाप व भक्तवत्सल म्हणून वर्णिला आहे, आणि म्हणूनच जेथें ब्राह्मणांखेरीज इतर सोनार, शिंपी, मराठे वगैरे जातींनाहि मूर्तीचे पायावर डोकें ठेवून नमस्कार करण्याचा प्रघात आहे, तेथें या दीन वर्गाला मात्र 'मूर्तीला विटाळ होईल' या 'वेड्या' कल्पनेनें मनाई केली जाते! केवढा हा अन्याय! 'धर्म' या नांवाखालीं किती अन्याय होत आहे याचें हें एक चांगलें उदाहरण आहे."

रमाबाईंनीं शेवटीं आपली लेखणी न्यायमूर्ति रानडे यांचे रा. फाटक यांनीं लिहिलेल्या चारित्रास प्रस्तावना लिहिण्यासाठीं उचलली. या प्रस्तावनेंतहि 'धर्मपर व्याख्यानांच्या प्रस्तावनेप्रमाणें त्यांची पतिनिष्ठा उत्कट स्वरूपांत पाहावयास सांपडते. या प्रस्तावनेंत त्यांनीं चरित्र कसें लिहावें याबद्दल प्रकट केलेले विचार मननीय आहेत. त्या म्हणतात, "चरित्र लिहिण्याचें कार्य सोपें नाहीं. ज्या व्यक्तीचें चरित्र लिहावयाचें तिनें आपल्या हयातींत जी कामगिरी केली असेल त्या कामगिरीच्या पाठीशी जे हेतु असतील, त्या

व्यक्तीनें जे भलेबुरे प्रसंग अनुभवले असतील, त्या प्रसंगीं तिचें जें विशिष्टत्व दिसलें असेल, त्या सर्वांची माहिती यथातथ्य यावयास पाहिजे, तशी माहिती या पुस्तकांत आलेली आहे. ही माहिती सांगत असतांना ती कोठेंहि कंटाळवाणी न होऊं देण्याची खबरदारी चरित्रकाराला घ्यावी लागते या पुस्तकांत रा. फाटक यांनीं तशी खबरदारी घेतल्यामुळें मनोरंजकपणांत कोठेंहि खळ पडल्याचें आढळून येत नाहीं. पुष्कळदां चटकदारपणा आणण्याचें भरांत चरित्रलेखक आपल्या पुस्तकांतील माहिती विश्वसनीय आणि साधार असावयाला पाहिजे, ही महत्वाची गोष्ट विसरतात. ही गोष्ट रा. फाटक यांनीं डोळ्याआड केली नसल्यानें त्यांच्या या पुस्तकांत विश्वसनीयता व चटकदारपणा या दोन्ही गुणांचे योग्य प्रमाणांत मिश्रण झालें आहे.”

सेवासदनापेक्षांहि रमाबाईंच्या ‘आठवणी’मुळें त्यांचें नांव चालू पिढीप्रमाणें पुढील पिढ्याहि घेत राहतील इतक्या उच्च दर्जाची मराठी भाषेची सेवा ‘आठवणी’ लिहून रमाबाईंनीं केली आहे.

# [ १३ ]
## स्वभावाची घडण.

" माझ्यामध्यें कुलीन घराण्या शिवाय स्वतःचा संबंध जुळण्यासारखें रूप, रंग, गुण किंवा विद्या यांपैकीं कांहींच नसून केवळ परमेश्वराच्या कृपा प्रसादानें मला ही जन्माची जोड मिळून माझें जीवित धन्य झालें आहे, " असें उद्गार स्वतःच्या ऑपरेशन पूर्वी रमाबाईनीं काढले आहेत. न्यायमूर्तीनीं शेवटीं वडिलांच्या म्हणण्यास संमति देतांना मुलगी कुलीन असावी अशी मुख्य अट घातली होती. कुलीनपणा हा रमाबाईंच्या स्वभावाची घडण करण्यांत महत्वाचा भाग आहे. लग्न करतांना कुल, शील, आणि वय पाहावे असें महाराष्ट्रांत म्हणत असतात. यांत वयाकडे महाराष्ट्रांत पूर्वीपासून दुर्लक्ष होत आलें आहे. हल्लींच्या नव्या सुधारणेच्या काळांत सुशिक्षितांत रूप आणि सुशिक्षितपणा याकडेच अधिक लक्ष देण्यांत येते. त्यामुळें वयाबरोबर कुल आणि शील लोकांना जुने पुराणे वाटणारे शद्ब झाले असून हल्लींच्या लग्न संबंधांत ह्या शद्बांचा उपयोग करणें भाषेंत आर्षप्रयोग करण्या इतकेंच कित्येक सुशिक्षितांना अनुचित वाटूं लागलें आहे. पण मुलींच्या किंवा मुलांच्या स्वभावाला इष्ट वा अनिष्ट वळण मिळण्यांत कुल आणि शील यांचा परिणाम होत असतो ह्यांत शंका नाहीं. कुलीनपणांत बालवयांत घडलेल्या संस्कारांचा समावेश होतो; व शील शद्बानें मुलींच्या किंवा मुलांच्या मनाचा स्वाभाविक कल व्यक्त होतो. लहानपणीं रमाबाईंच्या मनावर ईशभक्ती व पतिभक्तीचे संस्कार उत्कटपणानें झाले होते. त्यांचे वडील भगवद्भक्त होते आणि आई पतीला देव आणि गुरु मानणारी होती. ईशभक्तीच्या व पतिपरायणतेच्या संस्कारांबरोबरच हिंदू स्त्रियांच्या अंगीं असणारे भोळेपणाचे गुण रमाबाईंच्या अंगांत दिसून येतात. लग्न झाल्यानंतर पतीच्या बऱ्या वाईट स्वभावाचा परिणाम हिंदू

स्त्रियांच्या स्वभावाला वळण लावण्यास कारणीभूत होत असतो. रमाबाईनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें कुलीनपणाचें संस्कार झालेला त्यांच्या मनाचा मातीचा गोळा न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या हातीं आला. त्याला सुंदर मूर्तीचें स्वरूप देण्याचें कामीं न्यायमूर्तींनीं चिकाटीनें आणि शांतपणानें खटपट केली. आईबापांची वागणूक व पतीची वागणूक कितीही उत्तम संस्कार करणारी असली आणि मुलीचा स्वभाव संस्कारक्षम नसल तर हीं कारणें असून नसून सारखींच होतात. यामुळें मुलीची स्वाभाविक सद्प्रवृत्ति असावी लागते. रमाबाईच्या ठिकाणीं ही सत्प्रवृत्ति लहानपणापासून दृष्टीस पडते.

त्यांचा ईशभक्तीकडे लहानपणापासून ओढा होता. त्या लहानपणीं आपल्या ज्या गणपतीला हितगुज सांगत तो गणपति त्या चार पांच वर्षांच्या असतांना एका शास्त्रीबुवांनीं दिला होता. तो त्यांच्या देव्हाऱ्यांत कडेपर्यंत होता. या शिवाय त्यांच्या लहान वयांतील भक्तिपरायणतेची गोष्ट त्यांनीं 'मानस पूजा' या प्रकरणांत दिली आहे. हें प्रकरण 'आठवणीं'तून गाळलेले आहे. त्यांच्या आईला पुराणाहून आल्यावर ऐकलेल्या गोष्टी अंगणांत मुलांना भोंवतीं जमा करून सांगण्याचा नाद असे. एके दिवशीं रमाबाईच्या आईनें मुलांना ध्रुवाची गोष्ट सांगितली व त्यांत ध्रुवानें आपली माता सुनीति हिला मानसपूजा कशी करूं म्हणून विचारलें ती हकिगत सांगितली. तेव्हां रमाबाईनीं आईला मानसपूजा कशी करावयाची हें विचारून घेतलें. व दुसरे दिवशींपासून गणपतीची पूजा झाल्यावर रमाबाई स्वतः मानसपूजा करावयाला लागल्या. या मानसपूजेची हकिगत रमाबाईनीं पुढील प्रमाणें दिली आहे.

"दुसरे दिवशीं सकाळपासून मी रोज गणपतीची पूजा झाल्यानंतर पडके स्वयंपाकघर म्हणून जो एक भाग आहे तेथें जाऊन व दाराला आंतून कडी लावून घेऊन तुळशीवर स्वस्थ मनानें डोळे मिटून बसे व

आईनें सांगितलेल्या पद्धतीवर पूजा करण्याचा प्रयत्न करी. ही गोष्ट व मानसपूजेचा प्रकार माझी इतर भावंडे तेव्हांच विसरून गेलीं. त्यामुळें मी काय करते हें कित्येक दिवस त्यांच्या कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. फक्त आईलाच माहित होतें. परंतु ही गोष्ट पंधरा तीन वारांनीं माझ्याच भोळे-पणानें माझ्या भावंडांना कळली व तीं सर्वजण थट्टा करूं लागल्यामुळें कांहीं दिवसांनीं माझा तो क्रम सुटला. तो प्रकार असा. एके दिवशीं मी अशी पूजा करीत बसले असतांना मला वाटलें कीं, आज उदबत्तीचा वास अतिशय उत्तम येत आहे माझ्याप्रमाणेंच हा वास आईला आला कीं नाहीं असें मनांत आल्याबरोबर मी तशीच उठले व तडक स्वयंपाक घरांत आईकडे जाऊन तिला विचारलें कीं, आई तुला उदबत्तीचा वास आला काग ? किती चांगली आहे. नाहीं ! आई लागलीच समजली आणि मला म्हणाली कीं, खरंच चांगली आहे. फार चांगली आहे. तूं जा आपल्या कामाला कांहीं वाटलें तरी असें मध्येंच उठून येऊं नये. हें ऐकून मी आपल्या जागीं धांवत गेले. एवढें बरें झालें कीं, या दिवशीं हें माझें आईला विचारणें कोणी भावंडांनीं ऐकलें नाहीं. पण आणखी सात आठ दिवसांनीं एक दिवशीं असाच कल्पनेनें केलेल्या साखरभाताचा मला उत्तम वास आला. त्याबरोबर मी धांवत आईकडे गेले व तुला साखरभाताचा वास आला का म्हणून मोठ्या उत्सुकतेनें विचारलें. हे दिवस मे महिन्याचे असल्यामुळें पुण्यास शिकत असलेले माझे वडील भाऊहि यावेळीं घरीं आले होते. दोघी वहिणी सासरहून नुकत्याच आल्या होत्या व आम्ही लहान मुलें तर तेथेंच होतो. वर सांगितल्याप्रमाणें मी हें आईला विचा-रलेलें ऐकतांक्षणीं सर्व मंडळीं आईकडे धांवत आली. आईनें मला जा म्हणून खूण केली. ती कां केली हें जरी मला समजलें नाहीं, तरी मी आपल्या जागीं परत निघून गेलें. इकडे माझे भाऊ व वहिणी आईला विचारूं लागले कीं, आई साखरभात कसला ! ती हांसून म्हणाली कीं,

कांहीं नाहीं रे. ती उगीच कांहींतरी म्हणते. तुम्ही जा आपल्या कामाला तरी तीं ऐकेनात. हें पाहून आईनें मानस पूजेचा प्रकार थोडक्यांत सांगितला व आतां तिच्या पाठीस लागूं नका, ती रडेल, तिला चिडवूं नका असें बजावून सांगितलें, पण मुलेंच तीं. त्यांच्या कानावर अशी एकादी गोष्ट गेल्यावर ती कशीं बसणार ! सर्व मंडळी टाळ्या वाजवून मी कोठें आहे तें शोधण्यास निघाली व मी पुष्कळ रडेपर्यंत त्यांनीं मला चिडवून पुरेसें केलें. शेवटीं ही गोष्ट माझ्या वडिलांच्या कानापर्यंत जाऊन, तिला चिडवूं नका, तिच्या वाटेस गेलांत तर खबरदार, असें जेव्हां ते रागें भरलें तेव्हां सर्वांनीं मोठ्यांदां चिडवावयाचें व चेष्टा करण्याचें सोडून दिलें. तरी कित्येक वर्षें ही उदबत्ती व साखरभात मला त्रास देत होतीच. हा चिडविण्याचा प्रकार सुरू झाल्यामुळें चार दोन दिवसांतच माझा मानसपूजेचा क्रम सुटला. पण त्याचें स्मरण व गोडी मात्र अद्यापि मनांतून गेली नाहीं. ''

ही लहानपणापासूनची रमाबाईंची ईश्वरनिष्ठा आमरण कायम होती. न्यायमूर्तींच्या निधनानंतर त्यांनीं न्यायमूर्तींनाच आपले देव समजून त्यांची पूजा, अर्चा, मनन व चिंतन करण्यांत त्या वेळ घालवीत असत. 'माधव' या नांवाचा जप त्यांनीं आमरण चालविला होता. रमाबाईंची पतिभक्ति पाहून महात्माजींनीं धन्योद्गार काढले. महात्माजी या प्रसंगासंबंधानें आपल्या 'नवजीवन' या गुजराथी साप्ताहिकांत लिहितात, "वैधव्य ही हिंदु धर्माची शोभा आहे. एकदां ज्याच्याशीं आपण विवाहानें बद्ध झालों व ज्याला पति म्हणून ओळखूं लागलों त्याचा कर्मधर्मसंयोगानें कायमचा वियोग सहन करण्याची पाळी आली असतांहि, त्या गत देहाचें स्मरण म्हणजेच आनंद, एवढेंच नव्हे तर त्याच्या चिंतनांत आनंदानें दिवस कंठणें म्हणजेच अखंड पातिव्रत्य होय. हिंदुस्थानांतील हजारों विधवा याप्रमाणें वागून सर्वांच्या आदरास पात्र होऊन राहिल्या आहेत. कांहीं महिन्यापूर्वी श्रीमती रमाबाई रानडे यांना भेटण्यास जाण्याची संधि मला मिळाली होती. त्यांच्या

नेहमींच्या बसण्याऊठण्याच्या दिवाणखान्यांतच मला त्यांचें दर्शन घडलें. त्या दिवाणखान्यांतील अग्रभागीं एक कोच असलेला मी पाहिला. त्या कोचावर कै. न्या. रानडे यांची तसबीर ठेवलेली होती. त्यांतलें इंगीत मी मनांत समजलों. परंतु माझा समज बरोबर आहे कीं नाहीं याची खात्री करून घेण्यासाठीं मी रमाबाईंना म्हणालों, " ही तसवीर आपण कोचावर कशाला ठेविली ? " यावर त्या म्हणाल्या, " हा त्यांचाच कोच आहे. नेहमीं याच कोचावर बसणें होत असे. यासाठीं हा कोच खास त्यांच्या तसबिरीसाठीं राखून ठेवला आहे. " ते पवित्र शब्द ऐकून मी आनंदांत गर्क झालों व वैधव्याची शोभा मला अधिक अधिक समजूं लागली. अशा प्रकारच्या पतिव्रता रमाबाई हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं आहेत. " रमाबाई या तसबिरीपुढें बसून भागवत, तुकारामाचे अभंग, ज्ञानेश्वरी वाचीत असत. न्यायमूर्तींची पुण्यतिथी त्या पाळीतच, पण न्यायमूर्ती कैलासवासी बुधवारीं झाले तो दिवसहि त्या उपवास करून न्यायमूर्तींच्या चिंतनांत घालवीत.

ईश्वरावर निष्ठा असलेले माणूस सत्प्रवृत्त असतें असें डोळे मिटून सांगण्यास हरकत नाहीं. अशा माणसांत दोषच असेल तर तो भाबडे-पणाचा व भोळेपणाचा होय. हा भोळेपणा रमाबाईच्या अंगीं होता, पण न्यायमूर्तींनीं तो काढून टाकला. चातुर्मासाचे नियम करतांना उलट पति-भक्तीमुळें त्यांना एका वर्षीं न्यायमूर्तींच्या पायांचें तीर्थ रोज घ्यावें असें वाटलें व दुसऱ्यांदा रोज न्यायमूर्तींच्या पानांत जेवावयास बसावेसें वाटलें. पण ह्या गोष्टींत रमाबाईंना मोडून काढून न्यायमूर्तींनीं त्यांना विद्याभ्यासाचा नियम धरण्यास सांगितलें. असें रमाबाईंनीं ' चातुर्मासाचे नियम ' या अप्रकाशित प्रकरणांत लिहिलें आहे. त्यांचा स्वप्नावर विश्वास होता. ' करमाळ्याच्या दुखण्यां ' तील स्वप्न त्यांनीं ' आठवणीं ' त दिलेंच आहे. त्यांच्या आजारीपणाच्या शेवटच्या दिवसांत न्यायमूर्ती येऊन आप-णाला चल, तुझें काम संपलें असें सांगत आहे असें त्यांना भासल्याचें

देवदत्त यांनीं 'रमाबाईंच्या आठवणींत' लिहिलें आहे. १८८६ मध्यें त्यांचे वडील वारले. त्या वेळीं त्या हरिद्वाराहून परत येत होत्या. येतांना त्यांनीं वडिलांच्यासाठीं एक कलश भरून आणला होता तो वाटेंत फुटला. यामुळें वडिलांचें कांहीं वाईट झालें नसेल ना असें मनांत येऊन त्यांना चर्रर झालें व पुढें खरोखरींच त्यांची भीति खरी ठरली.

हा भोळेपणा सोडला तर ईशभक्तीमुळें येणारा प्रेमळपणा त्यांच्यांत पुरेपुर भरला होता. या प्रेमळपणाचें व्यक्त स्वरूप त्यांची पतिपरायणता, मुलांची आवड आणि अनाथांना उपयोगी पडण्याची उत्कट इच्छा या रूपांनीं व्यक्त झाल्याचें त्यांच्या चरित्रांत आढळून येतें. पतिभक्तीबद्दलचें वर्णन पुष्कळ झालें आहे. मुलांच्या आवडीचाहि मागें उल्लेख आला आहे; पण मुलांसाठीं त्या किती खस्ता खात याचें एक उदाहरण म्हणजे रा. नारायण-राव रानडे उर्फ नानू आजारी असतांना त्यानें खा खा करूं नये म्हणून यांनीं स्वतः खाणें सोडलें होतें होय. सौ. सखूताईवर तर त्यांचा जीव होता. त्या १९०७ सालीं वारल्यावर त्यांचा मुलगा देवदत्त याचें संगोपन त्यांनीं पोटच्या पोराहून अधिक केलें. देवदत्त हा त्यांना आई म्हणत असे व नेहमीं त्यांच्याभोंवतीं असे इतका रमाबाईंचा त्याला लळा लागला होता. दुसरा राजाराम, याचेंहि त्यांनीं पुत्रवत् संगोपन केलें. हा चमत्कारीक रीतीनें त्यांच्या ओटींत पडला. १९०७ च्या सुमारास रमाबाई मुंबईस असतांना राजारामास त्याची आई आफ्रिकेहून घेऊन आली. आफ्रिकेंत राजारामाचे वडिल नोकरीवर होते. राजारामाची आई अतिशय क्षीण झाली होती. तिनें गाडींतूनच रमाबाईंना खालीं येण्याबद्दल निरोप पाठविला. रमाबाई खालीं आल्या; राजारामाच्या आईनें राजारामास रमाबाईंच्या स्वाधीन केलें व त्यांचें प्राणोत्क्रमण झालें ! त्यांची मुलांची आवड, त्यांनीं सरकाराकडे पत्रव्यवहार करून येरवड्याच्या तुरुंगांतील मुलांना खाऊ वांट-ण्याची परवानगी घेतली यावरूनहि दृष्टीस पडते.

जशा प्रेमळ तशाच त्या निगर्वी व अभिमानी होत्या. १९१७ पर्यंत त्या दत्तक मुलाबरोबर एकत्र राहात होत्या; पण पुढें वाद उपस्थित झाल्यावर त्यांनीं सेवासदनाच्या जागेंत स्वतःकरतां घर बांधून त्या वेगळ्या राहूं लागल्या. या फारकतीच्या बाबतींत त्यांना झालेला त्रास त्या कधींहि बोलून दाखवीत नसत. सेवासदन संस्थेला त्यांच्यामुळें इतकें रूप आलें आहे; पण मिरविण्याची हौस त्यांच्यांत नव्हती. पुढें पुढें करणें हें त्यांच्या स्वभावाला मनापासून नको होतें. १९१७ सालीं मुलींच्या सक्तीच्या शिक्षणासंबंधानें पुण्यास निघालेल्या मिरवणूकींत त्या मोठ्या आग्रहानें चार पावलें गेल्या व परत घरीं जाऊन बसल्या.

त्यांनीं आपल्या स्त्रीधनाची व्यवस्था आपल्या मागें न्यायमूर्तींच्या पत्नीला साजेल अशीच केली. त्यांना वापरावयाला दिलेलें लोणावळ्याचें घर व त्यांच्या खर्चाकरितां ठेवलेले वीस हजार रुपये त्यांच्या मागें न्यायमूर्तींच्या मृत्युप्रमाणें त्यांच्या दत्तक मुलाकडे गेले. त्यांचे स्त्रीधनाचे पंधरा हजार रुपये होते. त्यांतून दहा हजारांचें घर बांधून तें त्यांनीं सेवासदनाला देऊन टाकले आहे. एक हजार रुपये राजारामाला दिले असून बाकीचे दागिने देवदत्ताला दिले आहेत असें समजतें.

चांगले गुण असले तरी ते विकास पावण्यास अनुकूल वातावरण व स्वयंभू शक्ति असावी लागते. ह्या दोन्हीची जोड रमाबाईंना मिळाल्यामुळें त्यांच्या चरित्राचा सुगंध आज भरतखंडभर पसरला आहे.

# मरावें परि किर्तिरूपें उरावें

कोणाहि विभूतीचें चरित्र लिहीत असतांना शेवटचा प्रसंग लिहिण्यास जितके लांबणीवर टाकावे तितकें टाकून त्याच्या आयुष्यांतील अनेक प्रसंगांचेच वर्णन करीत बसावेंसें वाटत असते. पण कोणत्याहि गोष्टीला शेवट असतो. त्याप्रमाणें या वाटण्यालाहि मर्यादा असतेच असते. त्याप्रमाणें आतां रमाबाईच्या शेवटच्या दिवसाची हकिकत लिहिण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. पण तें काम सेवासदनच्या लेडी सुपरिंटेंडेंट श्री. जानकीबाई भट यांनीं ता. ४ मे १९२४ च्या सुबोधपत्रिकेच्या अंकात केलें असल्यामुळें माझ्या वरील ओझें कमी झालें आहे. श्री. जानकीबाई भट 'सुबोध पत्रिका' कारांना लिहितात, " आपलें ता. २८।४।२४ चें पत्र पोचलें. त्यांच्या संबंधीं शेवटल्या पंधरा दिवसांतील कांहीं आठवणीच्या गोष्टीविषयीं लिहावें म्हणून आपण लिहिलें; त्यांच्या सेवेंत कांहीं शेवटलें दिवस जावेंत म्हणून मी मुद्दाम मुंबईहून आज १५।२० दिवस आलेली होतें. माझ्या राहण्यानें त्यांना फार समाधान वाटलें व त्या आमच्या आग्रहामुळें औषधपाणी व थोडेसें दूध, फळांचा रस वगैरे नियामितपणें घेऊं लागल्या होत्या. पोटांतून इच्छा नसतांनाहि आमच्या इच्छेला मान देऊन या सर्व गोष्टी त्या करीत असत. किडनीज व आतडी बिघडली असल्यामुळें त्यांना पोटांत व पाठींत अतिशय दुःख होत असे. पण तें दुःख त्या अतिशय शांतरीतीनें सहन करीत असत. व जेणेकरून सान्निध्यांत असलेल्या मंडळींना समाधान वाटेल अशाच तऱ्हेची वृत्ति त्यांनीं अखेरपर्यंत कायम ठेविली होती. दुखण्यामुळें माणूस अत्यंत त्रासिक व चिडखोर बनतें व त्या सारखी त्यांची दुखण्याची स्थिती होतीहि. तरी शांततेनें दुःख सहन करण्याची त्यांची कमाल होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमची संस्था मोठी असल्यामुळें त्यांच्या भेटीस येणाऱ्या

मंडळींचा—शिक्षक, शिक्षकिणी व विद्यार्थिनी यांच्या येण्याचा फारच त्रास होत होता; पण त्याबद्दल कधींही कुरकुर किंवा असमाधान त्यांनीं व्यक्त केलें नाहीं. उलट जें मनुष्य येईल त्याला पांच मिनिटें तरी पाहून जाऊं द्या असें त्या आम्हांस व घरांतील मंडळीस सांगत. "मंडळी भक्तीनें येतात त्यांस मनाई करूं नका" असें त्या वरचेवर आम्हांस सांगत; पण आम्हीच त्यांना त्रास नको म्हणून कांहीं मंडळीस मनाई करीत असूं; पण त्यांना तें कधींही आवडलें नाहीं. संस्थेच्या हितचिंतक डॉक्टरांनीं दुखणें असाध्य आहे अशीच परीक्षा केली होती, परंतु त्यांच्या एका मैत्रिणीनें वैद्याचें औषध घेण्याची त्यांना सल्ला दिली व त्याप्रमाणें त्यांचें मनहि तयार झालें; परंतु हे चांगले चांगले डॉक्टर सोडून मी वैद्याचें औषध घेतें यामुळें डॉक्टर लोकांचीं मनें दुखावतील व ते माझी मूर्खांत गणना करतील म्हणून त्यांनीं अशा स्थितींतही डॉक्टरांची सल्ला घेऊन वैद्यांचें औषध सुरू केलें. वैद्यास औषध बदलतांना बजावून सांगितलें कीं, 'ही डॉक्टर मंडळी माझी अत्यंत काळजी घेणारी व प्रेमाची आहेत. तेव्हां तुम्हांस रोग बरा करण्याची खात्री असेल तरच या मंडळींचें मन मोडून मी तुमचें औषध घेईन." मनाचा किती थोरपणा हा! कीं दुसऱ्याचें मन होतां होईल तों दुखवावयाचें नाहीं. त्यांच्या इच्छेनुसार डॉक्टरांनीं वैद्याचें औषध घेण्याची परवानगी दिली; पण अखेरीस वैद्य बुवांच्याहि प्रयत्नास यश आलें नाहीं!! परंतु शांतपणानें कष्ट सोसण्याची त्यांची कमालच दिसून आली. व त्यांनीं वैद्यांनीं दिलेलीं कडु औषधें सुद्धा तशा स्थितींत निमूटपणें घेतलीं. आधीं पांच दिवस त्यांनीं आपल्या इस्टेटीचें वुईल करून ठेविलें होतें. वुईल केल्यानंतर मात्र त्यांची वृत्ति फार उदास दिसूं लागली होती. तरीपण ती सतत झांकण्याचा त्या प्रयत्न करीत असत. शेवटपर्यंत कोणाहि नातलगा-जवळ त्यांनीं निराशेचे उद्गार काढले नाहींत. मरणाचे आदले दिवशीं मात्र त्या कोणाशींही कांहीं एक बोलल्या नाहींत. अखेरपर्यंत वृत्ति अत्यंत समा-

धानी अशीच होती. प्रार्थना समाजांत स्त्रियांचे मेळ्याचे दिवशीं बोर्डिंगातील मुलींना घेऊन जा हें सांगण्यास त्या विसरल्या नाहींत. ”

ता. २६ एप्रिल १९२४ पासून ‘ मरावें परि किर्ती रूपें उरावें ’ या समर्थांच्या उक्ती प्रमाणें रमाबाई आतां कीर्ति देहानें महाराष्ट्रांत वावरत आहेत. त्यांच्या कीर्तिदेहाला कोणतें स्वरूप द्यावयाचे ह्या बाबत अनेकांच्या खटपटी चालू आहे. व त्याच्या नांवाचा सेविकाश्रम काढण्याची ‘ सेवासदन सोसायटीची खटपट चालू आहे. त्यांच्या नांवानें गांवागांव स्त्री शिक्षणाच्या शाळा काढाव्या अशाहि कांहींनीं सूचना केल्या आहेत. प्रत्येक स्त्री जेव्हां स्त्रियांना सुशिक्षित करण्याचें काम हातीं घेईल तेव्हां स्त्री शिक्षणाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटेल असें प्रो. कर्वे यांनीं आपल्या आत्मवृत्तां ’त उद्गार काढले आहेत. हें कार्य महाराष्ट्रांच्या हातून व्हावयाचे असेल तर महाराष्ट्रांतील प्रत्येक स्त्रीनें रमाबाई होणें हाच उपाय आहे आणि हेंच रमाबाईचें खरें स्मारक होणार आहे. रमाबाईच्या चरित्राचें समालोचन करीत असतांना ती गौर, बुटकी व तेजस्वी चेहऱ्याची मूर्ती डोळ्यापुढें उभी राहून.

‘ धन्य धन्य म्हणे लोक, सत्क्रिया करतां बरी ’

हें सामर्थ्याचे उद्गार प्रत्येकांच्या तोंडून आपोआप बाहेर पडल्या शिवाय राहणार नाहींत.

IRBK-0100329

## रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टचीं बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोयांची रु. ५; आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. ३॥; घड्याळाचा छेडा रु. ३.

### केंस काळे करण्याचा मावण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ वड्यांच्या बॉक्सला रु. १॥

### इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्याप्रमाणें असून, टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यांसाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४

मगनलाल के. आणि कं० अमृतवाडी, गिरगांव मुंबई.

---

पृष्ठसंख्या ४२० | किंमत २-८. — ऋग्वेदी कृत — कापडी बांधणी | ट. ख. निराळा.

## आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास.

(सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति)

सहा तीनरंगी चित्रें व प्राचीन हिंदुस्थानचा नकाशा असून महाराष्ट्राच्या परिचयाचे विद्वान लेखक श्री. वासुदेव गोविंद आपटे यांची भारदस्त प्रस्तावना.

या पुस्तकांत आम्ही (एका वर्षांत) पाळींत असलेल्या एकंदर ४३ सणांची माहिती आली असून, तें वाचल्यावर हिंदुधर्माचें रहस्य काय आहे हें कळून येईल. समाजाची उन्नति धार्मिक बलावर कशी अवलंबून आहे व राष्ट्रोद्धाराच्या कामीं या सणांसारखे प्रसंग कशा रीतीनें उपयोगांत आणतां येतील याचें मार्मिक विवेचन सर्व मतांच्या व ज्ञातींच्या बंधुभगिनींस मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

व्ही. मभा आणि कंपनी, भटवाडी, गिरगांव मुंबई

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नं. ३२९ [illegible]

खऱ्या मोत्यांशीं टक्कर देणारीं पाणीदार
टिकाऊ व जड

# इमिटा पर्ल्स.

कुड्यांकरितां १४ मोत्यें रु. ३, नथीचीं १७ मोत्यें रु. ४, बाळीचे तीन दाणे रु. १, इतर दागिन्याकरितां शेंकडा रुपये २ .

खऱ्या सोन्यांत बांधलेले घाटदार

## ❀ तयार दागिने. ❀

नथ रु. १२, कुडीं रु. ८, बाळी रु. ५, लवंगा रु. ६, बांगड्या रु. १५, कॉलर रु. २५, चौकुडे रु. ४.

खऱ्या जवाहिराप्रमाणें चकाकणारीं

## * कृत्रिम रत्नें. *

हिरे, माणिक, पाच, पुष्कराज, शनी वगैरे वापरून तयार केलेले कुडीं जोड रु. १८, अंगुठी रु. १२, नाकांतील फुली रु. ३, स्टारबुट्टी रु. ८, लोलकबुट्टी रु. १०, कॉलरचा स्क्रुबटन रु. ५, कॉलर पीन रु. ६, सारी पीन रु. ८.

## ❀ गिलिटाचे दागिने. ❀

गोट रु. ८, पाटल्या रु. ७, बांगड्या रु. ५, अंगुठी रु. २, सह्ले रु. २॥, बोरमाळ रु. १०, तोडे रु ८, छेडा रु. ५, शर्ट बटन सेट रु. ५

बॉम्बे युनिव्हर्सल एजन्सी,
आंबेवाडी, गिरगांव मुंबई.